१७।०८
मराठी ग्रंथालय
कादंबरी
क्रमांक— १०४

॥ ...प्रसन्न ॥

...पुस्तकमाला.

# कमलिनी.

१४४५७

[ सामाजिक कादंबरी. ]

—:०:—

लेखक

रघुनाथसुत.

014457

मुद्रकः-गंगाधर गोविंद ...
४९४ बुधवार पेठ, ...
भारतभूषण प्रेस.

—:०:—

प्रकाशक

चिंतामण हरि अष्टेकर.

४०० सदाशिव पेठ, पुणें.

अष्टेकर आणि मंडळी.

किंमत एक रुपया.



॥ श्री ॥

मनोरंजक पुस्तकमाला.

पुस्तक २ रें.

# कमलिनी.

[ सामाजिक कादंबरी.

---

लेखक


रघुनाथसूनु.


—०:—:०—


मुद्रक—गंगाधर गोविंद गोंधळेकर. ४९४ बुधवार पेठ.

भारतभूषण प्रेस, पुणें.

—:०:—

आवृत्ति पहिली.

प्रकाशक

चिंतामण हरि अष्टेकर.

४०० सदाशिव पेठ, पुणें.

अष्टेकर आणि मंडळी.

१८३३. सन १९११ इसवी.

किंमत एक रुपया.

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टा
प्रमाणें नोंदून प्रकाशकांनीं सर्व हक्क
स्वाधीन ठेविले आहेत

# प्रस्तावना.

इंग्रजी शिक्षणांचा प्रसार झाल्यानंतर आमच्या समाजांत जी क्रांति झाली तिचे प्रौढविवाह, प्रेमविवाह, जातिभेदाचा नाश इत्यादि अनेक घटक आहेत. इंग्रजी कादंबऱ्यांच्या वाचनानें त्यांत आढळून येणाऱ्या प्रेमाच्या मनोरम छायेला भुलून आपल्या समाजांतहि असले पाश्चात्य चाळे रूढ व्हावे अशी इच्छा होणें स्वाभाविक आहे. परंतु आमच्या पुरातन पिंडाला असले प्रकार मानवणें शक्य नाहीं व ते जबरदस्तीनें लादण्याचा प्रयत्न केल्यास त्यापासून कुटुंबसुखाचा नाश झाल्याशिवाय खास रहाणार नाहीं. याबद्दलचें शब्दचित्र रेखाटण्याचा या लहानशा कादंबरींत प्रयत्न केला आहे. पति व पत्नीचा आपसांतील व्यवहार जितका जास्त सात्विक आणि निर्दोष असेल तितका समाजाला हितकरच आहे व तसा असावा असेंच कोणीहि समाजहितैषी सांगेल.

या कादंबरींतील कांहीं भाग कित्येकांस अगदींच अशक्य वाटेल; पण हल्लींच्या समाजाचें निरीक्षण करणारास तो अतिशयोक्तींत वर्णिलेलें सत्यच आहे हें तेव्हांच समजून येईल. प्रस्तुत प्रयत्न कितपत सिद्धीस गेला आहे हें पहाण्याचें काम रसिक व मार्मिक वाचकांचें आहे.

पुणें, मित्ती मार्गशीर्ष शुद्ध १ शके १८३३.

लेखक.

## अनुक्रमणिका.


| प्रकरण. | विषय. | पृष्ठ. |
| --- | --- | --- |
| १ | मर्तकाळची स्मृति ... ... ... ... | १ |
| २ | प्रेमभंगाचें नैराश्य ... ... ... ... | ६ |
| ३ | दहा वर्षांपूर्वीचें प्रेमचिन्ह ... ... ... | १४ |
| ४ | मुकुंदराव व रुक्मिणीबाई ... ... ... | १८ |
| ५ | प्रभाकराची हकीकत ... ... ... ... | २६ |
| ६ | तीर्थयात्रेनंतर ... ... ... ... | ३२ |
| ७ | परिचारिकेचा प्रताप ... ... ... ... | ४३ |
| ८ | एक दुर्दैवी कैदी ... ... ... ... | ५१ |
| ९ | निराशेंत आशा ... ... ... ... | ५८ |
| १० | पुढचा प्रयत्न ... ... ... ... | ६२ |
| ११ | दुसरा दिवस ... ... ... ... | ७० |
| १२ | चोर समजून संन्यासी धरला ... ... ... | ७३ |
| १३ | आकस्मिक भेट ... ... ... ... | ७८ |
| १४ | देवळांतल्या तीन व्यक्ति ... ... ... | ८४ |
| १५ | विकारजागृति ... ... ... ... | ८६ |
| १६ | आरोपाची शाबिती ... ... ... ... | ९१ |
| १७ | कैद्याचा मनस्ताप ... ... ... ... | ९४ |
| १८ | उलगडा पडला ... ... ... ... | ९७ |
| १९ | उलगडा पडला ( पुढें चालू ) ... ... ... | १०३ |
| २० | परसांतल्या दोन व्यक्ति ... ... ... | १०६ |
| २१ | आनंदीबाई ... ... ... ... | १११ |
| २२ | सहज योगायोग ... ... ... ... | १२० |
| २३ | अंतःशुद्धि ... ... ... ... | १२७ |
| २४ | संबंधाची थोडीशी ओळख ... ... ... | १३४ |
| २५ | धिक्कारपूर्वक निषेध ... ... ... ... | १४१ |
| २६ | पत्रदर्शन ... ... ... ... | १५१ |
| २७ | आकस्मिक घात ... ... ... ... | १६० |
| २८ | ओळख पटली ... ... ... ... | १६८ |
| २९ | माधवराव आणि आनंदी ... ... ... | १७३ |
| ३० | आनंदीची पूर्वकथा ... ... ... ... | १७७ |
| ३१ | इकडे काय झालें ? ... ... ... ... | १८८ |

॥ श्री ॥

# कमलिनी.

## प्रकरण पहिलें.

## गतकालची स्मृति.

मधुपुर नांवाच्या एका लहानशा खेड्याच्या उपान्तभागीं एक लहानशी नदी असून तिच्या कांठावर दोहीं बाजूंस अत्यंत रम्य अशी हिरवीचार क्षेत्रराजी पसरलेली होती. हें खेडें रुद्रगडच्या जमीनदारींतलें असून येथील लोकांची प्रथमपासून एकंदर टापटिपी-विषयीं विशेष प्रसिद्धि असे. ह्मणून या गांवाच्या प्रत्यक्ष दर्शनापूर्वींच याच्या बाह्यप्रदेशाच्या व्यवस्थितपणावरून येथें येऊं इच्छिणाराचें एकदम अनुकूल मत झाल्याखेरीज रहात नसे. या गांवासंबंधानें विशेष माहिती प्रसंगोपात्त सांगण्याचा आमचा विचार असल्यामुळें वाचकांना मधुपुरासंबंधी सकृद्दर्शनींच होणारी जिज्ञासा कांहीं काळ तरी दाबून ठेवणें भाग आहे.

वर सांगितलेल्या नदीच्या कांठीं एके दिवशीं संध्याकाळीं एक युवति मंद मंद गतीनें एका मनोहर शेतांतून फिरत होती. दिवस अश्विन महिन्यांतील पौर्णिमेच्या थोडे नंतरचे असल्यामुळें पिकें अगदीं फळास आलीं होतीं. जिकडे तिकडे हिरव्या पिंवळ्या रंगानें मिश्रित झालेल्या क्षेत्रराजींखेरीज कांहींच दिसत नव्हतें. संध्यासमय असल्यामुळें अस्तास जाणाऱ्या सहस्रांशूचीं निस्ताप किरणें सृष्टीच्या बहारीच्या सौंदर्याशीं होणाऱ्या किंचित् वियोगामुळें जातां जातां सृष्टीचें चुंबन घेत असल्याचा भास होत होता. प्रातःकाळपासून

भोगलेल्या सुखाचा कालचक्राला अनुसरून होणारा विरह कांहीं काळपर्यंत लांबणीवर टाकावा एवढ्या हेतूनेंच कीं काय सूर्य अस्ताचलावर रेंगाळत होता. दिवसभर श्रम करणाऱ्या अखिल प्राणिमात्रांला विश्रांति देणारी निशादेवी आपल्या नाथासह पूर्व दिशेकडून येत चालली होती. सूर्यकिरणांच्या पल्ल्याबाहेर ग्रहतारादि मंडळी हळूहळू आकाशपटावर चमकूं लागली होती. सायंकाळचा समय वास्तविक सर्वांनाच आनंददायक असायचा. पण वर लिहिलेल्या युवतीच्या मनावर अशी कांहीं विलक्षण विषण्णतेची छाया पसरली होती कीं, तिला आतां तिच्या सभोंवतीं चाललेल्या क्रमिक जगद्व्यापाराच्या अल्पांशाचीहि दाद नव्हती. विसांवा घेण्याकरितां उत्सुक झालेल्या बैलांसह आनंदानें दिवसाचें काम संपवून आपली सोत्कंठ वाट पहाणाऱ्या प्रियजनांच्या भेटीच्या कल्पनेनें उल्हासित झालेले शेतकरी, वत्सांच्या दिवसभर झालेल्या वियोगानें पान्हा फुटून घराकडे जलद पावलें टाकीत चाललेल्या गाई, त्यांच्या मागून आपल्या सवंगड्यांसह थट्टाविनोद करीत चाललेले गोपाळबाळ, यांच्या मनांत अस्तकालीन शोभेनें अत्यानंद झाला होता, पण वरील युवतीच्या मनांत त्यांचा यत्किंचित्‌हि ठसा उमटला नाहीं.

सगळे लोक घरोघर परत जात असतां या युवतीनें एकटेंच गांवापासून बऱ्याच अंतरावर फिरावें हीहि आश्चर्य वाटण्याजोगी गोष्ट. तिच्या मुखावर पसरलेली व अंतर्वृत्तीची साक्ष देणारी विमनस्कता तिच्या एकंदर बाह्यवेषावरून तरी कळण्यासारखी नव्हती. कारण तिच्या अंगावर असलेलीं वस्त्रें भूषणें हीं खरोखर इतर स्त्रीजनांनीं मत्सर करण्यासारखीं होतीं. शिवाय बरोबरीच्या मैत्रिणींमध्यें तिच्या स्वरूपाचा उपहास होईल अशीहि स्थिति नव्हती. तिचें सौंदर्य शेंकडों स्त्रियांच्या नटण्यामुरडण्यानें आलेल्या उसन्या रमणीय-

तेला लाज आणण्यासारखें होतें. साधारण स्त्रियांनीं ज्या सुखांची इच्छा करावी तीं सर्व सुखें तिला अनुकूल असल्याचें कोणाहि पहाणारास स्पष्ट दिसलें असतें व या युवतीच्या सुखाबद्दल इतरांनीं मत्सरहि केला असता. परंतु इतकीं सर्व सुखें असतांहि आज तिच्या मनाची वृत्ति फार चमत्कारिक झाली होती. मनुष्याच्या अंतरंगाच्या उल्हास–विषाद–वृत्तीवर बहिरंगाविषयीं प्रेम अथवा उदासीनता अवलंबून असते, या नियमाला अनुसरूनच सायंशोभेमुळें तिच्या मनावर यत्किंचित्‌हि आल्हादकारक परिणाम घडून आला नाहीं. अस्तगिरीवर असलेला रवि युवकयुवतींना त्यांच्या प्रेममय एकान्तकालाचा सूचक ह्मणून प्रिय वाटावयाचा; पण त्याच्या उलट परिणाम वरील युवतीवर घडत होता. सायंकाळच्या शीतल वायूच्या मंद मंद लहरी दिवसभर तापामुळें कोमेजलेल्या वृक्षलतांना सचेतन करीत असूनहि या रमणीच्या अंतःकरणावर त्यांचा चित्तवृत्ति निश्चेष्ट करण्यामध्यें परिणाम होत होता. असो. अशा उद्विग्न स्थितींत ती फिरत असतां तिच्या अंतःकरणांतील खळबळीचा लोंढा अत्यंत अस्फुट व तुटक शब्दानें बाहेर पडूं लागला. तिच्या ओंठांना स्फुरण मिळालें. "गेल्या काळच्या गोष्टीशीं हल्लींच्या परिस्थितीची तुलना करणें मूर्खपणाचें होणार नाहीं का? स्त्रीजातीचा स्वभाव अस्थिर अशा तऱ्हेची ओरड पुराणमुनींपासून होत असतां आपल्या प्रेमाच्या स्थैर्यानें स्त्रीजातीच्या सत्यनिष्ठेची प्रतीति दाखविण्याचा निश्चय गतकाळांत जाऊन सांप्रतच्या स्थितींत ती गोष्ट ह्मणजे नुसती आठवण काढून दुःख करीत बसण्यापुरतीच होऊन बसावी ना?—त्या काळची स्थिति आठवली ह्मणजे जिवाचा दाह होऊं लागून त्याचें अस्तित्व देखील नकोसें होतें. ज्याला एकदां माझ्या बाबांनीं वचन दिलें त्याची फसवणूक कालगतीनें व्हावी? पण छे!! झाली गोष्ट ही

माझ्या स्वाधीनची का होती? पावसाळ्यांत सर्व आकाश स्वच्छ असतां ज्याप्रमाणें एकाएकीं चोहोंकडून सजल मेघांचा दाट पडदा पडून सृष्टीवर त्यांची अंधकारमय भेसूर छाया पसरावी त्याप्रमाणेंच घडून आलेल्या गोष्टीच्या वेळीं जर आमच्या दुर्दैवाच्या मेहेरनजरेनें संकटांची परंपरा ओढवली तर मग आशेच्या नाशाबद्दल— भवितव्यतेंतील सुखाचे काळीं दिसणारीं आनंदमय स्वप्नें जगाच्या घडामोडींत खोटीं ठरल्याबद्दल— रडत बसण्यांत तरी अर्थ काय?"

या वेळीं सायंकाळच्या धूसर वर्णाचा लोप होत जाऊन रात्र चोहोंकडे बरीच पसरली होती. तथापि अजूनहि अनन्त आकाशाच्या पश्चिमभागावर पिंवळ्या सूर्यकिरणांची प्रकाशमय अंधुक छटा दिसत होतीच. गांवांतील घरांमध्यें लावल्या गेलेल्या व चुकलेल्या प्रवाशाच्या निराशेमध्येंहि आपल्या अस्तित्वानें गांवाचें सान्निध्य दाखवून आनंदित करणाऱ्या दिव्यांच्या ज्योती आतां लांबच्या पल्लयावरून दिसूं लागल्या होत्या.

आसपास पसरणाऱ्या अंधारामुळें त्या स्त्रीला भय वाटलें नाहींच; उलट अंतरंगाच्या विषण्णतेशीं समधर्म असलेल्या संध्यारागमिश्रित निशादेवीच्या भेसूर रूपामध्येंच तिला प्रेम वाटूं लागलें होतें. निशाधर्माला अनुसरून सर्व विश्वावर पसरणारी व रात्रीं भयानक स्वरूपाला मदत करणारी शांतता ही जिकडे तिकडे पसरूं लागली होती व या शांततेची गंभीरता अधिक तीव्र करण्याकरितांच कीं काय मधून मधून कौशिक मुनीचा भयप्रद व तुटक घूत्कार जवळपासच्या एखाद्या जुनाट वृक्षामधील ढोलींतून अंतरिक्षांत दुमदुमूं लागला होता. त्यांतच एखाद्या कोल्होबाची लहानशा आरोळीची भर पडून भीषणता अधिकच दुणावत होती. परंतु जिची वृत्ति वरच्यासारख्या विचारांमध्यें गर्क झाली होती तिला

या सर्व प्रकाराची दाद नव्हती यांत नवल काय?

यांप्रमाणें ती आपल्या विचारांत गर्क असतां आणखी किती वेळ तिला आपल्या गृहकर्माची आठवण झाली नसती कोणास ठाऊक? पण इतक्यांत दुरून एक व्यक्ति या स्त्रीच्या दिशेनेंच झपाट्यानें येत होती. ही व्यक्ति येत असल्याचेंहि त्या युवतीला अर्थातच भान नव्हतें. या व्यक्तीनें थोडें जवळ येतांच आपल्या सवेग गतीला बरेंच शिथिल केलें व अगदीं सावकाश नकळत ती त्या युवतीच्या पाठीशीं येऊन उभी राहिली. क्षणैक या स्थितींत गेल्यावर त्या व्यक्तीनें त्या रमणीच्या पाठीवर थाप मारली. या आकस्मिक झालेल्या स्पर्शानें त्या युवतीला स्वस्थितीचें भान आलें. एकदम चपापून ती दहापांच पावलें बाजूला सरून मागें वळली.

"कमलिनी, आज आपलें चित्त या रात्रीच्या चांदण्याची शोभा पहाण्यांत गुंग झालें आहे वाटतें? आपल्या चांदण्याची पांढरी शुभ्र पैठणी नेसवून वायूच्या साहाय्यानें सृष्टिसतीशीं क्रीडा करणाऱ्या चंद्राची शोभा पहात असतां आमची, घराची व बाळ मकरंदाची आठवण कशाला होणार?"

आपल्या पतीचा परिचित शब्द ऐकतांच कमलिनीला धीर आला. तिच्या वृत्तीची उदासीनता व विचारांची दिशा पार नाहींशी होऊन तिला आतां रात्रीचें प्रमाण किती वाढलें आहे हें कळलें. किती वेळपर्यंत आपण शेतांत आहों याची तिला जाणीव उत्पन्न झाली. आपल्याला पति बोलाविण्याला आला या चमत्कारिक प्रसंगापेक्षांहि बाळ मकरंदाला आपण किती काळपर्यंत घरीं टाकून आलों या कल्पनेनें तिची चित्तवृत्ति फारच चंचल झाली. प्रथम स्पर्शाबरोबर परपुरुषाच्या कल्पनेनें ती दूर सरली, पण आपल्या सुखासाठीं अहोरात्र झटणाऱ्या आत्ममय वृत्तीच्या प्रेमळ पतीच्या

विनोदपर शब्दानें तिच्या मनाला किंचित् समाधान झालें. ती मनांत बरीच ओशाळली होती. घरीं जाण्याच्या इच्छेनें ती पतीजवळ आली व लडिवाळपणानें तिनें पतीच्या स्कंधावर आपला कोमल बाहु टाकला व " आतां घरीं चलायचें गडे? बाळ वाट पहात असेल " असे शब्द ती बोलली. दोघेंहि चंद्रिकाप्रकाशांत दिसणाऱ्या पुसट पायवाटेवरून गांवाकडे जाऊं लागलीं.

आकाशांत यावेळीं चंद्र क्षितिज सोडून थोडा वर आला होता. त्याच्या किरणांचा प्रकाश अजून जितका लख्ख पडावा तितका पडला नव्हता. त्यामुळें आसपासचे डोंगर, उंच झाडें, खडक, शेतें, यांची एक अस्पष्ट अशी रूपरेषामात्र दिसत होती. हवेंत बराच गारवा असून चोहोंकडे प्रशांत, गंभीर व निश्चल असें उदात्त सृष्टिस्वरूप पहाणाराच्या मनावर उदात्त विकारांचा उद्भव केल्यावांचून रहात नव्हतें. जवळच वाहणाऱ्या नदीचा खडकाळ प्रदेशांतून येणारा ध्वनि, रातकिड्यांची किरकिर, खुबडाकोल्ह्यांची ओरड यांमुळें त्या शांततेंत भंग उत्पन्न होत होता. आकाशांत असंख्य तारांची एकच गर्दी झाली असून खालीं घराजवळ एकमेकांशीं प्रेमालाप करीत असलेल्या प्रणयी दंपत्यावर अत्यंत कुतूहल दृष्टीनें त्या पहात असाव्यासा भास होत होता. अशा रम्य निशाकालीं माधव व कमलिनी घराच्या अंगणांत आलीं तोंच बाळमकरंदानें रांगत रांगत येऊन "आई–आई" करीत आपल्या मातेचे पायाला मिठी मारली.

---

## प्रकरण दुसरें.

## प्रेमभंगाचें नैराश्य.

वरील जोडपें घरीं येण्यापूर्वींच थोडा वेळ एक नवखा माणूस

कमलिनीच्या घरून चवकशी करून गेला होता. त्याची चौकस बुद्धि पाहून व त्याला असलेली पूर्वीची कमलिनीविषयींची माहिती ऐकून त्या घरच्या प्रत्येकाला आश्चर्य वाटत होतें. कमलिनीचें लग्न माधवाशीं झालें असल्याचें ऐकतांच त्या पुरुषाला एकाएकी सखेदाश्चर्य वाटलें ही गोष्टहि त्या घरच्या मंडळीच्या लक्षांत आल्यावांचून राहिली नाहीं. संध्याकाळ बरीच झाली असल्यामुळें त्यांनीं त्या तरुणाला रात्रीं आपल्या येथें रहाण्यास सांगितलें, परंतु त्याची चित्तवृत्ति बावरली असल्यामुळें त्याला त्या घरीं आतिथ्य घेण्यास रहावेंसें वाटेना ! त्याचवेळेस वर सांगितलेलें कमलिनीचें सुंदर बालक त्याच्या दृष्टीस पडलें. कमलिनीच्या व माधवाच्या एकमेकां-विषयींच्या विवाहाचें व तदनुसारी अनुरागाचें तें प्रत्यक्ष प्रमाण दृष्टीस पडतांच त्याच्या हृदयाला द्रव आला व त्या बालकाला उचलून घेऊन त्यानें त्याचें बऱ्याचदां चुंबन घेतलें. त्या बालकाला उद्देशून त्यानें कांहीं वाक्यें उच्चारलीं, परंतु त्यांचा संदर्भ घरच्या मंडळीच्या लक्षांत न आल्यामुळें त्यांना हा कोणी वेडा असावा असें वाटलें. परंतु वेषावरून व एकंदर चालचर्येवरून त्याच्या तुटक वाक्यांनीं होणाऱ्या वेडेपणाच्या समजुतीला आधार मिळत नव्हता. त्यानें एकदां सर्व घराकडे पाहिलें—आसपासच्या प्रदेशाकडे एकवार नजर टाकिली व अनन्त विश्वाची व्यवस्था सुरळित चालविणाऱ्या जग-न्नियंत्याला उद्देशून आकाशाकडे दृष्टि लावली !! प्रदोषकाळीं सर्वत्र धूसर रंगाचा दाट पडदा पडला असून आकाशांत एकदोनच दिव्य तारे प्रकाशत होते. त्याप्रमाणें गतकालच्या सुखकल्पनांच्या निरासानें उत्पन्न झालेली कृष्णवर्ण निराशा त्याच्या मोहक मुखावर पसरून त्यांत चमकणारें प्रेममय नेत्रद्वय फारच सुंदर भासत होतें. नभस्तलावर एकतान झालेल्या त्याच्या डोळ्यांची चमक पा-हून हा कोणी तरी दिव्यदृष्टीचा सिद्ध पुरुष असावा असेंहि

त्या सेवकवर्गाला वाटल्यावांचून राहिलें नाहीं. "प्रभो, हा सगळा तुझ्या इच्छेचा खेळ !!" असे उद्गार त्याच्या तोंडून नकळत बाहेर पडले व त्याच्या आवाजांतील कारुण्यमय कंप–सद्गदित अंतःकरणामुळें येणारा मंद स्वर व सहज शब्द यांमुळें कमलिनीच्या घरच्या मंडळीच्या चित्तावर त्यांचा ठसा जास्तच खुलून उठला. त्यांना या वाटसरूविषयीं फारच सहानुभूति व प्रेम वाटूं लागलें. त्यांनीं त्याला त्या रात्रीं तरी निदान घरीं राहून पाहुणचार घेण्याचा अत्यंत आग्रह केला. आपल्या स्वामीची व स्वामिनीची त्यांच्या उदारतेबद्दल सेवकवर्गांनीं केलेली स्तुति ऐकून "अशी स्वामिनी तुह्मांला लाभली त्या अर्थीं तुह्मी फार धन्य आहांत" असे उद्गार काढून त्या पांथस्थानें घरीं रहाण्याचें नाकारलें. "कमलिनीबाईची मर्जी संपादन करून तिचा आशीर्वाद घेतला तर ईश्वरहि तुह्मांस कधीं उणें पडूं देणार नाहीं" असें ह्मणून तो जाऊं लागला. आपल्या मालकिणीविषयीं इतकें प्रेम दाखविणाऱ्या इसमाचें नांव, गांव व त्याची स्थिति विचारावी या हेतूनें कांहीं नोकरांनीं त्याला निनांवी हांक मारिली. तो थांबला. पण त्याचे नांवाविषयीं नोकरांची असलेली जिज्ञासा सफळ झाली नाहीं. त्याचें भाषणच नोकरांना समजलें नाहीं. "माझें नांव सांगण्यासारखें नाहीं. मनोरथाचा नाश झाल्यामुळें निराशा पदरीं बांधून अफाट जगांत लोकांच्या शिथिल औदार्यावर 'कमलिनी'चें नामस्मरण करीत पोट भरीत फिरणें हा आमचा धंदा व सगळें विश्व आमची संचारभूमि." अशा तऱ्हेचें लाक्षणिक भाषण त्यानें केल्यामुळें त्या नोकरांना याचा अर्थ उकलणें दुरापास्त झालें. नोकरांनीं पुष्कळ विनवण्या केल्यावरून 'कमलिनीला माझें नांव कळल्यास ती विषण्ण होईल, तिला त्रास होईल व वेळेस तिच्या जीवितावर घाव बसेल ह्मणून आपण तें सांगण्यास तयार नाहीं' असा साफ जबाब देऊन

तो पुढें चालूं लागला. वरील संभाषणानें नोकरलोकांचें समाधान न होतां उलट जिज्ञासा मात्र अधिक भडकली. त्यांनीं आपल्या कल्पनांची शिकस्त करून पाहिली, पण या अपरिचित पथिकाविषयीं एकहि साधार गोष्ट त्यांना सांपडेना. शेवटीं तेहि निराश झाले. क्षणभरानें तो फिरून परत फिरल्यासारखा वाटला, पण आपल्या चालण्याची दिशा बदलून तो मधुपुरच्या पश्चिमेच्या बाजूला जाऊं लागला. या बाजूला नुसतीं रानें असून कातकरी, धनगर वगैरे रानटी लोकांची तुरळक वस्ती होती. शिवाय नुसत्या रानापेक्षां डोंगरांच्या दऱ्याखोऱ्यांमुळें त्यास जास्तच भयानकपणा आला होता. पश्चिमेच्या बाजूचा हा भाग दहा बारा कोसांपर्यंत नुसता अरण्यमय होता. माधवाच्या घराच्या अंगणांतून ही सेवकमंडळी त्या पांथस्थाकडे पहात होती, पण संधिप्रकाशांत अगदीं पुसट पुसट दिसणारी आकृति त्यांना कांहीं वेळानें साफ दिसेनाशी झाली.

माधवकमलिनी ह्या दंपत्याला संसार करावयास लागून सरासरी पांच वर्षें झालीं होतीं. त्यांचें एकमेकांविषयीं अगदीं अकृत्रिम प्रेम होतें. त्यांतून त्यांच्या प्रेमाला ऐक्यमय करण्यास बाळ मकरंदाचा जन्म अधिक कारण झाला. त्या दोघांचीहि त्या गोजिरवाण्या बाळावर फारच भक्ति जडली होती. तें बाळ नसून दोघांच्या स्वरूपाचें व प्रेमाचें साम्य दर्शविणारी ती एक प्रेमग्रंथिच आहे असा त्यांना वारंवार भास होत असे. दोघेंहि अत्यंत उदार व सेवकजनांना उत्तम प्रकारें कनवाळूपणें वागविणारीं होतीं. शिवाय श्रीचें आनुकूल्य बरेंच असल्यामुळें त्यांनीं तिचा सहविचारानें सद्व्यय करण्याकडे उपयोग करण्याचें व्रत चालविलें यांत नवल काय? त्यांच्या उदारपणाचा फायदा घेण्यास गांवोगांव फिरणारे भिक्षुक, निराश्रित गरीब लोक व भटकलेले वाटसरू तत्पर असत; इतकेंच

नव्हे, तर आपल्या घराचें दार अतिथीकरितां सदैव खुलें ठेवण्याची त्यांची स्वभावसिद्ध प्रवृत्ति होती. खानदानीचें घर दिसलें, कीं तेथें लोक आपली पडशी ठेवण्यास तयार असतात; परंतु औदार्याच्या भ्रामक समजुतीनें आळसाला उत्तेजन देण्याची या घरामध्यें पूर्वीपासून पद्धति नव्हती. ज्या भिक्षुकाला संध्या देखील ह्मणतां येत असेल, ज्या भिक्षेकऱ्याची श्रम करून पोटाला मिळविण्याची सोय असतां जो केवळ निरुद्योगीपणामुळें भीक मागत असेल, अथवा कांहीं ना कांहीं निमित्तानें लोकांकडून द्रव्य उकळण्याचा ज्या वाटसरूंचा धंदा असेल अशांना या घरामध्यें कधीं थारा मिळत नसून जे साह्य करण्यास पात्र आहेत त्यांचाच परामर्ष काळजीपूर्वक घेतला जाई. सत्पात्र अतिथींचा सत्कार करून त्यांचा आशीर्वाद घ्यावा अशी या घरांतील माणसांची प्रवृत्ति होती व असें करण्यांत यांना धन्यता वाटत असे. परंतु या दोन्ही प्रकारच्या पथिकांपेक्षां आजचा वाटसरू कांहीं निराळ्या प्रकारचा होता.

उत्तम वस्त्रांचीं गांठोडीं बांधून अगर त्यांची विक्री करून लोकांना द्रव येण्याकरितां रकटीं धारण करणारी मंडळी व आजचा साधाच पण टापटिपीचा पोषाख घातलेला वाटसरू यांमधील तफावत तेव्हांच दिसून आली. मलिन व गलिच्छ भिक्षुक अगर द्रव्याभिलाषी पांथस्थ ज्याप्रमाणें यजमानाविषयीं अगदीं रसभरित वर्णन करतात, तशांतला कोणताच प्रकार वरील युवकामध्यें नव्हता. तारुण्याच्या ऐन उमेदीची झांक व नेत्रांतील अनुपम तेज पाहून हा कोणी माधवाचा बरोबरीचा स्नेही असावा असें नोकर लोकांना वाटून त्यांनीं त्याला आदरानें वागविलें. अशा तऱ्हेचे संभावित पाहुणेहि पुष्कळच येत असत, त्यांतलाच हा एक असावा अशीहि समजूत क्षणमात्र झाली. कमलिनीच्या घरादाराची माहिती विचारतांना त्याच्या शांतवृत्तींत होणारा फरक ताबडतोब नजरेस

येऊन त्या नोकरांनाहि आश्चर्य वाटलें. त्यानंतर झालेला प्रकार वर दिलाच आहे. प्रवासी निघून गेल्यावर थोडक्याच वेळांत माधव व कमलिनी परत घरीं आलीं. जेवणखाण आटोपल्यावर एक दो-घांनीं वरील तरुण प्रवाशाची सर्व हकीकत त्यांना सांगितली; पण त्यामुळें कमलिनीला व माधवाला काय वाटलें हें सांगण्यापूर्वीं त्या प्रवाशानें काय केलें व तो कोठें गेला तें आपण पाहूं.

पश्चिमेच्या बाजूस निघाला तो तडक शेतें, कुंपणें, मळे, ओलांडीत भरभर गांवाची शीव मागें टाकली व त्यानें रानाकडे मोर्चा फिरविला. मधुपुरच्या नदीचा प्रवाह याच रानांतून वहात जात असल्यामुळें तिच्या कांठापर्यंत तर त्यानें मजल मारली. आतां गांव बराच मागें पडला असून त्या भयप्रद अरण्याची मर्यादा सुरू झाली होती. या ठिकाणीं नदी एका उंच दरडीवरून खालीं जोरानें पडत होती व या पातामुळें तिच्या मागील मंद प्रवाहाला एकदम वेग मिळून ती जोरानें अरण्याच्या दाट झाडींतून व डोंगराच्या दऱ्यांतून वाट काढीत चालली होती. या स्थळीं येईपर्यंत तो मुळींच थांबला नाहीं. परंतु येथें मात्र तो अगदीं सपशेल थांबला. त्यानें मागें दोन अडीच कोसांवर राहिलेल्या मधुपुराकडे एक दीर्घकालिक दृष्टिक्षेप केला व नंतर आकाशाकडे नजर टाकिली. नभोवासी तारांचीं किरणें आपल्या क्षीण प्रकाशानें आकाशाच्या मध्यभागाजवळ आलेल्या चंद्राच्या प्रभेला मदत करीत होतीं. पण त्या चंद्रिकेचें शीतलत्व या प्रेमभंग झालेल्या विरक्ताला शकुंतलेसाठीं कण्वाश्रमीं असतांना झुरणाऱ्या दुष्यंताप्रमाणें अग्नितुल्य उष्ण वाटलें. आपल्या नाथाच्या स्वरूपाचें आकंठ पान करणारी तमोवृत सृष्टिसती व तिचा दिवसाच्या वियोगांत झालेला दाह शांत करण्याकरितां अमृत स्रवणारीं किरणें टाकणारा चंद्र पाहून त्या चिरवियुक्ताला मत्सर वाटला. त्याची दृष्टि नभावरून खालीं सृष्टीवर उतरली व

तिचें अप्रतिम सौंदर्य पाहून त्याच्या दुःखाला भरती आली. प्रेमच्छेदाच्या अखंड दाहानें त्याचें कठिण हृदय अश्रुरूपानें नेत्रांतून स्रवूं लागलें. मोहक गालावर विमल कौमुदीमध्यें चमकणारे ते अश्रुबिंदु चांदण्यांप्रमाणें व अश्रूंच्या पतनानंतर मागें रहाणारी सजल रेषा आकाशांतून पडतांना मागें दिसणाऱ्या दिव्य ज्वलनरेषेप्रमाणें भासत होती. थोडा वेळ असा गेल्यावर त्यानें आपलीं वस्त्रें प्रावरणें नदीतीरावर काढलीं व धशीखालीं नदीचा ओघ पडत होता त्यावर उभें राहून आत्मघातासाठीं तो तयार झाला. " कमलिनी—कमलिनी ! मद्याचें घोट तोंडाला लावून माझा घात करण्यास तूं कारण आहेस—आजच्या आत्महत्येच्या पातकाची जबानी देण्याकरितां चित्रगुप्तानें यमधर्मापुढें मला उभें केलें तर त्याबद्दल सर्व दोष मी तुझ्यावर लादणार. तूं आपल्या चित्ताला आळा घालून माझ्यावरील प्रेम कायम ठेविलें असतेंस तर माझ्या प्राणाला जलसमाधि देण्याला मी खास तयार झालों नसतों. अरेरे! हाय ! हाय ! कोण भयंकर विचार हे ? जिच्याविषयीं मी अनुरक्त झालों, जिच्या प्रेमाकरितां मी मुंबईहून येथें इतक्या लांब आलों, जिच्या प्राप्तीच्या आशेनें मीं इतकीं वर्षें येथें कंठलीं, तिचा घात स्वार्थाकरितां करण्याला मी तयार होतों त्या अर्थीं माझ्या प्रेमाच्या चंचलतेची उत्तम साक्ष पटली ! प्रेमा—प्रेमा—मृगजळाप्रमाणें तुझें मानवी चित्तांतील वास्तव्य भासमय आहे काय ? दिव्यस्वरूपी तुला—तुझ्या प्रभावाला—माझा शेवटचा प्रणाम घे. प्राणत्यागानंतर मी मनुष्येतर जन्मांत गेलों तर निसर्गाला अनुसरून देहधर्म पार पाडण्यापलीकडे माझ्या हातीं काय असणार? मला आशेला लावून शेवटीं निराशेचा मर्मच्छेदक घाव मारणाऱ्या प्रेमा, जा; जा; मी तुला धिक्कारपूर्वक नमस्कार करतों. ईश्वरा, पंचमहाभूतांनों, क्षमा करा; आपल्या अनुकूलतेनें तुह्मी माझ्या—अरे-

पण ती आतां माझी नाहीं—माधवाच्या—कमलनीला संतोष द्या, सुख द्या.—हाय—हाय—! प्रखर काळाचें साहाय्य घेऊन खडतर दैवानें माझा घात केला! ईश्वरा, पंचमहाभूतांनों, माझें कमलिनीला स्मरण होऊन तिच्या मनाला त्रास न होईल असें करा.—आकाशांतील असंख्य नक्षत्रांनों ! ! ! तुह्मी माझ्या—नव्हे माधवाच्या—कमलिनीवर कृपादृष्टि ठेवा. माधवा, माझ्या सुखाची—माझ्या काल्पनिक वैभवाची—आनंदाची ठेव तुझ्याजवळ मीं ठेविली आहे, तिचा आपल्या जीवापलीकडे सांभाळ कर. दहा वर्षांपूर्वींच्या काळाकडे नजर दिली ह्मणजे कालाच्या प्रभावाचा प्रत्यय येतो. मुकुंदरावाचें घर माधवाचें झालें ! त्याचा जमीनजुमला माधवाचा व कमलिनी—त्या काळची माझी कमलिनी—आज मातृपदाला चढून माधवाची अर्धांगी झाली आहे. माझ्याविषयींची स्मृति हीच काय ती त्या एकात्मक देहद्वयाची भिन्नत्वदर्शक मध्यरेषा आहे. पण कालांतरानें तिचाहि लोप होईल. सर्वत्र आनंदीआनंद होईल. पण मुकुंदराव, तुमचें तरी निधन झालें का ? छे ! तसें खास झालें नाहीं. तापसीप्रमाणें आयुष्य घालविणारी माझी धर्माची आत्याबाई सरस्वती कोठें असेल ? त्यांची गांठ पडून त्यांचे पाय घट्ट धरण्याचा—त्यांना अश्रुस्नान घालण्याचा योग या जन्मीं तर मला नाहीं. पण माझें त्यांच्याविषयींचें उत्कट प्रेम माझा हा प्रणाम अदृश्य रूपानें त्यांना पोंचवील अशी मला खात्री आहे. निराशेंत जात असलेला प्रत्येक क्षण मला मरणापेक्षांहि असह्य वाटत आहे. मना चल, वृत्तीची तयारी कर. त्यांतच तुला सुख आहे. अखिल विश्वांतील भूतमात्रांनों, कायेनें, वाचेनें, मनानें, मीं तुह्मांस जो त्रास दिला असेल त्याबद्दल क्षमा करा———"

अगदीं उडी मारण्यास सिद्ध झाला. ढकलून दिलेल्या दगडाप्रमाणें एका क्षणांत त्याचा देह खालीं घसरून पडला असता व

त्याचे इहलोकींचे आयुष्याचा अंत झाला असता. पण होणारी गोष्ट वेगळीच होती. त्याच्या दुःखाचा व निराशेचा उमाळा वरील शब्द-रूपांत बाहेर पडत असतां त्याचा शेवट होण्यापूर्वींच त्याच्या तोंडावर कोणाच्या तरी हातानें घट्ट बंधन बसलें. जिव्हेची गति व शब्द आंतल्या आंत शिथिल झाले. आपला हात सोडविण्यासाठीं तो धडपड करूं लागला व त्याच्या शरीरसामर्थ्यानें तो प्रयत्न सफळहि झाला. मागें वळून पहातो तों दोन चार धिप्पाड व अक्राळविक्राळ मनुष्याकृति त्याच्या भोंवतीं उभ्या असलेल्या त्यास दिसल्या. त्यांचे हातांतील आयुधें जुनीं होतीं. फक्त खांद्यावर असलेल्या कुऱ्हाडी मात्र चंद्रप्रभेमुळें चमकल्या. त्यांनीं या प्रवाशाला सुटलेला पहातांच त्याच्या शरीरासभोंवतीं दोराचे फांस घालून त्याच्या वस्त्रप्रावरणासह त्यास अरण्यांत नेलें. त्या तरुण प्रवाशाला कांहीं वेळानें निश्चेष्टता आली व तो झाडींतला अंधार व नेणारे लोक यांखेरीज कांहींच दिसेनासें झालें.

---

## प्रकरण तिसरें.

## दहा वर्षांपूर्वीचें प्रेमचिन्ह.

वरील प्रकार ज्या दिवशीं रानांत घडला त्याचे दुसरे दिवशीं अगदीं पहांटेस कमलिनी मागील दारीं परसांत असलेल्या लहानशा बागेंत उभी होती. काल संध्याकाळीं शेतांतून आल्यानंतर तिला व तिच्या पतीला सेवकांनीं एका अदृष्टपूर्व प्रवाशाची हकीकत सांगितली, तेव्हां तिला जरा चमत्कारिक वाटलें. शेतांत तिला फार वर्षांपूर्वींच्या कांहीं प्रसंगाची आठवण झाली होती. त्यांतहि एका विशेष व्यक्तीविषयीं तिला फारच खेद होत होता. तीच व्यक्ति कदाचित् आपल्या घरीं येऊन आपल्या स्थित्यंतरामुळें दुःखी होऊन

निघून गेली असावी असें तिला वाटलें. परंतु फिरून एकवेळ तिचें मन त्याच्या इहलोकींच्या अस्तित्वाविषयीं साशंक झालें. "तो जिवंत नसावा" असें तिला अनेकदां वाटलें. पण त्याला सबळ पुरावा नसल्यामुळें एक वेळ "तो जिवंत असून आज आलेला प्रवासी तोच" अशीहि तिला खात्री वाटे. माधवाला याहून कांहीं निराळेंच वाटलें. अलीकडे कांहीं दिवसपर्यंत या प्रांतांत–विशेषतः रुद्रगडच्या जमीनदारींत–दरवडेखोरांची धामधूम सुरू झाली होती. तेव्हां त्यांपैकींच कोणी तरी माणूस प्रतिष्ठितपणें बातमी काढण्यासाठीं पांथस्थाच्या वेषानें आला असावा अशी त्याची समजूत झाली. कमलिनीच्या मनोवृत्तीची ओळख नसल्यामुळें त्याला कमलिनीच्या विषादाचें कारण या दरवडेखोरांचें भय असावें असें वाटलें. त्यानें तिला पुष्कळ धीराच्या गोष्टी सांगितल्या व तिनेंहि बळेंच स्मितहास्य दाखवून आपल्या खऱ्या मनोवृत्तीची त्यास ओळख होऊं दिली नाहीं. तिला आपल्या पतीला फसविण्याचा एकदांहि प्रसंग आला नव्हता. हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें पति हीच आपली उपास्यदेवता या कल्पनेनें कमलिनीला माधवाविषयीं पूर्ण श्रद्धा वाटत होती. माधवाचेंहि तिच्यावर निस्सीम प्रेम होतें. त्यामुळें त्यांच्या प्रेमाचा ओघ सर्वदा अभंग असे. त्यांच्या मनोविकारांत नेहमीं अभेद असे. परंतु कालचा प्रसंग फारच चमत्कारिक होता. मनुष्याच्या अंतःकरणांत कित्येक अशा गोष्टी असतात कीं, त्या त्याच्या हृदयाखेरीज इतरांस क्वचितच ठाऊक असण्याचा संभव असतो. त्याप्रमाणें कमलिनीचें गतरात्रीचें हृद्गत माधवाच्या सहवासांत असतांना कधींच बाहेर पडलें नाहीं. मनाची प्रवृत्ति एकमेकांविषयीं अगदीं निष्कपट असल्यामुळें त्यांच्या हातून परस्परांस त्रास देणारें एकहि कृत्य आजपर्यंत घडलें नव्हतें. आपल्या मानसिक विकाराला जर माधवाच्या नजरेस पडूं दिलें तर त्याला

त्रास होईल ह्मणून तिनें खोटया स्मित हास्यानें आपल्या पतीचें मन दुखविलें नाहीं. परंतु या बाह्य आनंदाचा परिणाम मनावर झाला नव्हता. रात्रभर तिचें मन अस्वस्थच होतें. प्रभातकालीन शिशिरवायूच्या गारव्यानें व सर्व सृष्टीच्या सुंदर दर्शनानें मनाला शांति मिळाली तर पहावी ह्मणून ती वर सांगितल्याप्रमाणें परसांत उभी होती. तिच्या मनाला इच्छेप्रमाणें किंचित् समाधान झालें, पण ज्या व्यक्तीच्या स्मृतीनें तिच्यावर एवढा खेदकारक परिणाम घडला ती व्यक्ति मात्र तिच्या मनोमंदिरांतून ढळली नाहीं. विकार व विचार यांचा झगडा चालू झाला. परंतु या दोहोंपेक्षां ती स्नेहमय मूर्ति प्रबळ असल्यामुळें त्यांच्या झगड्यानें तिचा ऱ्हास झाला नाहीं. उलट विकारालाच तिचें पाठबळ मिळून विचाराची शक्ति पूर्ण शिथिल झाली. तिचे नेत्र समंताद्भागावरील अनेक पदार्थांवरून जात होते. इतर वेळेला तिला अत्यंत प्रिय वाटणाऱ्या जाई, जुई, मालती वगैरे पुष्पलतांच्या अरुणोदयकालीन रम्य प्रफुल्ल स्वरूपानें यावेळीं तिला आनंद झाला नाहीं. आपल्या गुलाली किरणांनीं सगळ्या सृष्टीला रंगवून तिच्यांत चैतन्य उत्पन्न करणाऱ्या अरुणाची प्रभा तिला तापदायक वाटली. परंतु तिनें त्या उदयोन्मुख सूर्याच्या पुरोवर्ती भालदाराचें आपल्या भक्तिपूर्वक नमस्कारानें स्वागत केलें. सृष्टिशोभेचें तिनें विषण्ण मनानें अवलोकन केलें. ती मागें वळली व हळूहळू घरांतून पुढील दारीं आली. अंगणांत येतांच कांहीं तरी चमकणारी वस्तु तिच्या दृष्टीस पडली. प्रथमतः तिनें उभ्या स्थितींतच पायानें त्याची उलथापालथ करून परीक्षा केली. ती वस्तु कांहीं तरी वाटोळा पदार्थ होता. प्रथम हा एखादा दगड असेल या समजुतीनें तिनें त्याला तसेंच टाकून दिलें व ती पुढें गेली. अजून सूर्योदय झाला नव्हता. धुक्याचे तरंगणारे संघ एकामागून एक पर्वताच्या भागावरून दऱ्याखोऱ्यांतून संचार

करीत होते. पश्चिम दिशेकडे क्षितिजावर चंद्राचा निष्प्रभ गोल क्षीण होत चालला होता. मेघखंडेंहि प्रदोषरागानें रंजित होऊन आकाशांत इतस्ततः मंदमंद संचार करीत होतीं. खालीं धुकें क्रमानें अगदीं विरळ होऊन सृष्टीवरील पदार्थ जास्त जास्त स्पष्ट होत चालले. शेतांतून घरीं जाणाऱ्या कांहीं शेतकऱ्यांच्या पुसट आकृति दिसत होत्या. पूर्वक्षितिज जास्त जास्तच उज्ज्वल होऊन आकाशांत अधिकाधिक प्रभा फाकूं लागली. झाडाझुडुपांवरून पक्षिगणाचा जागृतिदर्शक किलबिलाट सुरू झाला, पण अजून त्यांचें कूजन मधून मधूनच होत होतें. कमलिनीच्या डोळ्यांपुढें पहातां पहातां सकाळ होऊं लागली. तिचे डोळे पूर्वेकडे होते पण चित्त मघांच्या खडा समजून टाकलेल्या वस्तूकडे फिरून गेलें. मधून मधून गुणगुणत, क्षणभर निश्चेष्ट उभें रहात तिनें आपला मार्ग बऱ्याच वेळानें आक्रमिला व ती त्या वस्तूपाशीं आली. तिला कांहीं तरी पूर्वस्मृति होऊन तिनें त्या वस्तूला हातांत उचलून घेतलें व दृष्टि संकुचित करून तिची तपासणी चालविली. त्या वस्तूला पहात असतांना तिच्या निर्मल प्रेमाश्रूंनीं तिला धुऊन काढलें. कमलिनीच्या डोळ्यांत कालपासून वसणारी उदासीनता पार नाहींशी होऊन त्यांत सौम्य प्रेम चमकूं लागलें! तिनें त्या मण्याला फिरून फिरून तपासलें तों तिला पाहिजे असलेली खूण पटली. "तोच तो! खास जिवंत आहे! मला सोडून जातांना मीं त्याला दिलेली खूण ती हीच. तोच हा स्फटिक मणि! हीं पहा माझ्या नांवाचीं कोरलेलीं सुवर्णाक्षरें! मला अभागिनीला तूं कोणच्या स्थितींत भेटलास? पण तुला निर्जीवाला मी दोष देत नाहीं. ज्या दैवानें—ज्या अचिंत्य ईश्वरी शक्तीनें— माझ्या स्थितींत अंतर पाडलें त्याचाच हा खेळ; त्यानेंच तुला निर्जीवाला येथें येण्याला समर्थ केलें. त्याची प्रत्यक्ष भेट होईपर्यंत मी तुला मज-

जवळ ठेवतें;" असें ह्मणून तिनें प्रेमानें त्या स्फटिक मण्याचें साश्रु चुंबन घेतलें.

हा प्रकार इकडे चालला आहे तोंच घरांत मंडळी उठून कामकाज करूं लागल्याची तिला चाहूल लागली ह्मणून तिनें कानोसा घेऊन घरांत जाण्याचें ठरविलें; इतक्यांत बाळ मकरंदाची हांक ऐकूं येऊन ती घरांत निघून गेली.

---

## प्रकरण चवथें.

## मुकुंदराव व रुक्मिणीबाई.

मधुपुर हें गांव रुद्रगडच्या जमीनदारींतलें असल्याचें वाचकांना मागेंच कळलें आहे. हा गांव फारच व्यवस्थित होता असेंहि त्यांना ठाऊक आहे. आतां त्यांना आश्वासन दिल्याप्रमाणें त्या गांवाची जास्त माहिती देतों.

पुण्यापासून बऱ्याच अंतरावर मावळांत ही रुद्रगडची जमीनदारी आहे. पेशवाईपासून येथील ब्राह्मण जमीनदारांना हा भाग मिळाला होता. नंतर इंग्रजी राज्याच्या आरंभीं एलफिन्स्टन गवर्नर साहेबांनीं तो त्यांजकडेच ठेविला. अशा रीतीनें हा भाग या ब्राह्मण जहागिरदारांकडे कायम राहिला. या जमीनदारींत आणखी दहापांच गांव आहेत त्यांचा आमच्या कथानकाशीं विशेष संबंध नाहीं. त्या जमीनदारींतलें मधुपुर हें गांव असून तेथील व्यवस्था पहाण्याचें काम मुकुंदराव नांवाचे एका गृहस्थाकडे होतें. हे गृहस्थ स्वतः फार सज्जन व उदार असल्यामुळें त्यांच्या देखरेखीखालीं हा गांव भरभराटला. विहिरी, तळीं, वगैरे पाण्याच्या नवीन सोयी पूर्वीं नव्हत्या. त्या गांवकऱ्यांच्या मदतीनें स्वतः अंगमेहनत घेऊन यांनीं अमलांत आणिल्या. गांवांत एक लहानशी शाळा यांनीं

स्थापन केली. तीमध्यें हुशार व शिकविण्याचे कामांत वाकबगार असे शिक्षक आणवून त्या शाळेला यांनीं व्यवस्थित स्वरूप दिलें. विहिरीवर धुण्याचें पाणी पुष्कळ वहात असून त्याचा चिखल वाढविणें व हवा वाईट करणें यापलीकडे उपयोग नसल्यामुळें मुकुंदरावांनीं त्या ठिकाणीं घाण झालेल्या जागेंत कांटेरी तारांचीं भक्कम कुंपणें घालून लहान लहान बागा केल्या होत्या. या नवीन सोयीमुळें जिकडे तिकडे प्रत्येक विहिरीपाशीं, तळ्यापाशीं, एक एक लहानशी मजेदार पुष्पवाटिका दृष्टीस पडे. गांवांत नेहमींचे क्षुल्लक तंटे व्हावयाचे. हे तंटे बहुधा मुकुंदरावांच्या ओसरीपेक्षां वरिष्ठ कोर्टांत जात नसत. मुकुंदरावांनीं आपली बुद्धिमत्ता खर्चून त्या खटल्यांचे निवाडे करावे. हे निवाडे गांवकऱ्यांना पटल्यामुळें वकीलाचे व सरकारी फीचे पायीं द्रव्याचा निरर्थक व्यय करण्याचा प्रसंग सहसा येत नसे. मुकुंदरावांना ह्या कामापासून कांहीं मिळकत अगर फायदा होता अशांतली गोष्ट नाहीं; परंतु त्यांची समाजाच्या हिताकडे स्वाभाविक प्रवृत्ति असल्यामुळें त्यांना अशीं कामें करण्याची मनापासून हौस वाटे. लोकांकरितां ते नेहमीं झटत यामुळें लोक त्यांना धन्यवाद देत. त्यांचा जमीनजुमला, शेतवाडी कांहीं कमी होती असें नाहीं; इतकेंच नव्हे, तर त्यांच्यासारखा श्रीमान् त्यांच्या आसपास बऱ्याच गांवांतून कोणीहि नव्हता. परंतु त्या द्रव्याचा विनियोग त्यांनीं गरीबगुरीबांच्या माना मुरगळून त्यांना त्रास देण्यांत केला नाहीं; उलट एखाद्या गांवकऱ्यावर कांहीं किटाळ आल्यास त्याच्या बाजूनें त्याच्या सोडवणुकीकरितां ते झटत. त्यांचा स्वभाव असा दिलदार व मेहनती असल्यामुळें ते त्या प्रांतांत बरेच लोकप्रिय झाले होते.

अशा रीतीनें लोकोपयोगी कृत्यांत त्यांचा बराच काळ निघून जात असे. याशिवाय फुरसतीच्या वेळीं चातुर्मास्यांत श्रीधरी ग्रंथ समाजांत

वाचून दाखवून कुणबी मंडळींना अवघड स्थळीं अर्थ सुबोध करून सांगण्याचा त्यांचा परिपाठ असे. त्यांच्यावर ईश्वराची कृपा असल्यामुळें इतर सर्व गोष्टींप्रमाणें त्यांच्या आवाजांतहि माधुरी होती. ज्ञानेश्वरीं किंवा एकनाथी भागवतांतला वेदान्त व व्यवहारज्ञान सांगून रामविजय, हरिविजयांचा कथाभाग ते जास्तच मनोरम करीत असत. या कारणानें चातुर्मास येण्याची वाट कुणबी लोक अगदीं उत्सुकतेनें पहात यांत नवल नाहीं. मुकुंदरावांना इंग्रजी शिक्षणाचा बराचसा संस्कार पूर्ववयांत झालेला होता. त्यांना लोकशिक्षण कोणच्या तऱ्हेचें असावें याबद्दल अगदीं पूर्ण ज्ञान होतें. मोठमोठ्या शहरांतल्या शाळांमधून क्रमिक पुस्तकांच्या चुटपुटत्या ज्ञानावर मांडलेल्या शिक्षणाच्या बाजारांतील जिनसांनीं कार्यभाग होत नाहीं अशी त्यांची खात्री झाली होती. इंग्रजी शिक्षणाच्या जोरावर अंध होऊन जुन्या चालीरीतींना व धर्मबंधनांना निखालस useless ह्मणून शेरा देणाऱ्या व इंग्रजी चालीरीती अंध श्रद्धेनें उत्तम ह्मणून ग्रहण करणाऱ्या सर्व महापंडितांना आपला कोटिक्रम मुकुंदरावांपुढें नाइलाजानें सोडून द्यावा लागे. मावळांतल्या प्राचीन व ऐतिहासिक स्थळांना पहाण्याकरितां इंग्रजी विद्येच्या घोकंपट्टींत डोकें थकलेले असे विद्यार्थ्यांचे पुष्कळ संघ उन्हाळ्याच्या सुट्टींत निघतात. त्यांपैकीं पुष्कळांना मधुपुरास मुक्काम करावा लागे. या वेळीं या विद्वान् लोकांना मुकुंदरावांचा सहवास घडत असे. मुकुंदरावांचें संस्कृत अध्ययनहि चांगल्यापैकीं होतें. त्यामुळें संस्कृत ज्ञानभांडारांतील उत्तम उत्तम रत्नांची उज्ज्वल प्रभाहि त्यांच्या चित्तावर नेहमीं पडलेली असे. त्यांची काम करण्याची पद्धत मौज वाटण्यासारखी असे. दिवसभर स्वतःचा कामधंदा पहावा, लोकांचे न्याय निवडावे, रात्र पडली ह्मणजे एक दोन घटका कुणबी मंडळींत ज्ञानचर्चा त्यांना रुचेल व पचेल अशी करावी, मद्यपानासारख्या

भयंकर व्यसनापासून होणारे अनर्थ दाखवून कुणव्यांना त्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करावा अशी त्यांची रीत होती व त्याचा बराच अनुकूल परिणामहि झाला होता. असो.

मुकुंदरावांच्या पत्नीहि त्यांच्याप्रमाणेंच सत्वशील होत्या. परंतु पूर्वींच्या पद्धतीप्रमाणें त्या गृहकृत्यांत उत्तम वाकबगार व शिक्षणाच्या कामांत अगदींच अडाणी होत्या. सकाळपासून संध्याकाळपर्यंत देवधर्म व घरांतील कामकाज यांतच त्यांचा सारा वेळ जात असे. शिवाय घरांत पाहुणेराउळे यांची रहदारी फार असल्यामुळें त्यांना कामाखालीं कधीं रिकामटेकड्या विचारांना फुरसतच मिळत नसे. इंग्रजी शिकलेले कित्येक आधुनिक पदवीधर त्यांच्या घरीं जात, परंतु इंग्रजी विद्येला आणि इंग्रजी चालीरीतींना अगदीं अनभिज्ञ असलेल्या या माउलीला पहांटेचे प्रहरीं घराबाहेर सडासंमार्जनादि विधि करतांना तिच्या निसर्गमधुर कंठांतून निघणारीं देवाचीं गाणीं ऐकून वरील शिक्षित पाहुण्यांची वृत्ति कांहीं काळ तरी तल्लीन होऊन जात असे व त्या भरांत त्यांच्या तोंडून या अडाणी व पूर्वपद्धतीला अनुसरणाऱ्या साध्वीबद्दल धन्यवाद निघत असत. त्यांची घरांतील टापटीप व व्यवस्था पाहून कोणालाहि संतोषच व्हावयाचा. पतिसेवा हेंच एक ध्येय रुक्मिणीबाईंना ठाऊक होतें. त्यांचा परिवार फार नव्हता. मुकुंदरावांना एकच अपत्य असून तीहि कन्या होती. मुकुंदरावांचे मनांतून आपल्या सहधर्मचारिणीला श्रीभागवत रामायण वाचण्यापुरती विद्या शिकवावी असें पुष्कळ होतें, पण त्याचा उपयोग झाला नाहीं. वत्सला ही त्यांची कन्या. इच्या जन्मानंतर पतिसेवा व इतर गृहकर्में यांमध्यें बालसंगोपनाची भर पडली. आपल्या पत्नीनें जगांत नांवलौकिक मिळविण्याकरितां विद्या शिकावी, स्त्रियांच्या उन्नतीकरितां विनयादि

नैसर्गिक स्त्रीधर्म बाजूला गुंडाळून मोठमोठाल्या सभांतून व्याख्यानें झोडावीं, पुरुष ह्मणजे नरपशु, त्यांनीं स्त्रियांना गुलाम केलें, स्त्रियांना स्वातंत्र्य दिलें पाहिजे, अशा तऱ्हेच्या तिच्या कल्पना व्हाव्या, अशी मुकुंदरावांची इच्छा नव्हती. परंतु शिक्षणाचा प्रसार झाल्यानंतर स्त्रियांच्या शिक्षणापूर्वीं असलेल्या स्वभावामध्यें कांहीं फरक न होतां निवळ उच्छृंखलपणाची अनिवार प्रवृत्ति मात्र दिवसेंदिवस जास्त होऊं लागली असें दिसून आल्यानें, आणि खुद्द रुक्मिणीबाईंना शिकण्याचा एक प्रकारचा तिटकारा असल्यामुळें, मुकुंदरावांची शिक्षणविषयक इच्छा तृप्त झाली नाहीं व त्यांना त्याबद्दल कांहीं विशेष विषाद वाटला नाहीं. शिक्षणाचा गंधहि नसतां रुक्मिणीबाईच्या मनोवृत्ति उदार होत्या. त्यांची शांत व धर्मपरायणवृत्ति पाहून ही खरोखरीच कोणी देवी असावी असा सर्वांना भास होत असे. गांवांतील आजाऱ्यांची शुश्रूषा करून त्यांना औषधपाण्याचा आपल्या खर्चानें पुरवठा करणें इत्यादि अनेक बाह्य गोष्टींचा व्याप मुकुंदरावांच्या व रुक्मिणीबाईच्या मागें होता. गांवचे कुणबी लोक कोठें इतर गांवीं कामकाजास जाऊं लागले ह्मणजे या सुशील दंपत्यास वंदन केल्याखेरीज जात नसत. त्यांचा आशीर्वाद सदैव यशोदायी आहे अशी त्यांची दृढ समजूत झालेली होती.

वत्सला जन्मास आल्यानंतर ती थोडीशी मोठी होतांच त्यांनीं तिला गृहशिक्षण देण्यास सुरुवात केली. तिच्या मातेनें व पित्यानें तिची अत्यंत काळजी घेऊन शिकविण्याचें काम पत्करलें. तिच्या मोहक बालदेहाकडे पाहून तिला लोक कमलिनी ह्मणूं लागले व तिचें मूळचें नांव जाऊन कमलिनी हेंच नांव प्रचारांत आलें. तिला शब्दोच्चार करण्याची शक्ति आल्यानंतर लहान लहान स्तोत्रें, श्लोक, पदें वगैरे शिकवून तिच्या मनावर तेव्हांपासूनच मातापित्यांनीं देवाधर्माविषयीं आदर उत्पन्न केला. तिची ह्मणण्याची ऐट—तिच्या

बोबड्या वाणीमधून येणारी तुटक शब्दरचना-पाहून मातापित्यांना कौतुक वाटे. कमलिनी ही मातेची दुसरी प्रतिमाच होती. परंतु तिला आपल्या मातेचा लाभ फार दिवस झाला नाहीं. ती सुमारें पांच वर्षांची होतांच रुक्मिणीबाईचा अंत झाला. खुद्द मुकुंदरावांपेक्षांहि त्या गांवच्या सगळ्या आबालवृद्धांना रुक्मिणीबाईच्या मृत्यूमुळें जास्त वाईट वाटलें. मुकुंदरावांचें वयहि यावेळीं फार नव्हतें. नुकतेंच ४० वें वर्ष लागलें होतें. संसाराच्या ऐन उमेदींत भार्येची हानि व्हावी ही गोष्ट दुःखकारक तर खरीच,पण प्रथम कांतेचा वियोग सह्य होण्याकरितां, इष्टेटीला वारस पुत्र पाहिजे या निमित्तानें कमलिनीसाठीं नवीन कुमारीमातेची योजना त्यांनीं केली नाहीं. त्यांच्या बरोबरीच्या मित्रमंडळींनीं त्यांना द्वितीय विवाहाचा सल्ला दिला. कांहीं मंडळींनीं आपल्या प्रौढ कन्यकांचें फोटोच्या रूपानें अगर प्रत्यक्ष दर्शन घडवून आणण्याचाहि प्रयत्न केला. परंतु त्यांच्या मनाची वृत्ति कोणच्याहि प्रयत्नानें ढळली नाहीं. रुक्मिणीबाईचा आपल्या बालकन्येसह एक फोटो पत्नीच्या मरणापूर्वीं थोडेच दिवस मुकंदरावांनीं अत्याग्रहानें काढविला होता. तिचा तो फोटो त्यांनीं आपल्या बसण्याच्या जागेसमोर टांगला होता. त्याकडे पाहून ते आपल्या दुःखाचें होईल तितकें शमन करून घेत. त्यांच्या वियोगदुःखांत आसपासचीं किती एक खेडीं भागीदार होतीं. त्यांना पत्नीच्या वियोगानंतर त्या घरांत जिकडे तिकडे शून्यता भासूं लागली. ते दिवसांतून अनेक व्यवसाय करून पत्नीच्या मरणाचें स्मरण न होऊं देण्याचा प्रयत्न करीत असत. परंतु समोरील चित्र व कमलिनीची मातृविषयक चवकशी या योगानें त्यांच्या डोळ्यांतून अश्रुस्राव होऊं लागे. कमलिनीसारख्या अज्ञ बालिकेला याचें कारण कळेना. तिनें दिवसांतून कितिकदां तरी सगळ्या घराचा कानाकोंपरा शोधून काढावा व वारंवार ती न सांपडल्या-

मुळें वडिलांपाशीं चवकशी करून त्यांच्या दाबलेल्या दुःखाला उमाळा आणावा. त्याचप्रमाणें इतर लोकांचीहि स्थिति झाली. मुकुंदरावांकडे कामकाजाकरितां येणाऱ्या माणसांना रुक्मिणीबाईंचें चित्रदर्शन होतांच त्यांचे अनेक गुण मूर्तिमंत डोळ्यांपुढें येऊन ते अश्रूंनीं भरून येत असत. मुकुंदरावांची वृत्ति दिवसेंदिवस जास्तच उदासीन होत चालली; पण कमलिनीच्या मातृवियोगामुळें पित्याशीं जडलेला लळा त्यांस यात्राप्रवास करण्यास सिद्ध होऊं देईना. कमलिनीचे डोळे व तोंडाची ठेवण हुबेहुब मातेप्रमाणें होती. त्यामुळें त्यांना तिच्याकडे पाहून क्षणभर समाधान वाटे. पण हा संतोष तिच्या अल्पवयांत झालेल्या मातृहानीच्या कल्पनेनें तेव्हांच नाहींसा होऊन दुःखाला दुप्पट जोर येत असे. कालाच्या ओघांत कमलिनीला दिवसेंदिवस मातेचा विसर जास्त जास्त पडत चालला. परंतु त्याबरोबरच त्यांच्या मनाची उदासीनता वाढत चालली.

कमलिनीच्या जन्मापूर्वीं तीन चार वर्षें एका नातलगाचें अनाथ मूल रुक्मिणीबाईंनीं घरांत आपल्या करमणुकीकरितां व त्याच्या संगोपनाकरितां आणलें होतें. त्याची भक्ति मुकुंदरावांवर व त्यांच्या पत्नीवर अत्यंत जडली होती. रुक्मिणीबाईहि त्याला अगदीं विसंबत नसत. त्यामुळें मुकुंदरावांना प्रत्यक्ष पितृपद येण्यापूर्वींच पत्नीच्या अंकावर खेळणाऱ्या त्या गोजिरवाण्या बाळाला पाहून हीं मातापुत्रच आहेत कीं काय असा भास होऊन त्यांना क्षणैक धन्यता वाटे. या बाळाचीं मातापितरें लहानपणींच त्यास इहलोकच्या उदारचरितावर ठेवून निघून गेल्यामुळें त्यास आपल्या आप्तेष्टांहातीं पडावें लागलें. परंतु या लहान अर्भकाची काळजी घेण्याचें सोडून जन्मास येतांच मातापितरांला मारून टाकणारा करंटा ह्मणून त्यांनीं त्याचे हाल मांडले. रुक्मिणीबाईंच्या कानीं ही वार्ता येतांच त्यांना फार वाईट वाटलें. त्यांनीं ताबडतोब त्या बाळाला आपल्या घरीं आणून

त्याचें आईपेक्षांहि जास्त पालनपोषण आरंभलें.

कमलिनीनें इहलोक पाहिल्यानंतर तिला तिच्यापेक्षां वयानें सहा वर्षांनीं मोठा असा एक खेळगडी मिळाला. स्वतःच्या संततींत आणि दुसऱ्या मुलांत दुजाभाव ठेवणें रुक्मिणीबाईच्या मनाला कधींहि पटलें नाहीं. रुक्मिणीबाईच्या गरोदर स्थितींत मुकुंदराव नेहमीं त्या मुलाला जवळ घेऊन प्रेमानें ह्मणत—“ बाळा ! तुझ्या आईला दुसरें बाळ झालें ह्मणजे तुझी हेळसांड होणार आहे. ” पण हा विनोद होता. रुक्मिणीबाईच्या वागणुकींत माता झाल्यानंतर कांहींच फरक पडला नाहीं. या बालबालिकेचा प्रेमळ खेळ पाहून मुकुंदराव, रुक्मिणीबाई व त्या बालद्वयाला पहाणारी इतर मंडळी नेहमीं ह्मणत कीं, “ हा जोडा ईश्वरानें आजन्म कायम ठेवावा. ” त्या दोघांना याची कल्पनाहि नव्हती. रुक्मिणीबाई नेहमीं या दोघांमध्यें विवाह करावा असें मुकुंदरावांना सहज थट्टेनें सुचवीत.

मातृवियोगानें कमलिनी वेड्याप्रमाणें झाली, पण तिच्याहूनहि थोडा वयानें व समजुतीनें मोठा असलेला तो मुलगा तसाच भ्रमिष्ट बनला. प्रेमानें मुख कुरवाळणाऱ्या रुक्मिणीबाईंना तो मध्यरात्रींच “ आई, आई ” करून रात्रीं स्वप्नांत उठून हांक मारी. सकाळ झाली ह्मणजे विरही मुकुंदरावांना स्वप्न सांगावें व त्यांच्या डोळ्यांत अश्रु आलेले पहातांच त्यांच्या दुःखाची अस्पष्ट कल्पना येऊन एकदम गळ्याला मिठी मारावी व त्यांना अश्रूंचें कारण विचारावें. कमलिनीला प्रभाकर व प्रभाकराला कमलिनी यापुढें मुळींच विसंबत नसत. मातेची आठवण जसजशी जास्त जास्त अस्पष्ट होत चालली तसतसा त्यांचा दिवस आनंदांत जाऊं लागला. परंतु लग्नदिवसानंतर मरणापर्यंत एकनिष्ठपणें सेवा करणारी भार्या आपल्या अंगावर दोघां बाळांच्या संगोपनाची जबाबदारी टाकून अगदीं

अकालीं गेलेली पाहून त्यांच्या हृदयाला बसलेला धक्का कमी झाला नाहीं. हीं दोन मुलें जों जों वाढूं लागलीं तों तों आपले गृहवासाचे दिवस संपत आले असें वाटून त्यांना एक प्रकारची तीव्र उदासीनता भासूं लागली.

प्रभाकराला प्रथम त्यांनीं पुण्यास शिक्षणास ठेविलें. तो जात्या बुद्धिमान् असल्यामुळें त्याचा म्याट्रिकपर्यंतचा अभ्यास १७ वे वर्षीं पूर्ण होऊन तो पुढें मुंबईस जास्त शिक्षणाकरितां गेला. त्याचें शिक्षण पूर्ण होऊन तो परत येईतोंपर्यंत कमलिनीला उत्तम गृहशिक्षण देण्याचा आपला बेत मुकुंदराव पूर्ण करीत होते. शाळांतून शिकलेल्या व चैनीस सोकावलेल्या गृहिणीपेक्षां कमलिनीला गृहशिक्षण अगदीं काळजीनें देऊन एक उत्तम गृहिणी बनविण्याच्या आपल्या विचाराला ते प्रत्यक्ष स्वरूप देत होते. प्रभाकर सुट्टीचे दिवसांत परत आला ह्मणजे तीं एकमेकांला वाचण्यास मिळालेल्या नवीन नवीन पुस्तकांतील गोष्टी व उपदेश सांगत असत. सुट्टीचे दिवस निघून गेले ह्मणजे एकमेकांपासून होणारा वियोगहि त्यांस दुःसह होत असे.

---

## प्रकरण पांचवें.

## प्रभाकराची हकीकत.

शाळेचा अभ्यास संपून प्रभाकर मुंबईस कॉलेजांत शिकूं लागला. तेथून पाहिलेल्या निरनिराळ्या प्रसंगाचें वर्णन दर आठवड्यास नियमानें पत्र पाठवून तो घरीं कळवीत असे. त्याला लहानपणापासून मुकुंदरावांचे घराखेरीज इतर कांहींच माहिती नसल्यामुळें आपले नातलग इतर कोणी आहेत ह्याची त्यास माहिती नव्हती व मुकुंदरावांचे घरीं त्या दंपत्याच्या बोलण्यांत तसा कधीं त्याच्या पूर्व गृहाचा संबंध त्यास आढळला नाहीं. त्यामुळें त्याला कमलिनी-

प्रमाणेंच आपणहि मुकुंदरावांची औरस संतति आहोंत असें नेहमीं वाटे. त्याचें लहानपणापासून पालनपोषण करणाऱ्या कनवाळू दंपत्यांनीं कोणत्याहि शब्दांनीं त्याला दुखविण्याचा प्रयत्न केला नाहीं. अर्थात् घरापेक्षां येथें आपला कांहीं निराळा संबंध आहे असें वाटण्याचें व दुःखी होण्याचें त्यास कारण नव्हतें. अशा रीतीनें कांहीं काळ गेल्यावर गांवांतल्या बोलण्यावरून मुकुंदराव हे आपले वडील नसून पालक आहेत असें त्याला कळलें. परंतु या माहितीनें त्याच्या वागणुकींत फारसा फरक पडला नाहीं.

कमलिनीचा मराठी भाषेचा अभ्यास मुकुंदरावांनीं बराच करून घेतला असल्यामुळें प्रभाकराच्या पत्रांना तिच्याकडूनहि योग्य अशीं उत्तरें जात असत. याशिवाय मुकुंदरावांचींहि बोधप्रद पत्रें वारंवार प्रभाकरास पोंचत असत. कमलिनी थोडी मोठी झाल्यावर ह्मणजे आठ दहा वर्षांची होतांच घरांतलें कामकाज पाहूं लागली होती.

रुक्मिणीबाईच्या मृत्यूनंतर लवकरच मुकुंदरावांचा मेहुणा मरण पावला व विधवा बहीण घरीं आली. तिनें प्राप्त स्थितींत समाधान मानून आपल्या भावाच्या घरीं रहाण्याचें ठरविलें. मुकुंदरावांस तरी आतां दुसरें मायेचें कोण होतें? एक बहिणच राहिली होती व तीहि कालाच्या तडाख्यानें विधवा झालेली. प्रियपत्नीच्या मरणानंतर हा त्यांच्या अंतःकरणाला दुसरा धक्का बसला. "छिद्रेष्वनर्था बहुलीभवन्ति" असें त्यांस वाटलें. पण झाल्या गोष्टीला इलाज नव्हता. बहिणीच्या पतिनिधनानंतर तिचें समाधान त्यांनीं करावें असा प्रसंग ओढवला.

सरस्वतीबाईवर मुकुंदरावांचें पहिल्यापासून फार प्रेम होतें. तिच्या दुर्धर प्रसंगीं तर त्यांना जीवित नकोसें झालें. पण ईश्वराच्या कृपाळूपणावर विश्वास ठेवून दुःखांत सुख मानून घेण्याचा त्यांनीं प्रयत्न आरंभला. सरस्वतीचा पति हा मोठा पंडित होता.

यांची कॉलेजच्या सर्व अभ्यासांत तरतरी पाहून तेथील व्यवस्थापकांनीं कॉलेजच्या प्रोफेसरीच्या जागेवर यांस नेमिलें. पांडुरंगपंतांचा इंग्रजी व संस्कृत विषयांत हातखंडा असे. विवाह झाल्यावर गृहकर्मांत कुशल असलेल्या आपल्या पत्नीला लिहिणें वाचणें शिकविण्याचा त्यांनीं क्रम आरंभिला. त्यांना स्त्रियांचें शिक्षण कशा तऱ्हेचें असावें, याची पक्की कल्पना कळली होती व त्या धर्तीवर त्यांनीं आपल्या भार्येचें शिक्षण आरंभिलें. सरस्वतीबाईहि आपल्या बुद्धीचा उपयोग आस्थेनें पतीच्या शिकवणीकडे करीत होत्या. पांडुरंगपंतांनाहि शिक्षण देण्याचा हुरूप येत असे. पांडुरंगपंतांचें वय पसतीस वर्षांचें झालें, सरस्वतीबाई तिशींत होत्या. तोंच त्यांच्या संसारसुखावर पुण्यांतील नूतन रोगानें घाला घातला व त्यांच्या प्रपंचाची माती झाली. पाण्याप्रमाणें पैसा खर्चूनहि अपयश आलें. पांडुरंगपंत मृत्यूला अनुसरले व सरस्वतीवर वैधव्याचें अपार दुःख ओढवलें. हा प्रकार झाल्यावर मुकुंदरावांनीं आपल्या भगिनीस घरीं मधुपुरास नेलें.

सरस्वतीबाईंना बरींच मुलें झालीं, पण त्यांतून भावी पतिविरहाचा विसर पडण्याकरितां एकहि मागें राहिलें नाहीं. वडिलांच्या अगोदर सर्व परलोकच्या अनिवर्तनीय प्रवासाला निघून गेलीं. वहिनीवांचून मुकुंदरावाचें घर सरस्वतीस उदास भासे, पण अखंड औदासीन्याची मिराशी पत्करल्यामुळें त्यांना या शून्यतेचा फारसा त्रास होत नसे. घरांतलें कामकाज आटोपल्यावर जगाच्या नश्वरतेचा विषय घेऊन तीं दोघेंजण चर्चा करीत असत. शिवाय सरस्वतीबाईंनीं आपलें वाचन कायम ठेविलें होतें. विधुर आणि वैधव्य स्थितींत दोघां बहीणभांवडांच्या वेदान्ताचा ओघ एकाच दिशेनें वहात असल्यामुळें दोघेंहि एकमेकांच्या तत्त्वज्ञानाची सांगड घालून काळ कंठीत असत. शिवाय दोघांहि बालबालिकांच्या शिक्षणाचा

भार सरस्वतीवरच जास्त पडला. मातृविरहानंतर सरस्वतीनें मुलांस कांहीं उणें पडूं दिलें नाहीं. कमलिनी व प्रभाकर आत्याबाईच्या अगदीं आज्ञेंत वागत. कॉलेजांत गेल्यावर प्रभाकर मधून मधून आपल्या आत्याबाईस पत्र पाठवीत असे. तिचीहि त्यास उत्तरें जात.

आतां मुकुंदरावांचें व सरस्वतीचें एक कार्य राहिलें होतें. कमलिनीचें व प्रभाकराचें लग्न आपल्या डोळ्यांदेखत करून, प्रभाकराच्या हातीं सर्व जिंदगी द्यावी व आपण दोघांनींहि तीर्थयात्रा करीत हिंडावें असा त्यांचा बेत झाला. पण भवितव्यतेपुढें इलाज नव्हता. प्रभाकर एकदां उन्हाळ्याच्या सुट्टींत मधुपुरास आला व त्याच्या भेटीनंतर त्याला एका मित्राचें अतिशय आजारी असल्याबद्दल मुंबईहून पत्र आलें. या गृहस्थाचें घर रत्नागिरीकडे कोंकणांत होतें व तो शिक्षणाकरितां मुंबईस रहात असे. याची व प्रभाकराची कॉलेजांत मैत्री जमली होती व जास्त सहवासानें ती अगदीं दृढ झाली होती. प्रभाकराबरोबर त्याच्या आग्रहानें एकदां हा मित्र मावळांत मधुपुरीं आला होता. मुकुंदरावांनाहि या तरुणाची सात्विक वृत्ति पाहून आनंद झाला. याचें पत्र येतांच प्रभाकरानें सचिंत होऊन मुंबईस परत जाण्याची परवानगी मागितली. प्रभाकराबरोबर मित्राच्या औषधपाण्याकरितां जास्त पैसे देऊन मुकुंदरावांनीं सद्गदित होऊन निरोप दिला. सरस्वतीलाहि फार वाईट वाटलें. “ मित्राच्या प्रकृतीबद्दल वारंवार पत्र पाठवून आम्हांला कळवीत जा बरें ” म्हणून त्याच्या पालकानें त्यास कितीदां तरी सांगितलें.

मुंबईस पोहोंचल्यानंतर प्रभाकराचें दर चार दिवसांनीं पत्र नियमितपणें येत असे. मित्राची प्रकृति सुधारल्यावर त्याचे घरीं कोंकणांत जाण्याचा प्रभाकरानें बेत केला व त्याप्रमाणें कोंकणांत गे-

त्याचेंहि घरीं मधुपुरास पत्र आलें. परंतु हें पत्र शेवटचेंच. यानंतर दिवस गेले—आठवडे लोटले—दोन तीन महिनेंहि गेले—पण प्रभाकराचें पत्र नाहीं. मुकुंदरावांना ही नवीन काळजी उत्पन्न झाली व सरस्वतीबाईलाहि चिंता लागली. मुंबईपुण्याच्या ओळखीच्या माणसांकडून चवकशी आरंभली. शेवटीं कोंकणांत त्या मित्राचे घरापर्यंत त्यांनीं स्वतः मजल मारिली. तेथें त्यांना प्रभाकराच्या अस्तित्वाविषयीं कायमचें निराश व्हावें लागलें. कोंकणांत आपल्या मित्राला घरीं पोंचवून प्रभाकर परत जाण्याकरितां तेथून निघून गेल्याचें मुकुंदरावांना कळलें व यापुढें त्यांना त्याबद्दल जास्त कांहीं कळेना. हा मुकुंदरावांच्या मनावर तिसरा आघात. प्रभाकराबद्दल सरस्वतीबाईहि अत्यंत हळहळल्या. पण उपाय काय? प्रभाकराचा पत्ता लागेना.

गेल्या मार्गशीर्षांत प्रभाकरकमलिनीचा जन्माचा संबंध जोडून द्यावा असा जो त्या बहीणभावंडांचा बेत त्याचा ऱ्हास झाला. मुकुंदरावांच्या डोळ्याचें पाणी खळेना. पत्नीचा मृत्यु, भागिनीपतीचें निधन व प्रभाकराची अज्ञात स्थिति या त्रयीमुळें त्यांचे हृदयावर जबरदस्त आघात झाले. त्यांना चैन पडेना. संसाराची कांहीं तरी व्यवस्था करून आतां आपण लवकरच तीर्थयात्रेचा मार्ग पत्करावा असें त्यांस वाटे, पण फिरून कमलिनीविषयीं विचार मनांत येऊन त्यांस फारच दुःख होई. प्रभाकर नाहींसा झाल्यावर दुसऱ्या वर्षी त्यांनीं कमलिनीचें ‘ माधव ’ नांवाच्या एका सुशिक्षित, श्रीमान् व सदाचरणी वराशीं लग्न लावून दिलें व पांच सहा महिन्यांनीं कमलिनी संसारास योग्य झाल्यावर घरीं नोकरचाकर ठेवून त्या गांवाचा व कन्येचा निरोप घेऊन ते बहिणीसह तीर्थाटनाकरितां बाहेर पडले.

कमलिनीच्या लग्नासारख्या मंगलविधींत मुकुंदरावांना मुळींच

उत्साह नव्हता. मुलगी मोठी झाली तेव्हां धर्माला व लोकरीतीला अनुसरून तिला अनुरूप पतीच्या स्वाधीन करणें इष्ट होतें. त्याप्रमाणें ते प्रभाकराच्या अभावीं अगदीं जड हृदयानें वरान्वेषणाचें काम करीत होते. तों त्यांस रुद्रगडासच एक वर आढळला. त्याचें कॉलेजचें बी. ए. पर्यंत शिक्षण झालें होतें. शिवाय घरीं संपत्तिहि बरीच होती, परंतु त्या मुलाला बाप नव्हता. तथापि इतर गुण पाहून मुलाला पसंत करून विवाहविधि मोठ्या थाटानें पार पाडला. माधवाला व त्याच्या आईला ही अनुरूप व सुशील वधू मिळाल्यामुळें अत्यानंद झाला. एकुलत्या एका मुलीच्या विवाहांत सर्वांच्या आनंदाचे वांटेकरी मुकुंदराव नव्हते याचें कारण वाचकांना आतां निराळें सांगायला नकोच!

घर सोडतांना मुकुंदरावांना काय वाटलें असेल याची वाचकांनीं कल्पना करावी. अनुभवानेंच जाणल्या जाणाऱ्या वृत्तींचें वर्णन करण्यास लेखणी असमर्थ आहे. "कमलिनीला सांभाळा" असें सांगतांना मुकुंदरावांना व त्यांच्या बहिणीला अगदीं वाईट वाटलें. त्यांच्या तोंडून वरील शब्द इतक्या कष्टानें बाहेर पडले कीं, ते ऐकणाऱ्या एखाद्या पाषाणासहि पितृवात्सल्याचा अप्रतिम नमुना पाहून त्यांच्या वियोगानें गहिंवर आला असता. माधवरावाची आई बरीच वृद्ध होती व मुलीला वराचे स्वाधीन करतांना होणाऱ्या दुःखाचा अनुभव असल्यामुळें आपल्या व्याह्याच्या शोकाला तिनेंहि हातभार लाविला.

कमलिनीच्या मनाशीं समधर्म झाल्याखेरीज तिचे विचार कळणार नाहींत.

---

## प्रकरण सहावें.

## तीर्थयात्रेनंतर.

वाचकांना मुकुंदरावांबरोबर तीर्थयात्रेला नेण्यापूर्वी कमलिनीच्या विवाहानंतरच्या थोड्याशा स्थितीचें दिग्दर्शन करणें रास्त आहे.

लग्न होतांच मुकुंदरावांनीं माधवरावास त्याच्या मातेसह मधुपुरास आणविलें व घरींच राहून घेतलें. माधवरावाला बहिणी होत्या हें चाणाक्ष वाचकास मागें कळलेंच असेल.परंतु त्या सर्व आपआपल्या घरीं मुलांबाळांसह नांदत असल्यामुळें लग्नानंतर तीनचार महिन्यांमध्यें त्या आपल्या घरीं निघून गेल्या. मधुपुरांतील मुकुंदरावांच्या सर्व इष्टेटीचा वारस माधवराव झाला. आपल्या तीर्थयात्रेला पुरेसा पैसा मात्र त्यांनीं वेगळा काढून ठेविला होता. तीर्थयात्रेस जातांना एक अगदीं गुप्त असें पत्र प्रभाकराच्या नांवानें लिहून त्यांनीं कमलिनीजवळ दिलें. यदाकदाचित् प्रभाकर पुढें आलाच तर त्याला हें पत्र द्यावें अशी त्यांची आज्ञा होती. " ह्या पत्रांत काय आहे हें जाणण्याची तूं कधीं इच्छा बाळगूं नकोस व या पत्राची हकीकत माधवास कळवूं नकोस; प्रभाकराच्या अस्तित्वाविषयीं पूर्ण निराशा झाल्यावर मग तूं हें पत्र फोडून त्याचा उपयोग इच्छेस येईल त्या कामीं कर" असें त्यांनीं पत्र कन्येच्या स्वाधीन करतांना बजावलें व त्याप्रमाणें आज्ञाधारक कन्येनें वागण्याचें कबूल केलें. मधुपुरच्या सर्व इष्टेटीची माहिती करून दिल्यावर आपल्या जामाताला संसारांत कसें वागावें याबद्दल त्यांनीं पुष्कळ उपदेश केला. माधवरावाला आनंद झाला. आपल्या सासऱ्याचा स्वभाव पूर्णपणें कळल्यावर मुकुंदरावांविषयीं त्याच्या मनांत फारच पूज्यबुद्धि वाटूं लागली. आपल्या धनामध्यें लग्नामुळें जास्त भर पडली या क्षुद्र विचारानें त्याला मुकुंदरावांविषयीं पूज्यता कधींच वाटली नाहीं. स्वतःवर प्रेम जडले-

ली सुशिक्षित बायको पाहिजे, तिनें आपल्या नवीन विचारांप्रमाणें वागून समाजांत मिरवावें—व्याख्यानें द्यावीं—टेनिस खेळावें—बाहेर मोकळ्या हवेंत खुशाल पतीच्या खांद्याशीं खांदा भिडवून फिरावयास यावें, अशा तऱ्हेचे विचार कॉलेजांत शिकत असतांना त्याच्या मनांत येत असत. पण खरें शिक्षण व संसार याविषयींच्या सासऱ्याच्या उदात्त व अनुभूत विचारांची ओळख झाल्यावर वरील विचारांचा जोर ओसरला. परंतु समूळ नाहींसा झाला नाहीं.

कॉलेजांत असतांना पुण्यामुंबईच्या सुधारकांविषयीं माधवरावाचे मनांत सहानुभूति वाटे व त्यांचे विचार अमलांत आणावे असेंहि त्याच्या मनांत येत असे. पण घरीं रुद्रगडास जुने वळणाचीं माणसें असल्यामुळें व त्यांचा उघड उघड अनादर करण्याइतका सुधारकी जोर त्याच्या मनांत नसल्यामुळें त्याला आपले विचार अनेकवार दाबून ठेवावे लागत. कॉलेजच्या सहाध्यायांत मात्र त्याच्या विचारांना पोषक अशीच मंडळी मिळत व त्यामुळें तेथें असतांना त्यानें सुधारकी धामधूम बरीच चालविली होती. कॉलेजामध्यें एका प्रोफेसराची माधवावर बरीच भक्ति जडली होती. हे प्रोफेसर पहिल्या प्रतीचे सुधारक होते. आपल्या घरामध्यें त्यांनीं सर्व सुधारकी थाट ठेवला होता. वर्गामध्यें शिकवितांना आपल्या सामाजिक चालीरीतींवर कोरडे ओढण्याचा यांचा क्रम फार दिवसांपासून चाललेला होता. सर्व बाबतींमध्यें गुलामगिरीपासून मुक्तता करून घेऊन प्रत्येक तरुणानें स्वतंत्र झालें पाहिजे, आपल्या समाजामध्यें ज्या घाणेरड्या व वेडगळ चाली आहेत त्यांचें निर्मूलन करण्यासाठीं तरुणांनीं कंबर बांधली पाहिजे, आपल्या ज्ञानाच्या आणि उद्योगाच्या जोरावर पाश्चात्य राष्ट्रांमधील लोक ईश्वराशीं देखील ज्याप्रमाणें स्पर्धा करूं लागले आहेत त्याप्रमाणें आपणहि केली पाहिजे, शेंकडों वर्षें ज्या शृंखलांनीं आपणांस गुर-

फटून टाकलें आहे त्या ताडकन् तोडून आपण सुधारणा केली पाहिजे, इत्यादि प्रकारांनीं आपल्या छात्रवर्गाचें लक्ष सुधारणेकडे ओढण्याचा या प्रोफेसरांचा प्रयत्न अव्याहत चालू होता. जातिभेदाच्या बेड्या हिंदुधर्माच्या पायांमध्यें ठोकल्या आहेत त्या तोडून टाका, स्त्रियांना पशूप्रमाणें वागविण्याची चाल नाहींशी करा, त्यांना पुरुषांच्या बरोबरीनें सर्व हक्क द्या, लहानपणीं आईबाप तुह्मांला विवाहरूपी बंधनामध्यें गुरफटून टाकतात त्याविरुद्ध नुसती शब्दाची ओरड करून थांबूं नका, तर विवाहाला तयार न होतां त्यांचे वाक्प्रहार सहन करा, पण आपल्या तत्त्वापासून ढळूं नका, विवाह करावा असें तुह्मांला वाटेल तेव्हां तुमच्या पसंतीनें जिचें तुमच्यावर व जिच्यावर तुमचें प्रेम बसलें असेल अशा वधूशीं विवाह करा, इत्यादि प्रकारांनीं उपदेश करून आपल्या मतांचा पगडा विद्यार्थ्यांवर बसविण्यांत हे प्रोफेसर सदा तत्पर असत. या प्रोफेसरांकडे माधवाचेंहि बरेंच लक्ष लागलें. माधव त्यांच्या घरीं नेहमीं जात येत असे. त्यांच्या संगतीनें माधवाच्या रहाणीमध्यें बराच फरक पडला. तो ह्मणे, सोंवळें नेसूनच जेवलें तर अन्न पोटांत जातें, नाहींतर पोटांत जात नाहीं, असें थोडेंच आहे ? आंघोळ केल्यावर संध्येची कवाईत करण्याची काय जरूर आहे ? दाढीच्या बरोबर डोकें भादरलेंच पाहिजे असें कांहीं युक्तिवादाचें प्रत्यक्ष प्रमाण नाहीं, पोषाख करावयाचा तो अमक्याच एका तऱ्हेचा केला पाहिजे हा जुलूम काय ह्मणून? धोतरच नेसलें पाहिजे, पायांत जोडाच घातला पाहिजे, अंगांत सद्राच घातला पाहिजे,डोक्यावर साधीच टोपी जरूर आहे, अशा तऱ्हेचा पोषाखामध्यें देखील समाजाचा करडा अंमल आमच्यावर काय ह्मणून असावा? इत्यादि विचार माधवाच्या मनांत येऊन त्यानें हा सर्व अंमल झुगारून स्वतंत्रतेचा झेंडा उभारला. डोक्यावर केश वाढले, त्या केशांमधून भांग निघाला.

डोक्यावर एक सनहॅट (ज्याला मराठीमध्यें बोलणारे लोक घमेलें असें ह्मणतात ) आणि एक किरिस्तावांची टोपी आली. गळ्यांतलें जानवें कुलपांत जाऊन बसलें. अंगामध्यें ट्रेचर आणि कंपनीमध्यें विकत मिळणारे शर्ट आले. त्यांच्यावर युरोपियनांच्या पद्धतीप्रमाणें शिवलेले बनावट रेशमाचे ( इमिटेशन सिल्क ) कोट आले. कोटाच्या आंत आणि शर्टच्या बाहेर गळ्याभोंवतीं एका कापडाची पट्टी आली. पायांत पाटलोण आले. या पोषाखाला पाहून त्याच्या वर्गांतली मंडळी त्याला हंसूं लागली. पण आपल्या तत्त्वाकरितां झगडा करीत असतांना आपणांवर कशींहि संकटें आलीं तरी त्यांना तोंड दिलें पाहिजे अशी प्रोफेसरांची शिकवणूक माधवाच्या मनावर चांगली बिंबली असल्यानें त्यानें कोणाच्या टीकेची पर्वा केली नाहीं. याप्रमाणें पोषाखाचें स्वातंत्र्य माधवानें मिळविलें. तसेंच जेवणाच्या कामांतहि तो स्वतंत्र ह्मणजे स्वतःच्या मनांत येईल तें खाणारा झाला. आपल्या आईला ही स्वतंत्रता आवडणार नाहीं याकरितां तो घरीं जाण्याचे प्रसंग होतां होईल तितके टाळीत असे. घरीं न जातां कॉलेजाच्या स्वतंत्र हवेंतच नेहमीं संचार करण्याचा माधवाच्या गट्टींतल्या प्रोफेसरांनीं त्याला उपदेश केला होता. प्रोफेसरसाहेब ह्मणत, “आपलें कॉलेज शहरापासून सुमारें दीड दोन मैल अंतरावर आहे. त्यामुळें कॉलेजाच्या आवारांत शहरांतील अशुद्ध हवेचा प्रवेश फारसा होण्याची भीति नाहीं. दुर्दैवानें आपल्या कॉलेजांत शहरांतून जाणारीं बरींच मुलें आहेत. त्यामुळें शहरांतलीं बरींच खेकटीं त्यांच्याबरोबर कॉलेजांत येत असतात व येथील निवान्त प्रदेशांत थोडीशी खळबळ उत्पन्न करतात. परंतु सुट्टीच्या दिवसांत यांचा उपसर्ग तुह्मांला होत नाहीं; आणि सुट्टीचे दिवस ह्मटले तर वर्षांतून सहा महिने असतात. अतएव सुट्टीच्या दिवसांत शहरापासून अथवा खेडगांवापासून पुष्कळ दूर असलेल्या कॉलेजाच्या

स्वतंत्र वातावरणांत अनिरुद्ध संचार करण्याची जी तुह्मांला सवड मिळते तिचा पूर्ण उपयोग करून घ्या. घरीं राहून तुमच्या मनाला अवश्य असणारा मोकळेपणा मिळण्यासारखा नाहीं. तुमच्या आईसारखी कडकाडित सोंवळ्याची बाई डोक्यावर असल्यावर तुम्हांला काय, अथवा तुमच्यासारख्या कोणत्याहि मुलाला काय अगदीं बांधल्यासारखें व्हावयाचें. कॉलेजाच्या वातावरणामध्यें तुम्ही असलां म्हणजे प्रत्येक गोष्टीचा आगापिच्छा पहाण्याची, आणि हें असें कां ? आणि तसें कां नाहीं ? याची चवकशी करण्याची तुम्हांला संवय होते. कोणतीहि गोष्ट तत्त्वतः समजून घेतल्याशिवाय तुमच्यानें रहावत नाहीं. घाण्याच्या बैलाप्रमाणें तुमची तऱ्हा नाहीं. तुमच्या मनाचे दरवाजे सताड उघडे आहेत. त्यामुळें नेहमींच्या वागण्यांतल्या गोष्टी सुद्धां अंधपणानें करायला तुम्हीं तयार होत नाहीं. घरीं गेलांत म्हणजे तुमचें मन संकुचित होईल, त्याच्या विकासाला अडथळा येईल. येथें रहाण्याचा परिणाम तुमच्या अंतर्बाह्य विकासास सर्वथा अनुकूल होईल. शहरांतल्या कोंदट हवेंत रहाणाऱ्या कुडींतले प्राण कोंडलेलेच असावयाचे आणि त्यांना कोंडलेले रहाणेंच बरें वाटावयाचें. परंतु बाहेरच्या खुल्या माळावर रहाणारांचा आत्माहि तसाच खुला व्हावयाचा. इकडे भिंत, तिकडे भिंत, पुढें भिंत, मागें भिंत, कोणत्याहि बाजूनें दृष्टीला—म्हणूनच मनोमय जीवाला—मोकळेपणीं संचार करायला जागा नसेल तेथें दृष्टीचा पल्ला वाढत नाहीं, तसाच मनाचा पोंच व परिघ हीं कोतीं रहातात. परंतु जिकडे पहावें तिकडे अफाटच अफाट माळरान, सर्व पृथ्वीची भेट होऊन तीं एकमेकांत लीन झालेलीं दिसतात तेथपर्यंत दृष्टीनें खुशाल संचरावें, तिला आडकाठी नाहीं, अशा ठिकाणीं मनुष्याच्या अंतरात्म्याची वाढ अनिर्बंध व्हावी आणि तो चोहों बाजूंनीं शरीरांत तसाच शरीराबाहेर वावरूं लागावा हें स्वाभाविक

आहे. खुरट्या माणसांच्या संगतींत उंच माणसेंहि, शरीरानें नाहीं तरी मनानें खुरटीं होतात. परंतु येथें सर्वच विशाल. सभोंवारचा दृक्प्रांत विशाल, डोक्यावरचें आकाशमंडल विशाल, त्यांचा अंत पहाण्यास इतस्ततः फिरणारें मन विशाल आणि त्यांचे योगें उद्भूत होणारे विचारहि विशाल! अशा स्थितींत तुमच्या मनाचे सर्व बंध तुटावे आणि तें सर्वांशीं स्वतंत्र व्हावें यांत आश्चर्य काय? शहरांत रहाणाऱ्या, शहराच्या चालीरीतींनीं आणि विधिविधानांनीं जखडलेल्या माणसांच्या रहाणीचा आणि करणीचा तुम्हांला अचंबा वाटावा, खेद व्हावा, संताप यावा, यांत काय आश्चर्य आहे ?"

इत्यादि प्रकारचा उपदेश करून प्रोफेसर मजकुरांनीं माधवाला अनेकदां सुट्टीमध्यें घरीं जाऊं न देतां कॉलेजांतच ठेविलें होतें. या वेळीं या प्रोफेसरांचे घरीं माधवाचें जाणें येणें फार होत असे. त्यांनीं माधवाशीं बराच वेळ सुधारणेच्या गप्पा मारीत बसावें, त्याला सुधारणेचीं तत्त्वें समजावून द्यावीं, आपल्या घरांत असलेलें सुधारणेचें प्रत्यक्ष स्वरूप त्याच्या नजरेस आणावें. माधवाला ते वरचेवर आपल्या घरीं जेवण्याचा व खाण्यापिण्याचा आग्रह करीत व त्याच्यानें साहजिकच तो मोडवत नसे. प्रोफेसरांची पंधरा सोळा वर्षांची, इंग्रजी शाळेंत शिकत असलेली एक कन्या होती. हिचें व माधवाचें सख्य बरेंच जमलें होतें.

कॉलेजांतील अभ्यासक्रम पुरा झाल्यावर माधवाला घरीं यावें लागलें. कॉलेजांत शिकलेल्या गोष्टींचा उपयोग घरीं करण्याची त्याला अनावर इच्छा झाली होती, परंतु आपल्या मातोश्रीच्या इच्छेविरुद्ध कांहीं करण्याची त्याची छाती झाली नाहीं. माधव एकुलता एक मुलगा असल्यामुळें आईचें त्याच्यावर अत्यंत प्रेम असे. अर्थात् माधवहि आईचा एकनिष्ठ भक्त होता.

या प्रोफेसरांची एक आख्यायिका आमच्या कानावर आली ती येथें

सांगितली असतां वाचकांना त्यांच्या संबंधाची चांगली माहिती होईल. हे प्रोफेसर सामाजिक सुधारणा या नांवाखालीं समाजांत क्रांति घडवून आणण्याच्या कामीं अग्रगण्य गणलेल्या मंडळींपैकीं एक होते. यांची वृद्ध आई यांच्या घरींच रहात असे. म्हातारी आपली जुन्या काळची देवभोळी बायको. परमेश्वराशीं स्पर्धा करण्याचे आपल्या मुलाचे विचार तिला कळत असतील कीं नाहीं कोण जाणे! मुलगा कधीं बापाचें श्राद्ध अथवा पक्ष करीत नसे. म्हातारीला हें पाहून मोठें दुःख होई. एके वर्षीं श्राद्धाचा दिवस जवळ आला आहे असें पाहून म्हातारीला वाटलें, आतां आपण लवकरच जगांतून जाणार; म्हणून एकदां तरी आपल्या डोळ्यांदेखत श्राद्ध करायला मुलाला सांगून पहावें व एकदां तरी बारा ब्राह्मणांना भोजन घालावें. या विचारानें तिनें मुलाजवळ गोष्ट काढली. प्रोफेसर साहेबांना असल्या गोष्टी विचारल्या म्हणजे ते नेहमीं संतापत असत. त्यांतून आपल्याला श्राद्ध कर्तव्य नाहीं असें आईला पन्नासदां निक्षून सांगितलें तरी पुन्हां हिची बडबड चालू आहे हें पाहून ते आईला म्हणाले, "बारा ब्राह्मण का पाहिजेत? तुझे बारा का नवरे होते?"

मुकुंदरावांनीं तीर्थयात्रेस जातांना इतरांप्रमाणें जामातांचाहि निरोप घेतला. तेव्हां त्यांस थोडक्यांत प्रपंचाची जबाबदारी, ती संभाळण्याचे कष्ट, इत्यादि सांसारिक गोष्टींचा उपदेश केला. लग्नदिवसापासून सासऱ्याच्या मनाप्रमाणें वागण्याचा त्याचा निर्धारच झाला होता. स्वातंत्र्याचा सुधारकी बाणा श्वशुराच्या हितप्रद सहवासामुळें त्याच्या मनांतून निघून गेला व गुरूंविषयीं ज्याप्रमाणें विनीत शिष्यांची भक्ति असावी तशी सासऱ्याविषयीं जांवयाचे मनांत पूर्णपणें झाली. सासऱ्याची व आपली ताटातूट होणार या कल्पनेनें त्यास फारच वाईट वाटलें. सरस्वतीबाईंशींहि त्याचा दृढपरिचय झाला होता व त्यांच्या वागणुकीची पद्धत त्याच्या मनावर जास्त बाणली.

नुसत्या डिग्रचा पटकावलेल्या पंडितांपेक्षांहि विचारानें पक्क झालेलीं माणसें जास्त श्रेष्ठ होत अशी त्याची पक्की समजूत झाली व जों जों आपल्या आतेसासूशीं त्याचा जास्त परिचय झाला तों तों त्या समजुतीला जास्त स्थिरत्व येत चाललें. सरस्वतीबाईनें तीर्थयात्रेला न जावें ह्मणून त्यानें पुष्कळ खटपट केली, पण तिला यश आलें नाहीं. आत्याबाईनें जाऊं नये अशी कमलिनीचीहि इच्छा तिच्या पित्याला पसंत पडली—बहिणीनें आणखीं कांहीं दिवस घरीं कमलिनीपाशीं रहावें असें त्यांच्या मनांत होतें. ही त्यांची इच्छा आत्याबाईकडून मान्य झाली नाहीं. जांवयाप्रमाणें विहिणीनेंहि सांगून पहाण्याची शिकस्त केली, पण व्यर्थ !

मुकुंदरावांना निरोप देण्याकरितां कामधंदा सोडून आसपास-च्या खेड्यांतील शेंकडों लोक मधुपुरास आले. कांहीं शिवेपर्यंत, कांहीं पुण्यापर्यंत व कांहीं मुंबईपर्यंतहि गेले. प्रत्येकाला त्या उदा-रात्म्याच्या वियोगामुळें फारच दुःख झालें. जिव्हाळ्याचीं माणसें रडलीं. त्यांना कित्येक दिवस अन्नपाणी गोड लागेना. लोकप्रिय व्यक्तीचा विरह कोणाला सहन होणार ?

महाराष्ट्रांतील सर्व क्षेत्रें पाहिल्यावर या यात्रेकरूंनीं उत्तर हिंदुस्थानाकडे मोर्चा फिरविला. तिकडे ते दोन वर्षेंपर्यंत हिंडत होते. त्यांचीं खुशालीचीं पत्रें महिन्या दीड महिन्यानें येत असत, त्यामुळें मधुपुरच्या सर्व मंडळींना आनंद होत असे. शेवटीं प्रसिद्ध क्षेत्र गंगोत्रीला जाण्याकरितां ते निघाले. येथपर्यंत वृत्तांत सर्वांना पत्रद्वारें कळला. परंतु त्यानंतर प्रभाकराप्रमाणेंच तींहि अज्ञातवासी झालीं. थोडक्याच दिवसांत वर्तमानपत्रांतून गंगोत्री-च्या यात्रेकरूंसंबंधानें एक भयप्रद हकीकत प्रसिद्ध झाली. त्यामुळें माधव व कमलिनीला अत्यंत वाईट तर वाटलेंच; पण आपल्या संबंधी यात्रेकरूंचा शोध करण्याबद्दलहि त्यांची निराशा झाली.

या सुमाराला कमलिनीच्या सासूवर नवज्वराचे रूपांत मृत्यूनें आपला दुर्निवार पाश टाकला व त्यामुळें आपल्या मुलाला व सुनेला तारुण्याच्या भर उमेदींत सोडून जाण्याचा प्रसंग तिजवर आला. तिकडे यात्रेंत वडील व आत्याबाई नाहींशीं झालीं व इकडे घरांतील कामकाजामध्यें उत्तम सल्ला देणारी सासू गमावली, यामुळें कमलिनीला काय वाटलें असेल याची जाणीव कल्पनेनेंच ओळखावी. या गोष्टीला एक वर्ष गेल्यावर निसर्गनियमानें शोकाचा पूर ओसरला. परंतु तिच्या प्रेमळ सासूची वारंवार आठवण होऊन तीस कधीं कधीं फारच वाईट वाटे. वडील मधुपुरास असतांना व त्यांच्या पश्चात् सासूच्या कारकीर्दीमध्यें कमलिनीला संसाराची जबाबदारी अशी मुळींच ठाऊक नव्हती. फक्त सांगतील त्याप्रमाणें काम करावें इतकेंच तिला ठाऊक होतें. परंतु सासूनंतर सर्व संसाराचा गाडा चालविण्याचें काम तिच्यावर पडलें. नाइलाजास्तव तिला तें काम पहावें लागे. कालान्तरानें तें तिच्या अंगवळणीं पडलें. या नवीन संसारांत कमलिनीचे दिवस जसजसे जाऊं लागले तसतसें तिला गतकालांतील गोष्टींचें अगदींच विस्मरण पडत चाललें. परंतु ज्या दिवशीं त्यांची आठवण होई, तेव्हां मात्र तिचें हृदय भरून आल्याखेरीज रहात नसे. असे प्रसंग क्वचितच येत. त्यांतून अलीकडे तीन चार महिने तिचें लक्ष एका नवीनच गोष्टीकडे वेधलें होतें व ती गोष्ट ह्मणजे तिचें बाळ मकरंद ! ! या अर्भकाचें कोडकौतुक पुरविण्यास घरांत वडील माणूस कोणीच नाहीं ह्मणून तिच्या मनांत दिवसांतून अनेकवार उदासीनतेचे विचार येत. परंतु नाइलाज ह्मणून हताश होण्यापलीकडे तिच्या हातीं कांहीं नव्हतें. घरांत नोकरचाकर, मोलकरणी, स्वयंपाकीणबाई ही मंडळी होती, पण त्यांचें प्रेम—त्यांची भक्ति—हीं किती केलें तरी उसनीं. अगदीं निःस्वार्थी प्रेम असलें तरी देखील सेव्यसेवकभाव कसा विसरला

जावा? अर्थात् त्यांचें अस्तित्व कमलिनीच्या मनांतील वडील माणसांसंबंधी उदासीन विचार घालविण्यास कधींहि समर्थ झालें नाहीं.

घरांतील वडील मंडळी गेल्यावर माधवरावाच्या वर्तणुकींत फरक पडत चालला. ऐश्वर्य, यौवन व प्रभुत्व या तिन्ही गोष्टींचें एकीकरण त्याच्या ठिकाणीं झालें होतें. परंतु अविवेकितेचें प्राबल्य झाल्याखेरीज या तिन्ही विषयांचा अनर्थकारक परिणाम कसा दृष्टीस पडावा? तिचा प्रादुर्भाव होण्याचा रंग माधवरावामध्यें हळू हळू दिसत चालला. घरांतील व्यवस्थेमध्यें कांहीं फरक करावा असें त्याच्या मनांत आलें नाहीं. नोकरलोकांवर अनियंत्रित सत्ता गाजवावी असेंहि त्याला वाटलें नाहीं. सत्पात्र अतिथी अभ्यागताचा अनादर करावा अशी इच्छा त्याला कधीं झाली नाहीं. सारांश, मुकुंदरावांच्या वेळच्या गृहास्थितींत कोणच्याहि तऱ्हेची उलथापालथ त्याच्या नवीन विचारानें घडून आली नाहीं. फक्त त्याचे सुधारकी विचार मात्र पुन्हां एकदां प्रत्यक्षाचें स्वरूप धारण करण्याचा प्रयत्न करूं लागले. स्त्रीसह समाजांत मिसळावें, तिच्याकडून टेनीसासारखे खेळ निःशंकपणें खेळवावे, जुन्या चालीरीती मोडून आपल्या पूर्वजांना सरसकट ‘ मूर्खत्वा ’ चा टिळा लावावा, इंग्रजी चालीरीतींचें अनुकरण कृतीनें करावें, असें त्याला वाटूं लागलें. परंतु आपल्या प्रियकान्तेच्या अनुमतीशिवाय या गोष्टी होणें व्यर्थ हेंहि तो जाणून होता. अंतःकरणांत खळबळणारे विचार कधीं कधीं अस्पष्टपणें परवानगी मागण्याकरितां बाहेर पडत, परंतु त्यांच्या विरुद्ध परिणाम कमलिनीच्या मुखावर उमटत असल्यामुळें त्यांना जागच्या जागींच स्वस्थ रहावें लागत असे. माधवाला यामुळें साहजिकच वाईट वाटे. परंतु पत्नीच्या सद्गुणांचा त्याला मोठा भरंवसा असल्याकारणानें त्याला तिची वरील बाब एकदम उघड मोडण्याची किंचित् भीति व लाज वाटे. कधीं एखादे वेळीं त्या विचा-

रांचा अमूर्त ओघ कमलिनीच्या दृष्टीस पडलाच तर "पतीची आज्ञा ऐकणें हा एकनिष्ठ पत्नीचा धर्म आहे, परंतु पतीच्या अविचाराला आपल्या सद्वर्तनानें आळा घालण्यास नेहमीं तयार असणें हें सुशील भार्येचें आद्य कर्तव्य आहे. शिवाय सुधारकी उपायानेंच पतिपत्नींतील निस्सीम प्रेम व्यक्त करतां येतें अशी कल्पना करणें-हि बरोबर नाहीं. मला वाटतें, अशा तऱ्हेनें समाजांत मिसळणें ह्मणजे आपल्या शिक्षणाचा, शालीनतेचा, धर्माचा व पूर्वजांचा उघड उघड अपमान करणें होय. आह्मां स्त्रियांना आतां आहे यापेक्षां जास्त स्वतंत्रतेची अवश्यकता आहे अशांतला प्रकार मला तरी दिसत नाहीं. स्त्रियांनीं निःशंकपणें परपुरुषांच्या मेळ्यांत स्वेच्छेनें हिंडणें फिरणें म्हणजे मनाच्या नैसर्गिक दुर्वृत्तीला आळा घालण्याचे ऐवजीं त्याला मोकळें सोडून स्वतःच्या चारित्र्याचा नाश करून घेणें होय. समाजाचीं आजपर्यंतचीं बंधनें शिथिल करण्यानें काय अनर्थ होतील याची आपणच कल्पना करा. पतिपत्नींचें अंतःप्रेम समजाच्या चवाठ्यांत मांडल्यानें त्याची किंमत वाढत नाहीं, उलट ती गोष्ट लोकांच्या उपहासाला कारण, व दंपत्याच्या आपसांतील पावित्र्याला बाध आणणारी आहे." अशा तऱ्हेचे उदात्त विचार तिच्या तोंडून बाहेर पडत. या विचारांपुढें माधवाचा सुधारकी कोटिक्रम लटपटे व त्याला तत्क्षणीं अशी सात्विक भार्या लाभल्याबद्दल साभिमान आनंद होत असे. "गृहिणी सचिवः" या महाकवीच्या सूक्तीचा प्रत्यय आपल्या अविचारांना अडथळा करून सन्मार्गाला प्रवृत्त करणाऱ्या कमलिनीकडे पाहून त्याला येत असे. राजाचें मन असन्मार्गाकडे जाण्याचा संभव आहे, पण सचिव जर चांगला असेल तर त्याच्या दुराचरणाचा जुलूम ज्याप्रमाणें प्रजेला भोगण्याचा प्रसंग टळतो, तद्वत् स्त्रीपुरुषांची स्थिति आहे. पत्नीचें सात्विक वर्तन पतीच्या उच्छृं-

खळ वर्तनाला समूळ नाहींसें केल्याखेरीज सहसा रहाणार नाहीं.

---

## प्रकरण सातवें.

## परिचारिकेचा प्रताप.

वर सांगितल्याप्रमाणें माधवाच्या मनाची द्विधा स्थिति होती. कमलिनीच्या सहवासांत त्याचा काळ अखंड प्रेमसुखामध्यें जात असे. पण——

मकरंदाला मातापितरें जीवापलीकडे जपत असत. त्याला खेळविण्याकरितां एक दाई ठेविली असून तीहि त्या मुलाला फार जपत असे. ह्या दाईची घरांतील वागणूक फारच व्यवस्थित होती, परंतु तिचें पूर्ण वृत्त मात्र कधींच कोणास ठाऊक झालें नाहीं. तिचें वर्तन जरी चोख होतें तरी माधवाविषयीं तिच्या मनांत कांहीं तरी विशेष संशय होता अशी तिच्या दृष्टीवरून कधीं कधीं कमलिनीला शंका येत असे. परंतु सध्यां त्याचा संबंध नाहीं.

सकाळची वेळ—सरासरी आठ वाजले असतील.आज कमलिनीचे घरांत जिकडे तिकडे एकसारखी गडबड चालली होती. घरांतील सगळया मंडळीच्या मनावर उदासीनता पसरली होती. घरांत पुष्कळ मंडळी जात येत होती, पण जातांना असलेल्या उत्सुकतेऐवजीं येतांना मात्र पूर्ण उद्विग्नता दिसे. जागजागीं मंडळी उभी राहून आपसांत कांहीं तरी कुजबुजत. इतक्यांत कमलिनी बाहेर आली. तिचा चेहरा अगदीं काळा पडला होता. डोळ्यांतून गळलेल्या अश्रूंमुळें गाल मलिन झाले होते. तिच्या मनाचा उत्साह व तद्दर्शक हास्य यांचा मागमूसहि चेहऱ्यावर सांपडला नसता. ती दाराबाहेर येतांच अंगणांत जमलेल्या मंडळींचें लक्ष तिजकडे गेलें. त्या सतीवर आलेला प्रसंग जाणून सगळ्यांना वाईट वाटलें. तिच्या उत्सुक दृष्टीचा

अभिप्राय जाणून एका सेवकानें "अजून आले नाहींत" असा जबाब दिला. ती तशीच लांब दूरवर दृष्टि लावून पाहूं लागली तों एका शेताच्या बांधावरून कांहीं व्यक्ति झपाट्यानें या घराकडेच येत होत्या. त्यांची संख्या चार होती. त्यांना पाहून सगळ्या मंडळींना बरें वाटल्यासारखें दिसलें. त्या व्यक्ति जवळ येऊं लागल्या तों तों सर्वांचीं मनें अधीर झालीं. माधवाबरोबर एक अत्यंत वृद्ध असा इसम येत असून त्याचा चेहरा इतका गंभीर होता कीं, त्याला पहातांच त्याजविषयीं पूज्यता उत्पन्न व्हावी. त्याला पाहून सर्वांना आनंद झाला. त्या वृद्ध इसमाला घेऊन माधव आंत गेला. कमलिनी त्याच्या मागोमाग गेली. सगळी सेवक मंडळी बाहेर आपसांत बोलत उभी राहिली. कोणी कोणी मधून मधून आंत बाहेर खेपा घालीत होते.

घरामध्यें एका खोलींत वरील मंडळी शिरली. तेथें एका तरुण बाईच्या मांडीवर एक निश्चेष्ट बालक पडलें होतें. त्या बालकाच्या सुंदर वदनावर हिरवट, पिंवळट व काळसर छटा उमटल्या होत्या. डोळे मिटलेले असून सर्व शरीर अगदीं अचेतन असल्याप्रमाणें भासे. बरोबर असलेल्या वृद्ध माणसाकडे माधवानें अगदीं सहेतुक दीन दृष्टि फिरविली. त्याचा भाव त्या वैद्यानें ओळखला.—

"माधवराव—कांहीं काळजी करूं नका—ईश्वर कृपा करील !" असें ह्मणत त्या बालकाचें सर्व शरीर त्यानें तपासलें. अशा मनोहर बाळाची अशी अगदीं करुण स्थिति व्हावी, त्याच्यावर प्रेतकळा यावी, हा प्रकार पाहून त्यास वाईट वाटलें. आपल्या धंद्याला अनुसरून त्यानें मुलाची परीक्षा केल्यावर जवळ पडलेल्या सहाणेवर आपल्या बंडीच्या खिशांतून एक जडी बुटी काढून घांसली. तिचे तीन चार वेढे दिल्यावर तें औषध त्या बालकाच्या तोंडांत घातलें. सर्वांची दृष्टि त्या वैद्यराजाकडे होतीच. त्यानेंहि सर्वांकडे

एकवार पाहिलें व " औषध जलाल आहे, खात्रीनें गुण येईल,— ईश्वर मला यश देवो " अशीं वाक्यें उच्चारिलीं. पांच सात मिनिटें गेल्यावर तें मूल हातपाय हालवूं लागलें. अंगाला आळोखेपिळोखे दिल्यावर त्यानें तोंड उघडलें व नंतर एक सपाटून वांति झाली. त्यामध्यें नाना तऱ्हेचीं जळमटें बाहेर आलीं. मुलाची वाचा किती वेळ तरी बंद पडली होती ती रडण्याच्या रूपानें चालू झाली. वैद्यबोवांच्या तोंडावर समाधान दिसूं लागतांच, सर्वांच्या चेहऱ्यांवर किंचित् तजेला दिसूं लागला. " ईश्वर यश देणार, मुलाबद्दल काळजी नको " असे धीराचे उद्गार वैद्याच्या तोंडून बाहेर पडले. एखाद्या कार्यांत यशाचीं चिन्हें दिसूं लागतांच ज्याप्रमाणें कर्त्याच्या डोळ्यांत एक तऱ्हेचें तेज चमकतें त्याप्रमाणें वैद्यबोवांच्या वृद्ध नेत्रांत दिसत होतें. त्यांच्या डोळ्यांवरूनच त्यांच्या अंतःकरणाचा संतोष जास्त स्पष्ट भासत होता. मुलाच्या जीविताविषयीं आतांपर्यंतच्या स्थितीवरून हताश झालेल्या कमलिनीला आपल्या वत्साचीं जीवनचिन्हें दिसूं लागतांच जो आनंद झाला त्याच्या भरांत तिनें मकरंदाला एकदम दाईच्या मांडीवरून घेतलें व हृदयाशीं धरून भराभर वात्सल्यानें अनेकवार चुंबिलें. आनंदाश्रूंच्या धारा नेत्रांतून लोटल्या. थोड्या वेळानें मकरंदानें चांगले डोळे उघडले. जननीच्या आनंदमय मुखाकडे पाहून त्यानेंहि किंचित् स्मितहास्य केलें. त्याबरोबर मातेच्या सौख्याला भरती आली. " बाळ " ह्मणून तिनें त्याचें मुख इतक्या कोमलतेनें कुरवाळलें कीं, तिकडे पहाणारालाहि आनंद झाल्यावांचून राहिला नाहीं. या स्थितींत मकरंद आणखी एकदां ओकला. त्यामुळें झालेला आनंद पुन्हां मावळला. दीन मुद्रेनें तिनें वैद्यबोवांकडे पाहिलें, परंतु " या वांतीनें मकरंद लवकर बरा होईल " असें आश्वासन मिळतांच कमलिनी फिरून आनंदित झाली. माधव मु-

ढाप्रमाणें आपल्या पत्नीकडे पहात होता. थोड्या वेळानें वैद्यबो- वांनीं बाहेर चलण्याची सूचना देतांच माधव बाहेर पडला. वैद्य- बोवाहि बाहेर आले.

" वैद्य महाराज! खरोखरी तुह्मीं मकरंदाला वांचविलेंत. आह्मी त्याच्या जीविताविषयीं साशंक झालों होतों. आह्मांला तो वांचेल अशी अशा नव्हती !! आज आमच्याच येथें भोजन करा आणि सावकाश संध्याकाळीं आपल्या गांवीं जा. "

" माधवराव! माझे उपकार मानण्यापेक्षां मानवी प्रयत्नाला यश देणाऱ्या भगवान् ईश्वराचे उपकार माना, त्याच्यावर निष्ठा ठेवा. आह्मी वैद्य ह्मणजे धन्वंतरी का आहोंत ? यशाचे मालक जर आह्मी तर त्याच्या विपरीत स्थितीबद्दल ईश्वराच्या नांवानें माणूस कां खडे फोडतो ? "

" खरोखरी त्याचे आमच्यावर उपकार आहेत. त्या कृपाळू ईश्वराला कसें विसरावें ? " याप्रमाणें सलोख्यानें बोलत बोलत दोघेहि बाहेरच्या दिवाणखान्यांत येऊन बसले. थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गप्पासप्पा झाल्यावर वैद्यबोवांनीं मुलाच्या आजारी प- डण्याची हकीकत विचारली.

" वैद्यबोवा! अलीकडे पांच सहा महिने मकरंदाला संभाळण्या- करितां मीं मघाशीं तुह्मीं पाहिलेली दाई ठेविली आहे. तीहि मोठ्या निष्ठेनें बाळाची सेवाशुश्रूषा करीत असे. काल संध्याकाळीं मी व —"माधव येथें गोंधळून थांबला.

" हां हां ! समजलों. पुढें ? " वैद्यबोवा हंसत हंसत ह्मणाले.

" आम्ही दोघें सहज शेतांत गेलों. आमच्या पश्चात् त्या दाईनें मुलाला दूध पाजलें असें इतर लोक सांगतात. त्यानंतर आम्ही घरीं परत आलों तों मुलानें रडून आकांत केल्याचें आ- मच्या दृष्टीस पडलें. तिनें त्याला घेतल्यावर " आई तहान !

तहान! करून त्यानें जीव टाकला. तिनें पाणी पाजलें, परंतु त्याचें समाधान होईना. शेवटीं त्याचे अंगांत ताप भरला. रात्रभर पोर तळमळत होतें; तिच्या जिवाला विश्रांति कशी ती ठाऊक नाहीं. दाई देखील रात्रभर जागली. तिलाहि रात्रभर झोंप नाहीं! मीहि पोराचे हाल पहात बसलों. घरगुती उपाय सगळे थकले. अगदीं पहांटे पहांटेस त्याला गार हवेंत फिरविला तरी त्याची तळमळ राहीना व मग तर त्याचे हातपाय थंड होत चालले. मग अगदीं सकाळींच उठून दोन माणसांसह तुमच्याकडे आलों."

वरील हकीकत माधव सांगत असतांना वैद्यबोवांना कांहीं गूढ उकलत चालल्याप्रमाणें वाटलें. वैद्यबोवांनीं "मुलगा रडूं लागल्यावर रात्रींत दाई कांहीं तुमच्याजवळ बोलली का?" असा प्रश्न केला.

"होय. मुलगा रडूं लागल्यावर ती बाई तिच्याशीं बोलूं लागली कीं "आतां मी नोकरी सोडतें." त्यावर तिनें "कां?" असें विचारिलें. तेव्हां तिनें "आज मीं रोजच्याप्रमाणें दूध पाजलें, पण त्याचा परिणाम असा झाला. उद्यां जर बाळाचें कांहीं कमी जास्ती झालें तर मग मींच त्याचा घात केला असें लोक म्हणतील!!" असा जबाब अगदीं दीन वाणीनें दिला. आज पांच सहा महिन्यांचा अनुभव असतां कालच तिनें कपट केलें असें कोणाला वाटेल?" अर्थात् तिनें दाईला जाऊं नको म्हणून सांगितलें."

वैद्यबोवांनीं एकदम टाळी मारली. आतांपर्यंत न समजलेली गोष्ट कळली अशा तऱ्हेची त्यांची वृत्ति झाली. त्यांनीं माधवास कांहीं तरी कानांत सांगितलें व दाईला औषध घेण्याच्या निमित्तानें स्वतःकडे पाठवून देण्यास सुचविलें. माधवानें खोली सोडली. वैद्यबोवा एकटेच वरच्या छताकडे पहात गुणगुणत स्वतःशीं विचार करीत होते. थोड्या वेळानें दाई अगदीं मंद गतीनें आंत

शिरली. ती समोर येतांच वैद्यबोवांनीं सारखें तिच्याकडे पहाण्यांतच दहा मिनिटेंपर्यंत काळ घालविला. त्यांचे डोळे अत्यंत शोधक होते. आपल्या मनांतला भाव यांनीं जाणूं नये म्हणून त्या दाईनें त्या खोलीच्या सर्व भागांकडे तोंड फिरविलें, परंतु तिच्या चेहऱ्यावरील वैद्यबोवांची नजर ढळली नाहीं. इतका वेळ गेल्यावर अगदीं शांत मुद्रेनें दाईनें वैद्यबोवांना स्वतःला आंत बोलावण्याचें कारण विचारलें.

"मकरंदाला संभाळण्याकरितां तुम्हांला ठेवलें आहे का?" असा प्रश्न वैद्यांनीं केला.

"होय!"

"मग मी विचारतों ती हकीकत स्पष्ट सांगाल का?"

"सांगेन!" कालिका अधिकच शांत मुद्रेनें बोलली.

"काल मुलाला दूध पाजण्यापूर्वीं तें तपासलें होतें का?"

"रोजच्याप्रमाणें दूध घालायचें त्यांत काय तपासायचें?

"दुधाचा रंग रोजच्याप्रमाणेंच होता?"

"होय."

"मग मुलावर त्याचा परिणाम रोजच्याप्रमाणें कां झाला नाहीं?"

"वैद्यबोवा! मुलगा काल रडूं लागला तेव्हांच मला पुढचा परिणाम दत्त म्हणून दिसत होता. माझ्या नांवाचा दुर्लौकिक होणार हें मी जाणून होतें. मुलाला रोज दूध पाजीत असतां कालच मला दुर्बुद्धि झाली असाच तुमचा भाव ना? पोटाची खांच भरण्याकरितां दैवानें आम्हांला लाविल्यानें ज्यांचीं त्यांचीं खेटरें खावीं हाच आमचा धर्म!" कालिकेनें डोळ्यांना पदर लाविला.

"बाई! अशा रडण्यानें—सोंगें आणल्यानें—तुमच्या कृत्यावर झांकण पडेल असें का तुम्हांला वाटतें? वैद्यबुवा जास्त कठोर

शब्दांत ह्मणाले. " मला तुमचें कर्म कळलें आहे. तुह्मी जर कबूल न कराल तर पोलिसांचे स्वाधीन करण्याचा प्रसंग येईल आणि एकदां त्यांच्या हातीं पडलांत, ह्मणजे मग सोडवण आमच्या स्वाधीनची नाहीं."

" नशीबीं असेल तें होईल. देवा—" तिला अधिकच हुंदका आला, " कायरे आणखी माझ्या कपाळीं आहे ?"

" बाई ! जपून असा. त्या पोराला विष तुह्मीं घातलेंत. तुमच्या पातकाला परलोकीं ईश्वर शिक्षा करीलच, पण इहलोकीं सुद्धां तुह्मीं कबूल न केल्यास आह्मांला करावी लागेल !" वैद्यबोवांनीं जास्त कर्कश शब्दानें दरडावलें.

इतका प्रकार घडल्यावर ती बाई जाऊं लागली, परंतु वैद्यबोवांनीं तिला तसें न करण्याविषयीं खडसून सांगितलें. कालिकेचे डोळे यावेळीं लाल झाले. स्त्रियांचें प्रसंगावधान तिच्या शरीरांत संचरलें. " वैद्यबुवा ! या खोलींत माझ्यावर बळजबरी करतां आहांत अशी बोंब मी सगळ्या घरभर--गांवभर ठोकीन. वार्धक्याचे मिषानें तुह्मांस कोणी सोडतील असें समजूं नका ? आजपर्यंत वैद्यकी अशाकरितांच केलीत काय ? माझ्या मानेला तांत लावण्यापूर्वीं स्वतःची कातडी वांचविण्याची तजवीज केली आहे का ?'

वैद्यबुवांच्या अंगांत अगदीं अदृश्य असा कंप भरला. क्षणैक त्यांची दृष्टि मिटली व तोंडांतून " शिव शिव " असे उद्गार नकळत बाहेर पडले. थोड्या वेळानें शांत दृष्टीनें कालिकेकडे पहात त्यांनीं निराळाच मार्ग पत्करला.

" बाई ! इहलोकच्या न्यायांतून आपल्या कर्तबगारीवर सुटलांत–दोषापासून विमुक्त झालांत, मानवी दृष्टीनें निर्दोष ठरलांत, तरी या सर्व जगाची अदृश्य स्थितींत पहाणी करणाऱ्या ईश्वरापुढें तुमचा कोटिक्रम टिकेल का ? ईश्वराला–त्याच्या अचिंत्य शक्ती-

लाहि—तुह्मी जर मानीत नसलां तर स्वतः तुमची सदसद्विवेकबुद्धि तरी तुह्माला निर्दोष ठरवील काय? खास ठरविणार नाहीं. तुमच्या चेहऱ्यावरून मी असें ताडूं शकतों कीं, तुमचे मनांत आतां चलबिचल चालली आहे! तुमचें हृदय खास तुमच्या मनाची ग्वाही देत आहे. हं! हं!! हं!!! असें तोंड लपवूं नका—जा! जा!! मला तुमच्यापाशीं जें पाहिजे होतें तें मिळालें. जा——"

पातकांत नवशिके असणारांना ईश्वराच्या नांवाचें व कल्पनेचें फार भय वाटतें, असा अनुभव आहे. तीच स्थिति कालिकेची झाली. तिचें मन तिला खाऊं लागलें, वृत्ति चंचल झाली व केलेलें पातक बोलून टाकावें असें तिला वाटलें. वैद्यबोवांनीं कालिकेची वरील स्थिति पूर्णपणें जाणली, परंतु कालिकेच्या मानी स्वभावाला माफी मागणें खपलें नाहीं. तिचा पुनर्निश्चय झाला. वैद्यबुवांना हेंहि कळलें. ते स्वस्थ बसले होते.

"मूळ स्थिति ठाऊक नसलेल्या लोकांना वरील प्रकार ऐकून दाईचें कृत्य निंद्य वाटेल, पण प्रत्येक गोष्टीचें निदान बाह्य परिस्थितीवरून केल्यास खास चुकतें." कालिकेचे शब्द ऐकतांच वैद्यबुवांना समाधान वाटलें व ते जास्त ऐकण्यास उत्सुक झाले. परंतु पुढें कांहीं तरी बोलण्याच्या अगोदरच कालिका बाहेर पडली होती. वरील भाषण वैद्यबुवांना एक गूढच होतें; त्याचा उलगडा करण्याची शक्ति त्यांना नव्हती. लवकरच माधव खोलींत कांहीं तरी कळेल या इच्छेनें आला, परंतु वैद्यबुवांची अर्धवट स्थिति पहातांच त्याची निराशा झाली.

"माधवराव, तुमची दाई सामान्य नोकरासारखी नाहीं. तिची बोलण्याची ऐट, शरीराची ठेवण, सफाईदार भाषा—हे सर्व गुण ती कोणी तरी उच्च दर्जाची स्त्री असावी असें सुचविण्यास

कारण होतात. शिवाय ती तरुण आहे, स्वरूपानें सुंदर आहे, हेंहि एक कोडेंच आहे. आणखी जात ब्राह्मण आहे."

"होय, आहे खरें वैद्यबुवा! तिच्याकडे पाहून मीं तिला पूर्वीं कधीं पाहिल्यासारखें वाटतें. काय असेल तें असो! ईश्वर जाणे!

"तिच्या शेवटच्या बोलण्यावरून तिनें कांहीं तरी काळेंबेरें केलें आहे असें वाटतें. पण खात्री नाहीं. तिला एकदम घालवूं नका; पण जरा बेतानें वागा हो."

इतक्यांत वैद्यबुवांना स्नान करण्यास सुचविण्याकरितां एक नोकर आला व हें बोलणें इतक्यावरच थांबलें.

---

## प्रकरण आठवें.

## एक दुर्दैवी कैदी.

वरील प्रकार मधुपुरास घडत असतां त्या सकाळींच पश्चिमेकडील रानांत कांहीं निराळीच गोष्ट चालली होती.

सूर्यनारायणाचीं किरणें झाडांच्या टोंकावरून नुकतींच अरण्याच्या अंतर्भागांत प्रवेश करीत होतीं. एका ठिकाणीं १०।२० मंडळी जमून त्यांचें कांहींतरी खलबत चाललें होतें. ही जागा बरीच साफसूफ केलेली होती व आसपास झाडीहि विरळ होती. या मंडळीमध्यें एक अगदीं तरुण मनुष्य असून त्याला सर्वांच्या मध्यें उभा केला होता. त्याच्या दंडाला दोऱ्या बांधल्या असून त्यांचीं टोंकें त्याच्या जवळच उभ्या असलेल्या दोन इसमांच्या हातांत होतीं. या ठिकाणीं असलेली मंडळी दिसण्यांत अतिशय राकट, बांध्यानें बळकट व एकंदरींत भेसूर अशी होती. त्यांच्या हातांत एक प्रकारचे भक्कम सोडगे होते व कांहींजवळ गंजलेलीं

मोडलेलीं जुनीं हत्यारें होतीं. मंडळीच्या एका बाजूस एक इसम स्वस्थ बसला होता; त्याच्या एकंदर बोलण्याच्या व वागण्याच्या ढबीवरून त्या रानटी टोळीचें नायकत्व त्याच्याकडे असावें. या इसमाजवळ कांहींजण अगदीं मंद स्वरांत पण मोठ्या अदबीनें बोलत होते. अशा स्थितींत किंचित् काळ गेल्यावर नायकाची दृष्टि त्या कैद्यावर फिरली. त्याप्रमाणें सर्वांचेंहि डोळे तिकडेच लागले. त्या मंडळींमध्यें करुण दृष्टीनें त्या दुर्दैवी तरुणाकडे पहाणारा कोणीहि नव्हता. प्रत्येकाच्या डोळ्यांत क्रूरपणा मात्र पूर्ण दिसत होता. कोणी कोणी त्याकडे पाहून आपसांत कुजबुजत–कोणी त्याकडे पाहून डोळे मिचकावीत–कोणी उघड उपहासानें हंसत. इतक्यांत नायकाच्या तोंडून शब्द बाहेर पडूं लागले व त्यामुळें सर्वत्र शांतता झाली.

"मग तुला स्वतःची सोडवणूक करून घेण्यापुरती ऐपत नाहीं व दुसरें कोणी दंड भरून तुझें आयुष्य विकत घेईल असेंहि दिसत नाहीं! श्रीमंत लोकांमध्यें तुझा कोणी मित्र असला तर पहा. जिवानिशीं सुटशील! नाहीं तर तुझा प्राण आह्मी घेणारच."

"तुमच्या हातीं सांपडल्यावर मला इतका वेळपर्यंत सुटकेची आशा वाटत होती; पण आतांपर्यंतची तुमची वागणूक पाहून माझ्या जिवाची सुटका तुमच्या हातून होण्याची आशा धरणें ह्मणजे निवळ मूर्खपणा आहे; तो तरुण अगदीं निराशेनें ह्मणाला. "शिवाय माझ्या जिवाकरितां स्वतःचा पैसा खर्चीं घालणारा मित्र या जगांत मला कोणी नाहीं."

"पहा विचार कर! असा जिवाला कंटाळूं नकोस" नायकानें सभ्यतेनें शब्द उच्चारले.

"मनुष्याशीं इतर माणसें जर माणुसकीनें वागलीं तर त्याला या जगांत रहाण्याचा व वागण्याचा उत्साह वाटेल; परंतु मनुष्याच्या

आकृतीचे पशुतुल्य वर्तन करणारे प्राणी जर या जगांत आहेत तर त्यांच्या धुमाळींत रहाण्यापेक्षां आपली जीवनयात्रा लवकर संपविणें कोणाला रास्त वाटणार नाहीं? मी एकदां आत्मघाताचा प्रयत्न करीत असतां, मला वांचवून हिंस्र पशूप्रमाणें जीव घेण्यांत तुह्मांला जर सौख्य वाटत असेल तर माझी मरणाची तयारी आहे. मला या जगांत मायेचें असें कोणी नाहीं—मला या जगांत आशा नाहीं. जिवंत असून मेल्याप्रमाणें माझी स्थिति आहे. द्रव्यद्वारा प्राण वांचविण्याचा मी प्रयत्न करीत नाहीं. माझा तुमचा अर्थाअर्थी संबंध नसतां तुह्मी माझे प्राण हरण्याविषयीं साभिलाष झालां आहांत. खुशाल ईश्वराचे न्यायासनासमोर मी तुमच्या वर्तीनें क्षमा मागेन. माझ्या प्राणापेक्षांहि तुमच्या अज्ञानाची कींव मला जास्त येते.—मी—"

"द्रव्य देऊन अगर एकाद्या मायेच्या माणसाकडून देववून सोडवून घेण्याबद्दल तुला आह्मीं विचारलें अन् तूं पुराण झोडलेंस. तुला जगांतून पाठवितों ह्यांत आमचा दोष नाहीं. असें करणें आमच्या धंद्याला योग्य आहे. आमचा नाइलाज आहे. अशा लपंडावानें तुझा जीव वांचेल असें समजूं नको." वरील उद्गार नायकाच्या तोंडून अर्धवट रागांत, अर्धवट तिरस्कारांत, असे बाहेर पडले.

आसपासची मंडळी नायकाच्या मनोवृत्तीशीं एकरूप झाली.

"महाराज ! तुह्मी थोर आहांत !" कैद्याच्या आवाजांत बराच कठोरपणा होता.

"अगोदर दरवडेखोरांसारखीं निंद्यकर्मैं करून त्यांना अडथळा करणारांना जगांतून नाहींसें करण्याचें पातक पदरीं बांधण्यांत तुह्मांस नाइलाज वाटतो. तुमच्या धंद्याला रोध करणारे इसम तुह्मी होऊन बनवितां. लोकांजवळून द्रव्यप्राप्ति झाली तरी, न झाली तरी,

त्यांचे गळे कापण्यांत जर तुमचा निरुपाय होत असेल तर ईश्वराचा न्याय देखील अंधळा आहे ह्मणायचा! आपल्याच जातभाईच्या रक्तानें हात रंगवून नरहत्येच्या पातकानें मन निर्दय करून कोणत्या महत्कार्याची उभारणी भावी काळांत तुमच्या हातून होणार आहे? पोटाची खांच भरण्याकरितां उजळ माथ्यानें जगांत वावरून पुष्कळ उद्योगधंदे करतां येतील. लोकदृष्टीपासून दूर अरण्यासारख्या स्थळांत तुह्मांला रहावें लागतें व त्यामुळें कांहीं काळपर्यंत तुमचा बचाव होईल. परंतु ईश्वराच्या सर्वशक्तिमत्तेपासून आपलीं शरीरें कोठें लपवाल? रानांतून दऱ्याखोऱ्यांतून तुमचा शोध करण्याचें धारिष्ट माणसाच्या हातून झालें नाहीं तरी, आपल्या वास्तव्यानें दूषित केलेल्या वातावरणाचा त्याग तुमच्यानें करवेल काय? तुमचें जीवन चालविणाऱ्या पंचमहाभूतांना सुद्धां चकविणारें सामर्थ्य तुमच्यांत आहे का? हीं पातकें आपल्या फळांचीं ओझीं बांधून तुमचा ऱ्हास करण्यास केंव्हां तरी उतरतीलच! मानवी सामर्थ्य, अधिकार, सत्ता ह्या सर्वांला तुह्मीं धाब्यावर बसविलें; तरी पण त्यांहून वरिष्ठ असलेल्या अचिंत्य ईश्वरी शक्तीचा लय तुमच्यानें होणार नाहीं. दुर्दैवानें तुमच्यासारख्या नरपशूंच्या हातून मरण आलें तरी मी तुह्माला सुबुद्धि देण्याकरितां ईश्वराची मरणानंतर व मरतांना प्रार्थना करीन. त्याची करुणा भाकीन.—चला, प्रत्येक क्षण मला निराश व्यक्तीला जड वाटत आहे. चला, तुमच्या सर्वांच्या शक्ति एकवटून माझ्या देहाचा नाश करण्यास सिद्ध होऊन माझा क्षय होवो. तुम्हांस नाइलाजाच्या वाटणाऱ्या गोष्टीला मी अडथळा करणारा कोण? चला तयार व्हा!"

वरील प्रत्येक शब्द व वाक्य त्या तरुणाच्या तोंडून इतकें कठोर, ठांसून व कळकळीनें बाहेर पडत होतें कीं, तें ऐकून त्या

रानवट दरवडेखोरांचे चेहरे उतरले. भाषण चालू असतांना नायकाच्या तोंडावर नानातऱ्हेचे विकारतरंग येऊन गेले. राग, तिरस्कार, करीत असलेल्या पातकाची जाणीव, भय अशा तऱ्हेच्या मनोवृत्तीच्या अनेक लहरी मनाचें प्रतिबिंब दाखविणाऱ्या येऊन गेल्या. त्यांचा चेहरा जरी राकट होता, त्यांचा धंदा जरी घोरकर्मी होता, तरी पण माणसाच्या निसर्गवृत्तीवर पडलेलें दडपण वरील भाषणानें जाऊन त्या बळावल्या. त्याला स्वतःच्या आजपर्यंतच्या कर्मांची लाज वाटून त्याचें मुख आरक्त झालें. लोहवत् कठिण अंतःकरणाच्या नायकाप्रमाणेंच अनुयायांच्या मनामध्येंहि न्यायबुद्धि, सदयता, काठिन्य व क्रूरता इत्यादि परस्परविरोधी मनोविकारांची खडबळ चालू झाली होती. हा सर्व परिणाम त्या तरुणाच्या भाषणाचा होता. आजपर्यंत त्यांनीं आपल्या धंद्यांत कित्येक व्यक्तींचा कंठच्छेद केला होता. जीवासाठीं दीनवाणीनें दया भाकणारीं कित्येक माणसें त्यांना भेटलीं. परंतु आजच्यासारखा परिणाम त्यांजवर कधींच झाला नव्हता. प्रत्येक इसम अधोवदन करून बसला. तरुण कैद्याच्या वदनावर विलसणारें तेज कांहीं अपूर्व होतें. त्यामध्यें मरणाचें भय मुळींच नसून उलट जीविताविषयीं निराशा मात्र दिसत होती. बराच वेळ शांततेंत गेल्यावर नायकानें तोंड वर केलें व तरुणाकडे किंचित् लज्जामय दृष्टीनें पहात पहात तो बोलूं लागला—

"तुझ्याशीं बोलावें कोणच्या तऱ्हेनें हेंच मला कळत नाहीं. बाहेर जगांत सभ्यपणाचे नांवाखालीं नीच कर्में करणारे प्राणी नाहींत अशी का तुझी समजूत आहे? असें असतां आमच्या धंद्यावर इतकें टाकून बोलण्याचें कारण काय?"

"बाबारे! करीत असलेल्या पातकांच्या सांठ्यांत भर घालण्यापेक्षां त्यांचा नाश करणें जास्त इष्ट नाहीं का?"

" तूं जरी कांहीं ह्मटलेंस तरी आह्मांला करणें असेल तेंच करूं! धर्मानें वागून इमानानें पोट भरण्याचे हे दिवस नाहींत."

तरुणाचे ओंठ क्रोधानें स्फुरूं लागले-"जा-जा, मी तुझा-तुझ्या अधिकाराचा उघड धिक्कार करितों-तुह्मी मनुष्य नाहीं—पशु——"

" जिवावर बेतली नाहीं तोंपर्यंत या अशाच गमजा चालायच्या. चलरे-ए-" असें अर्धवट बोलून त्यानें एका व्यक्तीस जवळ येण्याविषयीं खुणावलें.

ती व्यक्ति जवळ येण्यापूर्वींच तो उठला. मंडळीमधून एक धिप्पाड व्यक्तिहि उभी राहिली व मंद गतीनें त्याजवळ आली— " गड्यांनों— " नायक सर्वांकडे पहात ह्मणाला. मंडळींचे डोळे त्याकडे गेले. "ब्रह्मज्ञान ऐकण्याची ही वेळ नाहीं. या इसमाला जिवंत ठेवला तर हा खात्रीनें आपल्याला अधिकाऱ्यांकडून पकडून देईल. शिवाय आमच्या डोळ्यांदेखत आमचा उघड उघड धिक्कार करणाऱ्या या नीचाला-हीं सापाची जात आहे, ब्राह्मण आहे—याला न मारणें ह्मणजे आपल्या हातानें जाणून बुजून गळा कापून घेण्यासारखें आहे. याला बोलण्याची सवलत मिळतांच वाटेल तसें अद्वातद्वा बोलण्याला याची जीभ सिद्ध झाली. चला, आज रात्रीं आपल्या कामाला-- " येथें नाईक बोलतांना चाचरला-मंडळीकडे पाहून त्यानें डोळे मिचकावले. " प्रहर रात्रीपूर्वीं याला-रवाना-जास्त नको-वेळ किती तरी फुकट गेला. याच्या जगण्यानें स्वतःला लाभ तर नाहींच, उलट त्रास मात्र होणार. दिवसावर दिवस फुकट गेले. आज याचा शेवटचा निकाल लावणें-नव्हे-लावलाच-- ( येथें नायकांचे शब्द तुटक पडूं लागले ) पाहिजे-"-जवळ आलेल्या व्यक्तीच्या कानांत तो बोलला.

दिवस बराच वर आला होता. सूर्याची कोमलता पार नाहींशी

झाली असून झाडाच्या फांद्यांमधून त्याचें दुष्प्रेक्ष्य बिंब पहाणारांचे डोळे दिपवूं लागलें होतें. चोरांचा नाईक वरील भाषण बोलत असतांना कैद्याचें लक्ष सूर्याकडे होतें. त्याला नकळत त्याच्या हाताची अंजली झाली होती. झाडांमधून एक मोठा कवडसा वाऱ्याच्या अभावीं स्थिरपणानें त्याच्या मुखावर पडला होता. त्यांत त्याच्या शुद्ध सात्विक भक्तीचें प्रतिबिंब अधिकच उठावांत दिसलें. त्यानें सूर्याची— ब्राह्मणांच्या दैवताची–आराधना चालविली व तो मरणास सिद्ध झाला. त्याच्या तोंडावर त्या सूर्यप्रकाशामध्यें अद्वितीय तेज चमकूं लागलें !

या वेळीं दुसरे कोणी प्रेक्षक असते तर त्यांना त्या कैद्याविषयीं भक्ति उत्पन्न झाली असती. परंतु चोरांना त्यांचें काय होय ? मघांच्या धिप्पाड व्यक्तीनें आपल्या राकट हातानें कैद्यास कठोर स्पर्श केला. मागें पहातो तों त्याला एक व्यक्ति चालण्यास सुचवीत असल्याचें दिसलें. "ए बामणा– ! चाल. आज रात्रीं तुझे दिवस भरले असा नायकांचा हुकूम आहे. आज सारा दिवस तुला आहे. त्यांत कांहीं सोडवणुकीचा उपाय असला तर बघ. नाहीं तर काय होणार हें निराळें सांगण्याला नको. विचार कर. आज तूं फार रगेलपणानें वागलास. हं चल. वेळ घालवूं नको." बोलतांना त्यांच्या चेहऱ्यावर तजेला दिसत होता. परंतु त्या दुर्दैवी तरुणाची स्थिति कांहीं चमत्कारिक होती. त्या दरवडेखोरांच्या विलक्षण वागणुकीचा तरुणाला राग आला. डोक्यापासून पायांपर्यंत त्यानें एकदां पाहिलें व " थांब तुला कसें वागावें याचा धडा शिकवतों. इतका वेळ सभ्यपणानें वागलों त्याला रंगेल ह्मणाल इतके बेशरम असाल अशी माझी कल्पना नव्हती." असें ह्मणून त्यानें त्या व्यक्तीच्या छातींत मूठ वळून एक भयंकर ठोसा चढविला. स्वतःच्या सामर्थ्याचा परिणाम तो जाणून नव्हता असें

नाहीं. सूर्यबिंबाकडे पहात एकाग्र होऊन ईश्वरचिंतन करीत असतां त्याचा भंग केला ह्मणून त्याला त्या धिप्पाड व्यक्तीचा राग आला होता. त्यांतच त्याच्या तिरस्काराची व उद्धट वागणुकीची भर पडली. यामुळें रागाचा अतिरेक आणि स्वपरबलाबलाचा विचार करीत बसण्याइतकें भान न राहून त्यानें त्या सपाटच्यांत इतका जोरदार रट्टा दिला कीं, त्याच्या दुपटीनें ताकदवान असलेल्या त्या चोराला तो असह्य होऊन त्यानें आपला देह भूमीवर टाकला. हा प्रकार घडतो न घडतो तोंच " पहातां काय ? ठोका रामोशाला– " अशा तऱ्हेचा शब्दमय ध्वनि वातावरणांत दुमदुमला, एक जबरदस्त दांडक्याचा टोला कैद्याच्या डोक्यांत बसला व ताबडतोब त्यानेंहि आपल्या प्रतिपक्ष्याप्रमाणें जमिनीवर बेशुद्धींत लोळण घेतली.

* * * *

तरुण कैदी जागा होऊन पहातो तों एका अंधाऱ्या जागेंत आपण असल्याचें त्याला आढळलें.

---

प्रकरण नववें.

## निराशेंत आशा.

रानामध्यें असलेल्या एक अंधाऱ्या गुहेंत वरील तरुण अस्वस्थ चित्तानें फिरत होता. मधून मधून तो भिंती चांचपून पाही, पन त्यामुळें त्याला बाहेर पडण्याला मार्ग सांपडण्याची आशा दिसेना. शोधतांना त्याला इतकें मात्र आढळून आलें कीं, एक अगदीं लहान छिद्र आपल्या जीविताला राखण्यापुरतें आहे. त्या भोंकांतून त्यानें पांच चार वेळ बाहेर पहाण्याचा प्रयत्न केला. झाडांचा कांहीं भाग व थोडा उजेड दिसे. पण त्यामुळें त्याला दिनमान कळण्याला मार्ग

न्हता. आपल्या मनाशीं विचार करीत तो त्या अरुंद गुहेंत इतस्ततः फिरत होता. तासांचे तास एकामागून एक गेले. पोटांत भूक लागली. खाण्याला साधन कांहींच नाहीं. अशा स्थितींत त्याला चैन पडावें कसें? परंतु तसेंच स्वस्थ बसून आपल्या नशिबाला दोष देत रहाणेंच इष्ट होतें व त्याप्रमाणें तो करीतहि होता. बराच काळ लोटल्यावर कोणच्या तरी भागांतून माणसाचीं पावलें ऐकूं येऊन यानें आपले डोळे ताणून पाहिले, पण कोणच्या भागांतून कोण येत आहे हें त्याला मुळींच कळेना! थोड्या वेळानें तो बसला होता तेथें अंधुक प्रकाश पडूं लागला. जसजसा त्या प्रकाशाचा विस्तार होऊं लागला तसतशी त्याला एका व्यक्तीची अस्पष्ट आकृति आपल्याकडेसच येत असलेली दृष्टीस पडली. त्या प्रकाशाबरोबर त्याला स्वतःच्या तुरुंगाच्या रचनेचीहि बरीचशी कल्पना आली. रानांतला प्रकार त्याला त्याच्या मध्यंतरींच्या निश्चेष्टतेमुळें आठवत न्हता; अर्थात् आपण एकदम अशा जागीं कसे आलों याचें त्याला गूढ पडलें यांत नवल तें काय?

चित्तावर आलेल्या विस्मृतीची कृष्णछाया दूर सारून त्यापलीकडे आपल्या स्थितीला पहाण्यासाठीं तो उत्सुक झालेला होता. आपण चोरांपैकीं कोणाला तरी मारल्याचें त्याला स्मरत होतें, पण पुढें काय झालें याचें भान त्याला न्हतें. येथपर्यंतच त्याच्या स्मरणशक्तीची गति जाई व यापुढें सर्व शून्य दिसूं लागे. आपल्या स्थितीचा शोध लावतांना त्याचा हात सहज डोक्यावर गेला व तें खाजवितांना त्याला एकदम स्मरण झालें. त्याच्या डोक्यांत एकदम वेदना सुरू झाल्या व हात झटकन् खालीं आला. आतां त्याला झालेल्या स्थितीचें अस्पष्ट स्वरूप अंधुक अंधुक स्मरूं लागलें. इतका विचार चालला आहे तोंच मघांपासून मंदगतीनें येत असलेली व्यक्ति अगदीं जवळ येऊन उभी असल्याचें त्याला दिसलें.

तिच्या हातांत एक लहानसा कटोरा असून त्यांत कैद्याच्या खाद्य-पेयादि वस्तु होत्या. त्या वस्तु पुढें करून त्यानें कैद्याला त्या घेण्यास सांगितलें. मनुष्याला कितीहि दुःख झालें असलें व त्याला सर्व जीविताची कितीहि निराशा वाटूं लागली तरी भुकेच्या वेळीं तें विसरून जीवन राखणाऱ्या अन्नाचा स्वीकार त्याला करावा लागतो. यावेळीं इच्छा त्याच्या स्वाधीन रहात नसून बंदिवान गुलामाप्रमाणें तो क्षुधेच्या आधीन आपोआप होतो. किंबहुना पोट भरून सुखाची ढेकर देत असतांनाच त्याच्या कोणत्याहि विचाराला गति मिळते, निराशा प्रज्वलित होते व दुःख तीव्र भासतें. याप्रमाणें आपल्या जीविताविषयीं कंटाळलेला कैदी समोर अन्न येतांच त्याच्या स्वीकाराला सिद्ध झाला. अन्न हातीं पडल्यावर त्यानें तें आणणाऱ्या इसमाच्या तोंडाकडे एकवार निरखून पाहिलें. हा अगदीं तरुण असल्यामुळें व याच्या डोळ्यांतील सौम्य तेजामुळें याच्याशीं भाषण केल्यास अथवा तशी इच्छा प्रदर्शित केल्यास अनादर होईल, असें त्या दुर्दैवी कैद्यास वाटेना. शब्द टाकून पहावा ह्मणून त्यानें त्या अन्नादात्याशीं अत्यंत करुण वाणीनें बोलण्याची इच्छा प्रदर्शित केली. हा तरुण गृहस्थ यापूर्वींहि या तरुण कैद्यास अन्न पुरविण्याचे कामावर अनेकदां दृष्टीस पडला होता परंतु तेव्हां तो आपलें काम होतांच निघून जात असे, ह्मणून त्याशीं भाषण करण्याला याला संधिच मिळत नसे. आज तशी स्थिति नव्हती. रोजच्याप्रमाणें अन्न देऊन चालता न होतां आज तो बराच वेळ स्वस्थ उभा राहिला. ज्या भागांत हे दोघे-जण होते तेथें भरपूर उजेड नसल्यामुळें कैद्याला आपल्या अन्न-दात्याच्या मनोवृत्ति पहाण्यास मिळत नव्हत्या. दोघेहि एकमेकां-कडे पहात असतां किती तरी क्षण गेले, पण भाषणाचे कामीं पुढाकार घेऊन शांततेचा भंग करण्याचें साहस एकासहि करवेना.

एकमेकांच्या विचारांशीं परस्परांची पूर्ण ओळख असणाऱ्या अगदीं नेहमींच्या सवंगड्याशीं जरी मनाच्या निर्विण्ण स्थितींत गांठ पडली तरी भाषणाचा उगम कसा करावा याची अडचण पडते असा सर्वसाधारण अनुभव आहे. शेवटीं अंतर्वृत्ति शब्दरूपानें बाहेर पडण्यासाठीं उचंबळल्या असतां भाषणाला आरंभ करण्याचें धैर्य न होऊन, त्या दोघांचे निःश्वासच एकमेकांच्या प्रश्नांचीं उत्तरें देत आहेत कीं काय, असा तेथें कोणी पहाणारा असता तर त्याला भास झाला असता; व त्याप्रमाणेंच त्या दोघांची स्थिति होती. शेवटीं अन्न घेऊन येणाऱ्या इसमानें एक दीर्घ उसासा टाकला व त्यानें कैद्याकडे पाठ फिरविली. ज्याशीं भाषण करण्याची उत्कट इच्छा आहे तो जाण्याच्या तयारींत असलेला पाहून कैद्यानें त्याचा पाय सौम्य रीतीनें धरला व "महाराज" हे शब्द अगदीं मंद स्वरांत उच्चारले. "काय पाहिजे?" हा उलट ध्वनि निघाला. "आज रात्रीपर्यंतच आयुष्याची मर्यादा असलेल्या या गरीबाशीं चार शब्द बोलण्याची कृपा कराल का?" हे शब्द इतक्या मृदु स्वरांत बाहेर पडले कीं, तरुण कैद्याविषयीं सहानुभूति वाटणाऱ्या दुसऱ्या तरुणाचे डोळे भरून आले. त्याचें कारुण्यमय नेत्रद्वय दृष्टीस पडतांच कैद्याला धीर आला व आतां आपला अन्नदाता काय बोलतो याची वाट पहात तो त्याकडे टक लावून पहात राहिला.

"कैद्या! आयुष्याला तूं खरोखरच कंटाळला आहेस का?"

"महाराज! असें कसें वाटेल? बरोबर प्रयत्नाच्या सीमेपर्यंत मनुष्य आपल्या जीविताच्या रक्षणाकरितां धडपडतो. मीहि मनुष्यच आहें."

"होय, पण आज सकाळीं तुझ्या बोलण्यावरून तूं अगदीं निराश झालेला असून जीविताच्या नाशाची इच्छा करीत आहेस असें मला भासलें."

" निरुपाय झाला ह्मणजे निराशेपलीकडे माणसाच्या हातीं काय आहे ? "

" मग तूं खरोखरीच जगण्याची इच्छा करतोस तर ? "

" मरेतोंपर्यंत इच्छा तशीच कायम असते ! "

" मी सांगेन तसें करण्यास तुझी तयारी आहे का ? "

याला होकार मिळतांच कैद्याच्या कानांत कांहीं तरी सांगून तो निघून गेला.

दिलेल्या अन्नाचें भक्षण करून कैदी कटोऱ्यांतलें पाणी प्याला व जरा बरें वाटल्यावर स्वतःच्या स्थितीचा विचार करीत स्वस्थ बसला. चोहोंकडे निराशेचा अंधार माजला असतां त्याला आशेचा प्रकाश दिसूं लागतांच तो आपल्या डोक्यांत चाललेल्या वेदना विसरला.

---

## प्रकरण दहावें.

## पुढचा प्रयत्न.

रानामध्यें एका झाडाखालीं दोन व्यक्ति एकमेकांशीं बोलण्यामध्यें अगदीं गढून गेल्या होत्या. त्यांच्या वेषाकडे व रूपाकडे पाहिल्यास त्या दोघांचीं वयें सारखींच असावीं असें दिसलें असतें. भाषण करीत असतां त्यांचे डोळे मधून मधून आजूबाजूस लांबवर टेहळणी करीत असत. आसपास कांहीं आवाज झाला अथवा कसली तरी चाहूल लागल्याचा भास झाला, कीं, त्यांच्या मुद्रा कावऱ्याबावऱ्या होत, त्यांच्या भाषणांत किंचित् भंग होऊन ते आसपास पाहूं लागत व झाडाच्या आड होण्याचा प्रयत्न करीत. त्यांच्या चेहऱ्यांवर विलसणारी तारुण्यश्री पाहून कोणालाहि आनंद झाला असता. त्यामध्यें एक दुसऱ्यापेक्षां वयानें किंचित् लहान होता.

परंतु त्याच्या डोळ्यांत विलक्षण पाणी असून त्याच्या चेहऱ्याला त्यामुळें विलक्षण शोभा आली होती. असो.

" तुमची रहाणी चोरांमध्यें असून तुमची वृत्ति अशी निराळी कां? " थोरला ह्मणाला.

" मी स्वतः चोर नाहीं अगर चोरांचा साथीदारहि नाहीं. " धाकट्यानें उत्तर दिलें.

" मग तुह्मी येथें कां रहातां? "

" रहावें लागतें— "

" कारण? "

" कारण सांगून काय करायचें आहे? "

यावर ते फिरून एकमेकांशीं मंद स्वरांत भाषण करूं लागले व शेवटीं त्या दोघांच्याहि मुद्रेवर निश्चयाची झांक दिसूं लागली.

संध्याकाळ होऊन सूर्य अस्तगिरीपलीकडे गेला. त्याचीं अगदीं फिकट किरणें अजून पश्चिमआकाशांत होतींच, तरीहि पण त्या दोघां तरुणांचें भाषण आपसांत चाललेंच होतें. थोरला किंचित् उच्च स्वरांत ह्मणाला—

" त्यांचा हा बेत तर पक्का झाला आहेना? "

" होय—पण—! " धाकटा बोलतांना अडखळला; हें पहातांच त्याच्या मनांत कांहीं तरी सांगावयाचें असून तो सांगत नाहीं हें थोरल्यानें ताडलें व आपणापासून कोणतीहि गोष्ट लपविण्याचें कारण नाहीं असें त्यानें सुचविलें.

" आपण येथून लवकर गेलें पाहिजे. पुढच्या व्यवस्थेला तें बरें जुळेल! "

" आज त्यांना या बाजूला यायचें नाहींना? " थोरला किंचित् कातर स्वरांत बोलला.

" नाहीं, परंतु होतां होईल तितकें लवकर येथून निसटणें बरें

स्थापना शके १८३३ संग्रहालय शाखा

असें मला वाटतें."

प्रदोषकाळचा धूसर वर्ण रात्रीच्या प्रसारामुळें जास्त जास्त कृष्ण होऊं लागला. हें पाहून धाकट्याच्या मताला अनुसरणें थोरल्यास पसंत पडलें व दोघेहि मधुपुरच्या दिशेनें जाण्यास निघाले. थोडक्याच वेळांत ते दिसेनासे झाले.

* * * *

रात्रीचा आठ नऊ वाजण्याचा सुमार असेल नसेल. मधुपुरापासून थोड्याच अंतरावर एका शेतांतून जाणाऱ्या एका ओढ्याच्या दरडीखालीं अंधारांत दोन व्यक्ति आपसांत कांहीं तरी कुजबुजत होत्या. गांवांत जिकडे तिकडे शांतता होऊं लागली असून मधून मधून हंसण्याखिदळण्याचा ध्वनि मात्र अस्फुट असा वरील ठिकाणीं कानीं पडत होता. लांबच्या एखाद्या शेतांतून राखणारांचा कर्कश स्वरहि वेळावेळानें निशाकालीन शीतल वायूच्या मंद लहरींबरोबर येत होता. वरील व्यक्ति उभ्या असलेल्या स्थळापासून जवळच शेताच्या बांधावर पांच सात घनदाट झाडें होतीं. त्यामुळें त्या जागेवर जास्तच अंधारी आली होती. आपलें भाषण ऐकण्यास येथें कोणी नाहीं अशी त्यांची समजूत होती, परंतु बोलण्याच्या भरांत आसपास कांहीं कुजबूज झाल्यास ते कावरेबावरे होऊन इतस्ततः पाहूं लागत. वायूची झुळूक लागून कम्पित झालेली एखादी वृक्षशाखा जर त्यांना दृग्गोचर झाली तर एकदम मनुष्य आहे कीं काय अशी धास्ती वाटे व ते तसा प्रकार नसल्याबद्दल खात्री झाली ह्मणजे मग फिरून आपल्या पूर्व भाषणामध्यें मग्न होत.

"मग ठरलें ना कसें करायचें तें?" जरा उच्चस्वरांत हे शब्द बाहेर पडले. "हो. ठरलें. रात्रीं बारा वाजल्यावर तुह्मी मागील बाजूनें शीळ घाला. मी सांगितल्याप्रमाणें बाहेर येईन व

नंतर—" इतक्यानेंच परस्परांचा आंतर हेतु एकमेकांना कळला.

" पण बाई!! कालिका, मला अजूनहि तुमचें भय वाटतेंच, आमची फसवणूक तर करणार नाहींना? नाहीं तर भलतेंच होऊन पश्चात्तापाचे धनी मात्र व्हावें लागेल. यदाकदाचित् मला संशय आल्याप्रमाणें घडून येण्याचा रंग दिसूं लागला तर—पुढची स्थिति लक्षांत असूं द्या मात्र!!" भाषणाच्या शेवटच्या भागांत तर धमकावणी देण्याचा हेतु बोलणारानें आपल्या साथीदार स्त्रीजवळ अगदीं उघड केला.

" असलें कर्म करण्याला मी कां प्रवृत्त झाल्यें याचीं कारणें थोडीं मघांशीं तुह्मांला सांगितलीं. मी जातीची स्त्री आहें; आणि जगाच्या दृष्टीनें अबला असलें तरी पण माझ्या फसवणुकीचा सूड मी पूर्णपणें घेऊन माझें बळ त्या मेल्याला दाखविल्याखेरीज कधींहि रहाणार नाहीं. तुह्मी खुशाल निष्काळजी असा. आज तुमचें व माझें काम फत्ते झालें ह्मणून समजा—!!" वरील वाक्यें त्या स्त्रीच्या तोंडून बाहेर पडतांना त्यांमध्यें निश्चय पूर्णपणें भरला होता. तिच्या डोळ्यांमध्यें या वेळीं दिसणारी क्रूर चमक आकाशस्थ तारकांच्या अंधुक प्रकाशांत अधिक भेसूर दिसत होती. दहापांच क्षण शांततेंत गेल्यावर फिरून त्या स्त्रीनें कामाच्या यशाबद्दल निःशंक रहाण्यास सुचवून कालक्षयाच्या सबबीवर आपल्या पुरुष साथीदाराचा निरोप घेतला. तो पुरुष पलीकडच्या रानाच्या बाजूला मधून मधून शीळ घालीत निघाला व त्या स्त्रीनें मधुपुरचा रस्ता धरला. जातां जातां त्या दोघांमध्यें खालील भाषण झालें—

" बरोबर बाराच ना अगदीं?" " होय, बरोबर बारा."

* * * *

वरील गोष्ट घडून गेल्याला दोन तीन घटका गेल्या असतील नसतील तोंच गांवच्या पाटलाचे दारावर धक्के बसूं लागले. या

अपूर्व प्रकाराचा अर्थ न कळून आंतल्या मंडळीपैकीं कोणी किंचित् घाबरून किंचित् रागांत दारावर धक्के देण्याचें कारण काय म्हणून प्रश्न केला. परंतु बाहेरच्या खप्पी माणसांनीं त्यास सरळ जबाब न देतां "दार उघडल्यावर सर्व कळेल" असा रोकडा जबाब दिला. "तुह्मी कोण" अशी पृच्छा आंतल्या माणसानें जरा दरडावून केली. पण बाहेरच्या सद्गृहस्थांनीं यालाहि पहिलेंच उत्तर देऊन काम भागविलें. दोन प्रश्नोत्तरें होईतोंपर्यंत आणीकहि कांहीं गृहस्थ अर्धवट जागे झाले. बाहेरचे धक्के खरे नसून स्वप्नांतलाच खेळ आहे असें झोंपेच्या बहारींत अडथळा झाल्यानें त्रासलेल्या या मंडळीला वाटलें. त्यांनीं प्रथम जागा झालेल्या गृहस्थाची त्याच्या काल्पनिक प्रश्नोत्तरांबद्दल थट्टाच केली. तो बिचारा त्यांची खात्री पटविण्याचा जों जों प्रयत्न करी तों तों त्याच्या बोलण्याचें हंसें करून या अर्धवट जागृतांनीं जास्तच टवाळी करावी असा प्रकार सुरू झाला. बाहेरच्या मंडळींना याची गम्मत वाटून आंतील भाषण ऐकण्याकरितां त्यांनीं आपलें काम थोडा वेळ बंद ठेविलें. त्यामुळें तर टवाळखोरांना अधिकच अवसान चढलें व पहिल्या गृहस्थालाहि आपण खरेच धक्के ऐकून बोललों किंवा नाहीं, याची भ्रांति वाटूं लागली. या स्थितीचा फायदा घेऊन झोंपमोडीमुळें आरंभिलेल्या चळवळीच्या "उगाच ल्योकानं तरास दिलाया ! तिचीभन निज ल्योका मुकाटच्यान् ! ! उगाच येड्यावानी बरळतुय–कायर निजलास का नाय ?" असा समारोप करून शेवट केला. थोडा वेळ शांतता झाली. पण अजूनहि एखादा हंसण्याचा उमाळा न आवरून तिचा भंग करी व त्याबरोबर त्याला दाबण्याकरितां इतरहि कुजबुजूं लागून गडबड होई. दहा मिनिटें अशा प्रकारांत गेलीं, तोंच फिरून दाराला पहिल्यापेक्षां दुप्पट जोरांत धडक्या बसूं लागल्या. एकदां झोंपमोड झाल्यानें अजूनहि गाढ झोंप कोणालाच

लागली नव्हती. सर्वांनाच दारावरचे धक्के ऐकूं आले. पण मघांशीं मंडळीच्या चेष्टांमुळें विरमलेल्या व्यक्तीला चेव आला व त्यानें मागला वचपा काढण्याच्या हेतूनें निजण्याचा उपदेश करणाऱ्या मघांच्या गृहस्थांना ते अर्धवट झोंपेंतील सुखस्वप्नामध्यें मिटक्या मारीत असतां एकदम जोरानें हलविलें व "बघ ए–? तुझा बाबा दारावर ठोठावतुया. पग–ए हल्या!! ऐक ल्योका ऐक!!!" असें ह्मणून उठविलें. तो गृहस्थ या कर्मानें विलक्षण चापल्यानें उठला व पूर्व स्थितीचें भान न राहून उठविणाराला शिव्या देत देत मनगटाचा सकसपणा दाखविण्याची त्यानें मजल मारली; पण इतक्यांत "पाटीलबोवा! अहो पाटील-बोवा! अशा दोन भिन्न भिन्न स्वरांच्या हांका व त्याबरोबर जोरांत दारावर धक्का बसला त्यामुळें तो ताळ्यावर आला. जवळ असलेल्या मंडळींत आणखीहि दोघेतिघेजण पूर्ण जागे झाले व त्या सर्वांनीं आंतूनच एकदम बाहेरच्या लोकांवर प्रश्नांचा व शिव्यांचा भडिमार सुरू केला. बाहेरच्यांनींहि माघार न घेतां "बाहेर आल्यावर सर्व कळेल" या एका वाक्यानें त्या सर्वांना थोपवून धरलें. आंतल्या शूरांचा नाइलाज झाला. या घरांतल्या गोंधळानें खुद्द मालक—पाटीलबोवा जागे झाले. वार्धक्याच्या अशक्तपणामुळें आवाजांतलें काठिन्य नाहींसें होऊन तो पिंजल्या कळकासारखा खरखरत होता. किंचित् खाकरत–किंचित् खोकत–हे गृहस्थ आपल्या घोगऱ्या आवाजांत अगदीं त्रासिक स्वरानें आंतल्या मंडळीजवळ धामधुमीचें कारण विचारूं लागले. कारण कळतांच त्यांनीं बाहेरच्या लोकांस दार कां उघडावयाचें याची चवकशी केली. परंतु बाहेरच्यांनीं त्यांचाहि सर्वांप्रमाणेंच एका जबाबांत निकाल लावला. पाटीलबोवांनीं राम्याला दार उघडण्यास सांगितलें–त्या बहाद्दरानें गोंद्यास आज्ञा केली–गोंद्यानें कुरकुरत धों-

ड्याला काम करण्यास हातानें खुणावलें–धोंडू असलें काम करतो थोडाच–तो हिरमुसलें तोंड करून कोंडयाच्या वदनाकडे कार्यसूचक नेत्रानें टक लावून पाहूं लागला–पण त्या शिकंदरानें आपल्या दृष्टीचा मोर्चा पाटीलबोवांकडे वळविला व आपल्याशींच पुटपुटत तो स्वस्थ उभा राहिला. पाटीलबोवांचा आज्ञाभंग होईल ह्मणून रामाजीपंत आपल्या खेड्याला हातानें हलवून तोंडानें " जा किर! " असा आग्रह करीत होताच.

दारावर धक्के सारखे सुरूच होते व दार उघडण्याला तर कोणीच सिद्ध होईना! ह्मातार्‍यानें शिव्या देत देत तें काम आपल्याच शिरीं घेतलें. राम्या-गोंद्याची एकच धांदल उडाली. काम न करण्याबद्दल जो तो दुसर्‍याला दोष देऊं लागला. जवळ पडलेला सोटा घेऊन तो फरशीवर वाजवीत व खाकरत खोकरत चौघां साथीदारांसह वृद्ध पाटील दाराशीं येऊन थडकले. बाहेरच्या मंडळीच्या मातापितरांनाहि महारमांगांच्या उपमांनीं भूषित व्हावें लागलें हें निराळें सांगावयास नकोच. दार उघडलें व पाटीलबोवांच्या धुरकट चिमणीच्या प्रकाशांत दारावर धक्के देणारी मंडळी दिसली. त्यांची संख्या दोनच होती. " कोन तुमी? सांगा काय हाय तें " असा घोगर्‍या आवाजांतील प्रश्न ऐकून त्या दोघांपैकीं एकानें उत्तर दिलें, " दीड प्रहर रात्रीनंतर माधवरावाच्या घरावर दरवडा येणार असल्याची आह्मांला पक्की बातमी आहे. गांवचे लोकांना वर्दी देऊन सर्वत्र सावध रहा. वेळ फार थोडा आहे. नाहीं तर फुकट त्रास होईल. चोरांचा नाईक नुकतीच टेहळणी करून गेला. आह्मीहि तुमच्या मदतीस आहोंतच. चला आटपा लवकर. " दरवडेखोरांची बातमी ऐकतांच पाटीलबोवांपेक्षांहि त्यांच्या सहायक लोकांचे चेहरे कावरेबावरे झाल्यामुळें पहाण्यासारखे झाले होते. प्रत्येकजण दुसर्‍याकडे पाहून भयमिश्रित आश्चर्य प्रदर्शित करीत होता. पाटील-

बोवांच्या हातांच्या वार्धक्यांतील कम्पाला जरा अधिक गति मिळाली हें निराळें सांगावयास नकोच! थोड्या काळच्या शांततेनंतर बातमीच्या खरेखोटेपणाची पारख करण्यांत वीसपंचवीस मिनिटें गेलीं. प्रत्येक मिनिटाला वार्ताहरद्वयाचा अधीरपणा वाढत होता. पाटीलबोवांनीं आसपासची मंडळी पुकारली. हां हां ह्मणतां बरेच लोक जमले. चावडीवरील रामोशीहि पाटीलबोवांच्या हांकेसरशी धांवत आले. सर्वांना जागे रहाण्याविषयीं त्यांचा हुकूम फिरला. जो तो आपआपल्यापरीं आश्चर्य करण्यांत गुंग होऊन गेला. वार्ताहारकांनीं पाटीलबोवांच्या संमतीनें दोन रामोशी बरोबर घेऊन आपला डेरा चोरांच्या संकेतस्थानीं दाखल केला. लपण्याची जागा सुरक्षित होती. याशिवाय तरुण व धाडसी लोकांची एक टोळी सोडगे व कुऱ्हाडीसह सशस्त्र होऊन वरील वार्ताहारकांच्या खुणेची वाट पहात जवळच दडून बसली.

बारा वाजून गेले. सर्वत्र काळोख पसरला होता. अनाथ तारकापुञ्ज आपल्या परीनें अंधकाराचा दाट पडदा अल्पांशानें तरी दूर करीत होता. त्यामुळें आसपास कांहीं जात असल्यास आकृतीची ओळख पटण्याइतका तरी अंधारांत निवळपणा होता. क्षणामागें क्षण लोटले. अर्धा तास झाला. माधवरावाच्या घराचे मागील भागीं एक कर्कश शीळ अंतराळीं दुमदुमली. घराच्या पिछाडीचें कवाड उघडलें—व त्याबाहेर जवळच दुसरी शीळ वाजली. मागचा भाग ह्मणजे एक भली मोठी धस होती व त्या खालीं भात पेरण्याचीं खाचरें होतीं. त्या धशीच्या पोकळ भागांत कोणाच्या तरी पावलांचा प्रतिध्वनि उमटूं लागला.—दारांतून दुसरा ध्वनि निघाला त्याला उलट शीळ मिळाली. धशीवर वाजणारीं पावलें घराजवळ जवळ आलीं. पण काय? "हाय रांडेनें घात केलान्—अरे! दगा!! दगा!!!" असा एक प्रचंड स्वर बाहेर

पडला. लागलीच दुसऱ्याच तऱ्हेची एक शीळ वाजली व आसपासच्या भागांतून एकदम खजबज सुरू झाली. सोडग्यांचे दणके बसूं लागले. " ठार मेलास–" असा कठोर व " अरे वर्मी बसलारे ! मेलों ! ! " असा दीन स्वर एकसमयावच्छेदानें बाहेर पडूं लागला. क्षणार्धांत या गडबडीला ओरडाओरडीचें स्वरूप आलें. गांवची मंडळी धांवली. माधव-कमलिनी जागीं झालीं व मागील दारीं हातांत फांस घेऊन नोकराचाकरांसह गेलीं. तेथें त्यांस आकस्मित अशी ' कालिका ' दृष्टीस पडली. ' खालीं चाललेल्या गडबडीमुळें जागी होऊन मी येथें आल्यें–' ही सबब सांगून तिनें सर्वांची समजूत केली. थोड्या वेळांतच सर्वत्र सामसूम झाली.

---

## प्रकरण अकरावें.

## दुसरा दिवस.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं सगळ्या गांवांत गडबड चालली होती. चावडीमध्यें कोणी तरी अपूर्व मनुष्य अडकवून ठेवला होता. त्याचेपाशीं त्याचे इतर साथीदारहि बरेच होते.

या प्राण्याला पहाण्याकरितां सर्व लोकांचा घोळका चावडीच्या दाराशीं जमला. खेडेगांवची चावडी ! ही चावडी भैरोबाच्या देवळांत होती. त्या देवालयाच्या सभामंडपामध्यें हे प्राणी पडले होते. नुकत्याच सांपडलेल्या प्राण्यांना पिंजऱ्यांत पक्के अडकविण्यापर्यंत त्यांस दोरांनीं भक्कम बांधून ठेवणें ही स्वाभाविक गोष्ट होती. हे प्राणी त्या देवळांत बसले होते. परंतु आपल्याकडे पहाणाऱ्या लोकांस उलट धिटाईनें पहाण्याचें धैर्य त्यांच्यामध्यें नव्हतें. कांहीं-जण आपल्यास पहाणाऱ्या जनसमुदायाकडे तीव्र क्रोधानें पहात होते, कांहीं शांतपणें बसले होते, कित्येक जमिनीला डोकें टेकून

स्वस्थ पडले होते. या अद्भुत प्राण्यांना पकडतांना झालेल्या दु-खापती प्रेक्षकवर्गाला दाखवून प्राण्यांना शिव्या शाप देत आत्म-गौरव करण्यांत गांवकऱ्यांपैकीं कांहीं लोक बसले होते. प्राण्यांना पहाण्यास जमलेली गर्दी पाहून " कायरं हिथं काय तमाशा हाय कारं ? चला हिथनं " हे शब्द फुटक्या गाडग्यासारख्या आवाजांत काढून अंगावरील ' पटकुरें ' सांवरीत नाकांत तपकिरीच्या चि-मटच्या कोंबीत पाटीलबोवा मधून मधून उठत. देवळांत स्वतःची तेवढी सोय लावून घेण्याकरितां ह्मणजे कांहीं जास्त वेळ तेथें रेंगा-ळत बसायला सांपडावें ह्मणून गांवकरी एकमेकांना हांकलून लावूं लागले. थोडीशी गर्दी कमी झाली कीं, फिरून पोरांच्या झुंडी तेथें लोटत. मोठ्या मंडळीपेक्षां यांचाच त्रास जास्त. एखाद्या खोडकर मुलानें संधि साधून मोठ्या कुशलतेनें आंतील प्राण्यांवर दगड फें-कावा, तो पचलासा पहातांच गरुडाची नक्कल करणाऱ्या कावळ्या-प्रमाणें आणखी एखादा मुलगा आपल्या साथीदाराचें अनुकरण करूं लागे; पण दगड फेंकण्याची शिताफी व लोकांच्या डोळ्यांत धूळ फेंकण्याचें कौशल्य त्यास नसल्यामुळें त्याची खोडी लोकांच्या लक्षांत येऊन केलेल्या महत्कृत्याबद्दल पाटलाच्या हातचा प्रसाद तोंडभर मिळाल्याखेरीज रहात नसे. त्याबरोबर वटवाघुळाच्या जन्मभीतीनेंच कीं काय पंक्तिप्रपंच न करितां प्रसादाची अल्पाधिक वांटणी आटोक्यांतील सर्वच मुलांना देण्यांत पाटीलबोवा कसूर करीत नसत. ह्या महोदयपर्वांत वृद्ध नायकाच्या कणखर हस्त-स्पर्शानें पूजित होऊं न पहाणाऱ्या अधार्मिक बाळांना त्यांच्या पलायनांत भर देण्यासाठीं " पकड त्या चोराला " असे घोगरे शब्द पाटलांच्या मुखांतून सुटत होते. पुढच्या पोरांना ' शाळेंत जा ' अशी आज्ञा करून वडील मंडळी आपला प्रवेश करीत अ-सत व सांपडेल तेवढ्या अवकाशांतून फिरून एकदां प्राण्यांवर

 पुणे मराठी ग्रंथालय
४३७ : नारायण
दा. नों. 7229 

नजर फेकून त्यांचें दर्शन घेण्याकरितां बालमंडळीची खटपट चाले. शेवटीं मास्तरांच्या कडक शिस्तीची आठवण होऊन त्यांना रेंगाळत रेंगाळत शाळेकडे जावें लागे.

जसजसा दिवस वर येऊं लागला तसतशी लोकांची गर्दी निवळूं लागली. इतक्यांत नऊ साडेनवांच्या सुमारास माधवराव तेथें देवळांत आला. माधवरावाच्या सभ्य वर्तणुकीमुळें गांवांत त्याजविषयीं मोठा आदर होता. तो येतांच पाटीलबोवांनीं त्यास उत्थापन देऊन आसनस्थ केलें. पलीकडच्या पांच सात प्राण्यांकडे बोट करून माधवरावाची दृष्टि पाटीलबोवांनीं तिकडे वळविली. अगदीं शांततेनें माधव तिकडे पाहूं लागला.

" माधवराव ! ह्यो लोक. तिच्या भनं तुह्मास्नी तरास द्याला आलं होतं–देवानं खैर केली. " नाकांत तपकीर सारीत सारीत पाटील ह्मणाले.

" होय बोवा ! देवानें खैर केली यांत तर शंका नाहींच, पण तुह्माला प्रथम ही बातमी दिली तरी कोणीं ? अगदीं अचुक काम झालें बोवा ! " माधवराव सस्मित बोलला.

एकाएकीं आठवण झाल्यासारखें करून पाटीलबोवा मनाशींच विचार करूं लागले. दोन ब्राह्मण आले व त्यांनीं बातमी दिली असें माधवाला कळलें. पण दर्शनोत्सुक माधवाचें समाधान करण्याला ते तरुण त्या वेळीं गांवांत नसल्याचें पाटलांनीं सांगितलें. रात्रींच सर्वांना न कळत ते निघून गेले असल्यामुळें त्यांचा पत्ताहि त्यांस ठाऊक नव्हता. आसपासच्या बऱ्याच जणांना विचारून पहातां समाधानकारक उत्तर मिळेना.

गांवकऱ्यांपैकीं एकालाहि त्यांचें नांव गांव ठाऊक नसल्याचें माधवाला आढळून आलें. आपल्याला संकटमुक्त करीत असतां जखम झालेल्या आजाऱ्यांकडे जाण्यास चावडींतून पाटलासह

माधव निघाला. प्रत्येकाची जखम त्यानें बारकाईनें तपासली व त्यांना चार समाधानाच्या गोष्टी सांगून औषधपाण्याची स्वतःच्या खर्चानें व्यवस्था केली. आजाऱ्यांची निगा ठेवण्यासाठीं त्यांच्या घरच्या मंडळींना वारंवार बजावीत व या साहाय्याबद्दल त्यांचे धन्यवाद घेत घेत तो घरीं आला.

गांवांत जिकडे तिकडे हा एक चर्चेचा विषय होऊन बसला. दोन प्रहरीं शेजारच्या तालुक्याच्या गांवांतून एक पोलिसपार्टी आली. पाटलाचे घरचा पाहुणचार झोडल्यावर दरवडेखोरांच्या पकडापकडीची शक्य तितकी बारीक चवकशी करून फौजदार साहेब आज कित्येक दिवसपर्यंत आसपासच्या सगळ्या खोऱ्यांत गरीब गांवकऱ्यांना सतावून सोडणाऱ्या या नवीन श्वापदांच्या हस्तपादांत शृंखला अडकवून मोठ्या बंदोबस्तानें गुन्हेगारांच्या पांजरपोळांत त्यांची बोळवण करण्याकरितां स्वस्थानीं जाण्यास निघाले. त्यांना शिवेपर्यंत पोंचविण्यासाठीं पाटलासुद्धां कित्येक लोकांनीं आपला फुरसुतीचा रिकामटेकडा अमूल्य वेळ खर्चीं घातला.

---

## प्रकरण बारावें.

## चोर समजून संन्याशी धरला.

मागील प्रकरणांत सांगितलेल्या गोष्टीला आठ दहा दिवस लोटले. दरवडेखोरांच्या चर्चेचा पहिला बहार आतां नव्हता, परंतु फुरसतीच्या वेळीं या विषयाचें तुरळक विवेचन चालत असेच. सर्वांना एका गोष्टीची उत्कंठा विशेष होती व ती गोष्ट ह्मणजे बातमीदार तरुणांची अज्ञात माहिती. वादाचे भरांत जो तो आपआपल्या परीनें ह्या कूटाचा उलगडा करून दुसऱ्यावर ताण करण्यासाठीं गंभीरतेचें उसनें अवसान आणून या प्रकरणावर वाटेल तसा तर्क-

टत असे. परंतु त्यांतून खरा प्रकार मुळींच निष्पन्न होत नसून एकमेकांचा निकाल न पटल्यामुळें रागानें शिव्यागाळी करण्यांत त्याचा शेवट होई. असा प्रकार गांवांत रोज एकदां तरी कोणाच्या घरीं व्हायचाच.

पोलीस लोकांची रीतीप्रमाणें चवकशी चालू झाली. दरवडेखोरांतील कच्च्या गुरूंच्या चेल्यांनीं भराभर कबुलीजबाब दिले व त्यांत सुटलेल्या मंडळीचीं नांवें गोंवून त्यांचा गांव पत्ता वगैरे सर्व कांहीं पोलीसांना कळविलें. त्या सात जणांपैकीं तिघे मात्र पोलीसांनाहि सवाई भेटले. स्वतःसंबंधी चाललेल्या चवकशीवर सरसकट सगळ्याच बाबतींत ‘ नाहीं ’ या अक्षरांचा भरभक्कम शिक्का मारून तीं यांनीं निकालांत काढली. बाकीच्या चौघांचें धैर्य मात्र कसोटीला टिकलें नाहीं. त्यांनीं आपल्या जबानींत वरील घुम्यांवर गुन्ह्याचें सगळें खापर फोडून स्वतःच्या सुटकेबद्दल पोलीसांच्या दयाळूपणावर भिस्त टाकली.

त्यांच्या जबानीप्रमाणें इतर पांच चार दरवडेखोर वनांतील धनगरी वाड्यांतून पोलीसांनीं हुडकून काढले. फक्त एक दोन माणसें चुकत होतीं व खटला न्यायासनापुढें नेण्यापूर्वीं त्याला पूर्णपणें सजविण्यासाठीं वरील माणसें चुकूं देणें त्यांस इष्ट वाटत नव्हतें. पुष्कळ शोध केला पण त्या इसमाचा पत्ता लागेना. वास्तविक स्थितीविषयी अंधार असल्यामुळें खरा माणूस उजेडांत येत नाहींसें पाहून या राजदूतांनीं तशाच तऱ्हेचा माणूस शोधून काढण्याची खटपट आरंभिली. परंतु एखादे वेळीं भलत्यालाच धरलें तर कदाचित् सगळाच डाव उलटून स्वतःवरहि घोरपड येण्याची भीति त्यांस होती. दरवड्याची अगदीं प्रथम बातमी देणारांचा तर अजून पत्ता नव्हता. त्यांच्या साठींहि जारीनें खटपट चालू होती. परंतु ते पक्के बिलंदर ! त्यांनीं पोलीसांना असेंच घुलवीत ठेविलें.

वरिष्ठ फौजदार श्रीपतराव स्वभावानें सज्जन असल्यामुळें हें प्रकरण एवढ्यावरच थांबवून न्यायासनापुढें मांडण्याची त्याची इच्छा होती. परंतु याच्या हाताखालचे पोलीस इतक्यांतच हताश होण्यासारखे कच्या दिलाचे नव्हते. त्यांची उमेद अजून खचली नव्हती

चवकशीचे सट्ट्यांत त्यांनीं अलीकडे एकदोन दिवस गांवांतील शिवमंदिरांत उतरलेल्या एका गरीब बैराग्यास पकडून नेलें. मधुपुरांत फिरून चळवळ उडाली. त्या बैराग्याविषयीं गांवकऱ्यांना संशयच वाटत होता. दरवडेखोरांच्या ताज्या प्रकरणानें त्यांना अनोळखी माणसें चोर वाटूं लागलीं होतीं. मनुष्याचे अंतःकरणांत एकदां संशय शिरला ह्मणजे परिस्थितीविषयीं तो फार सांशक होतो असा नियम आहे. यामुळें व अजून चोरांचे एक दोन साथीदार चुकत असल्याकारणानें त्यांना या गोसाव्याविषयीं आपली समजूत दृढ करण्याला अवसर मिळाला. शिवाय या गृहस्थाला माधवरावाच्या घराच्या आसपास सावकाश हिंडतांना पाहून एका तर्कनाथाला हा गोसावडा कांहीं विशेष हेतूनें टेहळणी करण्याकरितां हिंडतो अशी आपली खोटीच पण बालंबाल खात्री वाटली. तो विशिष्ट हेतूनें प्रेरित होऊन माधवाच्या घराची पहाणी करीत असला तर त्याचें सत्य न जाणून त्यानें त्याचा आपल्या समजुतीप्रमाणें विपर्यास करून घेतला. असल्या गुप्त रहस्याचा उमाळा त्याच्या हृदयांत न मावल्यामुळें त्यानें तावडतोब त्याचा स्फोट चवकशीकरितां वारंवार गांवांत येणाऱ्या पोलीसापाशीं केला. त्याला या बातमीनें अत्यानंद झाला व आपल्या दोस्ताशीं खलबत करून त्यानें वरील शिकार साधण्याचा बेत पक्का केला.

आपल्यावर पोलीसांचा डोळा असल्याचें बैराग्याच्या लक्षांत आल्यावांचून राहिलें नाहीं. त्याला हें ठाऊक असतां स्वतःच्या सद्वर्तनावर विश्वास टाकून तो स्वस्थ राहिला. गांवांतील लोक

माझ्याकडे शंकित होऊन पहातात, आपसांत कुजबुजतात, या सर्वांच्या मूळाशीं कांहीं तरी बळकट संदेह कारण असावा असें त्या तापसाच्या पूर्ण निदर्शनास आलें होतें. परंतु त्यानें त्याबद्दल अगदीं बेफिकीर रहाण्याचा निश्चय केला व राजदूतांशीं प्रसंग पडलाच तर ईश्वर रक्षण करणार समर्थ आहे, असें जाणून त्यानें सर्व भार ईश्वरावर टाकला. गांवकऱ्यांनीं आपसांत बडबडण्यापलीकडे धांव घेतली नाहीं, पण वरील तर्कगुरूंनीं ही उणीव भरून काढली.

कमअस्सल चोरांच्या जबानींत उघडकीस आलेल्या, पण सांपडत नसलेल्या दोन चोरांपैकीं एकाच्या खाणाखुणा, वय, अंगाची ठेवण इत्यादि सर्व गोष्टी या गोसाव्याशीं पटल्या. ' शुभस्य शीघ्रं ' या न्यायानें आलेली संधि साधून घेण्याकरितां चार पांच पोलीसांची एक तुकडी एके दिवशीं पाटलाचे घरीं उतरली. जेवणखाण झाल्यावर पाटलाला घेऊन आपल्या साध्या वेषांत भाविकतेचा आव आणून वरील गृहस्थ शिवमंदिरांत गोसाव्याकडे गेले. इकडच्या तिकडच्या गप्पासप्पा झाल्यावर पोलीसांनीं नुकत्याच घडलेल्या दरवडेखोरांच्या प्रकरणाची चर्चा चालविली. हा विषय निघतांच चोर असल्यास या गोसावड्याच्या तोंडावर तसा परिणाम दिसेल अशी त्या हेरांची समजूत. पण व्यर्थ! गोसाव्याच्या चेहऱ्यावर अथवा बोलण्यांत कोणच्याच तऱ्हेचा फरक पडला नाहीं. त्याच्या गांभीर्यांत यत्किंचित्हि विकार झाला नाहीं. उलट या बाबतींत बैराग्यानें आपलें पूर्ण अज्ञान असल्याचें प्रकट केलें. दाढी मिशांच्या विस्ताराचा फायदा घेऊन सभ्य स्वरूपांतहि अत्यंत नीच माणसें लपलेलीं असतात असा शिपायांचा बोलण्याचा रोंख; परंतु त्यांच्या सर्व छद्मी भाषणानें इष्ट असा परिणाम घडलेला मुळींच दृष्टीस पडेना. उलट वरील भाषणाचा मुद्दा ध्यानांत येऊन त्यानें त्याच शब्दांत संमतिदर्शक उत्तर दिलें.

"चोरांच्या टोळीपैकीं कांहीं लोक अजून सांपडले नाहींत. मोठे वस्ताद असतात बेटे!" अशा ओघाला भाषण आणलें; तरी पण गोसाव्याची मुद्रा निर्विकारच. आतां मात्र ते त्रासले व आपलें खरें स्वरूप प्रकट करण्यास त्यांनीं आरंभ केला. "निरपराधित्वाचीं कितीहि सोंगें केलीं तरी त्यानें लोक फसणार नाहींत. खरी स्थिति ही कळायचीच!" असा उपोद्घात त्यांनीं केला. यानेंहि दाद लागत नाहींसें पाहून स्वतः पोलीस असल्याची ओळख देऊन पाहिलें. हाहि डाव फसलेला पाहून "तुमच्याच चवकशीकरितां आह्मी येथें आलों आहों व येथें थांग लागूं दिला नाहींत तरी तालुक्यावर फौजदारींत नेलें ह्मणजे स्वतःच्या निरपराधित्वाचा भ्रम आपोआप दूर होईल" अशा तऱ्हेचीं भाषणें त्यांनीं केलीं व "आतांपासून तुह्मी आमचे बंदिवान आहांत, उद्यां सकाळीं आमच्याबरोबर तुह्मांस तालुक्यावर आलें पाहिजे असें निक्षून सांगितलें.

इतक्या सगळ्या प्रकारांत गोसाव्याच्या शांतवृत्तींत यत्किंचित्‌हि फरक पडला नाहीं. पोलीसांची दृष्टि एकपक्षी झाल्यामुळें हा कोणी तरी एक बिलंदर चोर आहे, आपल्या सर्व प्रकारच्या मात्रांचा प्रभाव यावर निष्फळ झालेला पाहून तालुक्यांतील कोतवालचावडीसारख्या महदौषधालयांत या नैतिक आजाराला बरें करण्याचीं व ताबडतोब ताळ्यावर आणण्याचीं औषधें दिलीं पाहिजेत अशी त्यांची खात्री झाली.

गोसाव्याच्या अढळ वृत्तीचा परिणाम वृद्ध पाटलावर बराच झाला. कांहीं परिणाम झाल्यास पहावा ह्मणून "आपल्याला असेल नसेल तेवढी माहिती सांगून टाका ह्मणजे उगाच पुढें त्रास नको असा त्यानें सदुपदेश केला. परंतु दरवड्याच्या बाबतींत अज्ञानी आहों असेंच त्यानें निर्वाणीचें उत्तर दिलें.

बरीच रात्र झाली. सूचना मिळाल्यामुळें गोसावी पळून जाईल

या संशयानें पोलीसांनीं त्यास आपल्याबरोबरच सर्व सामानासह पाटलाचे घरीं चलण्यास सांगितलें ——नव्हे आज्ञा केली. एक शब्दहि न उच्चारतां त्या गोसाव्यानें आपली अल्प सामग्री एकत्र केली व गांठोडें कांखेशीं मारून पाटलाचे घरीं जाण्यास तो सिद्ध झाला. रात्रभर तेथें विश्रांति घेतल्यावर प्रातःकाळीं त्यास शृंखलामंडित करून पोलिसांनीं तालुक्याच्या गांवाकडे नेलें.

---

## प्रकरण तेरावें.

## आकस्मिक भेट.

मधुपुरच्या गांवापासून बऱ्याच अंतरावर श्रीशंकराचें एक अत्यंत जुनाट पण विस्तीर्ण असें देवालय होतें. देवळाप्रमाणेंच शेकडों ऋतूंचे भिन्न भिन्न आघात सहन करून आपलें अस्तित्व कायम राखलेले बरेच वृक्ष त्याच्या भोंवतीं होते. पंचमहाभूतांशीं चालू असलेल्या जीविताच्या झगड्यांत त्याच्या देहाला बरीच भग्नता आली होती. शेकडों प्रखर ग्रीष्मांचे उष्ण वारे त्यांनीं सहन केले होते. पर्जन्यकाळाच्या प्रारंभीं गडगडणाऱ्या मेघांच्या उदरांतून बंधमुक्त झालेल्या विजेचा कडकडाट याच्या उत्तुंग शिखरावर शेकडों वेळां घडला असेल व कित्येकदां तर विद्युत्पात होऊन त्याचा खंडशः भंग झाला असेल. आकाशाच्या विस्तीर्ण नील प्रदेशांत आपल्या विमल कौमुदीच्या आल्हादकारक कोमल प्रभेनें असंख्य नक्षत्रांसह शारदीय इंदूनें सृष्टीशीं अनेकवार क्रीडा केली असेल. वसंतश्रीनें अनेकवेळां नवपल्लवित झालेले हे प्रचंड वृक्ष अजूनहि प्रवासी जनांच्या अंतःकरणावर कल्पनाविशालत्वाचा परिणाम केल्यावांचून रहात नव्हते. त्यांच्या प्राचीनत्वाला त्या जुन्या शिवालयाची जोड मिळून त्या स्थलाला विशेष रमणीयता

आली होती. जवळून वहात जाणाऱ्या एका निर्झरिणीमुळें त्या जागेंत मन रमण्यास एक जास्त कारण झालें होतें. देवालयाचीं कणखर दगडाचीं तृणावृत भिंताडें अजून आपल्या भक्कमपणाची साक्ष उत्तम रीतीनें देत होतीं. लांबून पहाणारास वृक्षांच्या घन-राजींमुळें देवळाचा मागमूसहि लागत नसे. पण जरा जवळ आ-ल्यावर झाडांच्या दाटींतून भिंतीचा अर्धवट भाग दृष्टीस पडे.

विशेष प्रसंगाखेरीज या देवळांत कधींहि कोणी फिरकत नसे. गांवांत भिक्षा मागण्यास येणारा एखादा दुसरा गोसावी मात्र मधून मधून श्रीशंकराशीं थोडा काळपर्यंत सान्निध्य करीत असे. परंतु त्यामुळें देवळांत स्वच्छता रहाण्याऐवजीं त्याच्या धुमीच्या राखेचा, स्वयं-पाकास जमविलेल्या कांटक्याकुटक्यांचा, जळक्या दगडांचा कचरा मात्र अधिक होत असे. गांवांतील भाविक एखादी पर्वणी साधून शिवाच्या पिंडीवर दहा पांच फुलें अर्पण करीत. परंतु पहिल्या निर्माल्याची कांहींच व्यवस्था न लागल्यामुळें कुजल्या वाळल्या बिल्वपत्रांचें व फुलांचें एक खळेंच पडलें होतें. देवळांत गाभाऱ्याखेरीज एक सभामंडपाचा भाग होता. त्याच्या शिखराच्या पोकळ भागांतील दगडीकपारींत निसर्गविहारी विहंगमांनीं आपली वस्ती केल्यामुळें त्यांची घाण बरीच झाली होती. सारांश, मानवीय निगा तेथें मुळींच नसून कालाच्या विनाशी आघातानें देहक्षय होत असलेलें तें देऊळ व त्याचे अधिपति यदृच्छेनें होणाऱ्या व्यवस्थेची वाट पहात स्वस्थ होते.

आज काय असेल तें असो! कोणी एक युवति आपल्या मनोहर बाळासह तेथें देवळांत उभी होती. तें बालक आसपास खुशाल उड्या मारीत होतें. त्याची माता मात्र आंतल्या गाभाऱ्यांत श्रीहरापाशीं अनन्य निष्ठेनें हात जोडून चिंतन करीत होती. नंतर ती आपल्या मधुर कंठानें महिम्नाचें स्तोत्र म्हणूं लागली.

बाहेरच्या बाजूस खेळत असलेल्या बाळाचीहि तिला दाद नव्हती. इतक्यांत तेथें एक युवा पुरुष आला. त्या एकाकी बाळाला पाहून त्याला आश्चर्य वाटलें. प्रकाशांतून एकदम आंत आल्यानें व देवळांत मूळचा बराच अंधार असल्यामुळें गाभाऱ्यांतील स्त्री दिसणें त्यास अशक्य होतें. बाळाला पहाण्यांत तो मग्न झाला. तें बालकहि त्याच्या शांत व आश्चर्यान्वित मुखाकडे पहात आपल्या सर्व क्रीडा सोडून उभें राहिलें. त्या युवकानें त्याला ओळखलें. परिचय पहातांच एकदम त्यानें त्याला वर उचलून घेतलें व त्याचें चुंबन घेण्यास आरंभ केला. बाळाला हा प्रकार अननुभूतपूर्व होता. एक अगदीं अपरिचित पुरुष आपलें चुंबन अत्यंत उत्कट प्रेमानें कां घेतो याचें कारण त्या चौकस बाळाला कळेना. तो आपला त्या युवकाच्या मुखाकडे पहात स्तब्ध राहिला. बाळाचें निरीक्षण करतां करतां त्याच्या कंठांतील एका वस्तूकडे नजर जाऊन तो युवा चकित झाला. "मला आजपर्यंत याची आठवण कशी नव्हती!" असें तुटक वाक्य उच्चारून गतगोष्टीची तो आठवण करूं लागला. एकहि कारण त्याला त्याच्या मनांतल्या तुटलेल्या चरित्राचा दुवा सांधून भ्रमनिरास करण्यासारखें स्मरेना. आश्चर्याचा पहिला पूर ओसरल्यावर महिम्न स्तोत्राचा मंजुल ध्वनि देवळांतील कुंद वातावरणांत तरंग उत्पन्न करीत करीत त्याच्या कानीं पडला.

किमीहः किंकायः स खलु किमुपायस्त्रिभुवनं
किमाधारो धाता सृजति किमुपादान इति च ।
अतर्क्यैश्वर्ये त्वय्यनवसरदुस्थे हतधियः
कुतर्कोऽयं कांश्चिन्मुखरयति मोहाय जगतः ॥
अजन्मानो लोकाः किमवयववन्तोऽपि जगता-
मधिष्ठातारं किं भवविधिरनादृत्य भवति ।
अनीशो वा कुर्याद्भुवनजनने कः परिकरो

यतो मन्दास्त्वां प्रत्यमरवर संशेरत इमे ॥
त्रयी सांख्यं योगः पशुपतिमतं वैष्णवमिति
प्रभिन्ने प्रस्थाने परमिदमदः पथ्यमिति च ।
रुचीनां वैचित्र्यादृजुकुटिलनानापथजुषां
नृणामेको गम्यस्त्वमसि पयसामर्णव इव ॥

* * * *

वरील श्लोकांचीं अक्षरें जसजशीं त्याच्या कानावर स्पष्ट येऊं लागलीं, त्याचें लक्ष जसजसें अधिक अधिक गायकाच्या स्वरमाधुरीकडे गुंगूं लागलें, तसतसा त्याच्या अंतःकरणावर कालावधीच्या योगानें बसलेला विस्मृतीचा दाब ढिला पडूं लागला. दृगाकर्षक निर्झरिणीच्या तरंगक्रीडेंत ज्याप्रमाणें मनाच्या अनिवार भराऱ्या बंद पडून क्षणभर तें मुग्ध बनतें त्याप्रमाणें गायकाच्या मुखांतून उगम पावलेल्या कर्णमधुर स्वराचा झोत गाभाऱ्याच्या पोकळींतून विशालत्व पावून वातावरणांत तरंगत असलेला पाहून याच्या मनाच्या सर्व शक्ति शिथिल पडल्या व त्रिनेत्र त्रिपुरारीचा गौरव गायिलेल्या स्तोत्रांतच त्याचा मनोलय झाला. वृत्ति तदाकार बनल्या त्या उदास स्थितींत युवकाच्या अंतःशून्यतेचें बिंब अधिकाधिक खुलून उठूं लागलें व दीर्घ निश्वास बाहेर पडले. आतांपर्यंत बालक याच्या कडेवरच होतें, पण आतां तें उतरण्यासाठीं चळवळ करूं लागलें. त्याला खालीं सोडतांच त्यानें आंतल्या गाभाऱ्यांत धूम ठोकली. मातेच्या गाण्यांतच त्याच्या पायांतील नूपुरांचा मंजुध्वन तालाचें काम करूं लागला. युवकाच्या मनोवीण्याची प्रत्येक वि ारमय तार गायनौघानें वेढली जाऊन त्यावरहि स्वरतरंग उठले व ईश्वरस्तुतीमध्यें मन लीन झालें. जों जों श्लोक संपत चालले तों तों युवकाचें मन अधीर होत चाललें. त्यानें सहज आंत पाहिलें; मातेच्या खांद्यावर गाण्यानें भारल्यामुळें एखाद्या

अचेतन मूर्तीप्रमाणें तें बालक दिसत होतें. ध्यानपरायण तापसीप्रमाणें तिचे डोळे मिटले होते. प्रेमलहरीनें व्याप्त झालेलें तें मंदिर इहलोकींचें दगडाचुन्याचें पार्थिव मंदिर नसून अखंड भक्तिरसांत निरंतर रंगून रहाणारी व स्वर्गापेक्षांहि अधिक दिव्य अशी भूमि असावी असा भास आंतील जनांना झाला.

गाभाऱ्याबाहेर उभ्या असलेल्या तरुणाला पूर्णपणें जागृतींत असूनहि स्वप्नांतच आपण सर्व प्रकार पहात आहों असें भासत होतें.

पूजाअर्चा समाप्त झाल्यावर गाभाऱ्यांत पावलें वाजूं लागलीं व उत्कंठ होऊन बाहेरचा युवा रमणीच्या दर्शनासाठीं अधीर झाला. क्षणार्धांत हातामध्यें पूजापात्रें घेऊन खांद्यावर मुक्तकेश रुळत असलेली ती युवति या गाभाऱ्याच्या अंधकारांतून बाहेर पडली. तिला पहातांच तो तरुण दचकला. अनपेक्षित तरुणाला पाहून ती युवतिहि भ्याली. दृष्टादृष्ट झाल्यावर तीं दोघेंहि विचारांत निमग्न होऊन गतकालरूपी विशाल प्रदेशांत आपल्या हरपलेल्या श्रेयाचा शोध करूं लागलीं. प्रथमतः स्त्रियांच्या मनोधर्माला अनुसरून देवळांत उभा असलेला तरुण कांहीं तरी दुष्ट हेतूनें मी एकटी असल्याच्या पाळतीवर असावा असें तिला वाटलें. परंतु युवकाच्या वागणुकीवरून तसा प्रकार जेव्हां दिसेना, तेव्हां तिला धीर आला. धीर येण्यापूर्वीं मात्र तिच्या हृदयांत हजारों विचारलहरी आल्या. " या दुष्टानें आपणासंबंधानें अनुचित व निंद्य अभिलाष जर प्रकट केला; आणि त्याचा राग येऊन आपण जर त्याची निर्भर्त्सना केली; आणि तिला न जुमानतां जर त्यानें कामांध होऊन बलात्काराचा यत्न केला; तर निराधार अबलेला ह्या दूर स्थळीं सहायक कोण ? " कल्पना करतांना कमलिनीच्या कपाळावर स्वेदबिंदु चमकूं लागले— लज्जेच्या लालीनें गाल आरक्त झाले. त्यांतच भावी स्थितीच्या कल्पनेंतील क्रोधाची आरक्तता मिसळली. शरीर भयानें कंपित

झालें. "साहाय्याची अपेक्षा कोणाजवळ करायची ? " स्त्रिया जरी देहानें अबल असल्या तरी जर मनानें सबल असतील तर नुसत्या कामांध दांडग्या नरपशूचें बळ त्यांच्यापुढें काय टिकणार ?—आपल्या निष्ठेच्या जोरावर तसाच प्रसंग आला तर श्रीविश्वेश्वराला मी माझा पाठिराखा करीन ! " कमलिनी ! काय तुझ्या कल्पनेच्या भराऱ्या!! वास्तविक स्थितीची जाणीव मुळींच नसतां निवळ तर्कानेंच ही केवढी भव्य इमारत तूं आपल्या मनश्चक्षूपुढें उभी केलीस!! ईश्वर संरक्षण करील, तो दीनांचा—अनाथांचा—अबलांचा—वाली आहे हा केवढा भक्कम आधार ! !

आरंभींच्या विचारानें तिची दृष्टि भयकातर झाली होती, पण आतां ती स्थिरावली आणि अधोवदन तरुणाचें निरीक्षण करण्यांत गुंगली. पहातां पहातां तिला कांहीं तरी स्मरूं लागलें. "होय, दिसतो तर अगदीं तसाच " असे शब्द तिनें मनांतल्या मनांत उच्चारले. निश्चेष्ट स्थितींत उभा असलेला तरुण जादूनें भारल्याप्रमाणें खालीं गुडघ्यांवर बसला व कमलिनीच्या लज्जामय मुखाकडे निश्चल दृष्टि लावून " कमलिनी अगदीं तोच ! तोच हा दुर्दैवी " असें वाक्य त्यानें उच्चारलें. एखाद्या निर्मल चित्ताच्या परस्थास या जिवंत पण अचेतन चित्रांत सात्विक भाव उचंबळलेला दृष्टीस पडला असता. निर्वाणीवर आलेल्या भक्ताला दयार्द्र होऊन ज्याप्रमाणें त्याच्या उपास्य देवतेनें दर्शन द्यावें त्याप्रमाणें हा प्रकार होता.

हा अदृष्टपूर्व प्रकार पाहून मकरंद स्तंभित झाला होता. त्याच्या अज्ञानी बालहृदयांत कसले विचार येत असतील ईश्वर जाणे ! कमलिनीच्या नेत्रांतून कारुण्यमिश्रित प्रेमाश्रु तरुणाच्या शिरःप्रदेशावर पडले.

" प्रभाकरपंत, उठा " असे उद्गार कमलिनीनें काढले. प्रभाकर

उभा राहिला. दोघांच्या हृदयांत एकमेकांशीं पुष्कळ बोलावयाचें असून गद्गद कंठांतून एकहि अक्षर बाहेर पडेना.

देवालयाच्या दाराशीं पावलांची चाहूल ऐकूं आली. माधव आंत आला. त्यानें कमलिनीला व अपरिचित तरुणाला पाहिलें. त्याच्या मनाला काय वाटलें असेल तें असो, पण त्यानें तें व्यक्त न करतां गाभाऱ्यांतून दर्शन घेऊन बाहेर आल्यावर आपल्या प्रिय भार्येला चलण्यास सुचविलें. दोघेंहि बाहेर पडलीं. पतीला माहीत नसलेल्या एका तरुणासह एकत्र देवालयांत असतांना त्याचें आगमन झालें यामुळें कमलिनीला कसेंसेंच वाटलें. माधव मात्र देवळांतील युवकाकडे वारंवार चौकस बुद्धीनें पहात पहात बाहेर पडला.

---

## प्रकरण चवदावें.

## देवळांतल्या तीन व्यक्ति.

कमलिनी निघून गेल्यावर प्रभाकराची स्थिति चमत्कारिक झाली. त्याला कांहीं बोलावयाचें होतें, पण माधव मध्यंतरीं एकाएकीं आंत आल्यामुळें त्याचा नाइलाज झाला. माधव शिरल्याबरोबर त्याच्या दृष्टीस आपण एक परस्थ तरुण पडलों यामुळें त्याच्या चेहऱ्यावर उत्पन्न झालेला मात्सर्याचा विकार कमलिनीला बाधक तर होणार नाहींना? कमलिनीच्या पातिव्रत्यासंबंधाची शंका घेऊन तिचा छळ होण्याला तर माझी भेट कारण होणार नाहींना? माधवाची ओळख नसल्यामुळें त्याला त्याच्या स्वभावाची पारख नव्हती. तथापि परपुरुषाबरोबर—आणि तोहि तरुण—आपल्या स्त्रीनें खुशाल एकान्तस्थळीं बोलत बसावें व त्याचा यत्किंचित्हि परिणाम न होतां तें आपणास सहन व्हावें, अशांतली स्थिति जुन्या चालीरीतींचें व-

ळण शिक्षणानंतरहि कायम राहिलेल्या तरुण हिंदूंच्या मनाची अजून झालेली नाहीं. स्त्रीच्या पातिव्रत्याचा कितीहि विश्वास असला तरी अशा तऱ्हेच्या भेटी त्यांस केव्हांहि अनिष्टच वाटावयाच्या, हें प्रभाकरास पूर्णपणें ठाऊक होतें. प्रभाकराला जगाचा बराच अनुभव आला होता व मुंबईस शिकत असतांना सुधारणाभक्तांचीं पुष्कळ उदाहरणें त्यानें पाहिलीं होतीं. स्त्रीस्वातंत्र्याच्या चळवळीचे पुष्कळ धुरीण त्यानें पाहिले होते व परपुरुषाशीं होणाऱ्या स्वकान्तेच्या एकान्तिक भेटीचा मनावर होणारा साहजिक विकारमय परिणाम दाबून टाकून त्याकडे आपल्या तत्त्वाच्या प्रतिपादनार्थ मुद्दाम कानाडोळा करण्याचा त्यांचा हेतु असतो असें त्याला आढळून आलें होतें. अनेक गोष्टी त्याच्या मनांत आल्या व गेल्या, तथापि आपण कमलिनीसह या देवळांत असतांना माधवाच्या दृष्टीस पडलों ही गोष्ट वाईट झाली असें त्याला वारंवार वाटे व या संशयाची दृढता होण्याचें कारण माधवाची त्याच्याकडे न्याहाळून पहाण्याची पद्धति होय. असो.

दुसरी एक गोष्ट त्याच्या चित्तांत आल्यावांचून राहिली नाहीं; ती मकरंदाच्या गळ्यांतला स्फटिकमणि ही होय. कमलिनीनें अगदीं शेवटीं मित्राचे साहाय्यार्थ मुंबईस जातांना आपली आठवण ह्मणून दिलेला तो स्फटिकमणि आपल्यापासून तिच्या हातीं कधीं पडला याचें त्याला मुळींच स्मरण नव्हतें. पुष्कळ खटपट केली, स्मरणशक्तीचें सगळें दप्तर झाडून पाहिलें, पण स्मरणशक्तीचा डोळा चुकवून घडलेल्या गोष्टीचें दप्तर सांपडावें कसें? विस्मृतीचा पूर्ण अंधेर या चमत्कारावर पडला होता.

विचारामध्यें अगदीं गर्क असतां देवळाचे बाहेर कोणी तरी बोलत असल्याचें त्याच्या कानावर आलें. श्वासोच्छ्वास थांबवून त्यानें कानोसा घेतला, तेव्हां बोलणाऱ्या व्यक्ति अगदीं जवळ जवळ

येत असल्याचें त्याला समजलें. दरवाज्याकडे उत्सुकतेनें पहातो तों त्याच्या दृष्टीस त्याचा रानांतला स्नेही व एक वार्धक्याची छटा तोंडावर उमटलेली स्त्री पडली. या स्नेह्याबद्दल त्याच्या मनांत फार पूज्यबुद्धि होती व प्राणदानाचें जबरदस्त ओझें आपल्या शिरीं आहे अशी त्याची पक्की खात्री होती. जीविताविषयीं पूर्ण निराश होऊन आपल्या शेषायूच्या शेवटच्या घटका मोजतां मोजतां थोडक्याच काळांत मानलेला आगामी मृत्यु अजीबाद लांबणीवर पाडण्याचें—आयुर्दानाचें—श्रेय केवळ वरील स्नेह्यावर होतें. त्याला पहातांच प्रभाकराचे मनावर आनंदछाया प्रतिबिंबित होत असत. परंतु प्रस्तुत प्रसंगीं एक स्त्री बरोबर असलेली पहातांच त्यास सानंद आश्चर्य झालें. त्याच्या स्नेह्यानें त्याच्या कानांत कांहीं आवश्यक माहितीचा स्फोट करून वृद्ध व अशक्त स्त्रीच्या व्यवस्थेची जबाबदारी आपणावर घेतली.

एकदोन घटकांपर्यंत अन्नसिद्धीला वेळ होता. सायंछाया सर्वत्र पसरूं लागल्या होत्या. ती स्त्री देवळाच्या एका बाजूस आपलें बिऱ्हाड आवरून बसली होती. प्रभाकराच्या स्नेह्यानें पाक तयार होतांच बाहेर एकटा बसलेल्या प्रभाकरास त्याच्या नांवानें हांक मारिली. जेवण वगैरे झाल्यावर तीं तिघेंहि एकमेकांशीं बोलण्यांत गर्क झालीं.

---

## प्रकरण पंधरावें.

## विकारजागृति.

देवळांत एका अनोळखी तरुणासह असलेल्या कमलिनीला पाहून माधवाला कसेंसेंच झालें. प्रथमतः त्याचें डोकें एकदम भणाणलें व समोर दिसणाऱ्या तरुणाचें काय करूं व काय न करूं असें त्याला झालें; पण अविचार करण्याचें साहस त्याच्यानें घडलें नाहीं

त्यामुळें तो प्रसंग निभावला. त्याला प्रभाकराची व कमलिनीची माहिती मुळींच नव्हती व असलीच तर अगदीं थोडी! स्वतःस अनोळखी असलेल्या तरुणाला पहातांच हा एकदम प्रभाकर असावा असा विचार येण्याइतकी तर मुळींच नव्हती. वाटेनें घरीं जातांना त्यानें अनेक विषयांवर चर्चा काढली, पण कमलिनीच्या आजतागायतच्या प्रेमाची जाणीव त्यास पक्की असल्यामुळें आज पाहिलेल्या प्रकाराचा निर्देश करण्याचें धाडस माधवरावाच्या विकारवश मनाला होईना. त्यानें पुष्कळदां प्रयत्न केला, पण अगदीं ऐन वेळीं त्याच्या जिव्हेचा धीर खचे व नाइलाजानें त्यास माघार घ्यावी लागे.

माधवराव एरवीं कितीहि चांगला असला तरी त्याच्यामध्यें एक दोष होता व तो विकारास सहज वश होण्याइतका कच्चेपणा. शिवाय स्त्रियांच्या बाबतींत अलीकडे तो फार मत्सरी झाला होता. स्त्रिया या जात्याच दुर्बल मनाच्या असल्यामुळें एखाद्या पटाईत कामुक माणसाच्या वाक्शरानें पातिव्रत्याचें कवच खात्रीनें फुटून त्या मोहवश होतील अशी त्याची अलीकडे कल्पना बनली होती. तो एक वेळ स्त्रीस्वातंत्र्याचा कट्टा पुरस्कर्ता होता पण लग्न झाल्यानंतर हळूहळू त्याचे पूर्व विचार मावळत मावळत पार नाहींसे झाले होते.

स्त्रियांना पुरुषांच्या मेळ्यांत उघडपणें खुशाल वावरूं द्यावें अशा मताचा तो राहिला नव्हता. कमलिनीच्या स्वभावाच्या प्रेमळपणाची त्यास पक्की ओळख झाल्यापासून तो तिच्याविषयीं कधींहि शंकित झाला नाहीं. पण ती जर एखादे वेळीं एखाद्या सेवकाशीं जरा जास्त वेळ बोलली तर त्यास तें खपत नसे. तिला एकटी शेतांत पाहिली ह्मणजे तो जरा बावरे पण फिरून कमलिनीच्या उच्च गुणांचें स्मरण झाल्यानें त्याचा मात्सर्यप्रेरित राग नाहींसा

होऊन तोहि तिच्याशीं मोकळ्या मनानें वागे.

देवळांतून घरीं आल्यावर आपल्या नित्य बैठकीच्या खोलींत जाऊन तो दृष्ट प्रसंगावर विचार करूं लागला. कमलिनी निर्दोष आहे अशी तो आपल्या मनाची समजूत करूं लागे. पण त्या योगानें मत्सर अधिकाधिक मात्र भडके. "स्त्रियांवर कधींहि विश्वास ठेवूं नका" असें वचन त्याच्या मनांत वारंवार येऊन त्याचा मनावरचा दाब उडाला. कमलिनीवर आपण फाजिल विश्वास ठेवीत आहों, अशी त्याची ठाम कल्पना झाली व यापुढें स्वतःच्या वागणुकींत फरक पाडलाच पाहिजे असा त्यानें निश्चय केला.

अशा तऱ्हेच्या अनेक विचारांत तो मग्न झाला असतां त्याच्या खोलींत कोणी तरी व्यक्ति शिरली असा त्याला भास झाला व त्याचें प्रत्यक्षत्व त्यास ताबडतोब कळलें. कोणी एक स्त्री त्याच्या जवळ समोर उभी असल्याचें पाहून तो किंचित् घोटाळ्यांत पडला. परिचारिकेनें त्याच्याशीं इतक्या सलगीनें वागण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. तुच्छ मुद्रेनें भ्रूसंकोच करून तिजकडे पहात तो स्वस्थ स्वतःच्या आसनावर बसला. ती स्त्रीहि निर्भयपणें त्याच्याकडे टक लावून पहात होती. थोडा वेळ शांततेंत गेल्यावर तिनें "माधवराव" अशी अगदीं हळू हांक मारली. "काय आहे ?" असा किंचित् विरक्त स्वरानें माधवरावानें जबाब दिला.

"असें रागावण्याचें कांहीं कारण नाहीं. भेदरण्याचें पण कांहीं कारण नाहीं." कालिका अगदीं धिमे स्वरानें त्याच्या चेहऱ्याकडे टक लावून पहात ह्मणाली.

माधवराव आपल्या विचारांत असतांना बराच त्रासला होता. त्यास तशाच स्थितींत राहूं दिलें असतें तर कांहीं विशेष घडलें नसतें. पण कित्येक जणांना आत्मविचारांत दंग असतां त्यांत भंग केल्यास चिडण्याची व त्रासण्याची संवय असते. त्याप्रमाणें माध-

वाची स्थिति झाली. मनांत असलेली गोष्ट एकदम उघड करून त्याची शहानिशा करून घेण्याचें सोडून अगदीं शांतपणानें बोलण्याची परिचारिकेची नवीन तऱ्हा पाहून तो फार त्रासला. या बाईला एकदम हांकलून द्यावें असें त्याच्या मनांत आलें. पण त्याच्या त्रासिक स्थितीची ओळख पडल्यावरहि आपला मालक ह्मणून कालिका त्याला भ्याली नाहीं, उलट त्यास तिनें वर्मी लागण्यासारखें उत्तर दिलें—

" माधवराव! मालकाच्या गैरमर्जीच्या भयानें सदैव गोंडा घोळणाऱ्या दासींपैकीं मी नाहीं. माझा तुमच्या येथें रहाण्यांत कांहीं विशेष हेतु होता. त्याची ओळख देण्याकरितां घरांत कोणी नाहीं असें पाहून मी आलें आहें. माझ्या पगारा—"

" पगाराची बढती करा असेंच ना तुमचें ह्मणणें? समजलें. तुह्मा नोकरांचा दुसरा काय हेतु असायचा? त्याची ओळख मालकाला द्यायला घरांतील सामसुमीचा मुहूर्त कशाला साधायला हवा? नोकर घरीं आला कीं या गोष्टीची जाणीव मालकाला आपोआप उत्पन्न होतेच."

" माझें ह्मणणें ऐकून तर घ्यायचें होतें, धनीसाहेब!" कालिका किंचित् उच्च पण शांत स्वरांत बोलूं लागली. " असा उतावळेपणा कां? माझ्या पगाराची शिफारस करण्याचा माझा हेतु नाहीं. मला पगाराची जरूर नाहीं, पर्वा नाहीं. ईश्वरानें मला अन्नवस्त्राला कांहीं कमी केलें नाहीं.—मी केवळ——"

" मग आह्मीं तुझ्या दारीं नोकरी देण्यासाठीं भिक्षा मागितली होती का?"

" अहो पण महाराज! अशी घाई कां? तुह्मी जरा दम धरला तर!"

" हं बोला काय आहे तें. आह्मांला तुमचा फाजिलपणा ऐकण्याला वेळ नाहीं."

" धनीपणाच्या तोऱ्यांत मिरवणारांना अशी ऐट पाहिजेच असते. आपल्या मुक्ताफळांचे हार माझ्या गळ्यांत पडतील याचा अजमास मीं प्रथमपासूनच केला होता. तुमच्या शब्दाच्या किंमतीचा पुरा खोटेपणा माझ्या अनुभवास आल्यावरून मी— "

" काय हलकट असतात माणसें हीं? तुमच्या मालकाच्या शांतपणाचा तुह्मी फायदा घेत आहां. "

" माझे महाराज—आपण धनीसाहेब–फार शांत, जबरदस्त सोशिक, अत्यंत सत्यवादी, मोठेच सज्जन आहेत. आपल्यासारख्या महात्म्यांना त्रास देऊन त्यांच्या शापाचे भागीदार मीं व्हावें हें मोठेंच पाप. सगळें खरें! पण!! माझें काम तसेंच महत्त्वाचें आहे.— "

इतकें भाषण झाल्यावर आपल्या ओल्या पदरानें ती तोंड पुसूं लागली. कालिकेच्या वागणुकीचा उलगडा न पडल्यामुळें माधव तिच्याकडे पहात होता. क्षणार्धांत तिचा चेहरा कोडी माणसाप्रमाणें अर्धवट काळा अर्धवट पांढरा असा विलक्षण दिसूं लागला. ओल्या पदराचा हात तोंडावर फिरत असतां ही कोणी जादूगार आहे असा माधवरावाला भास झाला. मघांशीं तोंडावर पूर्ण कृष्णवर्ण होता तो काळापांढरा झाला व आतां तर तिचा एक सबंध भाग गौरवर्ण दिसूं लागला. दुसरा भागहि लख्ख निर्मळ झाला. हें पहातांच गाढ झोंपीं गेलेल्या माणसाला आकस्मिक कारणानें घाई करून उठविलें ह्मणजे जशी त्याची घाबरल्यासारखी स्थिति होते व तो एकदम उठतो तशी माधवरावाची अवस्था झाली. पहातां पहातां त्याच्या डोळ्यांसमोर काळ्या कालिकेहून कोणीतरी निराळीच स्त्री दिसली. ही दासी नाहीं, एक सभ्य स्त्री आहे, अशी माधवरावाची खात्री झाली. आश्चर्यामुळें त्याचे डोळे ताणले जाऊन दोन्ही भिवया एकमेकांजवळ आल्या व पहात असलेल्या

प्रकाराचें सत्यत्व पहाण्याकरितां तो धडपडूं लागला.

कालिकेच्या खऱ्या स्वरूपाची ओळख त्याला झाली. दिङ्मोहाच्या भरांत आपणाकडे शांत व धिम्या दृष्टीनें पहाणाऱ्या स्त्रीला तिच्या खऱ्या नांवानें त्यानें हांक मारिली.

" मी मी म्हणणाऱ्या घमेंडखोर पुरुषांनाहि बायका चकवूं शकतात ना ? आतां खात्री पटलीच असेल ! "

" होय, **आनंदी** ! बायकांच्या कुशलतेची साक्ष निखालस पटली. "

" पण उपयोग काय ? माधवराव तुह्मी पुरुष किती नीच असतां याची खात्री स्वतःच्या पूर्वचरित्राशीं उत्तरकालाची तुलना करून पडताळून घ्या. " आनंदी किंचित् उपरोधिक शब्दानें बोलली.

बिचारा माधव लज्जेनें अगदीं विरमला.

" बरें आतां मी जातें—माझ्याविषयीं लोकांनीं संशय न घ्यावा अशी मला खबरदारी घेतली पाहिजे. फिरून कधीं तरी संधि साधून भेटेन. "

कालिका बोलतां बोलतां दाराबाहेर पडली व निघून गेली. माधवराव मनाची सर्व विचारशक्ति हरपून बसले.

स्थानी शके १८२३ संग्रहालय

---

## प्रकरण सोळावें.

## आरोपाची शाबिती.

रुद्रगडच्या फौजदारी कोतवालींतील एका खोलींत कांहीं शिपायांसह गणपतराव फौजदार एका कैद्याची जबानी घेत होते. समोर बऱ्याचशा कागदांचीं बाडें पडलीं असून भोंवतीं ४।५ राजसेवक वीरासनें घालून बसले होते. दाराशीं एकजण उभा होता.

ज्या कैद्याची चवकशी चालली होती, त्याची मुद्रा अगदीं गंभीर असून सर्वांग निष्कंप होतें. आपल्या स्थितीची त्यास मुळींच ओळख नसावी असें त्याच्या मुद्रेवरून कोणालाहि वाटलें असतें.

पोलीसचौकींत पोलीस लोकांच्या नायकासमोर पोलीस लोकांच्या ताब्यांत असतांना मनाची निर्भयता कायम रहाणें फार अवघड आहे. अगदीं बिलंदर व मुरलेल्या दरवडेखोराच्याहि मनाचें धैर्य त्या दशेंत रहाणें अशक्य आहे. पण वरील कैदी परिस्थितीविषयीं अगदीं बेफिकीर होता. गणपतरावांनीं त्याला एकदां आपादमस्तक बारकाईनें पाहिल्यावर आपल्या हस्तकाची कसलीशी मसलत घेतली व त्या कैद्याशीं बोलण्यास सुरुवात केली—

" बावाजी—नांव, गांव व कोणत्याहि प्रकारची माहिती देण्याची तुमची इच्छा नसली व ती आमच्या चवकशींत तुह्मीं दिली नाहीं तरी तुमच्यावरचा अपराध दूर होतो असें नाहीं. बाकीच्या जबान्यांवरून चुकत असलेल्या दोन कैद्यांपैकीं तूं एक आहेस अशी आमची खात्री आहे. भगव्या वेषाखालीं अत्यंत नीच वागणूक करणारा तूं एक नरपशु आहेस अशी आमची समजूत आहे व तिला सबळ आधार आहे. बोला, अजून कांहीं माहिती असली तर; नाहीं तर--अर्थसूचक दृष्टीनें त्यांनीं आपल्या हस्तकांकडे पाहिलें.

" फौजदारसाहेब, तुमच्या ' नाहींतर ' या संदिग्ध शब्दाचा अर्थ मला कळतो व त्याचा अनुभवहि मला आहे. आपल्या ' नाहींतर ' चा प्रभाव आपण माझ्या देहावर चालविलात तो जर थोडा झाला असेल तर आणखीहि आपल्या शक्तीचा विनियोग माझ्यासारख्या गरीब गोसाव्याच्या शरीरछळांत करण्याला माझी ना नाहीं. नशीबीं असेल तें भोगलेंच पाहिजे. माझा ईश्वरावर पूर्ण भरंवसा आहे व तुमच्या कृत्यांची जबानी तुह्मांसहि परलोकीं

देण्याचा प्रसंग येणार आहे. माझ्यावर जर आरोपाची शाबिती होत असेल तर तुह्मी खुशाल करा. मी आपल्या हातानें स्वतःला दोषाचा कालिमा लावण्यास तयार नाहीं." गोसाव्याची गंभीरता अढळ होती.

"कर्में करितांना गोड वाटतात? हरामखोर! साहेब, अशानें हें भागणार नाहीं. मला हुकूम करा. खऱ्या स्थितीची मी याला समज पाडून देतों." एकजण संतापानें बडबडला.

"बोवा असा अरेरावीपणाचा वेदान्त चालायचा नाहीं. खरें काय तें सांगितलेंच पाहिजे." दुसरा ओरडला.

"आज ही नवीन का धमकी आहे? मी अशा धमकीला भीत नाही."

गणपतराव खवळले. 'चल, धर चोराला.' हस्तकांना हा शाब्दिक इशारा मिळतांच ते चार बाजूंनीं धांवले व त्यांनीं बरीच धक्काबुक्की चालविली. तथापि कैद्याच्या तोंडून एक अक्षरहि बाहेर पडलें नाहीं. रागानें गरगर डोळे फिरवीत गणपतराव शिपायाला म्हणाले, "सध्यां याला कोठडींत पोंचवा. जा." आज्ञा ताबडतोब पाळण्यांत आली. इतक्यांत श्रीपतराव वरिष्ठ फौजदार तेथें आले. त्यांना आपल्या पराक्रमाचा गौरव गणपतरावांनीं वर्णिला. श्रीपतराव हे फार विचारी व धिमे गृहस्थ असल्यामुळें त्यांना वरील गोष्ट पसंत पडली नाहीं.

"गणपतराव आपलें खातें हें जगांतला अन्याय हुडकून काढण्याकरितां आहे. अगोदर पोलिसखात्याबद्दल गैरसमज झाला असतां तुह्मी आपल्या अविचारानें तो दुणावूं पहातां तेव्हां तुह्मांस काय ह्मणावें? तुमच्या हातून आज खरोखरच एका निरपराधी व सज्जन गृहस्थाचा छळ झाला आहे. मला आज त्याविषयीं फार महत्त्वाची व खरी बातमी कळली आहे. त्याच्या एका नातलगाला मीं बोलाविलें आहे;

आतां इतक्यांत तो येईल. अधिकाराचा दुरुपयोग करण्याकरितां का आपण सरकारचा पगार खातां? तुमच्या व्यक्तिशः अविचाराच्या परिणामाची मजल सरकारच्या व प्रजेच्या गैरसमजुतींत व तदनुसारी फाटाफुटींत होते ह्याकडे तुमचें लक्ष आहे का?"
गणपतराव फारच विरमले! त्यांना आपण केलेल्या गोष्टीची चुटपुट लागली. श्रीपतराव हे फार थोर गृहस्थ होते. त्यांच्या न्यायप्रियतेवर लोकांचा मोठा विश्वास होता.

आपल्या कामांत अगदीं चोख राहिल्यानें सरकारी नोकरींतहि लोकप्रियता कशी मिळूं शकते याचा अनुभव त्यांना होता व त्यामुळें आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यांना ते नेहमीं सद्बोध करीत. अधिकाराचा दुरुपयोग केल्यानें वाईट परिणाम होतात हें ते जाणून होते. त्यामुळें गणपतरावांच्या उतावळेपणाचा त्यांना फार राग आला. त्यांनीं गणपतरावांची कानउघाडणी करण्यांत कमी केलें नाहीं. हें संभाषण चाललें आहे तों माधवराव तेथें आला.

---

## प्रकरण सतरावें.

## कैद्याचा मनस्ताप.

पोलीसांनीं गोसाव्याला गचांड्या मारीत कैद्यांच्या कोठडीकडे नेलें, एक जोराचा धक्का देऊन आंत लोटलें व दार बंद करून घेऊन ते परत आले.

कच्च्या दिलाचा जर एखादा कैदी असता तर त्यानें पोलीसांच्या खुषीकरितां खोटा कबुलीजबाब देऊन आपली तात्पुरती तरी मारापासून सोडवणूक करून घेतली असती. परंतु आमचा कैदी जबऱ्या मनोधैर्याचा असल्यामुळें त्यानें कोणच्याच उपायाला मान न वांकवितां आपला निर्दोषित्वाचा बाणा कायम ठेविला.

कोठडींत आल्यावर जीविताचा कंटाळा येऊन तो त्याच्या घाताला सिद्ध झाला. त्याला पकडण्यांत आलें तेव्हां त्याची झडती घेतलेली नसल्यामुळें कोठडींत त्याचीं वस्त्रेंपात्रें होतीं. त्यांतून एक स्वच्छ पांढरें फडकें आणि चाकू काढून त्यानें आपलें बोट कापलें आणि दुसरी अंगुली रक्तांत भिजवून फडक्यावर लिहिण्यास सुरुवात केली.

कैद्याचा मनःक्षोभ इतका झाला होता कीं, विचारशक्ति मावळून एका मरणाखेरीज त्याला दुसरें कांहीं दिसेना. बस्स ! मरावें हाच एक निश्चय. आजपर्यंत त्यानें आपलें आयुष्य परम धार्मिकपणानें घालविलें होतें. कोणत्याहि तऱ्हेचा दोष केलेला त्याला स्मरत नव्हता. असें असतां आयुष्याच्या उत्तरभागांत आपल्यावर असा चमत्कारिक प्रसंग यावा ही त्याला मोठी दुर्दैवाची गोष्ट वाटली. पूर्ण निरपराधी असतां आपल्या हातानें दोषी ठरून जगाच्या निदर्शनास दरवडेखोर या स्वरूपांत येण्यापेक्षां आपल्या निर्मळ मानसिक स्थितींत आयुष्याचा क्षय करणें शतपटीनें बरें अशी त्याची भावना अढळ झाली. जगांत आपलीं अत्यंत निकट नात्याचीं माणसें सुखानें नांदत आहेत ही गोष्ट तो विसरला नव्हता, पण त्यांना आपल्या दुःखाची माहिती देऊन त्रास देण्यास त्याचें मन घेईना. अनेक हालअपेष्टा सोसून ज्याकरितां आपण उत्तर दक्षिण प्रदेश आक्रमिला त्या सुखाशेचा रोपा डोळ्यांपुढें दिसूं लागतांच मरावा अशी जर ईश्वराची इच्छा असली तर मानवी प्रयत्नांचा विरोध त्यास कितीसा पुरवणार ? भविष्यामध्यें मनुष्याकरितां काय वाढून ठेवलें असतें याची ओळख सुद्धां माणसांना त्यांच्या प्रत्यक्ष दर्शनापर्यंत नसावीना ? दोषविरहित—सदैव दोषविरहितच—राहीन अशी असलेली त्याची समजूत खोटी ठरली. जगांत न्यायाचा सौदा फार थोडा आहे. निर्दोषतेचा आत्मविश्वास

लोकांच्या मनावर वास्तविक परिणाम करीत नाहीं याचा प्रत्यय त्याला आला. मग अशा दुःस्थितींत आणखी कांहीं दिवस आयुष्य जगविण्यांत हंशील कोणचें ? जगाच्या न्यायप्रियतेवर विसंबून रहाणें ह्मणजे आत्मवंचना आहे. आपल्यावरून जगाची परीक्षा करणें, लोकांच्या मनोवृत्तींशीं स्वतःच्या मनोवृत्तिचें साम्य मानणें, ह्मणजे आत्मघाताचा पहिला फांस गळीं पाडून घेण्यासारखें आहे.

जों जों तो अधिक विचार करूं लागला, जसजसें त्याचें लेखन संपत आलें, तसतशी त्याला आयुष्याची निराशा तीव्र भासूं लागली. मरणाचा निश्चय अधिकाधिक दृढत्व पावूं लागला व विलंब लावल्यास तो सिद्धीस जाणार नाहीं असें वाटून या जगाला—या विश्वासघातकी जगाला—शेवटचा रामराम ठोकण्याकरितां त्यानें दीड पुरुष उंचीवर असलेल्या एका गजाच्या भक्कम खिडकीस लोंबकळून बाहेर पाहिलें. प्रातःकाळचा समय असल्यानें त्याच्या दृष्टीस पूर्वक्षितिजारूढ प्रचंड तेजोगोल पडला. त्यास शेवटचें भक्तिपूर्वक नमन करून त्यानें आपल्या नातलगांच्या सौख्याकरितां आशीर्वाद मागितला. दृष्टीच्या मर्यादेंत असलेली प्रत्येक वस्तु त्यानें निर्विण्ण चक्षूंनीं पाहिली. समोर दिसणारी तुरळक तुरळक घरांची वाडी, त्यांतले लोक, तिकडे असलेली श्यामल क्षेत्रराजी, त्या स्वच्छ निर्झरिणीचा प्रवाह, ते वृक्षलतांनीं गजबलेले डोंगर, त्यांतल्या खोल दऱ्या, त्या टेंकाडाचे आड असलेलें कल्पनेला दिसणारें मधुपुर, त्यांतला माधवराव, कमलिनी, तिचें मोहक बाळ, त्यांचा जमीनजुमला, सगळे पदार्थ दृश्य अगर अदृश्य त्याला अल्प काळांत पारखे होणार होते, त्यांना तो मुकणार होता. याप्रमाणें एकवार बाहेर पाहिल्यावर त्यानें एक दोरी झोळींतून काढली व तिचा फांस तयार करून तो खिडकीच्या गजाला बांधला. अखेरच्या प्रवासाची सर्व तयारी झाली. ईश्वराची स्तुति करीत

असतां अंतकालीन फांस त्याचे गळीं उतरला व त्यानें त्याच्या देहांतली निर्मळ स्नेहमय प्राणज्योत मालविली. त्याचा जड देह भिंतीशीं लटकत राहिला.

इतक्यांत एक शिपायी आंत आला व या घोर देखाव्यानें घाबरून जाऊन पळत पळत निघून गेला.

---

## प्रकरण अठरावें.

## उलगडा पडला.

चावडीच्या कोठडींत वरील गोसावी आपल्या जीविताचा बिंदु कालसागराच्या उदरांत सांठविण्याच्या तयारींत असतां त्याच इमारतीच्या दुसऱ्या भागांत श्रीपतराव व माधवराव आपसांत खाजगी गप्पा गोष्टी बोलण्यांत मग्न झाले होते.

इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर बोलण्याचा उपसंहार करण्याच्या तयारींत श्रीपतराव होते. त्यांनीं ‘ माझ्या मतें तीच व्यक्ति खास—तेच गोसावी असतील असा माझा समज आहे ’ असे शब्द उच्चारले व त्याला साधारण आतुरतेनें आणि बऱ्याचशा जिज्ञासेनें माधवरावानें मानेच्या हलविण्यानें उत्तर दिलें. यानंतर ते दोघेहि उठले व जवळ असलेल्या गणपतरावाला त्यांनीं गोसाव्याच्या खोलीकडे नेण्यास सुचविलें. गणपतरावाच्या मनावर वरील भाषणाचा फारच विलक्षण परिणाम झाला होता. ज्या गोसाव्याला आपण एक बिलंदर दरवडेखोर समजून अटकेंत ठेविलें व चोपलें त्यासंबंधीं कांहीं विशेष अशी माहिती बाहेर पडली होती. श्रीपतरावाच्या एकंदर कर्तृत्वाबद्दल गणपतरावाला शंका नव्हतीच. जों जों त्या गोसाव्यासंबंधी जास्त जास्त माहिती बाहेर पडूं लागली तों तों त्याच्या अंतःकरणावर जबरदस्त धक्के बसूं लागले. श्रीपत-

राव मधून मधून गणपतरावाच्या पशुवृत्तीवर कोरडे ओढीत होतेच, त्यामुळें गोसाव्याच्या नुसत्या माहितीनें होणाऱ्या परिणामावर जास्तच तजेला येई. असो.

भाषणाचा ओघ बंद पडून ते तिघेहि गोसाव्याकडे जाण्यास निघाले. इतक्यांत एक शिपाई घाईनें येऊन कोणी एक माणूस कांहीं विचित्र माहिती सांगत असून त्याची फौजदारास भेटण्याची इच्छा आहे असें बोलला. त्यामुळें मूळची गोष्ट बाजूस राहून श्रीपतरावांनीं त्या इसमास आंत आणण्यास शिपायाला सांगितलें.

दिसण्यांत उग्र, अतिशय राकट व जीर्णवस्त्राच्या लक्तऱ्या अंगावर लोंबत असलेली अत्यंत मलिन अशी एक व्यक्ति शिपायाबरोबर आंत आली.

श्रीपतरावाच्या समोर आल्यावर त्यानें एकदां सभोंवार पाहिलें. श्रीपतरावांच्या प्रश्नांना उत्तर ह्मणून त्यानें एक लांबलचक जबानी दिली. ती संपेपर्यंत सर्वजण अगदीं शांत होते.

"महाराज! आपण आमचे मायबाप आहांत! मला जास्त सांगण्याची इच्छा नाहीं.पण जें काय सांगायचें तें एवढेंच कीं, माझी हकीकत समजली ह्मणजे सरकारच्या दृष्टीनें मी अत्यंत दोषी ठरेन व खऱ्या न्यायानें मला कदाचित् एखाद्या माझ्या घोर कर्माप्रमाणेंच भयंकर शिक्षेचें माझ्या इतर साथीदाराबरोबर भागीदार व्हावें लागेल. मी दोषी आहें, पण त्याबद्दल आपण शिक्षेच्या स्वरूपांत कांहीं तरी या गरीबावर दया कराल अशी माझी आशा आहे. न्याय देणें आपल्या स्वाधीनचें आहे. मी आपल्यापाशीं आहें" भाषणाच्या या सांदिग्ध उपक्रमानें तेथील श्रोत्यांस किंचित् कंटाळा आला व तो त्यांच्या मुद्रेवरून ताडून वरील क्रूर दिसणाऱ्या प्राण्यानें आपल्या स्वरूपाहून अगदींच विपरीत अशा नम्रपणानें आपलें भाषण आरंभिलें.

" मायबाप ! ज्या चोरांच्या प्रकरणाची चवकशी आपल्याकडे चालली आहे त्यांच्यापैकींच मी एक असून त्यांच्याबरोबर आसपासच्या प्रांतांत आजपर्यंत मी धामधूम माजवीत होतों. माझ्या साथीदारांना विश्वासघातानें पकडल्यावर मी व आणखी एकजण गुप्त रीतीनें आजपर्यंत राहिलों, पण नाइलाजानें व मुद्दाम एका इसमाच्या सोडवणुकीकारितां मी जाणूनबुजून ज्या परिणामाला आजपर्यंत भीत आलों त्याला वश होण्याच्या इच्छेनें आज येथें आलों आहे. माझा दुसरा साथीदार हा जरा वृद्ध व दाढी वाढविलेला होता. ज्या दिवशीं रात्रीं आमच्या टोळीची वाताहत झाली त्या दिवशीं मी व तो मारापासून बचाव करून कसेबसे सुटलों, पण जे कांहीं दोन चार सोट्याचे घाव पाठीवर बसले ते त्याच्या वयाला व तदनुरूप शक्तीला फारच घातक झाले आणि त्यांतच त्याचा अंत झाला. तो जर न मरता तर आमच्या धंद्याची पुन्हां जुळवाजुळव करण्याचा प्रयत्न आह्मीं केला असता. पण सुदैवानें ह्मणा अगर दुर्दैवानें ह्मणा, त्यानें या जगाला रामराम ठोकल्यावर मलाहि जगण्यांत कांहीं हंशील नाहीं असें वाटूं लागलें आहे. तथापि आपल्याच हातानें आपल्या जिवाचें बरें वाईट करून घेण्याचा माझा विचार होता. शिपायांच्या हातून आपल्या कृष्णकारस्थानाचा झाडा भर चव्हाट्यावर देण्यापेक्षां न सांपडतां पूर्णपणें आपल्याच हातानें अज्ञातवासांत जीवनयात्रा संपविण्याचा माझा बेत कांहीं विशेष कारणामुळें ढांसळला. माझ्या इतर साथीदारांनीं दिलेल्या जबाबांच्या आधारानें माझ्या मेलेल्या साथीदाराच्या खाणाखुणांशीं पटणारा कोणी एक गोसावी पोलीसांनीं पकडल्याची बातमी जेव्हां प्रथम माझ्या कानीं आली, तेव्हां आपल्या बचावाकरितां एखाद्या निरपराधी प्राण्याला त्रास व्हावा हें मला इष्ट वाटेना. चित्ताशीं बराच वेळ विचार केल्यावर आपला नीच देह

सरकारच्या स्वाधीन करून आजपर्यंतच्या पापावर एक तरी पुण्याचें गालबोट लावावें असा ठाम निश्चय झाला. महाराज! मला स्वतःच्या भोगाव्या लागणाऱ्या भावी परिणामापेक्षां मला आतांच गोसाव्याला झालेल्या त्रासाच्या वेदना होत आहेत. बिचारा निरपराध गोसावी जगाशीं आपला संबंध तोडून ईश्वर-भजनांत काळ घालविणारा असतां त्याला जगाच्या फंदांत गोंवून न्यायाधीश त्याच्या माथीं शिक्षा मारतील असें भय मला वाटतें आहे. तो जर येथेंच असेल तर अगदीं प्रथम त्याची सुटका करा. महाराज! आपण प्रजाहिताकरितां रात्रंदिवस झटत असतां त्यांत विनाकारण एखाद्या गरीबाला सगळ्यांबरोबर मुरगळून टाकणें आपणांस तरीं बरें वाटतें का? जास्तीकमी बोलल्याची माफी करावी सरकार!! मीं जें कांहीं सांगितलें तें अगदीं खरें आहे. शपथपूर्वक सांगतों. हो पण—आह्मी खरें तरी बोलतों कशावरून? सरकार! कांहीं तरी पुण्यमार्ग पदरीं पडावा एवढ्याच इच्छेनें मी येथें आलों आहें. तेव्हां प्रसंगाकडे नजर देऊन तरी आपणास माझ्या बोलण्याची सत्यता पटेल. एरवीं पोलीस शिपायांच्या चवकशीला मीं दाद दिली नसती हें आजपर्यंतच्या माझ्या स्थितीवरून आपल्या लक्षांत आलेंच असेल. यापेक्षां जास्त सांगण्यासारखें कांहीं नाहीं."

आपल्या पशुतुल्य वर्तनानें माणुसकीला काळोखी आणणाऱ्या या क्रूर दरवडेखोराच्या अंतःकरणांत आढळणारा हा दयेचा उदात्त जिव्हाळा कसा उत्पन्न झाला, स्वतःच्या जीवाचा वेळेला घात करून पकडलेल्या कैद्याची सुटका करण्याइतकी निःस्वार्थ बुद्धि या नरपशूच्या चित्तांत कशी उद्भवली, हा एक प्रश्न त्या श्रोतृ-वृंदापुढें आला. पण त्या विचाराचा शांतपणें निकाल लावण्याइतकी स्वस्थता त्यांना त्या काळीं नसल्यामुळें या आपण होऊन आलेल्या

चोराच्या सांगण्यावरून अधिक तपास करण्यासाठीं ताबडतोब त्या निरुपद्रवी गोसाव्याला आणण्याकरितां एक शिपाई पाठविला; व श्रीपतराव आणि माधवराव आपसांत जास्तच कुजबुजूं लागले.

गणपतरावाचा चेहरा काळा ठिक्कर पडला होता. त्या चोराच्या तीक्ष्ण दृष्टींतून ही गोष्ट सुटली नाहीं. गणपतरावाला उद्दामपणें वर्तन करतांना या गृहस्थानें अनेक प्रसंगीं भिन्न भिन्न ठिकाणीं पाहिल्यामुळें आजच्या त्याच्या वृत्तींत घडून आलेल्या जबरदस्त क्रान्तीचें कारण शोधून काढण्यामध्यें दरवडेखोराची मति गुंग झाली. आजपर्यंत सर्व लोकांवर अरेरावी गाजविलेले गणपतराव आज एखाद्या भाबड्या माणसाप्रमाणें घाबरून गेले होते. त्यांच्या डोळ्यांतला अधिकारमद पार जाऊन ते आपल्या मूळच्या मानवी स्वरूपाला येऊन मिळाले. तोंड वर करून पहाण्याचें धैर्य त्यांच्यांत आज मुळींच नव्हतें. कृतापराधाच्या जाणीवेनें लाजलेल्या गणपतरावांची केविलवाणी स्थिति पाहून पहाणाराला वाईट वाटलें असतें. पण त्याच्या आजपर्यंतच्या वर्तनाचें जर सिंहावलोकन केलें असतें तर त्याच्या आजच्या करुणस्थितीचा कोणालाहि संतोषच वाटला असता.

प्रत्येकजण आपआपल्या विचारांत मग्न होता. श्रीपतराव व माधवराव अत्यंत आतुरतेनें गोसाव्याच्या आगमनाची वाट पहात आपसांत बोलत होते. इतक्यांत कांहीं पावलें वाजलीं. त्यांच्या जलदपणावरून कोणी तरी फार घाईनें चालत असल्याचें सहज अनुमान करतां येण्यासारखें होतें. आपल्या तीव्र गतीचें कारण चेहऱ्यानेंच दर्शविणारा मघाशीं गोसाव्याच्या सोडवणुकीकरितां गेलेला शिपाई खोलींत एकटाच शिरलेला मंडळीनें पाहिला.

त्याच्या घाबरण्याचें कारण कोणालाच उमगेना व तोहि कांहीं बोलेना. कावरीबावरी मुद्रा, चंचल नेत्र व श्वासाचा वेग, एवढ्यानें त्याला कांहीं तरी विलक्षण प्रकार दिसला असावा असा संशय

प्रथम श्रीपतरावांना आला. माधवरावालाहि चमत्कारिक वाटलें. शिपायाच्या बाह्य स्थितीवरून अंतरंगांत चाललेली खळबळ व तिचें कारण प्रत्येकाच्या ध्यानांत आलें. तर्कानें ताडलेल्या उत्तराचें प्रत्यक्ष स्वरूप त्याच्या अनर्थावहतेमुळें शिपायाच्या भाषणांत पहाण्याचें धैर्य एकाचेंहि होईना. एकमेकांच्या मुखचर्या व नेत्र परस्परांच्या जिज्ञासा मुक्या भाषणांत व्यक्त करीत होते. पण असा प्रकार किती वेळ चालावा? या वेळांत गणपतरावांना भावी अनिष्ट चित्र कल्पनाचक्षूंपुढें दिसून त्यांच्या सर्व शरीराला कंप सुटून ताठ उभें रहाण्याचीहि त्यांच्यांत शक्ति राहिली नव्हती. एका भिंतीला टेकून तो उभा राहिला. आपल्याच अपराधाची ही परोक्ष शब्दांनीं चवकशी चालली असून घाबरलेल्या शिपायाच्या तोंडून निघणारे शब्द ह्मणजे स्वतःला मिळणारी शिक्षाच होती असें त्याला वाटलें. मूक संभाषणाचा शेवट करून शांतताभंग करीत करीत अधीरतेच्या कांपऱ्या शब्दांत श्रीपतरावांनीं त्या शिपायाला सरळ हकीकत सांगण्यास आज्ञा केली. शिपायाचें सर्वांग कांपत असून शिरःप्रदेशावरून स्वेदजलाची धारा गळूं लागली होती. अधिकाऱ्याची आज्ञा होतांच त्यानें भीत भीत गद्गद कंठानें कैद्याच्या निधनाची वार्ता प्रकट केली! त्याबरोबर सर्व मंडळींत मोठी चलबिचल उडून गेली. आपण होऊन आलेल्या दरवडेखोरांच्या तोंडून एकदम "शेवटीं पुण्य नाहींच ना पदरीं पडलें!" असे करुणोद्गार बाहेर पडले. माधवरावाचा हात त्याच्या नकळत अकस्मात भालप्रदेशीं आदळला व तद्दर्शक "हाय! हाय!!" असे शब्द त्याच्या मुखांतून उद्भवले. श्रीपतरावांचें सर्व शरीर रोमांचित झालें. राग, दया, इत्यादि विरोधी मनोवृत्ति एकमेकांवर चाल करून गेल्या व त्यांनीं सर्व हृदयांत एकच तुंबळ रण माजविलें. शोकावेग ओसरल्यावर त्या शिपायाला घेऊन ही मंडळी मनापुढें अगोदरच उभ्या राहिलेल्या

घोर चित्राचें प्रत्यक्ष दर्शन घेण्याकरितां मृत कैद्याच्या खोलीकडे निघाली. गणपतराव अगदीं मंद गतीनें त्यांच्या मागें चालला होता. जातां जातां श्रीपतरावांनीं नवीन दरवडेखोरास एका कोठडींत ठेवण्यास शिपायांना सांगितलें.

---

## प्रकरण एकोणिसावें.

## उलगडा पडला ( पुढें चालू ).

खोलीपर्यंत जाण्यापूर्वीं मध्यंतरींच्या काळांत तिकडे जाणाऱ्या व्यक्तींच्या हृदयांत हजारों विचारांचें काहूर माजून राहिलें होतें खोलींत दिसणारा प्रकार त्यांना अगोदरच दिसत होता व तेथें जातांना त्यांचे पाय अगदीं जड पडत होते. उल्हास व आनंद या विकारांचा पार नाश होऊन त्यांच्या जागीं भयानकतेचा रंग बसला होता. मोठ्या कष्टानें त्यांनीं त्या खोलीपर्यंतचा पल्ला मारला. दाराजवळ उभे राहिल्यावर त्यांनीं जरा वेळ तसाच घालवून नंतर दार उघडलें. दारासमोरच भेसूर मृतदेह खिडकींत अडकविलेल्या दोरावर लोंबत होता. मृत्यूची भेसूर छाया त्याच्या चेहऱ्यावर असल्यामुळें त्या जडतेंतच प्रत्येकाच्या मनोवृत्तीप्रमाणें निरनिराळे तरंग दृष्टीस पडले. गरीबाच्या छळाची मर्यादा त्याच्या आत्मघातापर्यंत आल्याचें पाहून श्रीपतरावांचें मन द्रवलें. माधवरावाला आपला एक अत्यंत हितकारी नातलग अशा भयंकर मरणानें गमावल्यामुळें फारच अनिर्वचनीय वाईट वाटलें. मृताच्या शांत व निर्विकार जड चेहऱ्यावर गणपतरावाला स्वतःच्या सूडाच्या छटा दिसूं लागल्या. त्याच्या द्रवलेल्या हृदयांत बळ नसल्यानें मृताच्या वदनाकडे पहाण्याचें धैर्य त्यांत उरलें नाहीं. तो शिपाई तर तिकडे न पहातां आपणाशींच विचार करीत दुस-

रीकडे पहात होता.

श्रीपतरावांनीं नंतर खोलींत इकडे तिकडे पाहिलें तों त्यांच्या पायांजवळच एक रक्तचिन्हांकित रुमाल अगर फडकें दृष्टीस पडलें. उचलून पहातां त्यावर रक्तांनीं लिहिलेलीं अक्षरें दिसलीं. हस्तकंपाबरोबर कंपित होणारें तें फडकें ताठ समोर धरल्यावर त्यावर–

" पूर्वाश्रमांतील मधुपुरचा मुकुंद —"

" कमलिनीला–तिच्या पतीसह–ईश्वर–सुखी ठेवो. "

अशीं अक्षरें लिहिलेलीं आढळलीं.

दुःखावेग अनावर झाल्यामुळें माधवरावानें आपल्या सच्छील श्वशुराच्या मृतदेहास मिठी मारली व तो एखाद्या लहान बाळाप्रमाणें मुक्त कंठानें रडूं लागला. त्याला स्वतःला मुकुंदरावांबद्दल वाईट वाटत होतेंच, पण आपली प्रिय भार्या मुकुंदरावांची एकुलती एक प्रिय कन्या कमलिनी हिला ही हकीकत कळल्यावर काय आकांत माजेल या विचारानें तो गोंधळून गेला.

हा प्रकार पाहून श्रीपतरावांनीं शिपायाला तें शव फांसापासून मोकळें करण्यास सांगितलें व माधवरावाला त्यापासून स्वतः सोडवून त्याला समाधान वाटण्याकरितां त्याच्या खांद्यावर हांत ठेवून, " झाल्या प्रकाराबद्दल शोक करून काय होणार ? " अशा तऱ्हेचें मानवी क्षणभंगुरतेवर वेदान्तप्रचुर असें एक व्याख्यान रीतीप्रमाणें अत्यंत मृदु स्वरांत झोडलें. परंतु यांत औपचारिक असें कांहींच नव्हतें. मुकुंदरावांशीं श्रीपतरावांचा चांगला परिचय होता व त्यांच्या गुणांबद्दल त्यांचे मनांत फारच आदरबुद्धि होती. अर्थात् अशा माणसाच्या विपरीत मरणाबद्दल त्यांस वाईट वाटल्यावांचून कसें राहील ? परंतु त्याबरोबरच या निरपराधी प्राण्याला आपल्या जीविताचा नाहक त्याग करावयास लावणाऱ्या जुलमी

गणपतरावाबद्दल मात्र फारच संताप आला.

शिपायानें तो मृत देह जमिनीवर ठेवला तेव्हां त्याकडे पहात गणपतरावाला उद्देशून श्रीपतराव कठोर शब्दानें ह्मणाले,

" गणपतराव, आपल्या चवकशीचा परिणाम पाहिलातना ? नसला तर अवश्य पहा ह्मणजे अजून तरी डोळे उघडतील ! पण आतां डोळे उघडून न उघडून सारखेच. या कृत्याच्या परिणामाचे प्राणहारक फांस गळ्याभोंवतीं पक्के पडल्यावर डोळे उघडले तरी ते कायमचे मिटल्यासारखेच आहेत."

गणपतरावाला हा प्रत्येक शब्द प्राणहारक वाटला. नंतर श्रीपतरावांनीं माधवरावाकडे वळून त्यास सर्व हकीकत समजून दिली.

"माधवराव ! हे गोसावीबोवा ह्मणजे पूर्वाश्रमींचे माझे मित्र व तुमचे श्वशुर मुकुंदराव. मधुपुरास आले तेव्हां त्यांच्या वर्तनावरून व त्यांनीं एकदोघां माणसांजवळ जे उद्गार काढले त्यांवरून हे मुकुंदरावच असावे अशी माझी खात्री झाली व त्यांना दरवडेखोरांच्या प्रकरणांत पकडल्याचें ऐकल्यावरून मला फारच वाईट वाटलें. आज वास्तविक माझें येथें येण्याचें विशेष कारण एवढेंच होतें. गणपतरावाचा एकंदर अंमल आजपर्यंत सर्वजणांना चांगलाच जाणवला आहे. त्यांत आज त्याचा कळस झाला आहे. गणपतराव जातीनें ब्राह्मण असल्यामुळें त्यांजविषयीं गोष्टी मी फारशा मनावर घेत नसें. परंतु ब्राह्मण झाला तरी तो निर्दोष असूं शकणार नाहीं याविषयीं निराळा पुरावा द्यायला नकोच. मघांशीं आपण पाहिलेल्या फडक्यावरून हे गोसावीबोवा ह्मणजे मुकुंदरावच ठरले. त्यांचा उत्तरविधि आतां तुह्मी त्यांच्या इभ्रतीस साजेलसाच कराल याविषयीं तुह्माला निराळें सांगायला नकोच."

भाषण संपल्यावर त्यांनीं दुःखाकुल माधवरावांच्या समाधानाकरितां फिरून वेदान्तावर विषय पालटला.

दुःखी माणसांना ही वेदान्ताची माहिती व जन्ममरणाची नित्यता ठाऊक नसते असें नाहीं. पण प्रसंगीं वेदान्त, विद्वत्ता सर्व लयाला जाऊन विचाराची मर्यादा उल्लंघन करणाऱ्या उन्मत्त अंतर्वृत्तीलाच वश व्हावें लागतें. तिऱ्हाईत माणसाचा वेदान्त मनाला पटण्याइतकी कानांची शक्ति जागृत नसते; ह्मणून त्या सर्वांचा उपयोग वस्तुतः कांहींच नसतो. पण उपचारार्थ परस्परांच्या प्रसंगीं परस्परांनीं इतर नसली तरी शाब्दिक तरी मदत करावी असा व्यवहार आढळतो व शेजारीं कोणी दुःखी असला तर त्याजपाशीं तद्विषयक चर्चा करण्याला जिव्हा आपोआप तयार होते.

श्रीपतरावांच्या देखत मृत देहाची कायद्याप्रमाणें तपासणी झाल्यावर त्याला माधवरावाच्या स्वाधीन करण्यांत आलें व माधवरावानें आपल्या श्वशुराचा मृत देह मधुपुराच्याच नदीतीरीं दहन करण्याची योग्य व्यवस्था केली.

याप्रमाणें भाषण चाललें असतां बाहेर शिपायांवरील मुख्य आंग्ल अधिकाऱ्याची आगमनवार्ता एका शिपायानें कळविली व त्याच्या स्वागतार्थ सर्व मंडळी गडबडीनें बाहेर गेली.

---

## प्रकरण विसावें.

## परसांतल्या दोन व्यक्ति.

स्थानम १८३३

मुकुंदरावाचा मरणोत्तर विधि होऊन दहापंधरा दिवस निघून गेले. गांवांत अजून मुकुंदरावाच्या मरणाच्या वैचित्र्याची व पोलीस लोकांच्या हालांची चर्चा चाललीच होती. गांवांत रोज नवीन नवीन बातम्या येत असत. जिल्ह्याचे मुख्य पोलीस ऑफिसर वुडकॉक साहेब यांनीं आपल्या दयाळूपणास व न्यायप्रियतेस अनुसरून गणपतरावाच्या कृत्याबद्दल त्याला न्यायासनासमोर ओढलें.

सदसद्विवेकबुद्धि कृतकर्माबद्दल दोष देत असतांहि सरकारकर्तांच आपल्या हातून गैरवर्तन घडलें असा गणपतरावांनीं ठासून जबाब दिला. चोरांचा बिलंदरपणा व समजुतीशिवाय चवकशींत होणारी अडचण याचें मोठें चटकदार वर्णन गणपतरावांच्या वकीलानें न्यायमूर्तींसमोर केलें. परंतु वुडकॉक साहेबांचा निग्रह तसाच कायम होता. त्यांनीं व श्रीपतरावांनीं सर्व बाजूचा पुरावा पुढें आणून गणपतरावाला आपल्या कर्माचा झाडा न्यायासनासमोर द्यायला लावला व न्यायमूर्तींनींहि आपल्या मनाची समता न डगमगूं देतां गणपतरावाला चार वर्षें राजाचा पाहुणचार स्वीकारण्यास पाठवून दिलें. गणपतरावाच्या आज्ञेनें आपण जें कर्म केलें त्याबद्दल आपणावर सरकारानें दया करावी, आपण हुकुमाचे ताबेदार, आम्हांस सांगतील तसें करणें भाग आहे, अशा तऱ्हेचा कोटिक्रम त्या गुन्ह्यांत गोंवलेल्या इतर शिपाई मंडळींनीं केला. त्यांपैकीं कांहींना नौकरीवरून बडतर्फी व इतरांस कमीअधिक दिवस बिनभाड्याच्या खोलींत रहाण्याची सोय न्यायमूर्तींनीं करून दिली.

या बातम्या दररोज येतच होत्या व सरकारनें दाखविलेल्या लोककल्याणबुद्धीची तारीफ सर्वजण करीत होते. लोकांमध्यें एक प्रकारचा अपूर्व उत्साह उत्पन्न झाला. वुडकॉक साहेबांनीं गुन्हा उघडकीस आणण्यांत जी तत्परता दाखविली त्याबद्दल लोकांनीं आपली आदरबुद्धि स्पष्ट शब्दांनीं व्यक्त केली. कर्तव्यजागृतीचें अंजन डोळ्यांत सदैव घालून राज्यकर्तृत्वानें येणारें अंधत्व दूर राखण्याविषयीं वुडकॉकसाहेबांची मोठी ख्याति होती; त्यांच्या कारकीर्दींत पोलीस लोकांवर मोठा वचक असे व असले गुन्हे सहसा घडत नसत. त्यामुळें लोकांचा त्यांवर विश्वास बसला यांत नवल काय?

या गोष्टीला बरेच दिवस लोटले. माधवराव व त्याचें कुटुंब

यांच्या मनावरचा मुकुंदरावांच्या मरणाचा परिणाम अजून गेला नव्हता. दोघेंहि एकमेकाच्या मनाचें समाधान करण्यांत वेळ घालवीत असत. शिवाय बाळ मकरंदाची करमणूक होतीच. तथापि क्रमाक्रमानें त्या दुःखाचें ओझें कमी कमी होत चाललें. “ उत्सवप्रियाः खलु मनुष्याः ” या न्यायानें खेदाची छाया पुसट पुसट होत जाऊन आतां तर घरांत सर्व व्यवहार व आनंद पूर्ववत् नांदू लागल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं.

“ एके दिवशीं संध्याकाळीं माधवरावाच्या घरामागें परसांत दोन व्यक्ति आपसांत कांहीं तरी बोलत होत्या. माधवराव बाहेर शेतांत हिंडावयास गेला होता. घरांत इतर नोकरचाकर बेताचेच व तेही आपआपल्या कामांत गुंतलेले; अर्थात या दोन व्यक्तींच्या भाषणांत व्यत्यय आणण्याला जवळपास कोणीच नव्हतें. त्यांच्या मागें त्यांचें संभाषण चोरून ऐकणारी एक व्यक्ति होती परंतु ती कोणालाच दिसणें शक्य नव्हतें.

“ कमलिनी! दैवानें आपणा दोघांचा जरी भेद केला, आपला एक होण्याचा रंग बिघडविला तरी पण आपसांत पूर्ववत् प्रेमानें बोलण्याचालण्याला तर कांहीं हरकत नाहीं ना ? ”

“ प्रभाकरपंत—तुह्मी—”

“ कमलिनीताई, आपण अशी नवीन बोलण्याची तऱ्हा काय काढलीत? एवढ्यानेंच तुमच्या माझ्यांतला दुजाभाव व्यक्त होत नाहीं का? ”

“ प्रभाकर! अजून आपण पूर्वींचींच लहान प्रभाकर–कमलिनी आहोंत कारे ? ”

“ ताई! तसें जरी नसलें तरी पण आपल्याला पूर्वींप्रमाणें वागण्याला तर हरकत नाहींना ? ”

“ बरें तर तुझ्या ह्मणण्याप्रमाणें कां होईना? ” कमलिनी

हंसत हंसत ह्मणाली. " प्रभाकर, तुझ्यामाझ्यामध्यें पूर्ववत् बोलण्याचालण्याचा व्यवहार चालावा हें तर खरेंच, पण आपला संबंध काय व आपल्या मिळून मिसळून वागण्याचा परिणाम काय होईल त्याकडे नको कां पाह्मला ? "

" आपसांत स्त्रीपुरुष जर अकृत्रिम प्रेमानें वागलीं तर तीं एक नवराबायकोच असलीं पाहिजेत, अगर तसें नसल्यास तीं नीच वर्तनाचीं तरी असलीं पाहिजेत असा सरसकटच नियम घ्यायचा का ? "

" आपण कितीहि शुद्ध वर्तनाचे असलों तरी पण जननिंदा ही आपणास दूषणच देईल ! ' यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं ' हेंच तत्त्व खरें आहे. "

" जगाच्या निंदेंतून सुटूं ह्मटलं तर एकहि गोष्ट तशी सांपडायची नाहीं ! "

" तरी पण होतां होईल तों तसाच प्रयत्न केला पाहिजे. "

" तें सगळें खरें, पण योग्यायोग्यतेचा कांहीं विचार ! "

आतां देखील आपण येथें बोलत उभे आहोंत हें जर कोणाच्या—" लज्जेमुळें तिच्या चेहऱ्यावर किंचित् लाली आली व शब्द स्पष्ट उमटेनासे झाले. " तसें कदाचित् होणार नाहीं, पण नियम काय सांगावा ? अन् जर आपण कोणाच्या कां होईना दृष्टीस— "

" पडलों ! एवढाच ना तुझ्या ह्मणण्याचा उद्देश ? " प्रभाकर मध्येंच बोलला.

" अरे ही कांहीं क्षुल्लक गोष्ट नव्हे ! यापासून कदाचित् अत्यंत अनिष्टहि परिणाम झाल्याखेरीज रहायचा नाहीं. आपण अशीं उदाहरणें जगांत पहात नाहीं का ?

" मग कमलिनी ! आतां आपला संबंधच तोडायचा का ? ह्मणत असशील तर तसें करूं.—पण ताई, आतां माझ्या ह्मण-

ण्यावर कदाचित् विश्वास बसणार नाहीं. योग मोठे सुंदर जुळून आले आहेत. कदाचित्—मुकुंदराव तर गमावलेच, पण आपली इतर जवळच्या नात्याची मंडळी भेटण्याचा फार संभव दिसतो."

कमलिनीताईच्या डोळ्यांत आश्चर्याच्या छटा उद्भवल्या व तिला कसली तरी आठवण होऊन ती बोलूं लागली--

"होय खरेंच! बाबांनीं जातांना मला तुझ्याकरितां ह्मणून त्यांच्या नांवाची मोहोर असलेलें एक पाकीट दिलें आहे."

"पाकीट? मी फिरून येथें येईन अशी त्यांना आशा होती वाटतें?"

"आशा कधीं सरते का?"

बाबांच्या ( मुकुंदरावांच्या ) स्मरणानें त्यांच्या मरणाचें भीषण चित्र त्यांच्या डोळ्यापुढें उभें राहिलें. दोघांच्याहि डोळ्यांत अश्रु आले. क्षणभर सद्गदित झाल्यावर कमलिनीनें भाषणांस आरंभ केला.

"प्रभाकर! तुझी वाताहत झाली अशी जरी आमची पक्की समजूत झाली असली तरी पण खरी स्थिति तूं आह्मांला केव्हां सांगणार?"

"ताई कमलिनी, योग्य प्रसंगाखेरीज ती तरी कशी सांगावी? सगळ्याच मंडळीची एकदम कळेल." आसपास बरीच दूरवर दृष्टि फेंकून पाहिली तों संध्याकाळ जास्त होत चालल्याचें त्याच्या नजरेस आलें. "ताई, जातों! फिरून कधीं भेट होईल ती होवो. जाऊं लागला, पण परत फिरून त्यानें तिच्याजवळ अगदीं मंद स्वरांत कायसें मागितलें.

"असूं दे माझ्याजवळच. असला ह्मणून कांहीं बिघडत तर नाहींना?"

प्रश्नाला उत्तर काय द्यावें याबद्दल प्रभाकर जरा गोंधळला. क्षणैक विचार करीत आहे तों कमलिनी पुन्हां ह्मणाली, "तुझा विरह

ज्याच्या दर्शनानें मला सहन झाला त्या वस्तूचा तुझ्या प्रत्यक्ष दर्शनानंतर त्याग करावा अगर कोणाच्या तरी ती स्वाधीन ठेवावी हा कृतघ्नपणा नव्हे का ?"

"जर स्वतःच्या इच्छेनें तसें केलें तर कृतघ्नपणा ह्मणतां येईल. तशांतली ही गोष्ट घडली नाहीं. मग तुझा त्यावर ताबा काय ?"

कमलिनी फिरून पेचांत सांपडली. उत्तर सुचेना. शेवटीं प्रभाकरानें विषय न लांबवितां फिरून त्या वस्तूची याचना केली.

"जराशा वेळाच्या अवधींत दिला असता पण तशी सवड तुला नाहीं व मलाहि तुझ्याजवळ उभी राहून बराच वेळ झाला. किंचित् भय वाटतें मनाला. फिरून आलास ह्मणजे तो तुला देईन. आणि फिरून येशी तो चांगला राजरोसपणें घरीं ये. घरांत यायला कोणाची हरकत आहे ?" असें ह्मणून ती लगबगीनें घरीं जाऊं लागली, पण प्रभाकरानें तिला हातानं खूण करून थांबविलें. प्रभाकराला बरेंचसें बोलावयाचें होतें. मागल्या बाजूला पावलांची चाहूल लागली ह्मणून मागें पाहिलें तों कोणी नाहीं. प्रभाकरानें तिच्याकडे सहेतुक दृष्टीनें पाहिलें व ती तेथून निघून घरांत शिरली. प्रभाकर बराच वेळ पहात उभा होता. अखेरीस नाइलाज ह्मणून त्यानें आपले पाय काढले व मागच्याच बाजूनें शेताकुंपणांतून तो आपल्याशीं विचार करण्याचे भरांत शीळ घालीत निघून गेला.

---

## प्रकरण एकविसावें.

## आनंदीबाई.

वरील संवाद चालला असतांना मकरंदाला संभाळण्याकरितां

ठेवलेल्या मोलकरणीनें तो सर्व ऐकला व आपल्याबरोबर आणखीहि एका व्यक्तीला चोरून ऐकण्याच्या कर्मांत सामील करून माधवरावाच्या पत्नीविषयीं त्याचें मन साशंक करण्यास ती कारण झाली. कमलिनी–प्रभाकर एकमेकांचा निरोप घेतांना मागच्या बाजूला जीं पाउलें वाजलीं त्यांच्या प्रवर्तक ह्या दोन व्यक्ति होत्या. त्या ज्या जागीं उभ्या होत्या तेथें त्या सहज येणाराजाणाराच्या दृष्टीस पडत्या; पण कमलिनी घरांत येण्यापूर्वींच त्यांनीं आपला गाशा गुंडाळल्यामुळें तिला निःशंकपणें घरांत शिरण्याला बरें पडलें. कमलिनीची कल्पना आपण कोणाच्या दृष्टीस पडलों नसूं ही खरी; पण पश्चात् घडणाऱ्या गोष्टी जाणण्याची जर मानवांत शक्ति असती तर तिला तिच्या निःसंदेह कल्पनेहून किती भिन्न प्रकार चालला होता तो दृष्टीस पडला असता.

आपल्यावरून मनुष्य जगाकडे पहात असतो. त्यामुळें चोरून ऐकणें ही गोष्ट करणारें कोणी माणूस आपल्या घरांत असेल अशी कमलिनीला कल्पना नव्हती. आपल्या सालस स्वभावाला अनुसरून वरच्यासारखी नीच गोष्ट करण्यास कोणी धजलें असेल असें तिला वाटलें नाहीं. फक्त प्रभाकरासारख्या अपरिचित तरुणाशीं बोलतांना जर आपणाला कोणीं यदाकदाचित् कर्मधर्मसंयोगानें पाहिलें तर त्याचा परिणाम चांगला होणार नाहीं अशी तिला भीति वाटत होती. तिच्या समजुती पुराणमताला अनुरूप असल्यामुळें कोणाहि पुरुषाशीं–तो आपला प्रत्यक्ष सहोदर बंधु असला तरी–एकान्तांत भेटणें तिला पसंत नव्हतें व झालेली गोष्ट वाईट घडली असें तिचें मन तिला ग्वाही देत होतें. तथापि झालेल्या भेटींत गैर कांहींच नसल्यामुळें कदाचित् प्रसंगीं आपण दूषकांना उत्तर देऊं अशी तिनें समजूत करून घेतली. पण दूषक प्रत्यक्ष प्रश्न न विचारतां परोक्ष रीतीनें तिच्या सौख्यांत मात्सर्य-

कालकूटाची भेसळ करीत असतील असें तिच्या मनाला वाटेना. "यद्यपि शुद्धं लोकाविरुद्धं" हें तत्त्व प्रभाकराला गप्प बसविण्याकरितां जें तिनें पुढें आणलें त्याची जाणीव, ती स्वतःच्या वर्तनांत विसरली. असो.

मघांच्या दोन व्यक्ति कमलिनीची दृष्टि चुकवून ज्या निसटल्या त्या थेट माधवरावाच्या नेहमींच्या बसण्याच्या दिवाणखान्यापर्यंत पोंहचल्या. त्यांपैकीं एक शेजारींच पडलेल्या कोचावर बसली व दुसरी त्याच्या समोर प्रवेशद्वाराकडे पाठ करून उभी राहिली. दार अर्थातच काळजीपूर्वक लोटलें होतें. बराच वेळ झाला तरी कोणी कोणाशीं बोलेना. शेवटीं कालिकेनें संवादाचा उपक्रम केला—

"माधवराव! आजचा झालेला प्रकार तुह्मीं पाहिलात ना? पुरुषांच्या गैरहजेरीचा फायदा स्त्रिया कशा घेतात याचा हा नमुना आहे. प्रत्यक्षच देखायला सांपडला ह्मणून बरें झालें!!"

माधवाच्या चेहऱ्यावर अगदीं विलक्षण औदासीन्य पसरलें होतें. भाषणाला आरंभ कसा करावा? आपल्या दासीच्या या बोलण्याचा हेतु काय असावा? हेंच त्याला कळेना. मनाशीं विचार करण्यांत दंग असल्यामुळें तोंड उघडून शब्दोच्चार करण्याला त्याचें मन कंटाळलें होतें, पण मागच्या एका प्रसंगापासून कालिकेचें त्याच्यावर असें कांहीं विलक्षण वजन बसलें होतें कीं, तिच्या ह्मणण्याला रुकार देण्यापेक्षां त्याला इतर कांहींच करण्याचें धैर्य होत नसे. कालिका ही अत्यंत चतुर असल्यामुळें स्वतःचा मूळ वेश लक्षांत येण्याइतका थिल्लरपणाहि तिनें कधीं केला नाहीं. कमलिनी-विषयींचे तिच्या मनांतले विचार कळण्याला कांहींच मार्ग नव्हता, पण बारीकसारीक संदिग्ध गोष्टीला विपरीत स्वरूप देऊन त्याचा भलताच परिणाम माधवरावाचे मनांत करून देण्याविषयीं ती तत्पर होती. कमलिनीला देवळांत ज्या तरुणाबरोबर आपण पाहिलें

त्यालाच फिरून आज आपल्या घरांत आपल्या पत्नीबरोबर प्रेमाचीं भाषणें करतांना पाहून माधवरावाचें मन बहकलें. माधवाला त्या तरुणाचें खरें नातें ठाऊक नसल्यानें व त्यांतच कालिकेच्या मल्लिनाथीची भर पडत असल्यामुळें त्याला वास्तविक स्वरूपाचा पडताळा पहाण्यासाठीं शांतपणें विचार करण्यास कधींच अवसर सांपडेना. आपल्या झांकल्या स्वरूपाची खरी ओळख दिल्यावर माधवरावाच्या मनांत विषारोपण करण्याकरितां कमलिनीवर तिच्या नकळत ती हरहमेश नजर ठेवीत असे. कालिकेच्या सान्निध्यांत पुरा भारला गेल्यामुळें तिच्या भाषणावर बोलण्याला तो बराच वेळ धजला नाहीं. अखेरीस त्यानें तिच्या ह्मणण्याला एकदांचा निरर्थक रुकार दिला. एवढ्यानें स्वस्थ बसणारी ती बाई नव्हती. माधवरावानें आपणांस कांहीं तरी हूंकार दिला, हें तिनें जाणलें व आपल्या जिव्हेला फिरून गति दिली. तिच्या मनांतून पुष्कळ बोलावयाचें होतें व तें आजच्या प्रसंगीं निर्धास्त ओकून टाकण्याचा तिनें पक्का निर्धारच केला असल्याचें पहाणारांच्या दृष्टीस पडलें असतें.

" माधवराव, मी तुमच्या जवळ कांहीं बोलूं का ? "

इकडे तिकडे शून्य दृष्टीनें पाहून झाल्यावर माधवरावानें तिला परवानगी दिली.

" मागल्या दिवसांची तुह्मांला आठवण आहे का ? "

" तें कसा विसरेन ? "

" मला दिलेल्या वचनांपैकीं तुह्मांला कांहीं स्मरतें का ? "

" होय. तुला पाहिलें ह्मणजे मला त्याची अजून चांगली आठवण होते. "

" होत असेल खरीच, पण नव्या प्रेमपाशांत जखडल्यामुळें तिच्यावर पांघरूणहि लवकरच पडत असेल. "

" नाहीं. मंदत्त्व येण्याऐवजीं तिला तीव्रता मात्र जास्त येते !"

" पण उपयोग काय ? पुरुष अर्धवट का बायका भोळ्या ? प्रेमाचा आभास देखील अबलांना खऱ्याप्रमाणें वाटतो. पण तो आभासच. त्याला खरें स्वरूप कशानें यावें ? निष्कपटी मनाच्या स्त्रिया बिचाऱ्या पुरुषांच्या प्रेमळपणावर भिस्त ठेवून स्वतःचे गळे मात्र त्यांचेकडून केसांनीं नकळत सौम्यपणें कापवून घेतात. खरें कीं नाहीं ? " इतकें ह्मणून तिनें एक दीर्घ निश्वास टाकला.

माधवरावांच्या मनांत अद्याप मघांचा प्रभाकर-कमलिनीचा प्रसंग घोळत असल्यामुळें वरच्या भाषणाला समर्पक उत्तर द्यायला त्याला तें एक आयतेंच साधन झालें—

" दोघांनीं—स्त्रीपुरुषांनीं—एकमेकांला दोषी ह्मणून नांवें ठेवावीं हाच दोघांच्या वागणुकींतला इत्यर्थ घ्यायचा. मघांच प्रसंग तूं अद्याप विसरली नसशील तर मग सांग पाहूं, आनंदी ! स्त्रियांनाहि आभासमय प्रेमाचाच दोष लागू आहे का नाहीं तो. जिच्यावर सहधर्मचारिणी ह्मणून विश्वास टाकायचा, जिच्या साहचर्यांत प्रेमसुखाची लालसा धरायची, ती स्त्री—विवाहानें अग्निब्रह्मसाक्षिक त्या पुरुषाच्या अर्ध शरीराला पूर्णत्व देणारी भार्या—जर पतीच्या हातावर तुरी देऊन त्याला नकळत इतर प्रियकरांशीं प्रेमालाप करूं लागली, तर विश्वासघाताचा दोष तिच्यावर-तुम्हां स्त्रियांवरहि-करण्यास काय हरकत आहे ? "

जीं उदाहरणें देऊन कमलिनीविरुद्ध कालिका माधवरावाला प्रवृत्त करीत असे त्यांचा फायदा घेऊन आपलें माप अचूक पदरांत पडल्यामुळें संवाद चालू ठेवण्याला कालिकेचा आतां धीर होईना. पण ती पडली पक्क्या धीराची ! एवढ्याशा पेचानें गडबडून जाणारी ती नव्हती.

" पुरुषांच्या वागणुकीनेंच प्रेमाचा-खऱ्या-सत्य प्रेमाचा खळ-

खंडोबा करण्यास स्त्रिया तयार होतात असाच त्याचा अर्थ घ्यायचा. मला जो तुमच्या विश्वासपात्र वचनाचा घातकी अनुभव आला त्याचा प्रयोग माझ्या लग्नानंतर मीं माझ्या ह्मणविल्या जाणाऱ्या प्राणनाथावर केला असता, त्यास फसवून प्रसंगीं तोंडघशीं पाडलें असतें तर त्यांत न्यायदृष्टीनें अगर "घे वाण दे वाण" या पद्धतीनें वावगें असें कांहींच वाटण्याचें कारण नव्हतें."

"आनंदी, तुझ्या बोलण्याचा रोंख मला कळतो आहे. ज्याबद्दल तूं अप्रत्यक्ष कोरडे ओढीत आहेस त्या दोषाचा सर्वस्वी भागीदार मी आहें व आरोपीला ज्याप्रमाणें संशयाचा फायदा ह्मणून देतात तसा जर तूं माझ्या पूर्व परिस्थितीचा फायदा देऊन मला दोषमुक्त करीत असशील तर प्रांजलपणें अपराधाची क्षमा मागण्यास माझी तयारी आहे."

"महाराज माधवराव!" जरा खड्या सुरांत आनंदी बोलली-"प्रथमच स्वतःच्या परिस्थितीचा विचार करून गोड गोड थापा देऊन भुरळ पाडण्याचें—फसवण्याचें—विश्वासघात करण्याचें—काम आपण जर कृपाविष्ट होऊन न करतां तर कदाचित् तुमची सोडवणूक झाली असती." येथें कालिकेची मुद्रा किंचित् क्रुद्ध व निष्ठुर झाली. "तुमच्या परिस्थितीचा जर तुह्मांला फायदा द्यायचा तर तुमच्या नादानें माझें तारुण्य, माझें वय, माझें शील, तुमच्याकरितां नासायला मी सिद्ध झालें तर मग त्या सर्वांच्या व्यर्थत्वामुळें माझ्या हृदयांत होणाऱ्या आगीचा डोंब सहन करावा कोणीं?"

"ज्याच्या चित्तांत होत असेल त्यांनीं!!!" असें विनोदी व उडवाउडवीचें उत्तर देण्याचें माधवरावाच्या मनांत कितीकदां तरी आलें, पण उत्तर देण्याला प्रवर्तक धैर्य त्याच्यांत नसल्यानें त्याला मनांतल्या मनांतच घोटाळत रहावें लागलें.

" माधवराव ! तुमच्या मतें तुह्मी अगदीं पूर्ण निर्दोषअसें वाटतें काहो ? " कालिकेनें जरा डोळे मिचकावीत मिचकावीत खोंचून शब्द उच्चारले. माधवरावावर त्याचा इष्ट परिणाम होऊन अनुत्तर स्थितींत त्यास विचार करीत स्वस्थ बसावें लागलें. यावर तिनें जो जो प्रश्न केला त्याला स्तब्धतेखेरीज एकहि उत्तर तिच्या अपेक्षित व्यक्तीनें दिलें नाहीं, त्यामुळें ती चिडली. माधवरावाकडे मोठ्या क्रूर दृष्टीनें पहात तिनें आपला इंगितार्थ सुचविला. स्त्रियांच्या प्रत्येक हृदयविकाराची किती जागृति असते याचें अपरोक्ष प्रमाण तिच्या डोळ्यांत समोरच्या इसमाला दिसत होतें.

" माधवराव ! अपमानाचा सूड घेण्याला अबला ह्मणविणाऱ्या स्त्रियांतहि किती सामर्थ्य असतें याची जाणीव तुह्मांला निर्वाणीच्या दिवशीं आढळून येईल. तेथपर्यंत असेच स्वस्थ असा. माझा तुह्मी उघड उघड उपमर्द करीत आहांत, माझ्या आयुष्याचा नाश तुह्मी करीत आहांत. करा, खुशाल करा. परिस्थितीच्या नांवावर आपल्या मनाचे छंद पुरविणाऱ्या मतलबी पुरुषाची कशी खोड मोडावी याचें उदाहरणच जगांत मी घालून देईन. स्वस्थ असा—अगदीं स्वस्थ असा. नको—पूर्वींच्या बाबतींत एक चकार शब्दहि समाधानकारक मजजवळ न उच्चारण्याची शेवटपर्यंत खबरदारी घ्या. राजकर्त्यांच्या सुधारणा आमच्यांत कां येत नाहींत याचें कारण आमचा धरसोडीपणा बहुतेक कारण असावा अशी आज माझी खात्री झाली. माझ्याशीं विवाह करण्याची शपथ घेऊन आयत्या वेळीं दुसऱ्याच एका शेतकऱ्याची कुणबाऊ पोर तिच्या बापाच्या इष्टेटीच्या प्राप्तीच्या इच्छेनें वडील माणसांचा आज्ञाभंग न होऊं देण्याच्या खाशा सबबीवर पटकावली हेंच एक उदाहरण पहाना. बाई—बाई—जग स्वार्थी असें आमचे ऋषि आजपर्यंत लोकांच्या नांवानें ओरडत आले तें कांहीं खास खोटें नाहीं. बायकांच्या चं-

चल वृत्तीवर गाल फुगवून लांब लांब सशास्त्र बाता मारणारांना आमच्या या गतकालीन प्रियकराचें उदाहरण दाखविण्याचें व त्यांच्या डोळ्यांत पुरुषांच्याच विश्वासघातकीपणाचें झणझणीत अंजन घालण्याचें काम मोठ्या बहारीचें होईल. " दाराबाहेर तोरड्यांचा झुमझुम आवाज जवळ जवळ ऐकूं येऊं लागला; व त्यांतच कांहीं बोबडे बोलहि ऐकूं आले. अर्थात् कालिका—बाई ऊर्फ आनंदी—बाईचे स्पष्ट शब्द बाहेर पडत असलेलें स्वगत भाषण आटपलें. या रुणझुणीनें माधवरावाचेंहि लक्ष दाराकडे गेलें. नूपुरांच्या ऐकूं येण्याच्या मर्यादेंतल्या पहिल्या झणकाऱ्याबरोबर कालिकाबाईच्या दृष्टीचा रोंख तिकडे गेला. दारांत रम्य बालकमूर्ति आपल्या सहास्य व कोमल वदनानें पित्याच्या चेहऱ्याकडे सकौतुक पहात असल्याचें त्यांच्या दृष्टीस पडलें.

त्याच्या मागोमागच कमलिनी हातांत अगदीं निर्मल अशी समई घेऊन आली. प्रसंग बिकट तर खराच, पण कालिकेला इतर मार्गच न राहिल्यानें तिनें मकरंदाला कडेवर उचलून घेऊन खऱ्या अगर खोट्या " ईश्वरो वै वेत्ति " प्रेमानें अनेकदां चुंबिलें. त्याला आपल्या पित्याकडे जावयाचें असल्यामुळें कालिकेच्या लघळ प्रेमाचा त्याला राग आला व इतर साधनांच्या अभावीं त्यानें चुंबनास उत्सुक झालेल्या तिच्या तोंडास दांतओठ खाऊन घट्ट हातांत आवळलें व आपल्या मृदु गालापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यांत यश येत नाहींसें पहातांच आपल्या ईश्वरदत्त नखशस्त्रांचा उपयोग त्यानें तत्काळ केला व तो रामबाण उपाय चांगलाच लागू झाला. ताबडतोब कालिकेनें " काय पोर द्वाड हो ! बापाकडे जायला कसा उत्सुक झाला पहा " असे उद्गार काढून माधवरावाकडे सहास्य मुखानें पाहिलें. हास्याची क्षणिक लकेर त्याच्याहि गालांवर उमटली, पण कालिकेच्या कडेवरून सुटलेला ' बाळ ' आतां

अगदीं जवळ पोंचला व वात्सल्याला अनुसरून माधवानें मकरंदाला हृदयाशीं धरलें.

इतक्यांत मागून दीपज्योतीचा प्रकाश पसरून अंधःकाराचा ऱ्हास करणारी समई हातांत घेऊन कमलिनी खोलींत शिरली. सकृद्दर्शनींच कालिकामूर्ति दाराशीं उभी. मकरंद इतका वेळ मातुश्रीजवळच असल्यामुळें आतां खोलींत माधवराव असतांना हिला येथें असण्याचें कारण काय हा पहिला प्रश्न तिच्या मनांत उद्भवला. समई व्यवस्थित जागीं नीट काळजीनें ठेवल्यावर तिनें फिरून सभोंवर एकदां नजर फेंकिली तों कालिका मोलकरीण तेथें नव्हती! मकरंदाशीं विनोद करण्यांत मग्न झालेले आपले यजमान माधवराव फक्त तेथें तिला दिसले.

प्रथमतः आपण केवळ मकरंदाशींच विनोद करीत असून कालिकेबद्दल आपण अज्ञानी आहों असें भासविण्याकरितां माधवरावानें खोलींत आलेल्या प्रियकान्तेकडे दुर्लक्ष केल्याचें सोंग केलें. पण त्याचा भेद मकरंदानें केला. माता जवळ उभी असलेली पहातांच त्या क्रीडासक्त बालाचे पाय तिकडेच धांवले. माधवरावाच्या प्रयत्नाला दाद न देतां ही स्वारी कमलिनीकडे जलदीनें निघाली. तेव्हां अर्थातच माधवरावाचें लक्ष तिकडे जाऊन त्याचा इष्ट भाव ढांसळला.

मकरंद कमलिनीकडे गेल्यावर माधवरावाची झालेली स्थिति तिच्या लक्षांत आली. आपण कालिकेबरोबर येथें एकटेच असल्याचें तिच्या दृष्टीस पडूं दिलें ही गोष्ट योग्य झाली नाहीं असें त्याला वाटत होतें. या योगानें कालिकेचें मूळ स्वरूप तिला कळण्याचा संभव आहे असेंहि त्याच्या पापी मनाला वाटलें. त्याच्या मनांत या विचारांचा झगडा चालल्यामुळें आपले भाव कदाचित् कमलिनीच्या लक्षांत येण्याचा संभव आहे ही गोष्ट त्याच्या ध्यानांत आल्यावां-

चून राहिली नाहीं. पण तें आतां त्याच्या स्वाधीनचें नव्हतें.

रांगत रांगत पायाशीं आलेल्या मकरंदाला कडेवर घेऊन कमलिनी बाहेर जाऊं लागली. पतीच्या मुखांतून कांहीं प्रेमळ शब्द कानीं पडतील अशी तिला आशा होती, पण माधवरावाच्या चेहऱ्यावर चाललेली चलबिचल तिनें ताडली व स्वतःहि कांहीं न बोलतां मूकवृत्तीनें मकरंदाला घेऊन ती बाहेर पडली. तिच्या मनांतहि वरील प्रसंगाच्या आकस्मिक दर्शनानें जरा चमत्कारिक विचार आले. पण तिनें बाह्य गांभीर्याच्या जोरावर ते कोणासहि न कळवितां ती बाहेर पडली. माधवराव तिच्या मार्गें पहात होता. पण वाचकहो! आतां त्या प्रत्येकाला स्वतःच्या विचारांत सोडून देऊन आपण दुसरीकडे इतर माणसांच्या चवकशीला जाऊं.

---

## प्रकरण बाविसावें.

## सहज योगायोग.

प्रभाकर—कमलिनीची भेट झाल्यानंतर घडलेला प्रकार वाचकांना वर विदित झालेलाच आहे.

प्रभाकर कमलिनीपासून निघाला तो थेट तडक आपल्या रहाण्याच्या जागीं आला. ही जागा कोणची हें वाचकांस अद्याप ठाऊक नाहीं.

श्रीशिवालयापासून बऱ्याच अंतरावर एका लहानशा टेकडीखालीं धनगरांच्या वस्तीप्रमाणें एका अगदीं लहानशा उटजांत ते रहात असत. प्रभाकर, त्याचा स्नेही व त्या स्नेह्यानें प्रभाकर—कमलिनीच्या शिवमंदिरांतील प्रथम भेटीच्या दिवशीं आणलेली एक वृद्धा स्त्री इतकीच काय ती मंडळी त्या ओसाडींत रहात असत. प्रभाकर व त्याचा स्नेही मधुपुराखेरीज आसपासच्या गांवांतून भिक्षा

मागून त्यावर उदरनिर्वाह करीत असत. त्यांना भेटलेल्या अनोळखी स्त्रीच्यासंबंधीं जरी विशेष माहिती तिनें सांगितली नव्हती व प्रभाकरानें विचारली नव्हती, तरी पण ती अत्यंत कनवाळू व प्रेमळ स्वभावाची असल्याचें कोणालाहि आढळलें असतें. प्राप्त दशेंत मिळणाऱ्या सुखाचें समाधानानें वांटेकरी होऊन त्याची मानसिक वृद्धि करण्यांत तीं कधींही कसूर करीत नसत. त्यांच्या मनांत एकमेकांच्या साहचर्यानें दिवसेंदिवस अधिकाधिक प्रेम वाढत चाललें होतें. कधीं कधीं अगदीं अल्पाहार करून रहाण्याचाहि त्यांस प्रसंग येई, पण त्यांत शांतपणें आनंद मानून रहाणारी ही त्रयी कधीं कोणास कष्टी अगर हताश अशी दृष्टीस पडत नसे. " यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महोदधौ " या सूक्तीप्रमाणें हीं तिघें एकमेकांस अज्ञात अशा स्थितींत परस्परांच्या संगतींत आलीं. आपला दैनिक क्रम सुखानें पार पाडण्यांत त्यांचा काळ जात असे. ज्या पर्णकुटींत तीं आनंदानें रहात असत ती एका धनगरानें स्वतःकरितां बांधली होती; परंतु त्यानें आपला कळप हालवला तेव्हां त्याबरोबर आपली झोंपडी न मोडतां या ब्राह्मणांकरितां तशीच ठेवून दिली व त्या उपकर्त्याच्या पश्चात् प्रभाकर आपल्या सहचाऱ्यांसह तेथें राहूं लागला. तोंपर्यंत त्याचें वास्तव्य शिवेवरील शिवालयांतच होतें.

यांचें बिऱ्हाड ज्या भागांत होतें तेथें क्वचित् प्रसंगीं एखाददुसरा शेतकरी अगर वाटसरू चुकून येत असे. त्यांना लोकांत वावरण्याचा मुळींच इच्छा नसल्यामुळें अशा क्षणैक गांठ पडणाऱ्या भटकणाराखेरीज लोकांचा उपसर्ग यांना फारसा लागत नसे. तथापि सहस्रजिव्ह समाजाच्या शिळोप्याच्या चकाट्यांतून त्यांचा देखील एकान्त चुकलेला नव्हता.

त्यांची आतां जरी एकमेकांची दाट ओळख झाली होती, तरी पण

त्यांचें अंतःकरणगत मात्र परस्परांस ठाऊक नव्हतें. आपणाशीं आस्थेनें वागणाऱ्या प्रभाकराची अगदीं पहिल्यापासूनची माहिती काय हें त्याच्या दुसऱ्या मित्राला ठाऊक नव्हतें. त्याप्रमाणें आपली सुटका करून चोरांच्या हातून प्राणदान देणाऱ्या मित्राची पूर्वकथा प्रभाकरास ठाऊक नव्हती. रस्त्यांत क्षुत्तृष्णेनें व्याकुल अशा स्थितींत गांठ पडलेल्या वृद्ध स्त्रीची पूर्वकथा प्रभाकराला माहीत असावी असा संशय त्या स्त्रीला अथवा प्रभाकराच्या मित्राला कधीं आला नाहीं.

दरवडेखोरांच्या प्रकरणांत पोलीसचवकशीमध्यें दरवड्याची प्रथम बातमी देणाऱ्या युवकद्वयाची अत्यंत आवश्यकता होती, पण तपासाअन्तींहि त्या तरुणांचा पत्ता लागला नाहीं. पोलीसांनीं मध्यंतरीं या दोघां युवकांना धरून नेलें होतें, पण सबळ पुराव्याच्या अभावीं त्यांस सोडून देणें भाग पडलें. असो.

एकमेकांच्या संगतींत दिवस घालवीत असतां एके दिवशीं संध्याकाळीं त्यांच्या कुटिकेजवळच असलेल्या लहानशा राईंत एक तरुण जोडपें प्रभाकराच्या नजरेस पडलें. लांकूडफाटा गोळा करण्याकरितां तो त्याच बाजूला झोंपडी सोडून गेला होता. खेडेगांवच्या वस्तींत संध्याकाळच्या वॉकला ( walk ) जाणारीं तरुण जोडपीं पहाण्याचा प्रभाकरास आजचा प्रसंग अगदीं नवीन होता, त्यामुळें त्यांचीं भाषणें ऐकण्याची त्यास साहजिक प्रवृत्ति झाली. पापाचार समजून प्रथम त्यानें आपल्या मनाच्या उच्छृंखळतेला दाबण्याचा प्रयत्न केला, पण त्याचा निग्रह शेवटपर्यंत राहिला नाहीं. जिज्ञासा—तृप्तीकरितां तो आपलें काम आटोपून त्या स्त्रीपुरुषद्वयाचा संवाद ऐकण्यास जवळच त्यांना न दिसेसा उभा राहिला. जवळ जाईपर्यंत त्याच्या मनांत येणारे विचार निवळ जिज्ञासेमुळें उत्पन्न झालेले होते. परंतु जवळ गेला तों कांहीं तरी विलक्षण प्र-

कार दिसल्याप्रमाणें तो आश्चर्यानें स्तंभित झाला. त्याला प्रथम कोणी तरी नवीन जोडपें दृष्टीस पडेल अशी आशा होती व त्याचे वन्य विलास पहाण्याकरितां तो उत्सुक झाला होता. परंतु जवळ जाऊन त्याच्या कानीं त्या स्त्रीपुरुषांच्या भाषणाचा कांहीं भाग पडला असेल नसेल तोंच त्याच्या मुखांतून " कमलिनी, तुझा घात होणार गे " असे कातर शब्द बाहेर पडले.

" झालेल्या चुकीची भरपाई होण्याला जर कांहीं उपाय असेल तर तो अमलांत आणण्याला मी एका पायावर तयार आहें. सुचतो का कांहीं तुला ? बघ विचार करून. " त्या तरुणानें स्त्रीकडे पहात पहात प्रेमानें ह्मटलें.

" हें पहा, कोणचीहि गोष्ट कधीं अशक्य आहे का ?–तुह्मांला आतां जेव्हां स्त्रियांबद्दल पक्का अनुभव आला तेव्हां माझ्या संबंधाच्या झालेल्या चुकीची भरपाई करण्याचा बुद्धिवाद सुचला. सुधारकांच्या तत्वांचा अनुभव यायला पाहिजे होता ना ? तो घ्या. आईबापांनीं जुळवून आणलेल्या लहान वयांतल्या लग्नाचा परिणाम नेहमीं असाच व्हायचा ! " त्या स्त्रीचे हे शब्द ऐकत असतां तरुणाच्या चेहऱ्यावर निस्तेजता पसरली. " असा चेहरा कावराबावरा कां झाला ? इतकें घाबरायला नको कांहीं ! " बोलत असतां युवतीचा हात तरुणाच्या गळ्यांत पडला. ज्या हेतूनें तिनें तो हात टाकला तो मात्र साधला नाहीं. मनावर पसरलेली उदासीनता दूर करून प्रेमाचा प्रकाश तेथें पसरावा ही तिची इच्छा; पण तिचा उपयोग झाला नाहीं. कंठांत हाताचें वेष्टन पडतांच त्याच्या अंगावर किंचित् शहारे आले. दुःखनिश्वास बाहेर पडूं लागले व अधोमुख होऊन तो स्वस्थ उभा राहिला. त्या स्त्रीनें हा सर्व प्रकार पाहिला व जरा निरुत्साह होऊन युवकाला उत्साह आणण्याकरितां तिनें आपलें भाषण पुढें चालविलें.

"हा परिणाम होणार हें मी जाणून होत्यें, पण काय! मोहिनी पडली—भुरळ पडली—तिच्या प्रेमाभासानं पुरे मारला गेलांत. तरी तिच्या प्रेमाचा पुरा अनुभव मीं ह्यापूर्वीं दाखवून दिला आहे. तुमची अशी स्थिति कां झाली? अग बाई—डोळे असे चमत्कारिक झाले! हाय हाय!! अंग सुद्धां थर थर कांपूं लागलें!!" स्त्रीच्या भाषणाप्रमाणें त्या युवकाची खरोखरीच स्थिति झाली होती. त्याच्या शरीरांत उभें रहाण्याइतकेंहि त्राण नव्हतें. त्याच्या कंपित देहाचा भार युवतीच्या हातावर जाऊन तो बेशुद्ध झाल्याप्रमाणें आपल्याला सांवरून धरणाऱ्या स्त्रीच्या बहुपाशांत पडल्यावर तिच्या वदनाकडे शून्य व निश्चल दृष्टि लावून निश्चेष्ट झाला. नेत्रांतून अश्रूंच्या धारा बाहेर येऊं लागल्या होत्या.

ती स्त्री मोठ्या कुशलतेनें आपल्या प्रियकरासह तेथें एका शिलेवर बसली. त्याच्या निष्प्रभ वदनाकडे पहात पहात तिच्याहि नेत्रांतून अश्रु येऊं लागले. तिनें त्याचें मस्तक हृदयाशीं धरलें, कुरवाळलें, प्रेमानें वाऱ्याच्या मंद मंद लहरींच्या योगानें अस्ताव्यस्त झालेल्या केशपाशाला सांवरण्याकरितां त्यावरून हात फिरविला. दहा पांच मिनिटांत तेथें दुसरा एक तरुण येऊन पोंचला. त्याला पाहून प्रथमतः ती बिचकली व मोठ्या क्रूर दृष्टीनें त्याकडे पहात पहात तिनें त्याला जवळ येण्याचें कारण विचारलें. तिनें त्याला ओळखलें असावें असा तर्क तिच्या भाषणावरून कोणासहि करतां आला असता. या नवीन तरुणानें तिच्याशीं मोठ्या अदबीनें वर्तन केलें व निश्चेष्ट तरुणाला शुद्धीवर आणण्याकरितां थोडें गार पाणी स्त्रीच्या हातीं दिलें. बेशुद्धींतून सावध होण्याचीं चिन्हें दिसूं लागतांच एकमेकांसंबंधीं चाललेली चवकशी थांबवून तो नवीन तरुण झपाट्यानें संध्याकाळच्या धूसर वर्णांत नाहींसा झाला.

युवतीचा प्रियकर चांगला सावध झाला. तिच्या अंकावरून त्यानें आपलें मस्तक उचललें व सभोंवार आश्चर्यानें पहात पहात आपण त्या ठिकाणीं कसे आलों असा प्रश्न केला. या प्रश्नाचें कारण त्या स्त्रीला पक्कें ठाऊक असल्यामुळें तिनें त्यास प्रथमतः कांहींच उत्तर दिलें नाहीं. पण त्या युवकाला स्वतःच्या पूर्व-स्थितीची जाणीव उत्पन्न झाल्याचीं चिन्हें जेव्हां दिसूं लागलीं तेव्हां तिनें कांहीं तरी बोलण्यास सुरुवात केली. बराच वेळ त्यांचें हितगुज झाल्यावर त्या युवकानें मध्येंच तिचें बोलणें थांब-वून ह्मटलें—

"छे! अं हं. तुझ्या अशा वागण्यानें तिला तुझ्याविषयीं संशय आ-ल्यावांचून खास रहाणार नाहीं. तूं अलीकडे दिवसेंदिवस आपल्या नेमलेल्या कामाची फारच टाळाटाळी करूं लागली आहेस. परवांचा प्रसंग अजून तूं विसरली नसशील. झाली गोष्ट ही चूक असें आपल्या संबंधावरून निश्चित ठरलेंच, पण तिचा परिणाम दोघांनाहि भोगावा लागणार आहे. कांहीं झालें तरी तिच्या संबंधांत काय-द्यानें—ब्राह्मणाच्या—अग्नीच्या—साक्षीनें बांधला गेलों आहें. तिचा त्याग—"

"करायचा नाहीं, करतां यायचा नाहीं, एवढेंच ना? अं:! ही तर गोष्ट उघडच दिसते आहे." स्त्रीच्या वाक्य-सरणींत प्रेमाचें मार्दव मुळींच नव्हतें; प्रत्येक शब्द मर्मभेदी स्वरांत उच्चारला जात होता. "अग्नीच्या व ब्राह्मणाच्या साक्षीनें स्त्रीपुरुषांचीं हृदयें का बांधलीं जातात? ह्मटलंच आहे कोणी एका कवीनें " आन्तरः कोऽपि हेतुः " तेंच खरें. कायद्याचें बंधन जर हृदयावर असतें तर मग प्रश्नच नव्हता. पण तसें आहे कोठें? बाहेरचा संसार ह्मणजे प्रेमाचा प्रपंच. नवऱ्याच्या पश्चात् घरामागें सोदे आणणें, त्यांशीं नवऱ्याविरुद्ध प्रेमाचीं भाषणें करणें हेंच

का प्रेम अन् हाच का अग्निसाक्षिकतेचा परिणाम?" सूर्यास्तकालीन शांततेचा भग करणारें एक उपरोधिक मर्मच्छेदी हास्य वातावरणांत कांहीं काळ दुमदुमलें.

अगदीं शांत—भयप्रद शांतता—निस्तब्धता—सभोंवार पसरली. पुन्हां शब्द ऐकूं येऊं लागले—

"या जीवाचं—नव्हे आणखी याबरोबर याच्या नाशाला कारण असणाऱ्या प्रियकराच्या जीवाचं—बरं वाईट करावं असं कितिकदां मनांत येतं—पण ह्मणतात ना प्रेम अंधळं ह्मणून तेंच खरं. एका इंग्रजी कवीनं ह्मटलं आहेना, Love is mere madness. खरं प्रेम ह्मणजे निवळ खुळेपण. प्रेम मला त्या घातकी कर्माला प्रवृत्त होऊं देत नाहीं." लाडानें प्रियकराचे गळीं हात टाकून "चलावं, घरीं चलावं; माणसं वाट पहात असतील. भ्यायला—कांपायला—दूर व्हायला काय झालं? माझा हात निर्जीव लोखंडाचा—कांटट्याचा का आहे? छे प्रिया, त्यांतून वहाणारी प्रत्येक शीर प्रेममय रक्तानें वहात आहे. त्यांत प्रेमाची उत्कटता आहे." येथें क्षणभर ती थांबली. हा वेळपर्यंत बोलत असतां तें जोडपें बरींच पावलें मधुपुरच्या बाजूला चालून गेलें होतें. आतां विषयान्तर करण्याच्या हेतूनें—"कामाची टाळाटाळ माझ्या स्वरूपाला बाहेर काढायला कारण होईल, खरेंच होईल. मग त्याचा परिणाम—" यानंतर स्वतःशींच विचार करण्यांत ती मग्न झाली. तिनें त्याच्या खांद्यावरचा हात काढून घेतला व थोड्या वेळानें त्याच्याशीं कांहीं बोलून तीं दोघेंहि दोन दिशांना निघून गेलीं. त्यांचा वियोग होतांना जवळपास कोठें तरी 'Love is mere madness' हें वाक्य मोठ्यानें उच्चारलेलें ऐकूं आलें.

आणि खरोखरीच हें वाक्य प्रभाकराच्या तोंडून नकळत अशा स्थितींत बाहेर पडलें. वरील प्रकार पाहिल्यावर त्याच्या मनाची

समता ढळली. कमलिनीविषयीं तो पूर्वींप्रमाणें विचार करूं लागला व तसाच हातांत गोळा केलेला लांकूडफाटा उचलून आपल्या झोंपडीकडे जाण्यास निघाला. फिरून अकस्मात् त्याच्या तोंडून Love is mere madness हे शब्द निघाले.

---

## प्रकरण तेविसावें.

## अंतःशुद्धि.

ज्या दिवशीं सहज योगायोगानें प्रभाकराला माधवराव व कालिका यांचा संवाद व एकंदर प्रसंग ऐकण्यास आणि पहाण्यास मिळाला, त्याच रात्रीं सर्व दैनिक क्रम आटोपल्यावर जेव्हां कमलिनी-माधवरावाची एकान्तांत गांठ पडली तेव्हां त्या दोघां पतिपत्नींना आपल्या हृदयाचें आविष्करण करायला संधि सांपडली.

आज कित्येक दिवसपर्यंत ह्मणजे कमलिनीला प्रभाकराबरोबर देवळांत ' एकान्तांत ' पाहिल्यापासून माधवराव कमलिनीशीं मोठ्या कुढेपणानें वागत असे. त्यानंतर कालिकेच्या सांगणीवरून त्यास पुन्हां एकदां प्रभाकर–कमलिनीचा एकान्तप्रसंग पहावयास सांपडला व तेव्हां स्वपत्नीच्या पतिनिष्ठेबद्दल त्याची साशंकता जास्त दृढ झाली. आपल्या पतीशीं अगदीं निष्कपट प्रेमानें—ममताळूपणानें—वागणारी कमलिनीहि आपल्या पतीची स्थिति लक्षांत येऊन मनांत झुरूं लागली. एकदोनदां तिनें त्याशीं भाषण करण्याचा प्रयत्न केला, पण माधवरावानें त्रासिकपणानें तिचा तिरस्कार केला. अर्थात् ही गोष्ट कमलिनीच्या मर्मीं झोंबली व असें वर्तनान्तर होण्याचें कारण ती आपल्या मनाशीं शोधूं लागली. पतीला आपला तिटकारा आला आहे, सबब त्याशीं कारणावांचून एकहि शब्दाची देवघेव करावयाची नाहीं, असा तिनें आपल्याशीं

निग्रह केला. प्रेमळ पत्नीप्रमाणें आपल्या अबोलपणानें पतीची समजूत पाडायची अशी तिची कल्पना खरी, पण त्याचा परिणाम तिच्या पतीच्या संशयी मनावर कांहीं निराळाच झाला.

मध्यंतरीं मुकुंदरावांच्या—आपल्या कनवाळू जनकाच्या—मरणाचें प्रकरण उपस्थित झालें व पतीच्या तऱ्हेवाईक वर्तनानें आलेल्या औदासीन्यावर त्याच्या भयंकर मरणदुःखाचा आणखी एक जास्त लेप चढला. ती घरांत एकटी असतांना एकंदर गोष्टीचा विचार करूं लागली ह्मणजे तिच्या मनांत भविष्यकाळाचीं स्वप्नें व तींहि अनिष्ट, भयप्रद अशीं पडूं लागत. त्यामुळें ती अगदींच गांगरून जाऊन काय करावें हें तिला सुचेनासें होई. बाळ मकरंदाची मंजु बालभाषा तिच्या हृदयाचा ताप हरण करण्यास कांहींशी समर्थ होई.

आपल्याशीं पतीचें विपरीत वर्तन कां होऊं लागलें याचा शोध करतांना तिला पतीचे खोलींत समई नेऊन ठेवतांना दृष्टीस पडलेला कालिका—माधवाचा एकान्त हें एक सबळ कारण सांपडलें. स्त्रिया शिक्षणानें कितीहि संस्कृत झालेल्या असल्या तरी त्यांना सवतीचे अस्तित्वाची निबळ कल्पना सुद्धां सह्य होत नाहीं. लग्नानें आपल्याच पदाला पोंचलेल्या स्त्रियांचा सवत या दृष्टीनें जर त्या इतका तिटकारा करितात, तर कालिकेसारखी दासी—यःकश्चित् नीच स्त्री—तिच्यावर जर ज्यावर सदैव पत्नीचा हक्क असा प्रेमाचा कटाक्ष पडूं लागला तर पतीच्या असल्या गैरवर्तनाचा पत्नीला अत्यंत संताप आल्यास नवल काय? कालिकेसारख्या दासस्त्रीशीं जर माधवरावांचा आपण कल्पना करतों असा संबंध असेल तर त्यासारखें दुसरें आश्चर्य नाहीं, असें कमलिनीला वाटलें व तें खरेंच होतें. कारण मुलेंबाळें झाल्यानंतर अशा तऱ्हेचें नीच वर्तन करणें अगदींच गैर अशी स्त्रियांची रास्त समजूत असते. मोठ्या थोरल्या

इष्टेटीला वारस जर प्रथम स्त्रीच्या वंध्यत्वामुळें झाला नाहीं तर आपल्या हक्काचा निम्मा हिस्सा वारसाकरितां केलेल्या पतीच्या दुसऱ्या स्त्रीला पुत्रप्राप्तीच्या सबळ कारणावर त्या देण्यास तयार असतात. परंतु तो हिस्सा पतीशीं विवाहित अशाच स्त्रीला त्या नाइलाजानें देतात हें विसरतां कामा नये. तसेंहि कांहीं कारण माधवरावाच्या स्थितींत कमलिनीला दिसेना. सारांश, पुष्कळ विचारान्तींहि पतीचें करणें सर्वस्वीं चुकीचें आहे असें तिला वाटलें.

असें वाटण्याला सर्वस्वीं हेंच एक कारण नव्हतें. त्या खोलींतल्या प्रसंगाचे अगोदरहि तिनें माधवरावाचें कालिकेशीं अशा तऱ्हेचें वर्तन ओझरतें पाहिलें होतें. त्या वेळीं तिला त्याचें कांहीं विशेष वाटलें नाहीं. पण आतां एकदां संशयानें पक्कें घेरल्यावर त्याची जाणीव होऊं लागली. तिची दृष्टि आतां पूर्ववत् समतोल नसल्यामुळें मागें पाहिलेल्या प्रत्येक गोष्टीचा संबंध ती आपल्या संशयाला जोडून देऊन त्याची दिवसेंदिवस जास्तच दृढता करीत असे.

कालिकेचा कामचुकारपणाहि तिच्या नजरेस दिवसेंदिवस जास्त येऊं लागला. त्यामुळें संतापून जाऊन तिनें माधवरावाकरवीं तिला चाकरीवरून काढून टाकण्याचा पुरा निश्चय केला. आज संध्याकाळीं बराच वेळ माधवराव व कालिका दोघेंहि अगदीं गैरहजर होतीं हेंहि तिच्या लक्षांत होतेंच.

निद्रित बाळाला खांद्यावर घेऊन ती खोलींत शिरली. त्याला व्यवस्थितपणानें लहानशा ( त्याच्याकरितां स्वतंत्र केलेल्या ) पलंगावर निजविल्यावर त्याचें तिनें चुंबन घेतलें व अंथरुणावर अस्वस्थ चित्तानें पडलेल्या पतीशेजारीं ती बसली. माधवराव शिकला सवरलेला असल्यामुळें त्याच्या खोलींत टेबल खुर्च्या नीटनेटक्या ठेवलेल्या होत्या. शेजारीं जवळच टेबलावर निर्मल समई

आपल्या स्वच्छ प्रकाशानें तेवत होती. इतर व्यवस्थेप्रमाणें शिक्षित माधवरावाच्या खोलींत पुस्तकांनीं भरलेलीं एकदोन कपाटें होतीं. माधवरावाला वाचण्याचा नाद असल्यानें त्याच्याजवळ निवडक पुस्तकांचा उत्तम व भरपूर संग्रह होता. मराठी व इंग्रजीप्रमाणें संस्कृताचेंहि त्याचें वाचन बरेंच होतें. पुण्यांतलीं एकदोन प्रसिद्ध वर्तमानपत्रेंहि होतीं. त्यांपैकीं एका वृत्तपत्राच्या ताज्या अंकांतील " खटल्याचा निकाल " " सरकारची न्यायप्रियता " " चार वर्षांची शिक्षा " अशीं ठळक अक्षरें कमलिनीच्या दृष्टीस पडलीं. मोठ्या उत्कंठेनें तिनें तें पत्र हातीं घेतलें व वाचूं लागली, तों गणपतराव फौजदारांना मुकुंदरावांच्या भयंकर मरणाबद्दल चार वर्षांची शिक्षा झाल्याचें तिच्या दृष्टीस पडलें.

मुकुंदरावांच्या स्मरणानें नेत्रांत येणारे अश्रु पुसत पुसत त्या खटल्याची साद्य हकीकत वाचीत असतां तिच्या खांद्यावर जड पदार्थ पडला. मुद्रिकेच्या खुणेवरून ती पतीची आहे असें ओळखतांच तिच्या मनांत किती काळपर्यंत औदासीन्याच्या छायेनें व्यापून गेलेल्या आनंदसूर्याचा एक आशाकिरण पडला. तिच्या हृदयांत आनंदाचा केवढा तरी लोंढा आला. हातांतलें वृत्तपत्र खालीं पायांशीं गळून पडलें. जणूं काय आपल्या बातमीनें उचंबळलेल्या कमलिनीच्या हृत्क्षोभाबद्दल तें तिच्या पायीं लागून क्षमेची याचनाच करीत होतें. त्याप्रमाणें त्यावर कृपेचे अश्रु पडून त्याचें पाप धुवून गेलें.

कमलिनीनें पतीचे हात आपल्या वक्षःस्थळीं धरून पतीच्या नेत्रांशीं आपले नेत्र मिळविले. पहाणाराला त्यांच्यांत अंतर दिसलें असतें, पण वास्तविक प्रेमानें त्यांस इतकें जखडून टाकलें होतें कीं, त्यांच्यांत दुजा भाव राहिला नव्हता. किंचित्काल असा गेल्यावर कमलिनीकडे पहाण्यास गुंतलेल्या माधवरावाचे ओठ स्फुरूं लागले.—

" लाडके, आपल्या मनांत तुडुंबलेले विचार पतीनें कोणा-पाशीं बोलायचे ? आजन्म प्रेमपाशानें जखडलेल्या पत्नीखेरीज अत्यंत विश्वासाचें व रम्य असें स्थळ दुसरें कांहीं आहे का ? " माधवरावाचे वरील शब्द किती तरी उदासीनेतच्या मंद स्वरांत बोलले गेले. कमलिनीला वाटलें कीं, आपण आपल्या मनाची भलतीच समजूत करून घेऊन पतीला आजपर्यंत निष्कारण कष्टी केलें. आपल्या कृत्याबद्दल ती मनाला दोष देत असतां माधवराव स्वस्थ राहिला नाहीं. " प्रिये,—माझ्याशीं बोलायचं नाहीं का ? "

" आपल्याशीं जर बोलायचं नाहीं—सुखाचे दोन शब्द काढायचे नाहींत—तर मग आह्मां बायकांना दुसरं स्थळ कोणचं असणार ? आज प्रकृतीला चैन का नाहीं ? " माधवरावाची चलबिचल पाहून त्या साध्वीचें हृदय दुभंगलें व " डोकं का दुखतंय ? पोटबीट तर दुखत नाहींना ? सांगायचं होतं काय होतंय तें, असं गप्प राहून आपल्या जीवाला त्रास दिल्यानं आह्मीं स्त्रियांनीं काय करावं बरं ? " इतकीं वाक्यें ती अधीरतेनें बोलली. माधवरावाच्या संशयी मनाला या शब्दांतील निर्मल प्रेममय आतुरता इतकी लागली कीं, कालिकेच्या सांगण्यावरून आपण आपल्या प्रिय कान्तेवर जो व्यर्थ आरोप केला तो अगदीं निराधार असें त्याला वाटलें. विचार करतां करतां त्याला प्रभाकरकमलिनीच्या प्रत्यक्ष भेटीचे प्रसंग आठवले व फिरून त्याच्या अंतःकरणावर संशयाची तमोमय छाया पसरली. कमलिनीच्या भाषणानें मध्यंतरीं चेहऱ्यावर आलेलें तेज मावळलें अथवा त्याचा लोप झाला व त्याच्या मुखाला खीळ बसली.

एवढ्या वेळांत कमलिनीच्या मनाची जी स्थिति झाली ती कदाचित् कल्पनासंवेद्यच असूं शकेल. आपल्याविषयीं पतीची कांनामर्जी झाली तें कमलिनीला ठाऊक होतें व आज आलेली भाषणाची संधि वायां न दवडतां आपल्या मनाच्या सर्व भावना आतां

ओकून टाकाव्या असा तिनें निश्चय केला व तो पार पाडला.

"बरेच दिवसांपूर्वीं एका सोमवारीं नियमाप्रमाणें मी देवदर्शनाला दुपारीं गेल्यें असतांना सांबाच्या देवळांत एका अनोळखी व्यक्तीशीं बोलतांना आपण मला पाहिलें. तेव्हांपासून पतीच्या तोंडचे शब्द ऐकण्याला मी अभागिनी मुकल्यें. माझ्या वडिलांनीं बरेच वर्षांपूर्वीं आईच्या विनंतीवरून तिच्या एका नातलगाच्या अनाथ बाळाला आपल्या घरीं ठेविलें. त्याच्या सर्व शिक्षणाचा खर्च संभाळला. त्याला वाढविलें. त्याचें लग्न करावें असा वडिलांचा मानस होता. पण देवाच्या दयेनें इकडे आपला संबंध जडला व इकडचे हे पवित्र पाय मला लाधले. एका आजारी मित्राला त्याचे घरीं कोंकणांत पोंचविण्याकारितां प्रभाकर गेला असतां तो नाहींसा झाला. तो आजवर कोठें होता त्याची मला माहिती नाहीं. मला तो दोनदां गुप्तपणानें भेटला. माझा व त्याचा संबंध अगदीं बहीणभावांसारखा चोख आहे. आपल्या घरीं येण्याला त्याला बरें वाटेना. ह्मणून त्यानें मला गुप्तपणें भेटण्याची युक्ति काढली. पतिव्यतिरिक्त कोणत्याहि पुरुषाशीं एकान्तांत भाषण करणें ह्मणजे अगदीं निंद्य गोष्ट हें मी जाणत असूनहि मीं नुकतेंच एके दिवशीं आपल्या घरामागें प्रभाकराशीं भाषण केलें. हा माझ्या हातून एक घोर व दूषणावह अपराध घडला आहे. माझ्यावर दयार्द्र होऊन मला क्षमा करावी. प्रभाकराशीं माझा बोलण्यापलीकडे कांहींच संबंध नाहीं. ईश्वर साक्ष, अंबाबाईची शपथ, माझ्या मनांत निष्कलंक मायेशिवाय यत्किंचित्‌हि अन्य हेतु नव्हता. या निरपेक्ष निर्हेतुक मायेमुळें जें थोडेंसें गैर वर्तन या दासीकडून झालें असेल त्याबद्दल माफी मागून इतःपर आपल्या अनुज्ञेवांचून एकहि गोष्ट न करण्याचें अभिवचन मी देतें." असें ह्मणून तिनें पतीचे पाय घट्ट धरले.

कमलिनीच्या वरील भाषणांतील प्रत्येक शब्दोच्चारांत सत्याचा ठसा इतका खेंचून भरला होता कीं, माधवरावाला त्यामध्यें शंका घेण्याला अवसरच राहिला नाहीं. सकृच्छ्रवणीं त्याला असें वाटलें कीं, कमलिनी आपणापाशीं प्रांजलपणें कबूल करीत असलेली गोष्ट आपण तिचें व प्रभाकराचें भाषण ऐकलें असें कळल्यावरून लपविण्यांत कांहीं अर्थ नाहीं अशा समजुतीनें करीत असावी. परंतु तिच्या बोलण्यांत कपटाचा लेशहि नसल्यामुळें या राजश्रींच्या शंकेखोर मनाला बहुप्रयत्नानेंहि त्यांत नांव ठेवण्यासारखें छिद्र आढळेना. आपला अपराध स्पष्टपणें कबूल केल्यावर कोणता पती आपल्या साध्वी भार्येवरील संशय टाकून तिला क्षमा करणार नाहीं ? व आपण आपली विनाकारण गैरसमजूत करून घेऊन पत्नीशीं अबोला धरल्याबद्दल उलट माफी मागण्यास प्रवृत्त होणार नाहीं ? माधवराव या नियमाला अपवाद नव्हता. ह्मणून साहाजिकच त्यानें कमलिनीला हृदयाशीं धरून तिची समजूत केली. दोघांचीं अंतःकरणें पूर्ववत् निर्मल झालीं. तथापि माधवरावानें आपल्या पत्नीपासून एक गोष्ट त्या रात्रीं लपविली. ती गोष्ट ह्मणजे कालिकेची होय.

नंतर बोलण्याच्या ओघांत कमलिनीनें पतीच्या कानीं कालिकेची कागाळी घातली. माधवराव त्या गाऱ्हाण्याच्या विषयाला अनभिज्ञ नव्हता, पण त्यानें तसें कांहीं न दाखवितां कालिकेला आणखी एकदां धाकदपटशा देऊन काम केलें तर पहा, नाहीं तर काढून टाकायचें हें ठरलेलेंच, असा जबाब दिला. बरेच दिवसांनंतर बोलण्याचा प्रसंग आल्यामुळें तें प्रणयी दंपत्य नानातऱ्हेच्या गुजगोष्टी करितां करितां भवभूतीनें वर्णिलेल्या ' अविरलितकपोलं जल्पतोरक्रमेण ॥ अशिथिलपरिरंभव्यापृतैकैकदोष्णोः ' अशा स्थितींत झोंपेच्या अधीन झालें.

## प्रकरण चोविसावें.

## संबंधाची थोडीशी ओळख.

अंतःशुद्धि झालेल्या दंपत्याची हकीकत मधुपुरास अगदीं एकान्तांत घडत असतां तेथून बऱ्याच अंतरावर टेंकाडाच्या पायथ्याशीं असलेल्या एकलकोंड्या झोपडींत प्रभाकर व इतर मंडळी शेकोटीच्या भोंवतीं बसून आपसांत बोलण्यांत गर्क झाली होती.

आज सहज बोलणें निघालें ह्मणून ते एकमेकांला आपल्या हकीकती सांगत होते. वयोवृद्ध दिसणारी बाईहि शेजारीं होतीच. परस्परांच्या गांठी कशा चमत्कारिक रीतीनें झाल्या याची स्मरणपूर्वक माहिती सांगण्यांत त्यांना मोठी मौज वाटत होती.

तुरुंगांत निश्चित मरणाची वाट पहात असतां एकाएकीं जवळपास चोर नसल्याची संधि साधून प्रभाकराच्या भाषणाचा परिणाम झालेल्या तरुणानें आपले अन्न पोंचविण्याचे कामांतच प्रभाकराची सोडवणूक कशी केली, नंतर त्या दोघांनीं चोरांचा नायक व कोणीएक स्त्री यांचा माधवरावाचे घरावर दरवडा घालण्यासंबंधीं बेत चालला असतां तो कसा ऐकला, पाटलाच्या घरची धांदल, नंतर पोलिसांची नजर चुकविण्याकरितां काढलेला पळ, देवळांत रहाण्याकरितां येण्याचे वेळीं रस्त्यावर विव्हल स्थितींत पडलेली ती स्त्री प्रभाकराच्या मित्राला कशी सांपडली, इत्यादि गतगोष्टींचें त्यांनीं मनःपूर्वक समालोचन केलें.

परंतु या तिघांमध्यें घडलेल्या गोष्टींशिवाय त्याच्या पूर्वीची इतर माहिती एकाच्याहि तोंडून निघेना. शेवटीं प्रभाकराच्या व ह्या स्त्रीच्या आग्रहानें नारायण आपली हकीकत सांगूं लागला.

" पुष्कळ वर्षें झालीं--मला कांहीं चांगलेंसें आठवत नाहीं; पण मी या रानांत येण्यापूर्वीं कोठें तरी दुसरीकडे रहात होतों.

पुणे मराठी ग्रंथालय स्थापना शके १८३३

तेथून एके दिवशीं कोणी तरी माणसानें मी रस्त्याच्या बाजूला बालपणच्या घराच्या दाराशींच खेळत असतां मला खाण्याला दिलें. मी त्याच्याबरोबर बाहेर पडलों. त्यानें मला गोड बोलून खायला देत देत घरापासून बरेंच लांब एका घरांत नेलें. पडकें घर असावें. नंतर तेथून मी जेथें प्रथम प्रभाकरपंतांना भेटलों तेथें गेलों. या रानांत आल्यावर मी चांगल्या स्थितींत होतों. मला एका स्त्रीनें चांगल्या रीतीनें वागविलें; परंतु नेहमीं रानचें रहाणें पडल्यामुळें मला त्याचा कंटाळा येऊन मी माझ्या पूर्वघरीं जाण्यासाठीं रडें. आज तुझी आई येईल, उद्यां येईल, अशा थापा देऊन मला त्यांनीं पूर्वस्थितीचा अगदीं विसर पाडला. नंतर मला तेथेंच बरें वाटूं लागलें. पुढें चांगलें समजूं लागल्यावर माझ्या सभोंवार नेहमीं दृष्टीस पडणारीं माणसें हीं चोर होत असें मला समजलें. परंतु त्यांच्या कृत्यांत मला कधींच सामील न होतां आल्यामुळें तीं मला कळत नसत. मधूनमधून एखादा नवखा माणूस त्यांच्या टोळींत ते पकडून आणीत, पण त्या बिचाऱ्याला जिवंत सोडलेला मला कधींच आठवत नाहीं. नानातऱ्हेचे हाल करून ते त्याचा जीव घेत असत. माझ्या देखत त्यांनीं कित्येकांस ठार मारिलें आहे.

" अशा तऱ्हेचे दिवस घालवीत असतां एके दिवशीं बरीच रात्र पडल्यावर रानांत आमच्या रहाण्याचे जागीं धामधूम सुरू झाली. मी पहातों तों एक अगदीं तरुण मनुष्य बेशुद्ध स्थितींत मंडळींनीं आणून त्यांच्या बंदिखान्याच्या गुहेंत ठेवल्याचें माझ्या दृष्टीस पडलें. त्याच्या एकंदर चर्येवरून मला एकाएकीं त्याच्याविषयीं वाईट वाटून कळवळा आला. पांचचार दिवसांनीं त्यांनीं त्याला दंडावर सोडण्याचें कबूल केलें. पण ही निवळ थाप असल्याचें मला ठाऊक होतें. दंडाच्या नांवावर द्रव्य पदरांत पाडून त्या माणसाचा जीव घेतल्याशिवाय ते चोर कधींहि रहात नसत. अशीं किती तरी उदा-

हरणें तेथें माझ्या देखत घडलीं होतीं. प्रभाकरपंतांनीं दरबडेखोरांच्या नीतीवर रागाच्या भरांत खूप खरमरीत टीका केली, पण तिचा उपयोग कांहींच न होतां त्यांना व्यर्थ मार खावा लागला. अजून त्या माराचें चिन्ह डोक्यांत असेलच." सहेतुक दृष्टीनें प्रभाकराकडे पहात त्यानें बोलणें चालविलें. "अलीकडे मरणाचे द्वारीं बसलेल्या कैद्यांना अन्नदान करण्याचें काम माझ्याकडे बरेच दिवस दिलें होतें. शिवाय प्रभाकरपंतांचे दिवशीं मधुपुरच्या दरबड्यासंबंधी विचार ठरवायला कोठें गुप्त जागीं जायचें होतें. तुरुंगांतील कैद्यांसंबंधी भय बाळगण्याचें कारणच नसल्यामुळें व यदाकदाचित् कारणे उपस्थित झाल्यास मी तर आहेंच, अशा समजुतीवर ते कधीं कधीं सबंध दिवसचे दिवस कोठें तरी दुसरीकडे असत. अर्थात् नियमाप्रमाणें त्या दिवशींहि ते त्या जागीं नव्हते. संधि साधून प्रभाकरपंत सुटले. पुढचा प्रकार सर्वांना माहीत आहेच."

नारायणाची हकीकत संपल्यावर त्या स्त्रीनें एक दीर्घ उसासा टाकला व ती आपल्याशींच विचार करण्यांत गुंग झाली. बाईला आग्रह केल्यावरून तिनेंहि आपली हकीकत सांगण्याला आरंभ केला. तिनें आपलें नांव सरस्वती असल्याचें सांगतांच प्रभाकराच्या मुखचर्येवर चलबिचल झाली. परंतु तिकडे बाकीच्या दोघांचें लक्ष गेलें नाहीं.

प्रथमारंभीं आपल्या आयुष्याचें थोडेंसें अथवृत्त देऊन आपण जवळच्या एका गांवच्या जमीनदार ब्राह्मण गृहस्थाची कन्या असल्याचें तिनें सांगितलें. लग्न झाल्यानंतर बरेच दिवसांनीं संसाराच्या ऐन उमेदींत असतां पतीनीं कायमचा पत्नीप्रमाणेंच सर्व जगाला रामराम ठोकून अनावर्ती दीर्घ प्रवासाला प्रयाण केल्याची माहिती दिली. असें अरिष्ट कोसळल्यावर तिच्या एका भावानें तीस आपल्या घरीं नेलें. भावाला बायको नसून त्याचीं दोन मुलें,

एक कन्या व एक पुत्र अशीं त्याचेच अंगावर होतीं. " त्या चाणाक्ष पोरांच्या शिक्षणांत व विनोदांत गत गोष्टींची विस्मृति पाडण्यांत मी दिवस घालवीं. मुलगा मोठा झाल्यावर त्याचें पुण्यांतलें शिक्षण संपल्यावर त्याला मुंबईस कॉलेजांत शिकायला ठेवलें. पण तेथून तो एका मित्राला त्याच्या आजारी स्थितींत कोंकणांत पोंचविण्याकरितां गेला असतां मुळींच परत आला नाहीं. त्याच्या बापानें त्याचा पुष्कळ शोध केला, पण पत्ता लागला नाहीं. मुलीचें लग्न करून देऊन ती प्रपंचाचा भार सोसण्याइतकी मोठी झाल्यावर मीं माझ्या भावासह तीर्थयात्रा करण्याकरितां आमचें रहातें गांव सोडलें. पण त्यानंतर माझ्या भाच्याप्रमाणें परत त्या गांवीं समाधानानें जाण्याचा प्रसंग आला नाहीं.

" गंगोत्रीच्या यात्रेकरितां हरिद्वार सोडून आह्मी बऱ्याच मजलीवर गेलों. आमच्याबरोबर आणखीहि पांचपन्नास वाटसरू होते. रात्र पडली ह्मणून आह्मीं सर्वजणांनीं रानांतच एकमेकांच्या सोबतीनें गाशा पसरला. थंडीकरितां जागजागीं मंडळी शेकोटच्या पेटवून जमावानें बसली होती. बरीच रात्र झाली. आह्मी अर्धवट झोपीं गेलों असून कित्येक शेकाशीं पथाऱ्या पसरून पडल्या पडल्या मधून मधून बाता मारीत होते. तोंच एक कर्कश शीळ ऐकूं आली व तिचा आवाज कानांत घुमत होता तोंच एक विलक्षण शिंग वाजलें आणि आरडाओरडा करीत मंडळी धांवत आली. यात्रेकरूंत एकच गलबला झाला. "डाकू आले-डाकू-डाकू" असा एकच शब्द अंतराळीं उठला. कोणी कोणाची दाद घेईना. आह्मी दोघेंहि बहीणभावंडें जागीं झालों. झाला प्रकार स्पष्टपणें कळण्याला मार्गच नसल्यामुळें मी आणि माझा भाऊ घाबरलों. इतक्यांत आमच्यापासून पंचवीस हातांवर एक धिप्पाड काळा पुरुष एका हातांत चुडी व एका हातांत पाजळलेली लहानशी

तरवार घेऊन आमच्याच दिशेनें येत असल्याचें मीं पाहिलें व भावालाहि तो दाखविला. त्याची भयंकर मुद्रा व वेश पाहून आह्मी त्याचा धंदा समजलों व इतरांप्रमाणें चोर चोर ओरडत एकमेकांच्या आधारानें पळत सुटलों. सर्व सामानसुमान तेथेंच टाकून देणें भाग होतें. त्यानें कांहीं वेळ पाठलाग केला. मी त्याच्या हातीं सांपडलें. "भाऊ मी मेल्येंरे मेल्यें" अशी निर्वाणींची आरोळी देऊन मी बेशुद्ध झाल्यें. माझ्या भावानें त्या चोराशीं झगडून मोठ्या शिताफीनें सोडविल्याचें मला पुढें कळलें.

"जागी झाल्यें तों मी अगदीं अंधारांत एका झाडाखालीं होत्यें. शेजारीं माझा भाऊ बसला होता. आह्मीं दोघांनीं ती रात्र मोठ्या भीतीनें काढली. सकाळ झाल्यावर आह्मी कोठें होतों तें आह्मांला कळलें. त्या रानांतून निघाल्यावर दोन प्रहरच्या सुमारास आह्मी एका गांवीं आलों. तेथें भावानें भिक्षा मागून आणली व पोटाची आग शमविली. अशा रीतीनें त्या प्रदेशांत भिक्षेवर—भिक्षुकीवर उपजीविका करीत आह्मीं यात्रेचा बेत रहित करून परत दक्षिणेंत येण्याचें ठरवलें. वाटेनें कष्ट फार झाले, पण माझ्या भावानें माझी फार निगा राखली." स्त्रीजातीला अनुसरून तिला भावाची स्मृति मनांतल्या मनांत दाबून ठेवतां येईना. अंतःकरणाचा उद्वेग अश्रूंच्या रूपानें बाहेर लोटलाच. पूर्वकथेचा भंग होऊन तिच्या दुःखाशीं समानशील असलेल्या नारायण—प्रभाकरालाहि द्रव आला.

थोडा काळ शांततेंत गेल्यावर प्रभाकरानें सरस्वतीबाईला प्रश्न केला. आतांपर्यंत हिनें सर्व मंडळीचा उल्लेख स्वतःच्या नांवाखेरीज सर्वनामांवर अगर मोघम सामान्यनामांवर चालविला होता, पण तेवढ्यानें प्रभाकराला बरें वाटलें नाहीं. त्यानें तिला आपल्या भावाचें नांव विचारलें.

"नांव सांगून कांहीं उपयोग नाहीं." सरस्वतीनें सांगितलें.

"पण तो भाऊ हल्लीं कोठें आहे?" प्रभाकराचा प्रश्न ऐकतांच त्या बाईचा कंठ गहिंवरला. खालीं मान घालून तिनें डोळ्यांना पदर लावला व मुक्त नेत्रानें तिनें अविरत अश्रुस्राव चालविला. आपल्या प्रश्नाचा असा विलक्षण परिणाम झालेला पाहून प्रभाकराला फार वाईट वाटलें. भाऊ जिवंत नसावा असें प्रभाकरानें यावरून ताडलें व लगेच त्याच्याहि नेत्रांमधून अश्रु आले. समजूत घालण्याकरितां प्रभाकर तिला बोलूं लागला. "बाई! कुठें चुकला बिकला असला तर येईल तुमचा भाऊ परत. कुठें चुकला तें सांगितलेंत तर आह्मीही त्याचा शोध काढूं. असा शोक करूं नका. भेटेल तुह्मांला आज नाहींतर उद्यां. आह्मी तुमचे कोणच्याच तऱ्हेनें हाल होऊं देणार नाहीं." प्रभाकराचा बुद्धिवाद इतर वेळेला कदाचित् समाधानकारक झाला असता, पण प्रस्तुत प्रसंगीं तरी तो निरुपयोगी ठरला. बाईला एक जोराचा हुंदका आला व रडक्या स्वरांतच तिनें पुढील शब्द उच्चारले—

"माझा भाऊ आतां मानवी शोधाच्या बाहेर गेला आहे. देवा, आतां त्याची न् माझी गांठ परलोकींच व्हायची! भाऊ मला सोडून गेला हो गेला! देवा!" रडण्याच्या भरांत तिनें देवाची करुणा भाकली.

सरस्वतीबाईचा शोक अनावर झालेला पाहून नारायण अगदीं स्तब्ध बसला. प्रभाकर स्तब्ध होता तरी त्याच्या अंतःकरणांत मोठी खळबळ उडाली. दोघेहि त्या अधोवदन स्त्रीकडे पहात बसले. सुमारें अर्धापाऊण तास अशा स्थितींत गेला. एक दीर्घ सुस्कारा टाकून बाई त्यांच्याशीं पुन्हां बोलूं लागली. रडण्याची ताकद नसल्यामुळें शोक अगदीं ओसरला.

"बाबांनो! तुह्मांला माझें रडणें मोठें चमत्कारिक वाटेल,

पण आमच्या बहीणभांवडांचें प्रेम आमच्यावर आलेल्या प्रसंगांतून कसें तावून सुलाखून निघालें याचा अनुभव ज्यास असेल त्यास या दुःखावेगाचें आश्चर्य वाटणार नाहीं. माझा भाऊ साध्या मरणानें मरता तर त्याचें मला इतकें वाईट वाटतें ना! पण आई—आई—त्याला भयंकर जाचामुळें निष्कारण आत्महत्या करून घ्यावी लागली! जगदंबे, भाऊ, कायरे तुला यातना भोगाव्या लागल्या असतील!"

इतका वेळ प्रभाकरानें कसाबसा दम काढला. आतां त्याच्यानें रहावेना. त्यानें एकदम उठून सरस्वतीबाईचे पाय धरले व "आत्याबाई" अशी गद्गद कंठानें हांक मारली. सरस्वतीबाई आश्चर्यानें स्तंभित झाल्या. त्यांनीं प्रभाकराला उठवून आपल्या हृदयाशीं घट्ट आवळलें व आनंदाश्रूंनीं त्याला पुष्कळ काळ न्हाऊं घातलें. आनंदाचें भरतें कालान्तरानें शान्त झाल्यावर प्रभाकरानें आत्याबाईला आपली हकीकत सांगितली. मित्राला कोंकणांत घरीं पोंचवून परत मुंबईस येण्याकरितां आगबोटीमध्यें बसलों असतांना आगबोट तुफानांत कशी सांपडली, बऱ्याच दिवसांनीं ती एका लहानशा बेटाला कशी लागली, नंतर मलबाराकडे जाणाऱ्या एका जहाजावरील लोकांनीं त्याला वर कसें घेतलें, तें जहाजहि वादळांत सांपडून तो एकटा लखदीव बेटापर्यंत कसा पोंचला, तेथें त्याला कांहीं वर्षें रहाणें भाग कसें पडलें, तेथून पुन्हां मलबारपर्यंत कसा गेला आणि नंतर मलबार प्रांतामधून उत्तरेकडे यात्रेकरूच्या वेषानें कसा आला इत्यादि गोष्टींचें त्यानें केलेलें वर्णन ऐकून इतक्या संकटांतून निभावून परमेश्वरानें सुखरूपपणें परत आणलें याबद्दल सर्वांना अत्यानंद झाला व त्यांनीं विश्वचालकाचे धन्यवाद गायिले.

तिघांच्या हकीकतींमध्यें रात्र किती गेली इकडे कोणाचें लक्ष

नव्हतें. पण आतां रात्रीचें आयुष्य निम्याहून अधिक झालेलें होतें व निद्रादेवी आपला अंमल तिघांवरहि बसवूं लागली. अर्थात् यानंतर पुढें संभाषण झालें नाहीं.

---

## प्रकरण पंचविसावें.

## धिक्कारपूर्वक निषेध.

मागील प्रकरणांत वर्णिलेली गोष्ट झाल्यानंतर चार पांच दिवसांत कांहीं विशेष घडलें नाहीं.

मधुपुरास माधवरावाचें व त्याच्या पत्नीचें मन परस्पराविषयीं निःशंक झाल्यानंतर त्यांचे दिवस सुखासमाधानांत जाऊं लागले. मध्यंतरीं झालेल्या बेबनावामुळें नोकरचाकरांत उत्पन्न झालेली कुजबूज बंद पडून घरांतल्या सुखासमाधानांत भर पडली. फक्त एक माणूस मात्र जों जों असे दिवस जाऊं लागले तों तों जास्त जास्त कष्टी होत होतें.

कमलिनीच्या पातिव्रत्याविषयीं शंका उत्पन्न करणारे प्रसंग माधवरावाला वेळोवेळीं दाखवून दिल्यानंतरहि तिच्याशीं शंकारहित वागणाऱ्या माधवरावाविषयीं कालिकेच्या मनांत साहजिकच जास्त राग उत्पन्न झाला. असल्या मेषपात्र माणसावर आपण उगीच प्रेम केलें, त्याच्यासाठीं वेषांतर करून त्याला ओळख द्यावी ह्मणून केलेला अट्टाहास निष्फळ झाला, याबद्दल तिला सखेद आश्चर्य वाटत होतें. स्त्रीजातीच्या नैसर्गिक चंचलतेचा तिच्यांत अभाव नसल्यामुळें तिनें आतां निराळाच बेत केला. तो शांतपणें पार पाडून मुकलेलें सुख भोगावें अशी तिची भावना झाली.

माधवरावाच्या घरीं दाईच्या रूपानें रहाणाऱ्या कालिकेची किंचित् चमत्कारिक माहिती व तिचा स्वभाव वाचकांच्या नजरेस

मागील प्रकरणांतून आलाच आहे. तिच्या खऱ्या माहितीविषयीं वाचकांना तर्कवितर्क करण्यांत तसेंच सोडून आम्ही त्यांच्या नजरेस आतां एक नवीनच प्रकार आणीत आहों.

मागल्या प्रकरणांत वर्णिलेली गोष्ट घडल्याला पांचवा दिवस अजून क्षितिजाबाहेर आला नव्हता. अरुणानें सूर्यागमाचें निशाण पूर्वक्षितिजावर उभारल्याला बराच वेळ झाला होता व पूर्वगिरीच्या मागून एक तेजोबिंब आपल्या प्रचंड प्रकाशानें उजळा देण्याकरितां बाहेर पडूं लागलें होतें. आकाशाच्या पश्चिम भागावर अजून अत्यंत अंधुक अशा कांहीं तारका दिसत होत्या. लोक उद्योगाकरितां तुरळक तुरळक बाहेर पडूं लागले होते. अशा वेळीं एक स्त्री अगदीं हळू व मोठ्या सावधगिरीनें माधवरावाच्या घराबाहेर पडली. आसपास आपल्या कृत्याची चाहूल नसल्याचें पाहून तिनें पायांना वेग दिला व क्षणार्धांत दहापांच शेतें तुडवून ती दृष्टीआड झाली.

* * * *

भज गोविंदं भज गोपालं भज विश्वेशं मूढमते ।
प्राप्ते सन्निहिते मरणे न हि न हि रक्षति डुकृञ् करणे ॥
यावज्जीवो निवसति देहे कुशलं तावत्पृच्छति गेहे ।
गतवति वायौ देहापाये भार्या बिभ्यति तस्मिन् काये ॥ भज० ॥
सुखतः क्रियते रामाभोगः पश्चाद्धन्त शरीरे रोगः ।
यद्यपि लोके मरणं शरणं तदपि न मुंचति पापाचरणम् ॥ भज० ॥

कंठांतून निघणाऱ्या चेतोहर आलापांतून आचार्यांचा वरील उपदेश मोठ्या बहारीनें बाहेर पडत होता. उषःकालीन शांततेला या मंगल गायनाचे योगानें अधिकच शोभा येत होती. रातकिड्यांचा किर्रर्र शब्द बंद पडून गगनतलामध्यें सर्वांच्या पुढें अघाडी मारून श्रीसूर्यनारायणाचें आपल्या निसर्ग संगीतानें

अभिनंदन करणाऱ्या चंडोल पक्ष्याचा मञ्जुस्वन अंतरिक्षांतून ऐकूं येत होता. रात्रभर एकमेकांस गाढ आलिंगन देऊन एकरूप होऊं पहाणाऱ्या तरुवल्लरींना परिमल वाहून वातावरण सुगंधित करणारा मंदवायु आपल्या सुखलहरींनें अत्यंत मृदुल स्पर्श करून जागें करीत होता. अथवा पानाच्या पाळण्यांत रात्रभर निजलेल्या व आतां विकसणाऱ्या बालपुष्पांना हा मंदानिल सावकाश झोके देत असावासा भास होत होता. निशेच्या अंकावर निजलेल्या निसर्गाला जागृत करण्याकरितां विहंग वैतालिक मुक्तकंठानें मधुर असें गायन करीत होते. त्यांतच शुचिर्भूत प्रभाकर जिच्या कांठीं बसून उषेच्या उदरांतून जन्म घेणाऱ्या उदयोन्मुख प्रातर्देवतेला वंदन व अर्घ्यदान करीत होता त्या स्वैरविहारी निर्झरिणीचा अखंड झुळझुळ ध्वनि मिसळून जात होता.

या रम्य व प्रशान्त समयीं प्रभाकरानें आपलीं धार्मिक प्रातःकर्में निर्वेधपणें व उल्हासयुक्त मनानें आटपलीं. वस्त्रें धारण करून शांत चित्तानें आपल्याशींच गुणगुणत मधून मधून पाठ येत असलेलीं स्तोत्रें, श्लोक वगैरे स्वतःशींच मोठ्यानें म्हणत तो आपल्या पर्णकुटीच्या दिशेनें निघाला. त्या काळीं स्वभावतः वासनाहीन मन अल्पांशानें तरी आत्मचिंतनांत निमग्न व्हायचेंच. तदितर जें चित्त कल्पनेवर बसून अदृश्य आत्मनिर्मित भूत आणि भव्य काळाच्या अगाध उदरांत स्वच्छंदानें निरर्थक भटकत असायचें तेंच आतांच्या प्रचंड शांततेंत अंतर्निवृत्त झालें. लौकिकविचारपराङ्मुख होऊन तें अनायासेंच परमार्थाकडे धांवलें. कारण, समंतात्प्रदेशाचें बाह्य निरीक्षण सुद्धां मनुष्याच्या मनाला स्वतःचें क्षुद्रत्व पटवून अनंत विश्वाच्या निर्मात्याचें अनंतत्व पटविण्यास पुरेसें होतें. मग प्रभाकरासारख्या मनोरथभग्न निराश माणसाच्या तोंडून त्या वेळीं आचार्यांचा समर्पक वाग्विलास बाहेर पडला यांत नवल काय?

आपल्याशीं तो गात चालला असतां त्याच्या मागोमाग एक व्यक्ति झपाट्यानें चालली होती. या मूर्तीचें सर्व शरीर वस्त्रावृत असल्यामुळें तिचा आकार अगर अवयव सर्व लोपले होते व ते एखाद्या चालणाऱ्या खांबाप्रमाणें दिसत होते. प्रभाकराला त्याचें भान नव्हतें. तो चालत चालत एका टेंकडीच्या वळणाजवळ आला. येथून त्याची रहाण्याची झोंपडी दिसत होती. येथें येतांच त्याच्या कानीं " अहो प्रभाकरपंत, " असे शब्द पडले. आपल्या नांवानें हांक मारणाऱ्या व्यक्तीला पाहून तो चपापला. असल्या भलत्या वेळीं आपल्याकडे येण्याचें या व्यक्तीला काय कारण असावें हें त्यास कळेना. आवाजांतली माधुरी एकून आणि त्या व्यक्तीला पाहून त्याला स्त्रीत्वाचा भास झाला. पण त्या स्तंभाकृतीला पाहून तो आश्चर्यस्तंभित झाला. ती जसजशी जवळ येऊं लागली तसतसे याच्या मनांत शेकडों विचार आले व गेले. ती व्यक्ति जवळ सुमोरें पांच हातांवर येऊन उभी राहिली व दोघेंहि स्तब्ध झालीं. प्रथम भाषणाला आरंभ कोणीं करायचा हाच प्रश्न त्या दोघांच्या मनांत परस्परांच्या सान्निध्यानें उद्भवला. शेवटीं थोडा वेळ स्तब्धतेंत गेल्यावर प्रभाकरानें त्या आकृतीला " काय काम आहे ? मला कां हांक मारिली ? " असा सौम्य प्रश्न केला.

" प्रभाकरपंत, " इतके शब्द तिच्या तोंडून निघाले व तिच्या सर्वांगावर असलेलें वस्त्र डोक्यावरून ढळूं लागलें. तें वस्त्र मानेवर गळलें व नंतर खालच्या भागावरून पायाशीं लोळूं लागलें. एखाद्या कुशल कारागिराच्या श्रमानें ज्याप्रमाणें एखाद्या शिलेमधून सुंदर मूर्ति बाहेर पडावी त्याप्रमाणें मनोविकाराच्या प्राबल्यानें अवगुंठन जाऊन त्यांतून एक स्त्री बाहेर पडली. तिला पहातांच प्रभाकराला काय वाटलें असेल तें असो, पण त्याच्या एकंदर बाह्य वर्तनावरून त्याला फारच आश्चर्य वाटलें असावें असें ह्मणण्याला हरकत नाहीं.

थोडे दिवसांपूर्वीं एका संध्याकाळीं आपण लांकूडफाटा गोळा करण्यास आलों असतांना शेजारीं वृक्षाखालीं ज्या परिचित आशुकमाशुकांचा प्रेमसंवाद ऐकला त्यांपैकीं ही स्त्री होती हें प्रभाकराच्या ध्यानांत आल्यावांचून राहिलें नाहीं व त्याला आश्चर्य वाटण्याचें कारणहि हेंच ! ! त्याच्या मनांत या प्रसंगापूर्वीं दहा मिनिटेंच जे वेदान्तपर निराश विचार येत होते ते पार विलयास जाऊन त्याला बरेच दिवस विस्मरण पडलेली इंग्रजी म्हण स्मरूं लागली. Love is mere madness ह्या कव्युक्तीनें ज्या स्त्रीच्या मुखांतून मागील प्रसंगीं जन्म घेतला होता, तीच ही स्त्री हें प्रभाकराच्या लक्षांत पक्कें येऊन चुकलें. त्या वेळीं माधवरावाच्या गळीं पडून ज्या स्त्रीनें त्याला कमलिनीविरुद्ध बहकाविण्याकरितां शुद्ध प्रेमाच्या मोठमोठ्या गप्पा मारल्या, तीच स्त्री आतां आपल्या प्रातर्विधीची वेळ साधून इतक्या लगबगीनें इकडे कां आली ? या प्रश्नोद्भवानें तो मनांत पुष्कळ गोंधळला. त्या दिवशींचा प्रसंग अजून त्याच्या डोळ्यांसमोरून ढळला नव्हता. पण मध्यंतरीं कालगतीनें त्यावर जो थोडा विस्मृतिमल सांचून त्यास जरासें अस्फुटत्व येत चाललें होतें तें मात्र तिच्या प्रत्यक्ष स्वसंबंधक दर्शनानें पार पुसून जाऊन त्यास विशदत्व आलें.

बाईच्या अर्धवट संबोधण्यानें प्रभाकरास बरें वाटलें नाहीं. त्यानें तिचा व आपला प्रस्तुत प्रसंग लवकर कसा संपवावा ह्याबद्दल मनाशीं पुष्कळ विचार केला. परंतु तिचा उद्देश जाणण्यापूर्वींच तिचा निषेध करणें त्यास इष्ट दिसेना. बाई लवकर बोलूं लागली—

" महाराज, ही अभागीण तुमच्यापुढें आज अनाथ होऊन आली आहे. मला जर आपण मी सांगेन तें काम करण्याचें वचन देत असाल तर मी आपणास माझा येथें येण्याचा हेतु सांगतें.

अगोदर वचन देण्याविषयीं या अबलेची आपणाजवळ आग्रहाची विनंति आहे. ”

भाषणाच्या या चमत्कारिक आरंभामुळें प्रभाकरास कसेंसेंच वाटलें. त्याला कालिकेच्या हेतूची थोडीशी कल्पना आली व त्या गोष्टीचा निरास करण्याकरितां त्यानें तिच्याशीं बोलण्यास सुरुवात केली.

“ बाई, तुमची मला ओळख नाहीं व तुह्मांला मी अपरिचित आहें. करितां एकदम तुमच्यावर विश्वास टाकून तुह्माला वचन देण्याचे भरीस पडावें कीं नाहीं हा एक प्रश्नच आहे. ”

कालिका स्फुंदूं लागली. “ अबलांचें, गरीब स्त्रियांचें, रक्षण करणें हा सज्जनांचा धर्म आहे. मी कष्टी–” भाषणाचा ओघ येथेंच थांबून त्या अर्धवट राहिलेल्याची सांगता स्फुंदण्यांतून जन्म पावणाऱ्या रुदनाच्या व्यक्त व केविलवाण्या स्वरानें केली. या करुण स्वराचा इष्ट परिणाम निग्रही प्रभाकरावर घडण्याचा रंग दिसूं लागला. जों जों तो दीर्घ होऊं लागला, तों तों प्रभाकराला वचन द्यावेंसें वाटूं लागलें. शेवटीं तो त्या विचाराला वश झाला. इष्ट हेतु पूर्ण होतांच आपली चालू क्रिया दाबून कालिका ह्मणाली–

“ महाराज, या दासीचा अंगीकार व्हावा अशी या दासीची सविनय प्रार्थना आहे. आपण ब्राह्मण जातीचे थोर पुरुष आहां, पण मीहि आपल्यापैकींच असें आपण समजा. सध्यां इतकेंच बोलतें. अभिवचनाप्रमाणें वर्तन ठेवणें हा भल्या लोकांचा मार्ग आहे. आपण सुज्ञ आहांत —” येथें क्षणभर प्रभाकराच्या आरक्त चेहऱ्याकडे पहात ती थांबली. “ माझा येथें येण्याचा व आपणास वचनांत गोंवण्याचा प्रयत्न मीं कां केला असा एक प्रश्न आपणांस भ्रमांत टाकण्यास कारण होईल. त्याचें निरसन करून

मला प्रिय वाटणाऱ्या आपणास निःशंक करणें मी आतां माझें कर्तव्य समजतें. आपलें दर्शन मला कोठें व कसें झालें ही एक बाब सांप्रत सोडून द्या. पण एवढें मात्र खरें कीं, माझें प्रेम आपणावर त्या दिवसापासून पूर्ण बसलें. आपल्याला जास्त काय सांगावयाचें? आपण सर्व जाणतच आहां. मी एक अनाथ दासी आहें. प्रेमानें आपल्या ठिकाणीं माझी भक्ति बसली. आपले पाय लाभण्याच्या इच्छेनें इकडे त्रास द्यायला आलें. उघडपणें आपण माझा स्वीकार केल्यावर माझी माहिती आपणास पूर्णपणें कळेलच. आसपासच्या लतांना, पृथ्वीवर संचार करण्याऱ्या वायुदेवतेला, वनदेवतेला व त्या टेंकडीमागून येत असलेल्या सूर्यनारायणाला—किंबहुना दृष्टीच्या आटोक्यांतील सर्व विश्वप्रदेशाला साक्षी ठेवून आपल्या वचनाप्रमाणें आपण माझें पाणिग्रहण करावें अशी माझी इच्छा आहे. परस्परांच्या निवळ प्रेमानेंच जडलेला संबंध आईबापांनीं एकमेकांच्या गांठी घालून देण्यापेक्षां जास्त सुखकारक सहजच असणार हें आपणास सांगावयास का पाहिजे? आपल्या चेहऱ्यावरून आपणाला ही गोष्ट अप्रिय वाटत असावी असें दिसतें. पण विचार करून पहा. माझ्या प्रेमाविषयीं शंका नको. या निर्हेतुक प्रेमाचा व त्याला अनुसरणाऱ्या या दीन अबलेचा अनादर करूं नका. आपण मघांशीं मला शब्द देऊन गुंतलां आहां ही गोष्ट विसरूं नका. माझें आपणावर अढळ प्रेम—"

प्रभाकराच्या रागमिश्रित हास्यानें भाषण येथेंच तुटलें व प्रभाकर बोलूं लागला—

"बाई, या अढळ प्रेमाची मला कींव येते. Love is mere madness असें आपल्या पूर्व प्रियकराला थोडेच दिवसांपूर्वीं, त्याच्या वर्तनाचा राग येऊन ज्या स्त्रीनें बोलून दाखविलें, त्या दिवशींच त्याला आपल्या अचळ प्रेमाच्या साक्षित्वानें जी स्त्री

मोठ्या मोठ्या गप्पा मारून त्यास स्वस्त्रीपराङ्मुख करण्याचा प्रयत्न करीत होती, तिनेंच आज दुसऱ्या एकाला वचनाच्या फांसांत धरून भ्रष्ट करण्याचा आणखी एकदां यत्न करावा हें योग्यच ना? थोड्या दिवसांच्या अंतरानें ज्या स्त्रीचें प्रेम पुरुषान्तर करतें त्या स्त्रीवर विश्वास ठेवून प्रेमविवाहाच्या विश्वसाक्षिक बातांवर फसणारा कोणी मूर्ख तरी असेल का ? वचनभंगाच्या पातकाचें भय घालणाऱ्या स्त्रीनें स्वतःच्या प्रेमांतराच्या अघोर पातकाचा कधीं विचार केला आहे का? छे! छे!! तुमच्याच शब्दांत सांगायचें ह्मणजे प्रेम हें निवळ खूळ आहे, Love is mere madness ! बाई ! आपल्या शब्दांचें विस्मरण पडूं देऊं नका. विचार करा व आपल्या प्रेमाच्या चलाचलत्वाची मीमांसा बरोबर करून माझ्या व्यतिरिक्त इतर वाटेल त्यास त्याची परीक्षा देण्यास जा. मग त्या सुसमयाला तुह्मी आपल्या पुण्यबलानें एखाद्या आकाशस्थ देवतेला साक्षित्व प्रकट करायला लावा अथवा फशीं पडलेल्या खुळ्याच्या समजुतीकरितां दृश्य विश्वांतच समाधान मानून त्यासच ग्वाही करा.—जा!!!"

आपलेच दांत आपल्या घशांत घालणाऱ्या प्रभाकराबद्दल तिच्या मनांत विकारामुळें उत्पन्न झालेली सहानुभूति पार नष्ट झाली. उपहासिक व क्रूर शब्दांत मर्मभेदी बोलणारा प्रभाकर तिला अप्रिय वाटल्यावांचून कसा राहील? त्या स्त्रीचें धैर्य गळालें. डोळ्यांपुढें दिसणारी व्यक्ति माणूस नसून आपल्या सदसद्विवेकबुद्धीची प्रत्यक्ष प्रमाणाच्या पुराव्यावर झडती घेणारा चित्रगुप्तच तिला वाटला. परंतु प्रसंगावधान धरून त्या स्त्रीनें फिरून आपलें वाक्पाटव आरंभिलें—

"प्रभाकरपंत, आतां मी आपणाकडे आलें हा आपल्या समजुतीनें लघळपणा झालासा वाटत असेल तर याउपर माझी आप-

णाजवळ बोलण्याची इच्छा नाहीं. अशा रीतीनें आशाभंग होऊन झालेली फटफजीती सहन करणारी स्त्री मी नाहीं, हें मात्र यथें बजावून ठेवल्याखेरीज माझ्यानें रहावत नाहीं. माझ्या प्रेमाला निराश करणाऱ्या व्यक्तींचा सूड घेण्याची बुद्धि मीं कां धरूं नये? पण वचनाचा मध तोंडाला लावून केसानें गळे कापणारे लोक या जगांत आहेत ह्या गोष्टीची जाणीव तरी आज मला झाली. ”

डोळे अश्रूंनीं भरून येण्याऐवजीं त्यांत राग, द्वेष, तीव्र तिरस्कार यांचें प्रतिबिंब मात्र ओतप्रोत भरलें होतें. प्रभाकर तिचें भाषण चालू असतां अधोमुख होता, पण आतां पहातो तों तिचें जमिनीवर पडलेलें अवगुंठन वस्त्र गळ्यापर्यंत आलें असून ती चालूं लागली होती. जरा लांब गेल्यावर तिनें आपले काळे भोर डोळे मागें फिरविले तों चित्रासारखा आपणाकडे पहात असलेला तटस्थ प्रभाकर तिला दिसला.

ओळख नाहीं तरी पण विकारवश होऊन या स्त्रिया स्वतःबरोबर इतरांनाहि विकारमय करण्यास कशा प्रवृत्त होतात याचें त्यास आश्चर्य वाटत होतें. पण आपण आज या महामायेच्या वचनांत गुरफटलों याबद्दल त्याचें हृदय खेदाकुल झालें होतें.

पहातां पहातां कालिका दृष्टीआड झाली व प्रभाकरहि त्या टेंकाडापलीकडे आपल्या रहात्या जागेकडे चालूं लागला.

वरील विचित्र प्रकारासंबंधानें विचार करीत करीत प्रभाकर चालला होता. या स्त्रीनें आपल्या चंचल प्रेमाचें असें प्रदर्शन करावें याबद्दल त्याला राहून राहून आश्चर्य वाटे. प्रेम ही वस्तुच चंचल आहे, खरोखर प्रेम म्हणजे मूर्खपणा आहे, असें त्याला कळून आलें. प्रेमाची चंचलता जाऊन त्याला चिरंतन स्वरूप आलें म्हणजे त्याचें प्रेम हें नांव जाऊन भक्ति असें नांव होतें. भक्तीचा अर्थ चंचलता नाहीं. आमच्या आर्य धर्मसंस्कारानें बद्ध झालेले विवाह

हे प्रेमविवाह नाहींत. अर्थात् आमच्या पतिपत्नींच्या परस्पर प्रेमावर चंचलत्वाचा आरोप कधीं येत नाहीं. त्या प्रेमाला शुद्ध आणि सात्विक अशा भक्तीचें स्वरूप येतें. इत्यादि विचार त्याच्या मनांत घोळत होते.

एकाएकीं त्याच्या अंतःकरणामध्यें एक नवीन विचार उद्भवला. त्याबरोबर तो जागच्या जागीं स्तंभित होऊन उभा राहिला. कांहीं वेळ अशाच अवस्थेमध्यें गेल्यावर त्यानें एक दीर्घ उसासा टाकला व पुढील शब्द त्याच्या तोंडून बाहेर पडले—"अखेरीस मी देखील कांहीं अंशीं या प्रेमाच्याच जाळ्यामध्यें गुरफटून गेलों होतों ना? माझें प्रेम शुद्ध होतें, सात्विक होतें, अर्थात् त्याचें फळ मला या लोकीं नाहीं तर पुढें तरी खास मिळेल. छे! छे! छे! किती नीच मनुष्य मी? कमलिनीची माझ्यावर जी ममता होती, तिचा मीं असा अर्थ काय ह्मणून करावा? कमलिनी! तुझ्या विवाहाबरोबर पति हा तुझा देव व त्याची तूं भक्त, असें असून मीं तुला विनाकारण दुःख दिलें. या खोट्या प्रेमाच्या नादानें मी तरी कसा इतके दिवस मूर्ख बनलों होतों? छे! छे! माझ्या भक्तीचें फळ मला मिळेल. पण या प्रेमाच्या वेडगळ नादानें आर्य स्त्रियांची आपल्या पतीवरची भक्ति यत्किंचित् देखील दूर करण्याचा मीं प्रयत्न केला असा संशय घेण्याला तरी माझ्या वर्तनानें मीं कां कारण उत्पन्न केलें? शिव! शिव! परमेश्वरा, मला क्षमा कर. माझ्या हातून आणखी कांहीं गैरवर्तन घडविलें नाहींस याबद्दल मी तुझा किती ऋणी आहें!" असें बोलून तो आपल्या पर्णकुटिकेकडे चालला.

## प्रकरण सव्विसावें.

## पत्रदर्शन.

माधवरावाच्या आश्चर्याला सीमाच राहिली नाहीं. इतक्या व्यवस्थेनें ठेवलेलें पत्र आपल्या नजरेस पडल्याबद्दल तो स्वतःला धन्यवाद देऊं लागला. नुकतीच आठदहा दिवसांपूर्वीं जिनें आपली प्रभाकराच्या निवळ भेटीबद्दल क्षमा मागितली तिलाच हें प्रभाकराचें प्रेमपत्र ! छे ! माधवरावाची दृष्टि त्याला चकवीत असेल ! त्याचें संशयी मन त्याला वास्तविक स्वरूपाहून कांहीं निराळेंच दाखवीत असेल. छे ! उत्तम सुवाच्य अक्षरानें लिहिलेले ' प्रिये कमलिनी ' हे शब्द दुसऱ्या कोणत्या तरी निराळ्याच वाक्याचें भ्रामक रूप आहे का ? नाहीं, खास नाहीं. खालीं सही पहावी तर ' तुझ्या प्रेमळ नेत्रकटाक्षांचा कृपाकांक्षी ' **प्रभाकर.** ' प्रत्येक अक्षर, त्यांच्या समुच्चयानें बनलेला प्रत्येक शब्द, त्यांच्या ऐक्यानें बनलेलें प्रत्येक अर्थबोधक वाक्य, सगळें खरेंच आहे, दृष्टिविभ्रम नव्हे. खास, खास, स्त्रियांचें प्रेम ह्मणजे अळवावरचे जलबिंदु ! दिसण्यांत किती सुंदर पण क्षणभर त्यांवर टिकतील तर शपथ. कमलिनी, तूं त्या दिवशीं रात्रीं आपल्या पतीला फसविलेंस. तुला आलेल्या प्रभाकराच्या पत्रांतला मजकूरच त्याची साक्ष देत आहे.

माधवरावाचें वदन क्रोधावेशांत असंकोच झाल्यामुळें भीषण दिसत होतें. त्याचे ओठ स्फुरत असून नेत्रांत आरक्तता विलसत होती. स्त्रीस्वातंत्र्याचा भोक्ता माधवराव पतिव्यतिरिक्त अन्य पुरुषाशीं प्रेमव्यवहार ठेवणाऱ्या आपल्या पत्नीवर आज कां रागावला? तिच्या मनाचें स्वातंत्र्य हिरावून घेणारा हा कोण ? पण त्याचे ते विचार आज आतां नाहींत. त्यांना विलयाला लावून कमलिनीच्या

नांवचें पत्र हातांत घेतलेला माधवराव आतां रागांत पूर्ण रंगला होता. आणखी एकवार पत्राच्या खरेखोटेपणांची शहानिशा करण्याकरितां तो वाचूं लागला—

‘ प्रिये कमलिनी,

थोडे दिवसांपूर्वी तुझ्या माझ्या भेटीपासून उत्पन्न झालेला संशय तूं पतीचे मनांतून घालविलास हें उत्तम झालें. आपल्या प्रेमाचा भंग पतीच्या संशयामुळें न व्हावा हीच तुझ्याप्रमाणें माझीहि इच्छा. वरील हकीकतीचें पत्र तूं कालिका नांवाच्या मोलकरणीच्या हातीं पाठवून माझ्यावर जी कृपा केलीस तीबद्दल तुझा हा प्रियकर अखंड आभारी आहे. त्या मोलकरणीला तूं चांगली ताब्यांत ठेव, नाहीं तर आपल्या पत्रव्यवहाराची गोष्ट जर बाहेर फुटली तर अनर्थ गुदरेल. कमलिनी, प्रेमानें माझें अंतःकरण किती उचंबळलें आहे याची कल्पना तुला कशी व्हावी? जेव्हां तुझा माझा देह एकमेकांच्या बाहूंत एकरूप होईल तेव्हांच माझ्या हृदयाचें अंतर्ज्ञान तुला होईल. दैवानें तुझा माझा विरह साधला. प्राणप्रिये, घरांत फार जपून वागत जा. नाहीं तर व्यर्थ अनर्थावह बखेडा माजेल. तुझ्याजवळ असलेली माझी वस्तु तूं जपून ठेव. तूं चोर आहेस. हें संबोधन पाहून रागावशील, पण चोराचेंच कृत्य तूं केलेंस. माझें मन हरण करणें ह्मणजे दुसऱ्याची वस्तु उपटणाऱ्या चोराचेंच कृत्य नव्हे का? परवां तूं लिहिलेंस कीं तुला पतीचा कंटाळा आला आहे. ठीकच आहे, इच्छेविरुद्ध जी गोष्ट घडली, ज्याच्या गळीं तुला व्यर्थ पडावें लागलें,—तूं त्याला वरलेंस यांत तुझा दोष नाहीं हें मी जाणून आहें—त्याच्याविषयीं तुला कंटाळा वाटावा यांत मी आश्चर्य मानीत नाहीं. ही गोष्ट सहाजिकच आहे. शिवाय येथें तुला एक नवीन व गुप्त गोष्ट सांगावयाची आहे.

“ ज्याला तूं आपला ‘ प्रिय पति ’ ह्मणवतेस त्याचें खरें प्रेम तु-

ञ्यावर नाहीं. तें एका निराळ्याच स्त्रीवर आहे. परवां नुकताच तो प्रसंग मला माझ्या झोपडीजवळ पहायला सांपडला. त्यांचीं भाषणें व अंगविक्षेप पाहून एखाद्या प्रेमळ जोडप्याचेच विलास आपण पहात आहों असें कोणासही वाटलें असतें. तो त्या वेळीं ह्मणाला कीं, " कमलिनीला आतां कोठें तरी पाठवून देऊन तिला नेमणूक करून देतों. अशा रीतीनें तुझी उचलबांगडी झाली ह्मणजे निष्कंटक प्रेमसुख दोघेंजण भोगणार. हा त्यांचा बेत ऐकून तुला अत्यंत वाईट वाटेल. पण काय करूं ? कर्तव्य ह्मणून हें कळवावें लागलें. ज्याच्यावर तूं पति ह्मणून विश्वासली आहेस त्याचा नीच बेत अगोदर कळून तूं सावध रहावेंस एतदर्थच माझा हा प्रस्तुत प्रयत्न आहे.

" माझ्या कमलिनीचें मीं कोणत्या प्रकारें प्रिय करावें ? आज संध्याकाळीं शिवेवर असलेल्या मध्वेश्वराच्या देवळाजवळ त्या लहानशा ओढ्याच्या कांठीं भेट. भेटण्याचें अभिवचन तूं मला दिलें आहेसच. त्याचीच पुनरावृत्ति प्रेमातिशयामुळें मीं केली. क्षमा कर, पण आपल्याविषयीं कोणत्याहि तऱ्हेचा संशय न येण्यासारखें चोख वर्तन तूं आपल्या पतीशीं ठेव. कालिकेला मलीदा चारीत जा, हें निराळें सांगायला नकोच."

" तुझ्या प्रेमळ नेत्रकटाक्षांचा कृपाकांक्षी

" प्रभाकर."

त्या दिवशीं दुपारच्या वेळीं सहज कागदपत्र चाळतां चाळतां ज्या पोथीचें कमलिनी मोठ्या भक्तीनें पारायण करीत असे त्या श्रीगुरुचरित्रांत हें पत्र व्यवस्थेनें ठेवलेलें आढळलें. पत्रावर "माझी मनोहारिणी कमलिनी" अशीं हृद्भेदक अक्षरें होतीं. माधवरावाला प्रथम हा सगळा कोणा तरी कपट्याचा खेळ असावा असें वाटलें. पण विचारान्तीं—अशा प्रसंगीं विचारहि भ्रष्टच झालेले

असायचे–त्यास हें कमलिनीचेंच कापट्य आहे असें वाटलें. त्यानें बरेचदां पत्र वाचलें, पण वाचनाच्या प्रत्येक आवृत्तींत त्यास संतापाचा अधिकाधिक अतिरेक भासूं लागला.

क्रोधामुळें झालेली शून्य दृष्टि त्या पत्राकडे लावून त्यानें 'कालिके' अशी कर्कश हांक मारिली. रागामुळें सर्व शरीर कांपत होतें. क्षणार्धांत 'आल्यें' असा मंद स्वर ऐकूं येऊन दार उघडलें व एक स्त्री आंत आली. आंत येतांच माधवरावानें पत्रावरची दृष्टि काढून तिजकडे टक लावली––

"कालिके, माझें अन्न खाऊन हरामखोरी करण्याचा धंदा तूं कधींपासून आरंभलास? चांडाळणी, माझा केसानें गळा कापणारे मांगिणी, बोल, बोल, खरें काय आहे तें."

कालिकेच्या लक्षांत सर्व प्रकार आला व प्रसंगाला अनुरूप असें वर्तन तिनें ठेविलें.

"धनी साहेब–आपण अन्नदाते आहांत ही गोष्ट विसरून मी हें कर्म करीत नाहीं अथवा केलेंहि नाहीं. बाईसाहेबांनीं जेव्हां मला त्याचें पहिलें पत्र तीन दिवसांपूर्वी तिकडे पोंचवायला सांगितलें तेव्हां अन्नदात्याच्या हरामखोरीचा प्रश्न मीं त्यांच्यापुढें मांडला; पण त्यांनींच उलट मला सांगितलें कीं, आपल्याला सुद्धां अन्नदान करणाऱ्या त्या स्वतः आहेत. हुकुमाची ताबेदार मी. करूं कसें धनीसाहेब?" माधवरावाच्या रागाचें प्रमाण ओळखलेल्या त्या कावेबाज स्त्रीनें भयानें सर्व शरीर कांपविलें.

माधवराव तिच्याकडे जों जों अधिकाधिक पाहूं लागे तों तों तिला जास्तच कंप सुटूं लागला.

आपल्यावरहि चढ करणारी कमलिनी आहे असें त्याला खास वाटलें. कालिकेच्या समोर तिची रुजवात करावी व असल्या भ्रष्ट स्त्रीचा त्याग करावा असें त्याला वाटूं लागलें आणि "रुजवातीला

तूं तयार आहेस का? " असा प्रश्न तिला केला.

" महाराज, बाईसाहेबांच्या रुजवातींत त्यांनीं माझ्या म्हणण्याला साफ नाकारून झिडकारलें तर मी मात्र फुकट तोंडघशीं पडणार. माझे उगीचच मधल्यामध्यें हाल. यापुढें मी त्यांचें ऐकणार नाहीं अशी मी आपल्याजवळ शपथ घेतें, पण आपण मज गरीबावर दया करा " बोलतांना तिचे डोळे भरून आले.

" अगे पापिणी, या पूर्वीं तरी तूं माझ्याविरुद्ध शेण कां खाल्लेंस?"

" खावं लागतं कधीं कधीं " अगदीं शांत उत्तर.

पण त्यामुळें माधवराव अधिकच भडकला. त्याची दृष्टि साफ फिरली. त्यांत अमानुषता स्पष्ट दिसूं लागली. कालिकेनें आपलें हास्य सोडलें व मूळच्या रूपांतील संबधानें ती त्यास बोलूं लागली.

" माधवराव, हा कृतकर्माचा परिणाम आहे. आतां दांतओठ खाऊन आणि संतापून काय होणार? तुमचेच दांत आणि तुमचेंच ओठ. कमलिनीताई तुमच्या व तुह्मी त्यांचे. उद्यां दोघें एक व्हाल अन् माझी हाकालपट्टी होईल. ज्यानें त्यानें आपआपल्या जबाबदारीवरच सगळ्या गोष्टी करायच्या असतात व त्याचीं बरीं वाईट फळेंहि शांत मनानें त्यानेंच सहन केलीं पाहिजेत."

वरील शांतोद्गार व बुद्धिवाद ऐकून रागाच्या उष्णतेचा पारा नेत्रांच्या थर्मामिटरांतून बराच खालच्या डिग्रीवर आला, पण अंतर्ज्वलन मात्र बंद पडलें नव्हतें.

" माधवराव! अशा तऱ्हेचें नीचकर्म करण्याला मला कमलिनीबाईनीं सांगितलें तेव्हांच मी हें आपणांस कळविणार होतें. पण मला तुह्मां पतिपत्नीमध्यें वितुष्ट आणायचें नव्हतें. इतकेंहि केलें असतें, पण मला दुसरेंच एक भय वाटलें कीं, कमलिनीबाईच्या कर्माला रोध केल्यामुळें त्या मला हर तऱ्हेनें तुच्छ करून हांकलून

दिल्याशिवाय रहाणार नाहींत व तसें झालें ह्मणजे ज्या प्रियकराच्या सांनिध्यासाठीं मी हा वेष पत्करून येथें राहिलें त्याला अंतर पडणार. काय करूं ? मला अभागिनीला इकडे आड व तिकडे विहीर असें झालें आहे.

कमलिनीच्या गुन्ह्याच्या शाबितीला आतां निराळा पुरावा नको होता. माधवरावाला कालिका उर्फ आनंदीचा प्रत्येक शब्द अगदीं सत्य वाटला व कमलिनी अपराधी असल्याची बालंबाल खात्री झाली.

" माजघरांत कांहीं विणकाम करीत असतां कमलिनीच्या समोरून थोड्या वेळापूर्वीं कालिका माधवरावाच्या खोलींत शिरली व लगेच माधवरावाच्या तोंडून बाहेर पडलेले रागाचे शब्द कमलिनीच्या कानीं अर्धवट आले. थोडा वेळ जिज्ञासा दाबून ठेवल्यावर ती हातचें काम ठेवून सहज त्या खोलीच्या तोंडाशीं आली. तों रागानें लाल झालेला माधवराव तिच्या दृष्टीस पडला. कमलिनीला पहातांच तो एकदम खेकसून ओरडला--

" चल तूं आतां माझ्या समोरून निघ आतां आपलें काळें तोंड घेऊन आपल्या प्रियकराकडे चालती हो. माझा कंटाळा आला आहेना तुला ? चल निघ घरांतून, अन् आपल्या प्रियकराबरोबर निष्कंटक विलाससुख भोग. चांडाळणी, तुला निर्लज्जपणानें असले धंदे करायला वाटलें तरी काय ? हाय ! हाय ! स्त्रियांच्या पातिव्रत्यावर विश्वास ठेवणारा माणूस एक वेडा तरी असला पाहिजे नाहीं तर पशु तरी असला पाहिजे. चल चालती हो. "

कमलिनीला हा प्रकार अपूर्व होता. माधवरावाच्या शब्दांचा अर्थ न कळून तिचें काळीज दुभंग झालें. पृथ्वीनें जर आपल्या उदरांत सांठविलें तर बरें होईल असें तिला वाटलें. काय बोलावें हें तिला सुचेना.

" नुकतीच थोड्या दिवसांपूर्वीं माझ्याशीं तूं जी पाघळलीस

तें केवळ तुमचें प्रेम माझ्या दृष्टीस न पडावें ह्मणूनच ना! शाबास, चांगलें आहे माझें नशीब. माझीं पूर्व जन्मींचीं पातकें आज फळाला येत आहेत."

कमलिनीनें भीत भीत "असं रागवायला झालं तरी काय?" असा प्रश्न केला.

"चांडाळणी! अजून तरी वेड्याचें सोंग करूं नकोस. ध्यानांत धर, तुझ्या सर्व गुप्त कृत्याची मला बित्तंबातमी लागली आहे. माझ्याजवळ तुझ्या कृत्याचा लेखी पुरावा—व्यवहार घडवून आणणारा चालता बोलता साक्षीदार--आहे. हा पहा पुरावा" माधवरावानें तिच्यापुढें पत्र टाकलें.

पत्र वाचतांच कमलिनीच्या डोळ्यांपुढें अंधेरी आली. तिला हा प्रकार कळेना. "मीं प्रभाकराला पत्र पाठविलें नाहीं, त्याचें मला कधीं आलें नाहीं, अन् हें त्याच्या सहीचें पत्र तर हातांत आहे. त्यांतलीं अक्षरें माझ्या समोर आहेत. प्रत्येक अक्षराचें ज्ञान मला होत आहे. प्रत्येक शब्दाचा, वाक्याचा अर्थ मी समजत आहें. कोणच्या दुष्टाचें हें कृत्य? कोणीं हा डाव साधला?" एक नाहीं, दोन नाहीं, शेकडों—नव्हे हजारों ह्मटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं—इतके भिन्न भिन्न विचारतरंग तिच्या मनांत तेवढ्या वेळांत येऊन गेले. पत्र पाहिल्यावर ती ह्मणाली,

"हा सगळा कोण्या तरी दुष्टाचा डाव आहे. मी आपणास खरेंच जगदंबेला स्मरून सांगतें, मी निरपराधी आहें."

"जळो जळो तुमच्या जगदंबा अन् भवान्या. त्यांच्या नांवाच्या शपथा बेधडक घेऊन त्यांना आपल्या पादांत गोंवायला लाज कशी नाहीं वाटत! तूं निरपराधी असलीस तर मी गुन्हेगार असूं शकेन. बोल, कालिकेला तूं कुंटिनीचा धंदा करायला लावला नाहींस?"

" नाहीं. "

" प्रभाकराला पत्रें पाठविलीं नाहींस ? "

" नाहीं. "

या दोन्ही उत्तरांत सत्याचा निर्भयपणा पूर्ण दिसत होता. पतीच्या रागाला भ्यालेल्या कमलिनीला हे शब्द उच्चारतांना भय वाटलें नाहीं.

" छे—छे—एवढ्यानें भागणार नाहीं. या प्रकरणाचा खरेखोटेपणा पहाण्याकरितां मला प्रभाकराकडेच गेलें पाहिजे. दे तें पत्र इकडे. मला जाऊं दे. त्यांत खरेपणा आहे असें वाटल्यास त्याचा सूडच घेतला पाहिजे. मी घेणारच. तुह्मी अगोदर येथून जा पाहूं. "

शेवटली सूचना कालिका आणि कमलिनी या दोघींनाहि मिळाली.

जाण्याची सूचना मिळाल्यावर कालिका तेथून निसटली पण कमलिनीचें मन तिला पत्याज्ञेचें उल्लंघन करण्यास तयार करीत होतें. पत्र लिहिणाराचा सूड घ्यावा अशी तिची इच्छा होतीच, पण प्रभाकरावर त्या पत्राचें लेखकत्व जबरीनें लादून त्यावर निष्कारण सूड उगविण्याची क्रूर इच्छा पतीप्रमाणें तिला मान्य नव्हती. पतीची क्रुद्ध मूर्ति तिच्यासमोर होती. माधवराव बाहेर जाण्याची तयारी करीत होता. पोषाख चढविल्यावर त्यानें एक भिंतीतलें फडताळ उघडून हातांत पिस्तुल घेतलें. या भयंकर प्राणहारक शस्त्राच्या दर्शनानें कमलिनीच्या डोळ्यांसमोर विलक्षण देखावे दिसूं लागले.

" काय ? जरा माझं ऐकायचं का ? " बोलण्याच्या पहिल्या प्रयत्नांतच माधवरावानें आपल्या वर्तनानें खंड पाडला.

" खबरदार प्रभाकराबद्दल एक चकार शब्द उच्चारशील तर. तुला आतांच्या आतां—" भाषणाची पूर्णता दांत ओठ खाण्यांत

झाली. माधवराव दारापर्यंत आला. बाहेर जाऊं देण्याविषयीं त्यानें तिला नजरेनें खुणावलें, पण ती तेथून हलली नाहीं. पतीच्या रागानें लाल झालेल्या निष्टुर चर्येकडे तिच्यानें पहावेना. माधवराव तिच्या केविलवाण्या दीन मुद्रेची कींव येण्याइतका ताळ्यावर नव्हता. प्रभाकर हा आपल्या पत्नीशीं नीच संबंध ठेवणारा पापी पुरुष आहे व आपल्यावर प्रेम असल्याचें दर्शविणारी कमलिनी कुलघातक नीच स्त्री असावी, असली विलक्षण दृढत्व पावलेली कल्पना त्याच्या मनांत आतां होती.

कमलिनीला त्याच्या मनांतले सगळे विचार कळणें जरी अशक्य होतें तरी पण त्याच्या एकंदर चेष्टांवरून तो कांहीं तरी घातक कृत्याला निश्चयपूर्वक प्रवृत्त झाला आहे असें तिला पुरें कळलें. एकवार साधल्यास प्रयत्न करावा एवढ्याच इच्छेनें मृदु भाषणाचा मार्ग तिनें सोडून दिला. त्याच्या क्रोधाला शमविण्याकरितां तिनें त्याचे एकदम पाय धरले.

" इकडून थोडं तरी माझं बोलणं ऐकणं होईल का ? " पतीशीं बोललेले हे तिचे शेवटचेच शब्द. आपल्या पत्नीच्या करुणामय भाषणाचा माधवावर परिणाम होऊं लागला. त्याच्या कपाळाच्या आंठ्या व भीषण भ्रूसंकोच आतां नाहींसा होऊन त्यावर सौम्यता क्षणमात्र झळकली. पण कमलिनीविषयीं मनानें एकदां वाईट घेतल्यामुळें हिचें भाषण ऐकत बसल्यास कदाचित् आपल्या मोहक वाणीचे जाळ्यांत आपणास ही अडकवील, नेत्रांत अश्रु दाखवून आपल्या हृदयास पीळ पाडील, छे ! छे ! आपला बेत सुद्धां लयाला नेण्याइतकी मोहिनी हिच्यांत आहे, या विचारानें त्याची सौम्यता विराली. पदतळीं करुणा भाकणाऱ्या स्वस्त्रीला लाथाडून निघून जाण्याइतकी निष्ठुरता त्याच्या मनांत आली, व इंद्रियेंहि त्या निष्ठुरतेलाच अनुसरलीं.

थोड्या वेळानें कमलिनीनें डोकें वर केलें तेव्हां त्या स्थळीं आपण एकटीच असल्याचें तिला आढळून आलें.

---

## प्रकरण सत्ताविसावें.

## आकास्मिक घात.

आपल्या करुणापर याचनेचा धिक्कार करून पति गेले. प्राणघातकच पत्र तें! त्याचा विचार करीत कमलिनी मोठ्या कष्टानें घरांत जाऊन रडूं लागली. स्वतःच्या नाशाकरितां ज्या दुष्टानें हा नीच प्रयत्न केला असेल त्यास शेकडों शिव्या शाप त्या स्त्रीनें दिले असतील. तिच्या मनाला शांति वाटेना. या पापी माणसाला पतीसमोर आणून त्याच्या तोंडून जर त्याच्या दुष्ट कृत्याचा पाढा वाचविला व आपलें निर्दोषित्व पतीसमोर स्थापित केलें तर फार चांगलें होईल असें तिला वाटत होतें. पत्रांत कालिकेनें पत्रवाहकाचें काम केलें असें लिहिल्याचें स्मरत होतें म्हणून तिनें त्या कालिकेला हांक मारली, पण ती घरांत कोठें होती? आसपास चोहोंकडे शोध केला पण त्याचा उपयोग झाला नाहीं. नंतर घरांत कोणीच नाहीं असें पाहून ती स्वतःशींच विचार करूं लागली.

कमलिनीचें लग्न झालें त्यावेळीं तिला पतिसुखाची कल्पना येण्याइतकी ती मोठी नव्हती. प्रभाकराशीं आपला विवाह होईल असें तिच्या कानीं पुष्कळदां आलें होतें. लग्न झाल्यानंतर जेव्हां तिला पतिसुखाची कल्पना आली तेव्हां कौमार्यांत ऐकलेल्या गोष्टी तिच्यापुढें उभ्या राहून प्रभाकराशीं जर आपलें लग्न झालें असतें तर आपण कोणच्या परिस्थितींत असतों इत्यादि गोष्टींचा उगीच शून्य विचार करण्यांत ती आपला वेळ कधीं कधीं घालवीत असे. परंतु प्रभाकर आपणास भेटल्यास आपल्या पातिव्रत्यापासून यत्किंचितहि

मराठी ग्रंथालय स्थापना

ढळण्याइतकें तिचें मनोधैर्य कमकुवत नव्हतें. आर्यस्त्रीच्या चारित्र्याला अनुरूप ती पतीविषयीं पराकाष्ठेची हितैकदक्ष असे व त्याला आपल्या हातून कोणताहि त्रास न पडावा अशी खबरदारी घेण्यास नेहमीं तत्पर असे.

माधवरावामध्यें इतर बहुतेक गुण असतांहि त्या सर्वांवर विरजण पाडणारा एक मत्सराचा दुर्गुण फार वाईट होता. यांतच तारुण्याचा दम अंगीं वसत होता. त्याचा परिणाम साहजिक कोणतेंहि काम करतांना विचार न करण्यामध्यें होत असे. एरवीं किती सालस व मनमिळाऊ असलेला माधव प्रसंगीं इतका बेताल होत असे कीं, त्याला त्या वेळीं आवरणें ह्मणजे फारच कठिण काम असे. लहानपणापासून त्यास सहज आवरून धरून धिमेपणानें काम करावयास लावणारें वडील माणूस कोणीच शिरावर नव्हतें. त्यामुळें त्याचा बेफामपणा क्वचित् प्रसंगीं तीव्र प्रमाणावर दृष्टीस पडे.

पित्याच्या निवडणुकीनें पसंत ठरलेला पतिच आपणास जन्मोजन्मीं लाभावा व ईश्वरानें प्रभाकराचें कल्याण करावें अशी कमलिनीची ईश्वराजवळ सदैव प्रार्थना असे. प्रभाकरापेक्षां कांहीं बाबतींत नव्हे, सर्व बाबतींत, माधवराव तिला जास्त प्रिय असणार व त्याप्रमाणें होताहि. एखादे वेळीं विचाराच्या भरांत जरी प्रभाकराशीं मागें होऊं घातलेल्या आपल्या विवाहाच्या काल्पनिक स्थितींत व आतांच्या प्रत्यक्ष स्थितींत ती तुलना करी, तरी पण तिच्या मनांत प्रभाकराविषयीं अगदीं निर्मल व निष्कलंक प्रेम वास करीत होतें.

अलीकडे तिच्यावर एक दोनदां पतीच्या निष्कारण शंकेचीं जीं अरिष्टें ओढवलीं तीं तिच्या अंतःकरणाला कायमचीं झोंबल्यासारखीं झालीं होतीं. त्यांतून आजचें प्रकरण विकोपास गेल्यामुळें तर तिला जीव नकोसा झाला. माधवरावाच्या हातीं एक विलक्षण

पत्र पडावें, त्यांत आपला, कालिकेचा, प्रभाकराचा व पतीचा भिन्न भिन्न संबंध गोंवला जावा हें सर्वच कांहीं विचित्र होतें.

खरोखर पाहूं गेलें असतां त्यांत कमलिनीचा संबंध कितपत होता हें एक ईश्वरासच ठाऊक! क्रमाक्रमानें या सर्व गोष्टींचा उलगडा पडायचाच आहे.

वाचकहो, सांप्रत कमलिनीला दुःखातिरेकानें रडत असलेली अशी माजघरांत सोडून आपण दुसरीकडे जाऊं.

* * * *

" आपल्या कुलदेवतेचें स्मरण कर अन् मरायला तयार हो, वेळ दवडूं नको. "

प्रभाकर आपल्याशींच विचार करीत एकटाच झोंपडींत बसला होता. इतर मंडळी कोठें तरी बाहेर गेली होती. कमलिनीचा व आपला होऊं घातलेला संबंध दैवाच्या तडाख्यानें तुटला, मुकुंदरावांचा चमत्कारिक मरणानें आयुर्नाश झाला, सरस्वतीची स्थिति अजून लोकांच्या उघडकीस आलेली नाहीं, अशा स्थितींत आतां पुढें करायचें काय? या विचारांत त्याची मति मग्न झाली होती. आजन्म अविवाहित राहून जनहितार्थ देह कारणीं लावायचा हा आतां त्याचा दृढनिश्चय झालेला होता. समाजांत रूढ असलेल्या जुन्या चालीरीति, आजची परिस्थिति, त्यांत होण्यासारखी हितावह सुधारणा, सुधारणेच्या नांवावर मोडत असलेल्या विघातक गोष्टी, पूर्वपरंपरा व नूतन प्रचलित व्यवहारांत परस्पर सदोषनिर्दोषतेची तुलना, समाजाचे धुरीण होण्याला लागणारीं साधनें व त्याची प्रचंड जबाबदारी यांसारख्या अनेक गोष्टींचा विचार करण्यांत सध्यां तो गढला होता. कमलिनीचा विचार त्याच्या हृदयांतून गेला नव्हता. तिच्याशीं आपण ठेवलेला एकदोन वेळचा व्यवहार प्रांजलपणें तिच्या पतीच्या कानीं जातीनें घालून

त्याबद्दल माधवरावाची सपशेल माफी मागून पतिपत्नीच्या एकात्मक संबंधांत विघातक अथवा गैर दिसणाऱ्या आपल्या वर्तणुकीच्या पापाचें क्षालन करून घ्यावें असा त्यानें बेत ठरवला. शिवाय त्याबरोबरच आपला पूर्वसंबंध व मध्यंतरीं गुदरलेला प्रसंग कानीं घालून मोकळ्या मनानें आपल्या या अवशिष्ट सुहृद्धर्माची रजा घेऊन आपलें कार्य करण्यास समाजांत शिरावें असें त्यानें ठरविलें. या योगानें स्वतःविषयीं व कमलिनीविषयीं माधवरावाचें मन निष्किल्मिष होईल अशी त्याची रास्त समजूत होती.

कमलिनीविषयीं त्याला आतां निर्मल प्रेमाशिवाय कांहींच वाटत नव्हतें. सोदर व निष्कपट बहीणभावांत जी आदरबुद्धि व प्रेम नांदावें त्याचा मासला प्रभाकर–कमलिनीच्या संबंधांत होता.

विचारांत एकतान होऊन बसला असतां शिरोभागीं निर्दिष्ट केलेले क्रूर शब्द त्याचे कानीं आले. वरील निष्ठुर व घातसूचक शब्दांचा उत्पादक माधवराव झोंपडीच्या दारांत आपल्यावर पिस्तूल रोखून उभा असलेला प्रभाकराच्या दृष्टीस पडला. त्या दोघांची दृष्टादृष्ट होतांच माधवराव पुढें सरसावला व आवेशांत त्यास म्हणाला—

" प्रभाकरपंत, इहलोकींच्या न्यायदृष्टीनें तुह्मी एका घोर पातकाचे जबाबदार आहांत. ( पत्र पुढें टाकून ) पहा त्याचा पुरावा. नीट वाचून पहा व सद्विचाराला ही गोष्ट कितपत पटते तें सांगा. लवकर वाचा व खरा खोटा जबाब देऊन मरणाला सिद्ध व्हा. "

प्रभाकरानें तें सर्व पत्र अक्षरशः नीट वाचलें व त्याचें मन बावरलें. परंतु क्षणार्धांत तो शांतचित्त झाला. त्या पत्राची तर्काच्या कसोटीनें शहानिशा करून घेण्याच्या उद्देशानें तो अगदीं धिम्मेपणानें ह्मणाला– " माधवराव, पत्रावरून ही गोष्ट सिद्ध होऊं शकते का ? "

"होय अलबत्!"

"हें पत्र माझेंच असें तुह्मीं कशावरून ताडलेंत? हें पत्र लिहिणारा मीच याला कांहीं पुरावा आहे का?"

"त्यावर तुमची सही आहे ना? यापेक्षां आणखी पुरावा तो काय पाहिजे?" माधवराव दांतओठ खात चिडून ह्मणाला.

"सहीनें ही गोष्ट सिद्ध होत नाहीं. या पत्रांतलें अक्षर माझेंच कशावरून? कांहीं आधार आहे का?"

प्रभाकराच्या शांत बोलण्यानें माधवराव जास्त चवताळला.

"प्रभाकरपंत, अशा लपंडावानें तुमच्या कृत्याबद्दल प्राण-घाताचें प्रायश्चित्त द्यायला मी विसरणार नाहींहो. पक्कें लक्षांत ठेवा."

"पण मी कोठें मरणाला भितों आहें? मला मरण्याला कारण काय हें तर कळूं द्या अगोदर. तुमचें शस्त्र सज्ज असूं द्या."

"तुह्मीं कमलिनीशीं बेकायदेशीर चोरटा संबंध ठेवला ह्मणून. हाच गुन्हा व माझ्या स्थितींत तुह्मी हीच शिक्षा देण्यास तयार झालां असतां. आपल्या स्त्रीचे चाळे—असले चाळे—अब्रूला हरताळ लावणारे खेळ सहन करण्याइतकें निलाजरें मन कोणत्याहि हिंदूचें नाहीं.

प्रभाकर हंसूं लागला.

"पति हेंच आद्य उपास्य दैवत अशी ज्या आर्य स्त्रियांची अगदीं उपजत पवित्र कल्पना असते त्या पतीच्या विरुद्ध एखाद्या तिऱ्हाईत माणसाशीं असला निलाजरा संबंध ठेवतील हेंच अगोदर संभवनीय नाहीं. ही आर्य स्त्रियांची सर्वसाधारण गोष्ट झाली. पण प्राचीन ऋषिवर्यांनीं जगांतील इतर स्त्रियांच्या स्वभावावरून त्यांच्यावर चंचलतेचा एक सर्वसामान्य आरोप ठेविला आहे, तेवढ्यावरून कमलिनी पतीशीं बेइमान झाली अशी तुमच्याप्रमाणें

कल्पना केली तरी हा बेइमानीचा संबंध माझ्याशीं जोडला गेलेला असल्यामुळें मी तरी तिच्याविषयीं खात्रीनें निक्षून सांगतों कीं, तिचा माझ्याशीं अगर माझा तिच्याशीं कोणच्याहि तऱ्हेचा नीच संबंध नाहीं व नव्हता. तुह्मी जर स्वतःला हिंदु आर्य समजतां तर तीहि आर्य स्त्री हिंदुच आहे हें बरोबरच लक्षांत ठेवा. कमलिनीविषयीं भलतीच शंका जर तुह्मी घेऊं लागलां तर तुह्मीं तिच्या स्वभावाची पारखच केली नाहींत असें मी खास सांगतों.

"तुह्मी परके इसम, तिला मागील दारीं परसांत भेटलां व ती तुमच्याशीं निःशंकपणें बोलली एवढीच गोष्ट तिच्याविषयीं शंका घ्यायला पुरे आहे. बोला, तुह्मी तिला भेटलां होतां कीं नाहीं?"

"मी परका इसम असें ठरल्यावर मग तुमच्या शंकेला जागा आहे. पण माधवराव! माझा व तिचा संबंध तुह्मांला ठाऊक नसतां एकदम त्याविषयीं भलभलतीं मतें ठोकून द्यायला तुह्मांला कांहींच कसें वाटत नाहीं?"

"तुमच्या चोरभेटीच तुमचा संबंध—खरा संबंध—व्यक्त करीत आहेत ना?"

"जरा शांतपणा धराल तर मग चोरभेटीचें प्रयोजन कळेल. कमलिनी ही माझी सख्खी नव्हे पण त्याहून अधिक अशी धर्माची बहीण आहे. परवां ज्यांना आत्महत्या करून घ्यावी लागली ते गृहस्थ माझे पोषक, मी त्यांचा मुलगा नव्हे. मी व कमलिनी एकदम एकाच घरीं वाढलों. दोघांचें एकमेकांविषयीं निःसीम प्रेम. सारांश, दोघेंहि सहोदर नसल्यामुळें आमच्यांत विवाहसंबंध व्हावा असा मुकुंदराव व त्यांची बहीण सरस्वतीबाई यांचा बेत. पण दैवानें आमच्या सहवासांत खंड पाडल्यामुळें तो संबंध अंतरून ती सध्यां आपली अर्धांगी आहे. अर्थात् तिचा व

माझा संबंध अगदीं प्रेमळ बहीणभावंडासारखा निकट आहे. जिला एकदां बहीण मानली, तिच्याशीं नीच संबंध ठेवण्यास एकहि खरा हिंदु धजणार नाहीं. मी आर्यसंस्कृतीचा व पूर्वपरंपरेचा अभिमानी आहें. या पत्रांत लिहिल्याप्रमाणें कमलिनी आपल्या पतीचा तिटकारा करील हें कधींच संभवनीय नाहीं. हें अक्षर माझें नव्हे व ज्या माणसाला आह्मी एकमेकांमध्यें पत्रें धाडण्याचें काम करण्याचें योजिलें असें यांत लिहिलें आहे तें माणूस माझ्या विशेष ओळखीचें नाहीं. परंतु त्याचा स्वभाव व चालचलणूक माझ्या पूर्ण माहितीची झाली आहे. ती स्त्री सुशिक्षित दिसते, पण अत्यंत प्रेमवेडी असून चंचल आहे, याचे प्रत्यक्ष पुरावे मला ठाऊक आहेत.

"हें पत्र मीं लिहिण्याऐवजीं तुमच्या हलक्या मनाचा फायदा घेऊन माझ्या व कमलिनीच्या ओळखीच्या विपर्यासानें सगळ्या संसाराचा नाश करण्याचे हेतूनें एखाद्या दुष्टानें लिहिलेलें दिसतें; व मला एकंदर विचारावरून हें कृत्य त्या बाईचेंच असावें असें वाटतें. तुमच्याशीं तिनें दाखविलेलें प्रेमलाघव मला स्मरत आहे व ज्या स्त्रीनें एके दिवशीं संध्याकाळीं इथल्या झाडींत सगळ्या विश्वाला आपल्या प्रेमाचे साक्षीदार करण्याचा प्रयत्न केला तीच स्त्री आपल्या प्रेमाचा फांस माझ्या गळ्याभोंवतीं घालण्याकरितां येथें आली होती. तिनेंच तुह्मां पतिपत्नींच्या संसाराचा नाश करण्याचा हा प्रयत्न केला असावा. माधवराव! आतां मी तुह्मांला माझ्यावर हत्यार चालवून माझा प्राणघात करण्यास परवानगी देतों. पण त्यापूर्वीं एक गोष्ट मात्र तुह्मांस वारंवार सांगून ठेवतों कीं, ज्या पित्याच्या व मातेच्या शिक्षणाखालीं ती वाढली त्यांच्याकडे पाहून तरी तुह्मी असल्या शंका कुशंका घालवा. मी मरणाला निर्धास्तपणें कां तयार झालों असें जर विचारीत असाल तर सांगतों, मला माझ्या आयुष्याचा कंटाळा आला आहे; व विशेषतः ज्याच्या अस्तित्वानें

कमलिनीसारख्या साध्वीचा छळ अथवा सुखाची माती होण्याचा प्रसंग आला, त्याला इहलोकावर जास्त दिवस वास्तव्य करूं देणें कधींच इष्ट होणार नाहीं. माझ्या मतानें मला कमलिनीविषयीं जें वाटतें तें सांगितलें. याउपर तुम्ही समर्थ आहांतच. हं, चालवा हत्यार, उडवा पिस्तुल!"

प्रभाकराच्या या शांत बुद्धिवादानें माधवरावाचा खून करण्याचा निश्चय ढळला. त्याच्या हातांतली संतापामुळें उत्पन्न झालेली रग जिरली. शरीराचा ताठरपणा नाहींसा झाला व पिस्तुल हातांतून गळून खालीं पडलें. त्याबरोबर उघडलेला घोडा मिटला व एकदम मोठा धडाका उडून झोपडी धूम्रमय झाल्यानें प्रभाकर व माधव एकमेकांस दिसेनासे झाले. पिस्तुलाच्या धडाक्याबरोबर झोंपडीबाहेर एक किंकाळी ऐकूं आली. धूर निवळला व प्रभाकर आणि माधव एकमेकांकडे आश्चर्यानें पहात उभे राहिले. फिरून कण्हण्याचा ध्वनि ऐकूं आला व झोंपडीमागून "प्रभाकरपंत, प्रभाकरपंत" अशा हांका ऐकूं आल्या. प्रभाकरानें झोंपडीच्या पिछाडीस पाहिलें तों झोपडी पेटलेली. कर्तव्यमूढ होऊन तो इकडे तिकडे पाहूं लागला तों त्यास खालीं पायाशीं पडलेलें पिस्तूल दिसलें. त्याच्या नळींतून अजून धुराच्या अंधुक लकेरी निघून हवेशीं एकरूप होत होत्या. पुन्हां कण्हण्याचा सूर व आपल्या नांवाच्या हांका प्रभाकरास ऐकूं आल्या. त्यानें दरवाज्याबाहेर तडक धूम ठोकली. बावरलेला माधवहि त्याच्यामागून पळाला. त्याच्या पश्चात् एक व्यक्ति घाईनें आंत शिरली व पिस्तुल घेऊन चालती झाली.

---

## प्रकरण अठ्ठाविसावें.

## ओळख पटली.

झोंपडीपासून थोडक्याच अंतरावर एका झाडाखालीं नारायण ओणवा झालेला असून जमिनीवर एक स्त्री मरणोन्मुख झालेली प्रभाकराच्या दृष्टीस पडली. जवळ जाऊन पहातो तों ती स्त्री दुसरी कोणी नसून सरस्वतीबाईच होती. प्रभाकरानें जवळ जातांच नारायणाला घाईघाईनें सरस्वतीबाईच्या या अत्यवस्थेचें कारण विचारलें. तेव्हां जवळून कोठूनसा पिस्तुलाचा बार ऐकूं आला व त्याची गोळी सरस्वतीबाईला लागली असें त्यास कळलें. पिस्तुलाचा मार बरगडीखालीं पोटांत बसल्यामुळें त्या जखमेंतून रक्तस्राव जोरानें चालला होता व त्यामुळें वेदना दर्शविणारी हातापायांची चळवळ क्षणोक्षणीं क्षीण होत चालली होती. माधवरावाला हा सगळा प्रकार कळला व त्याला आत्मनाश जवळ आला असें वाटलें. घडलेल्या गोष्टीच्या चमत्कारानें त्याचा मेंदु बिघडण्याचीं लक्षणें होऊं लागलीं. पण प्रभाकरानें त्यास शहाणपणाचे चार शांत शब्द बोलून धीर देण्याचा प्रयत्न चालविला.

प्रभाकर व नारायण यांच्या प्रयत्नानें रक्त बंद होऊन बेशुद्धि गेली व सरस्वतीनें डोळे उघडले. समोर उभा असलेल्या माधवरावाला पहातांच तिच्या तोंडून " माधवराव, तुह्मी इथें कुठें ? " असे आश्चर्यमूलक शब्द बाहेर पडले. माधवरावानें त्या बाईकडे न्याहाळून पहाण्याचा प्रयत्न केला. " आपण कोण, सरस्वतीबाई ? " असा प्रश्न त्यानें केला.

" कमलिनी तर खुशाल आहेना ? माधवराव, असे रडतां कां ? अहो कमलिनीला तर कांहीं बरें वाईट झालें नाहींना ? सांगा सांगा असे रडतां कां बरं ? माधवराव—" हीनबल सरस्वतीला प्रत्येक

शब्द उच्चारण्याला किती तरी श्रम झाले, कष्टानें तिला आतां बोलवेना व त्यांतच हृदयाची आतुरता भरली.

" सरस्वतीबाई, तुमचा घात माझ्या हातून झाला हो! दैवानें माझा गळा कापला.—मी सर्वस्वी बुडालों. हाय हाय!! हा काय भयंकर प्रसंग! माधवराव मोठ्यानें रडूं लागला.

सरस्वतीबाईचे डोळे निष्प्रभ होत चालले. त्यांनीं डोळे गच्च मिटले. माधवरावाच्या अंतःकरणांत भयाण विचार वावरूं लागले. केलेल्या घाताचें देहान्त प्रायश्चित्त घेण्यास आपण आतां सिद्ध व्हावें असें त्यास वाटलें व त्या भरांत " सरस्वतीबाई तर आह्माला सोडून चालल्याच, पण प्रभाकरपंत, त्यांच्या मरणोत्तर तयारीबरोबर माझीहि चिता रचण्याला सिद्ध व्हा " असें तो ह्मणाला.

सरस्वतीनें पापण्या उघडल्या. व आंतले मरणाची छाया असलेले निस्तेज डोळे फिरून सर्वांच्या दृष्टीस पडले. तिचे ओठ स्फुरूं लागले,—" माधवराव कमलिनी खुशाल आहेना? तिला कांहीं मूलबाळ झालें का? "

माधवरावांनीं होकारार्थीं उत्तर दिलें.

" माधवराव, तुह्मी सर्वजण आपआपल्या घरीं सुखानें नांदा. ईश्वर तुमचें कल्याण करो. पण ( नारायणाकडे तिनें आपलें निःशक्त बोट उचललें ) माझ्या बाळाला मात्र तुह्मी कोणी अंतर देऊं नका! "

प्रभाकर, माधवराव व नारायण सुद्धां आश्चर्यानें थक्क झाला.

" माधवराव, प्रभाकर, आश्चर्य वाटूं देऊं नका. माझें बाळ नारायणा, असा जवळ बस रे. तुझ्या पाठीवरून मला एकदां तरी शेवटचा हात फिरवूं दे रे. हा माझा बाळ अगदीं लहानपणीं अंगावर दागिने घालून दाराबाहेर रस्त्यांत खेळत असतां नाहींसा झाला. पुष्कळ शोध केला पण पत्ता नाहीं. शेवटीं आह्मी निराश

झालें. माझ्या ३।४ मुलांत एवढाच बाळ जगला ह्मणून मीं त्यास हौसेनें बाळलेणें घातलें. पण तेंहि मला लाभलें नाहीं. यानें परवां जेव्हां चोरांच्या टोळींतली स्वतःची हकीकत सांगितली, तेव्हांच मला संशय आला. पण आज त्याची खात्री झाली. " बाळ, तुझ्या गळ्यांतला ताईत कुठें " सरस्वती प्रेमानें आपला क्षीण हात नारायणाचे पाठीवरून फिरवीत होती. नारायणानें दंड चांचपला पण त्यास तो हातीं लागला नाहीं.

" चोरांनीं माझ्याजवळ ठेवलेली इष्टेट तेवढीच होती. पण तीहि आतां हरवली. " नारायण ह्मणाला.

" नारायण, हरवली नाहीं—तो ताईत मला सांपडला. हा पहा तो. हा आज सकाळीं मला सांपडला व त्यामुळें नारायणा, तूं माझा मुलगा ठरलास. बाळ, हा ताईत ज्या देवाच्या नांवानें तूं आह्मांला लाभलास त्याचा आहे. हीं पहा त्यावर—तिकडचें नांव—" सरस्वतीच्या निस्तेज चेहऱ्यावर लज्जेची लाली चढली व क्षणैक त्यास उज्ज्वलत्व आलें. " तिकडच्या नांवचीं अक्षरें आहेत. " सर्वांच्या दृष्टीखालून तो ताईत गेला व त्यांनीं त्यावर ' पांडुरंगपंत ' अशीं अक्षरें वाचलीं.

ज्या ताईतानें आपली व आपल्या बाळाची निर्वाण प्रसंगीं ओळख पटविली, त्याचें सप्रेम चुंबन घेण्यासाठीं सरस्वतीबाईच्या क्षीण हातांनीं त्यास ओठापर्यंत नेलें—त्याचें चुंबन घेतांना तिच्या डोळ्यांतून कांहीं अश्रु आले.

" माधवराव, प्रभाकर, माझ्या नारायणाला—याचें पूर्वीचें नांव यशवंत आहे— हा सध्यां चोरांत वाढल्यामुळें निरक्षर आहे. त्याला चांगलें शिक्षण देऊन प्रेमानें वाढवा. बाळा, प्रभाकरा, माधवरावा, एकमेकांला अंतर देऊं नका बरं. माझ्या कमलिनीचें व तिच्या बाळाचं संगोपन चांगलें करा. माझे प्राण आतां व्याकुळ होऊं लागले

आहेत.—र—डूं नका—एकमेकांला सं—भाळा—देव तुमचं रक्षण—क—रो—दे—"

सरस्वतीबाईचा व्यक्त आत्मा अव्यक्तांत मिसळला. त्यांचा देह 'काष्ठलोष्ठवत्' होऊन भूमीवर पडला होता. निर्वाणकाळीं आशीर्वाद देतांना त्यांच्या चेहऱ्यावर विलसणारा तेजोमय उत्साह त्यांच्या निर्जीव स्थितींतहि चेहऱ्यावरून ढळला नव्हता. शांततेंत देह ठेवणाऱ्या एखाद्या विराग्याप्रमाणें त्यांची चर्या शांत व निर्विकार होती.

प्रभाकराला आपल्या आतेची, माधवाला आपल्या सुशील सासूची व नारायण उर्फ यशवंताला आपल्या अज्ञात मातेची ओळख पटल्यानें त्यांस निरनिराळ्या प्रकारचा शोकसंताप झाला होता. नारायणाला मोहानें व्यापलें व मातेकरितां तो आक्रोश करूं लागला.

हा वेळपर्यंत झोंपडीचा बराच भाग जळून गेला होता. पिस्तुलाची गोळी स्थानभ्रष्ट झाल्यावर तिनें आपला ज्वलन मार्ग मागच्या झाडपाल्याच्या भिंतींतून काढला. घराकडे परत येणाऱ्या नारायण-सरस्वतीच्या दुक्कलीमधून मृदुल स्त्रीदेहाच्या अंतर्भागीं ती प्राणहारक गोळी प्रवेशली होती.

दुःखाचा परिहार करून पुढच्या कार्याला लागणें इष्ट असतांहि त्यांपैकीं एकहि जण तेथून हलेना. शेवटीं प्रभाकरानें स्वतःचा शोक आवरला व तो नारायणाला समजावूं लागला. माधवराव त्या मृतदेहाकडे पाहून अनिमिष अश्रुस्राव करीत होता. नारायणानें मातेच्या वक्षःस्थलावर आपलें शिर टेकलें होतें. प्रभाकराच्या शब्दांनीं त्याचा शोक न रहातां उलट त्यास तीव्रता मात्र आली.

"माधवराव, आतां शोक करून काय होणार? उत्तरकार्याला लागायला नको का? चला उठा, असे बायकांसारखे रडत बसल्यानें कांहीं होणार नाहीं. सगळेच आपण समदुःखी आहोंत.

माधवरावानें उठण्याचा मानस न दर्शविल्यामुळें प्रभाकरानें

आपलें भाषण पुढेंच चालविलें. पण तें माधवरावाच्या सदसद्विवेकबुद्धीला न पटल्यामुळें तो बरळूं लागला—

"प्रभाकरपंत, सरस्वतीबाईच्या मरणाबरोबर आमची इहलोकची यात्रा संपली असें समजा. कमलिनीबद्दल व तुमच्याबद्दल मीं जे संशय घेतले व तुह्मांला व तिला ताप दिला त्याबद्दल मी क्षमा मागतों. माझ्यावर दया ठेवा. सरस्वतीबाईच्या हत्येचें पातक आतां जन्मोजन्मीं सुटणार नाहीं. त्या साध्वीची निष्कारण हत्या—"

"माधवराव, तुह्मी जाणून बुजून जी गोष्ट करण्याचा प्रयत्न केला नाहीं त्याबद्दल स्वतःला विनाकारण दोष लावून घेणें इष्ट होणार नाहीं. चला, व्यर्थ शोक करूं नका." प्रभाकर बोलला.

"छे! छे!! छे!!! मीच या हत्येचा कर्ता व मीच याचें प्रायश्चित्त भोगणार." त्यानें एकवार सभोंवार पाहिलें.— "पिस्तूल पिस्तूल? कोणच्या दुष्टानें माझें हत्यार लांबविलें?" असें ह्मणत ह्मणत तो उठला व पळत सुटला. प्रभाकरहि त्याच्या मागोमाग धांवला. नारायण हा वेळपर्यंत मातेच्या हृदयावर डोकें ठेवून बसला होता. पण कांहीं तरी पहाण्याच्या उद्देशानें त्यानें डोकें वर काढलें व समंतात् पाहिलें तों झोपडीच्या दिशेनें प्रभाकर व माधवराव यांची धांवपळ चाललेली त्याच्या दृष्टीस पडली. त्याला कित्येकदां उठावेंसें वाटे, पण मातृदेह रानांत टाकून जाण्यास त्याचें मन धजावेना.

पहातां पहातां जळत्या झोंपडींतून माधवराव बाहेर पडला. 'पिस्तूल चोरलें' 'हाय हाय' असें ओरडत तो पळत असल्याचें नारायणानें पाहिलें. प्रभाकर मागें होताच. माधवरावाला धरण्याच्या बेतांत तो होता पण तेवढ्यांत ठेंच लागून जमिनीवर आदळला. माधवराव त्याच्या सपाट्यांतून निसटला व नाहींसा

झाला. प्रभाकर जरा वेळानें शुद्धीवर येऊन उभा राहिला व "माधवराव कुठें आहे ?" ह्मणून मोठ्यानें ओरडला. पण दीर्घ प्रतिध्वनीखेरीज त्याच्या प्रश्नाला कांहींच उत्तर मिळालें नाहीं. प्रभाकर परत फिरला व सरस्वतीजवळ येऊन पोंचला.

आत्मघाताला प्रवृत्त झालेला माधवराव हातचा सुटलेला, सरस्वतीबाईचें अवसान झालेलें आणि नारायणाची जबाबदारी अंगावर पडलेली. अशा स्थितींत कितीहि कार्यधुरंधर बहादूर असता तरी त्याला कर्तव्यमूढता आली असती. मग प्रभाकर तर अल्लड तरुण होता. त्याला कार्याकार्यविचार सुचेना यांत नवल काय ? सरस्वतीबाईजवळ आल्यावर तोहि रुदन करूं लागला व त्यांतच बराच वेळ गेला. या त्याच्या एकाग्र रुदनाला अडथळा करणारे पिस्तुलाचे एकामागून एक असे थोडक्या वेळाच्या अंतरानें दोन बार त्याच्या कानीं पडले. त्या दिशेला वातावरणांत पसरलेल्या धुराच्या रोखानें तो तेथून निघाला.

## प्रकरण एकोणतिसावें.

## माधवराव आणि आनंदी.

प्रभाकरानें पकडण्याचा प्रयत्न केला तरी पण माधवराव त्या वेडाच्या भ्रमांत जो पळाला तो मधुपुराच्या मर्यादेंतील एका शेताच्या कांठापर्यंत पोंचला. येथें बांधावर व आसपास झाडें बरींच होतीं. त्या ठिकाणीं माणसें फारच थोडीं असून तींहि बऱ्याच अंतरावर होतीं. त्या ठिकाणीं माधवराव दम टाकण्याकरितां क्षणभर उभा राहिला व त्याच्या तोंडून " माझ्या आयुष्याचा शेवट होणारच का ? " असा सहजोद्गार निघाला. त्याला या प्रश्नाच्या उत्तराची अपेक्षा नव्हती व तें मिळेल असें वाटलें नव्हतें.

पण जवळपास कोठून तरी त्याच्या कानीं त्याच्या दुःखोद्गाराला उत्तर मिळालें. " होय, तुझ्या आयुष्याचा शेवटच झाला पाहिजे."

माधवरावाचा मेंदु फिरून भ्रमूं लागला. त्या लहरींत आपल्या प्रश्नाला आकस्मिक उत्तर देणाऱ्याला पहाण्याची त्याची इच्छा होती.

" माधवराव, तुमच्या व माझ्या आयुष्याचा शेवट बरोबरच झाला पाहिजे " असें ह्मणत कालिका त्याच्यापुढें येऊन उभी राहिली. " ज्या तूं माझ्या आयुष्याचा नाश केलास, मला वेषांतरांत भटकविलेंस, दासीपणासारखीं कर्मं करायला लाविलेंस, त्या तुझी माझ्या रागाच्या शांत्यर्थ आहुतिच दिली पाहिजे. "

" आनंदी, माझा प्राणघात का तूं करणार ? "

" होय, मी करणार ! "

" मला निष्कलंक, निष्पाप, प्राण्याला का मारणार ? "

" स्त्रीहत्येचं अन् स्त्रीघाताचं पातक शिरावर असतांना निष्पाप ह्मणायला जीभेला शक्ति तरी कशी वहाते ? "

" स्त्रीहत्या अन् स्त्रीघाताचं पाप माझ्या शिरावर ? "

" होय. तुझ्या शिरावर ! "

" आनंदी, होय, माझ्या शिरावर आहे खरें ! " मंद स्वरांत माधवरावानें हा दीनोद्गार काढला.

" खुनास खून, जशास तसें, हा न्याय इथंहि लागू करायला काय हरकत आहे ? तुझ्या हातून सरस्वतीबाईचा खून झाला आहे, माझा घात झाला आहे. "

" हाय हाय ! घोर कर्म ! घोर पाप ! सरस्वतीबाई, तुमचा खून नकळत—शिव शिव—

माधवरावानें डोळे घट्ट मिटून धरले व अचेतन पुतळ्याप्रमाणें तो स्तब्ध झाला. बराच वेळ कालिका उर्फ आनंदी त्याच्याकडे

क्रूर मुद्रेनें पहात होती. एखाद्या हिंस्र श्वापदीच्या हातीं सांपडलेल्या दीन भक्ष्याप्रमाणें आनंदीची व माधवरावाची तुलनात्मक स्थिति पहाणाराच्या तेव्हांच लक्षांत आली असती. माधवराव बराच वेळपर्यंत निश्चेष्ट उभा असल्याचें पाहून कालिकेनें त्याला हालविलें. तेव्हां आपण यमासमोर उभे असून अन्यायानें मारली गेलेली सरस्वती आपल्याला हालवीत आहे असा त्याला भास झाला.

" सरस्वतीबाई, तुह्मी चुकून हो मारल्या गेलांत ! "

" चुकून कां होईना पण माझा जीव गेलाना ! ! " असा जबाब त्याला कोणींतरी दिला.

" अहो महाराज, जागे व्हा, या ढोंगानें मी फसणार नाहीं." कालिकेनें त्यास जोरजोरानें हालविलें.

माधवराव आपल्या भ्रमांतून सावध झाला, पण पुढें पहातो तों कालिका पिस्तूल रोंखून उभी.

" माझ्या आयुष्याचा शेवट होणार का ? " या त्याच्या सहज प्रश्नाचें हें शाब्दिक उत्तर नव्हतें. त्या प्रत्यक्ष प्रत्युत्तराची क्रूरता पाहून त्याचे मरणविषयक विचार पार लटपटले. " सबसे जीव प्यारा " या म्हणीची सार्थकता त्याला आतां पटली व जीवदेहाच्या वियोगाची कल्पनाहि त्यास असह्य भासूं लागली. जगांत चाललेल्या प्रचंड जीवनकलहाचें मूळच जर ' जिवंत रहावें ' ही कल्पना आहे तर जीव नकोसा कोणास वाटणार ? " मरण येईल तर बरें " हा पाढा ज्याच्या त्याच्यापुढें वाचणाऱ्या महात्म्यांपैकीं प्रत्यक्ष मरणाची भीति न वाटणारे किती सांपडतील ? यच्चयावत् प्राणिमात्रांना जीव नेहमीं प्रिय असतां मृत्यु ही गोष्ट---आयुष्याचा खंड करणारी गोष्ट एकदां घडून यायचीच अशी पक्की खात्री असतांनाहि प्रत्येकाला तिचा विसर पडल्याप्रमाणें झालेलें असतें; अथवा विसर पडण्याचा तरी प्रत्येकाचा प्रयत्न चाललेला असतो.

त्याप्रमाणेंच ज्या माधवरावाला सरस्वतीच्या मरणाबरोबर आपण मरणार अगर आपणास मरावें लागणार असें निश्चयपूर्वक वाटत होतें त्याला मरणाचें प्रत्यक्षत्व असह्य होऊन अनन्य भाविकाप्रमाणें त्यानें जीवदानाच्या भिक्षेकरितां कालिकेचे पाय धरले. आपल्या प्रयत्नाची सीमा करूनहि अनिवार्य मृत्यु निवारण्याचा भ्रामक प्रयत्न कोण करीत नसतो?

"माधवराव! जिच्याजवळ तूं दयेची अपेक्षा करतोस ती कोण आहे हें विसरलास वाटतें! तुझ्या निश्चित प्राणघातानें स्वतःची तृषा शमविणारी वाघीण सशस्त्र तुझ्यापुढें आहे. तुझी दीन स्थिति पाहून तिच्या दृष्टींतला क्रूरपणा यत्किंचित्हि कमी झाला नाहीं व होणार नाहीं." माधवरावाशीं बोलण्यांत जास्त वेळ घालविल्यास आपली प्राणघाताची तृप्ति होणार नाहीं असें भय तिला वाटून ह्या भाषणानें तिनें इहलोकींच्या संबंधाचा उपसंहारच केला.

माधवरावाच्या मरणासाठीं हापापलेल्या निर्दय कालिकेच्या अंगठ्यानें घोडा दबला. पिस्तूलाचा बार उडाला व क्षणार्धांत माधवरावाचा मरणोन्मुख देह भूमीवर लोळूं लागला. "आई, आई, चांडाळणी, घ त केलास ग घात. कम—लिनी—" हेच शब्द शेवटचे! माधवरावाच्या मृत देहानें धरणीमातेच्या अंकावर लोळण घेतली.

धुराचा लोट शमल्यावर कालिकेला आपला इष्ट हेतु पूर्ण झाल्याचें दिसलें. मृत माधवाकडे आनंदानें दृष्टिक्षेप करीत करीत पिस्तूलाचा रोंख तिनें आपल्यावर धरला. पण—फिरून घोडा उघडवेना. बार भरला, निश्चयानें छातीवर पिस्तुलाचें तोंड धरलें पण———

आत्मघात करण्याला धैर्य होईना.

पहिल्या बारानें आसपास दूरवर असलेलीं एक दोन माणसें

त्या स्थळीं धांवून आलीं. कालिका आपला व आत्म्याचा वियोग लांबणीवर टाकीत होती. पण या माणसांच्या दर्शनानें तिला तो लवकर घडवून आणणें जरूर होतें.

दुसरा बार—धुराचा प्रचंड लोट—विजेप्रमाणें क्षणिक चमक—नंतर जिकडे तिकडे गंभीर शांतता——

पहिल्या बाराचा परिणाम पाहूं आलेल्या मंडळींना काय झालें तें दृष्टीस पडण्यापूर्वीं दुसरा धडाका झाला. हत्याराच्या खेळांना पारखे असलेल्या शेतकऱ्यांना हा प्रकार अपूर्व होता. वर्षावर्षानें एखाद्या महाप्रसंगाला एखाद्या डुकराच्या शिकारींत एखादा बार त्या गरीब व निरुपद्रवी शेतकऱ्यांच्या कानावर लांबून यायचा. पण आतां तर एकदम दोन बार अन् तेहि अगदीं जवळ ऐकूं आले, यामुळें त्यांना कांहीं सुचेना. त्या दोघांतिघांपैकीं एकजण मात्र तेथें राहिला. बाकीच्यांच्या बार होऊन गेल्याला क्षण झाला नाहीं तोंच त्या स्थलापासून वीस पंचवीस हातांवर पाठी फिरल्या.

शांतता झाल्यावर त्या कुणब्याच्या दृष्टीस दोन अचेतन देह पडले. माधवरावाला मृतावस्थेंत पहातांच तो देखील गांगरून गेला आणि गांवांत कमलिनीताईसाहेबांना वर्तमान सांगण्याकरितां धांवत सुटला.

त्याला गेल्याला थोडा वेळ जातो न जातो तोंच प्रभाकर त्या जागीं येऊन थडकला.

---

## प्रकरण तिसावें.

# आनंदीची पूर्वकथा.

" आनंदी, नांवाप्रमाणें तुझें वर्तन जर आनंदमय असतें तर

तूं माझ्या संसारसुखांत इतक्या लवकर व्यत्यय आणण्यास खास घजली नसतीस. तूं स्त्रीरूपानें या जगांत वावरणारी एखादी भयंकर लांडगी असावीस असें मला आतां वाटत आहे. तो पहा तुझ्या शेजारीं माझा पार्थिव व नश्वर देह निर्जीव होऊन पडला आहे. माझ्यावर जर तुझें प्रेम होतें तर त्याला अनुसरून तूं एखाद्या साध्वीप्रमाणें माझ्या सुखाच्या आड न येतां त्याचें वर्धनच करावयाचें होतेंस. झाल्या चुकीची शिक्षा तूं किती भयंकर दिलीस याची आतां तरी तुला कल्पना येते का ? थोड्या वेळानें तूंहि माझ्याबरोबर आपल्या विकारभूत सृष्टदेहाचें विसर्जन मानवलोकीं करून अव्यक्तांत–माझ्यांतच विलीन होणार आहेस. माझ्या हातून तुझी फसवणूक घडली असें तुला स्पष्ट कळल्यावर तूं काय केलेंस तें मला कळून चुकलें आहे. आर्यधर्मांत स्त्रियांना मान नाहीं अशी माझी आजपर्यंत कल्पना होती. पण तुझ्या हातून मीं तो देह जेव्हां सोडला, अगर तुझ्यामुळें सुटला, तेव्हां भूत, भविष्य आणि वर्तमान या तिन्ही काळांत मी प्रसरण पावलों व त्यांत प्राचीन काळच्या व अर्वाचीन काळच्या आर्य स्त्रियांचें दिव्य दर्शन घडून पार्थिव देहामध्यें वास करीत अहंमन्यतेनें ज्या आर्य संस्कृतीला मी आजपर्यंत नांवें ठेवीत आलों ती किती श्रेष्ठ व पवित्रतम आहे याची कल्पना मला आतां होत आहे. मानवभूमीवर वास करणाऱ्या कमलिनीचा मूर्त देह हा सुटला व माझ्यांत मिळाला–हा पहा–हा पहा–"

* * * *

जागे होण्यापूर्वीं निद्रा विरल होत जाऊन कित्येकदां आपणास प्रत्यक्ष सृष्टींतल्या गोष्टी स्वप्नरूपानें दिसत असतात असा पुष्कळांना अनुभव असेल. त्याप्रमाणेंच आनंदी जखमेच्या वेदनामय मूर्च्छेंतून शुद्धीवर येत असतांना घडलें. ती शुद्धीवर

आली, पण डोळे उघडून आसपासची परिस्थिति पहाण्याची शक्ति अजून तिला आली नव्हती. डोळे मिटलेलेच होते, पण समोर दिसणाऱ्या गोष्टींचें ज्ञान तिला होत होतें. तिच्यासमोर कांहीं तरी आकाररहित पदार्थ आला. अनंत विश्वांचा त्यांतच समावेश झालेला तिला दिसला; पण त्या सर्वव्यापी पदार्थाचें आकुंचन होत होत त्यापैकीं कांहीं भागांतून माधवरावाची मूर्तरूप पावलेली छायामय आकृति तिला दिसली व तीच तिचा निषेध करीत होती.

" शिक्षणाचा हा सारा परिणाम. माझ्या देहाचा घात, कमलिनीचें मरण, या सगळ्या गोष्टींचें कारण आनंदी, तूं आहेस. नांव व बाह्यरूप किती उज्ज्वल व मनोहारि आहे! पण विधात्यानें त्याप्रमाणें अंतरंग निर्दोष न ठेवतां त्यामध्यें कालकूट विष कसें भरलें! आज तुझ्या नीचतेचा कळस झाला. चांडाळणी ! "

आनंदीच्या विवेकबुद्धीला या गोष्टी पटल्या व तिच्या पापी मनाला आतां माधवाचें अमूर्त दर्शन दुःसह झाल्यामुळें तिनें डोळे उघडण्याची खटपट मोठ्या कष्टानें आरंभली.

* * * *

डोळे उघडून पहाते तों तिला प्रभाकर समोर दिसला. तिचें पापी अंतःकरण तिला जास्तच खाऊं लागलें. कसाबसा धीर करून ती प्रभाकराशीं बोलूं लागली—

" प्रभाकरपंत, मी तुमच्याशीं बोलणार नव्हतें. माधवरावाच्या हत्येच्या पातकाचे जबाबदार तुह्मी आहां. माझें तुमच्यावर पूर्ववत् प्रेम कायम आहे. कमलिनीताईविषयीं—त्या साध्वीच्या छळाची अगदीं परमावधि आज झाली—माधवरावाविषयीं माझा दुजा भाव नाहीं. इहलोकीं तुह्मीं माझा त्याग केला, पण जन्मांतरांत कधीं तरी तुमची माझी पतिपत्नी या नात्यानें गांठ पडल्याखेरीज रहायची नाहीं. कमलिनीला माधवराव अन्य जन्मांत सुद्धां लाभो.

"प्रभाकरपंत, मी थोर कुलांत पुण्यास जन्माला आलें. मी जातीनें ब्राह्मण व अस्सल कोंकणस्थ आहें. माझ्या घराण्याचें नांव सांगण्याची माझी इच्छा नाहीं व त्याचा उपयोगहि नाहीं. माझें नांव आनंदी. शिक्षण प्रीव्हियसपर्यंत झालें असून इंग्रजी वाचन पुष्कळ झालें आहे. संस्कृताचाहि नाद पुष्कळच होता. आज माझें वय २३ वर्षांचें आहे.

"लहानपणापासून आमच्या घरांत सुधारणेचें बंड माजल्याचें मला आठवतें. इंग्रजी शिक्षणानें पावन होऊन जुन्या परंपरेचा नायनाट करण्याचा आमच्या घरच्या स्त्रीपुरुषांचा बाणा. बायकांना इतका नाहीं, पण पुरुषांच्या संगतीनें त्याहि लागतात चाळे करायला. या सर्वाला अनुकूल अशी श्रीमंतीहि घरांत होती. त्यामुळें तिचा विनियोग घरांत इष्ट सुधारणा करण्याकडे मनमुराद करण्यांत येत असे. सास्वांना सूर्याच्या तापाची बाधा कधीं झाली नाहीं, पण सुनांना छत्री जोडा यांखेरीज बाहेर पडण्यास पाय कधीं तयार नसत. घरांत अनवाणी चालवेना. चोळीनें शरीराची जोपासना नीट होईनाशी झाली. चहाच्या व बिस्कुटांच्या खुराकाखेरीज त्यांचीं देहयंत्रें चालेनात. जसजशीं जुनीं खोडें नवीन मंडळांतून नाहींशीं होऊं लागलीं—तसतसा जुन्या देवधर्मांनीं हळूहळू पोबारा केला. रामायण भागवताऐवजीं बायबलाचीं सोनेरी पुठ्ठ्याचीं मोहरेदार पुस्तकें कपाटांत येऊन बसलीं.

"बायकाहूंन पुरुषांत फार स्थित्यंतर घडलें. रात्रंदिवस पाय विजारींत गुंडाळलेले. साहेबी टोप्या, शर्ट, बूट, पायमोजे, इत्यादि सगळा साहेबी थाट. संध्याकाळच्या वॉकशिवाय आणि टेनिसाशिवाय प्रकृतीचीं सूत्रें बरोबर चालेनात. रोज संध्याकाळीं माझी आई आणि वडील व चुलता चुलती फिरायला जायचींच. हेंच काय, पण आणखी शेकडों प्रकार आमच्या घरांत चालत असत. इतकें

सगळं सांगण्याचं कारण काय कीं, मलाहि लहानपणापासून तसाच संस्कार मिळाला.

"मी पांच वर्षांची झाल्यापासून माझ्या शिकण्याला सुरवात झाली. भराभरा यत्ता होऊं लागल्या. बक्षिसें मिळत चाललीं. मी हायस्कूलांत असतांना माझे वडील ज्या कॉलेजामध्यें प्रोफेसर होते त्या कॉलेजांत माधवराव शिकत होता. माझा व माधवरावाचा स्नेह जमला. तो त्या वेळीं बी. ए. च्या वर्गांत होता. त्याचें आमच्या घरीं पुष्कळ जाणें येणें असे. पुण्याच्या शिक्षणानें व परिस्थितीनें त्याच्यांतहि पुष्कळच विचारक्रांति घडून आली होती. जुन्या परंपरेच्या विध्वंस–यज्ञांतील ताज्या दमाच्या अध्वर्यूंत त्याची गणना माझे वडील करीत असत. हळूहळू माझी व त्याची ओळख दाट होत चालली. त्याचें आमच्या येथें येणें जाणें सुरू असल्यामुळें मला अभ्यासांत येणाऱ्या शंका त्यानें दूर कराव्या–रोज नवीन नवीन विषयांवर आह्मीं चर्चा करावी––सुट्टीच्या दिवशीं लांब कुठें तरी गाडी करून फिरायला जावं––असा आमचा क्रम होता. पुरुष आणि स्त्री यांतला संबंध कळूं लागला तेव्हां आह्मीं एकमेकांला पति पत्नी वरण्याचें कबूल केलें. मीं मागें कधीं एकदां बायबल वाचलें होतें त्यांतील 'Let love be without dissimulation' हें मीं माझें ध्येय ठेवलें. माझ्या आयुष्यांत पुरुषाशीं असा अत्यंत निकट संबंध माधवरावाचाच. आमच्या घरच्या चालीरीती सुधारलेल्या असल्यामुळें माधवरावाला व मला एकान्तांत केव्हांहि बसायला निर्बंध नसे. माझी आजी जुन्या वळणाची असल्यानें तिला कधीं कधीं आमच्या बैठकींचा राग येई, पण बाबांना तें खपत असल्यानें ते कधींहि आजीला आमच्या वाटेस जाऊं देत नसत. ती कधीं गेलीच तर तिला रागें भरून आह्मांस उत्तेजन देत असत.

" माझी आई वारल्यावर बाबांनीं मला एक छानछोकीची नवी आई आणली. हिचा थाट कांहीं विचारूं नका. माझे बाबांची वागणूक हिच्या संगतीनें अगदीं बेताल झाली. हिचा दिमाख फार. सुधारणा देवीची ही मूर्तिमंत पुतळी. बाबांशीं तिचें लग्न पुण्यांतील " सुधारणामंदिरांत " हातांत हात घालून झालें. Love अथवा प्रेमावर हिनें केवढें तरी व्याख्यान झोडलें. सर्वांना वाटलें कीं, त्या दिवशीं माझ्या बाबांना अद्वितीय प्रेमरत्न लाधलें. पण बाबांना वारल्याला पुरे दहा दिवसहि लोटले नाहींत तोंच तिनें अद्वितीय प्रेमाचा सौदा एका टवाळ सुधारकाबरोबर मांडला व लवकरच ' एक सन्माननीय पुनर्विवाह ' या सदराखालीं पुण्यांतल्या एका सुधारकाग्रणी पत्रांत त्या टोलेजंग विवाहाचें वर्णन वाचायला सांपडलें.

" कमलिनीचें उदाहरण पाहीतोंपर्यंत मला पतिपत्नीच्या प्रेमाचा अस्सल नमुना पहाण्यास सांपडला नाहीं. मला वाटे कीं, नवरा आणि बायको ह्मणजे व्यवहारांतील इतर करारमदाराप्रमाणें एक मत्तयाचा सौदा आहे. पण हा भ्रम कमलिनीच्या वर्तनानें दूर झाला. माझ्यापाशीं प्रेमाचें प्रदर्शन मांडणाऱ्या ह्या प्राण्यानें—माधवरावानें—परिस्थितीच्या सबबीवर कमलिनीशीं विवाह केला. त्या साध्वीबद्दल माझी आदरबुद्धि कायम आहे व आतां तर तिच्यासाठीं मला फारच वाईट वाटतें. पण आतां कांहीं इलाज नाहीं.

" एके दिवशीं बी. ए. ची परीक्षा झाल्यावर पुण्याहून माधवरावाची स्वारी थोड्या दिवसांत परत येण्याच्या अभिवचनावर रुद्रगडास गेली. त्या अमर्याद थोडे दिवसांचा अर्थच मला कळेना. वर्षें लोटलीं, तरी स्वारीचा पत्ता नाहीं. पांच चार वेळ माधवराव पुण्यास माझ्या दृष्टीस पडला, पण मला चुकविण्याकडेच त्याचा विशेष कल असल्याचें मीं ताडलें. मला त्याच्या लग्नाची माहिती

नव्हती. बाबा गेले, आई नाहीं, अशा प्रसंगीं माझें वास्तव्य माझ्या चुलताचुलतीला कंटकवत् झालें. ते माझा कंटाळा करूं लागले व त्यांच्या अंतस्थ प्रयत्नांमुळें मला त्रास होऊं लागला. मनाचा निग्रह करून मी एकदां रुद्रगडास जाण्यास निघालें. रुद्रगडास पोंचल्यावर माधवरावांनीं आपलें तेथलें बिऱ्हाड कायमचें मोडून मधुपुरास संसार थाटल्याचें मला कळलें. मला खोटीं वचनें देऊन फसविल्याबद्दल किती वाईट वाटलें असेल व किती राग आला असेल याची कल्पना आपणच करा. या फसवणुकीचा सूड घेण्याच्या इच्छेनें मी मधुपुरास येण्यास निघालें. कांहीं औषधी पूड घेऊन मी रोज अगदीं पहांटेस माझ्या शरीराच्या उघड्या भागाला काळिमा देऊन मूळरूप झांकण्याचा प्रयत्न करीत असें. हा प्रयत्न मला चांगलाच साधला होता. माझ्या मनांत मत्सर अतिशय असल्यानें--व तो तसा असणें साहजिक आहे--मीं कमलिनीचा छळ करण्याचें आरंभलें. माधवरावाच्या मत्सरी स्वभावाची मला पूर्ण पारख होती. त्याच्या घरीं मी कालिका हें नांव घेऊन मूल संभाळण्याकरितां राहिलें. पांच सहा महिने चांगला विश्वास संपादन केल्यावर मीं दुष्टेनें त्या मुलाला विष चारलें. परंतु तो प्रयोग निष्फळ होऊन माझ्यावर संशय आला. त्यानंतर मी पुष्कळ डाव खेळलें, पण तेहि व्यर्थ गेले. अखेरीस एकदां संधि साधून मी माधवरावाला स्वतःचें रूप दाखविलें. तेव्हांपासून तो बावरला व सर्वस्वीं माझ्या ह्मणण्याप्रमाणें वागूं लागला. याच वेळीं त्यानें तुह्मांस व कमलिनीस श्रीशिवालयांत एकान्तीं पाहिलें होतें. त्यामुळें त्याच्या मनांत संशयाचा अंकुर उपजला होता. संधि मोठी नामी सांपडली. त्या संशयाचा फायदा मीं पूर्णपणें घेऊन त्याच्यांत व कमलिनींत बेबनाव आणण्याचा विलक्षण प्रयत्न केला. कमलिनीताईचा हा विनाकारण छळ बरं ! ! त्या साध्वीचा सहवास मला जन्मोजन्मीं घडो. माधवराव

माझ्या ह्मणण्यावरून बहकला, पण त्याच्या रागावर तिनें एक चकारशब्दहि उच्चारला नाहीं. वय लहानच, पण फार थोर बाई ती! प्रभाकरपंत, मला अशा पुष्कळ गोष्टी आठवतात कीं, ज्यांत चांगल्या शिकल्या सवरलेल्या बायका आपल्या स्वैर वर्तनाला यत्किंचित्हि आळ घालूं पहाणाऱ्या नवऱ्याशीं लग्नाच्या वेळचे Love चे शाब्दिक फवारे पार विसरून बरोबरीच्या नात्यानें सुधारलेल्या तऱ्हेनें जोडाजोडी करतात. पण कमलिनीचा स्वभाव कांहीं लोकोत्तर! तिची शांतता व गंभीरता कोणीकडे? व माधवरावाचा चंचलपणा कोणीकडे? जमीनअस्मानचें अंतर!! माधवरावाचें मन दूषित करण्याकरितां कमलिनीची पाळत राखून तुमचा व कमलिनीचा परसांतील--मागील दारचा-प्रसंग मीं मुद्दाम दाखविला. पण फिरून त्या नवराबायकोचीं मनें साफ झाल्याचें जेव्हां माझ्या दृष्टोत्पत्तीस आलें तेव्हां मीं आजच्या सगळ्या अनर्थाचें मूळ जें पत्र त्याची योजना केली. ही पत्राची मात्रा चांगलीच लागू झाली. माधवराव आज दुपारीं प्रियपत्नीला धिक्कारून निघाला तो तडक इकडेच आला. मीहि त्याच्या मागोमाग लपत छपत आलें. इथें घडलेला सगळा प्रकार मला ठाऊक आहे.

" प्रभाकरपंत, माधवरावाला सोडून मी तुमच्याकडे दीनपणें प्रेमयाचनेकरितां आलें, तेव्हां तुह्मीं मला निषेधपूर्वक घालविलेंत ही गोष्ट चांगली केली नाहीं. आजच्या अनर्थाचें तें मूळ आहे. निष्कपट प्रेम हें माझें ध्येय खरें, पण आजपर्यंतचा माझा अनुभव असा आहे कीं, कल्पनेनें वठवलेलें प्रेमाचें मानसिक चित्र प्रत्यक्ष जगांतील व्यवहारांत सांपडणें ह्मणजे अगदींच दुर्मिळ! मी इंग्रजी शिकल्यें आहे, इंग्रजी कादंबऱ्या वाचल्या आहेत. तेव्हां माझी कथा ऐकून कोणीं असा प्रश्न करील कीं, स्कॉटच्या आयवॅन्हो (Ivanhoe) या कादंबरींतील नायिका रेबेका हिच्याप्रमाणें माधवराव आपल्या

पुणें मराठी ग्रंथालय स्थापना शके १८३३

वचनापासून भ्रष्ट झाला तरी आजन्म अविवाहित रहाण्याच्या संकल्पानें रहाण्यास काय हरकत होती? लोकांचा प्रश्न बरोबर आहे. पण त्याला एखादें गोडसें शाब्दिक उत्तरहि देतां येईल. पण—जगांतल्या मोठमोठ्या सुंदर सुंदर सिद्धांतांनाहि 'पण' शब्दानें हरताळ लावून ठेविला आहे, हें ध्यानांत असूं द्या. रेबेकासारखीं उदाहरणें कवीच्या कल्पनेनें उठविलेल्या बहारीच्या कादंबरींतच सांपडायचीं. पण प्रत्यक्ष जगांतला व्यवहार पहा. सीता, मंदोदरी, द्रौपदी, दमयंती इत्यादि पौराणिक आर्य स्त्रियांच्या चारित्र्यांत प्रेमाचें जें उदात्त स्वरूप पहायाला सांपडतें त्याचा एक सूक्ष्मांश सुद्धां आजच्या सुधारकांच्या लग्नांत आढळत नाहीं. एखाद्या गरीब कुणब्याच्या संसारांत जें सुख व समाधान दृष्टीस पडतें तें आम्हा अनुकरणप्रिय सुधारकांच्या घरांत कोटचंशानेंहि दृष्टीस पडत नाहीं. उलट रुसवारुसवी, झगडा यांच्या नांदणुकीची जागाच आमचे सुधारकी संसार असतात.

" प्रभाकरपंत, माझीं गात्रें शिथिल होत चाललीं आहेत. प्राण कंठाशीं आले आहेत, माझ्यानें जास्त बोलवत नाहीं. फक्त तुमच्या पायांशीं एक विनंति आहे; व ती ही कीं, मला आपण आपली ह्मणून स्वीकारा. एकदां वचन दिलें होतें त्याला अनुसरून माझ्यावर अनुग्रह करा. मज पापिणीला एक तरी शांतीचा शब्द उत्क्रमणाच्या वेळीं मिळूं द्या. मीं आजपर्यंत " प्रेम प्रेम " ह्मणून आटाकोट प्रयत्न केले, पण माझे प्रयत्न वायां गेले. आतां माझी हीच शेवटची—निर्वाणींची—विनंति आहे. या अभागिनीवर एकवार कृपाकटाक्ष फेकून माझ्या अधरावर प्रेमाचा ओलावा येऊं द्या. कमलिनी तुमची बहीण आहे. माधवरावानें व तिनें आपलीं अंतःकरणें एकमेकांला वाहिलीं होतीं त्याप्रमाणें या अभागिनीवर एक दयेचा निर्वाणींचा अनुग्रह व्हावा अशी इच्छा आहे.

आतां यापुढें आपला माझा सहवास नाहींच, पण परलोकीं मी माझ्या सर्व पातकांचा झाडा देऊन पावन झाल्यावर आपल्या आगमनाची वाट पहात राहीन. माधवरावावरून मी आपल्यावर प्रेमांतर केल्याचा जाब ईश्वरापाशीं देईन. पतिनिष्ठ देवतांची त्याबद्दल क्षमा मागेन. महाराज, प्राण घोटाळताहेत, कृपा व्हावी–" आनंदीनें डोळे मिटले."

आनंदी हकीकत सांगतां सांगतां दमली, तिच्या नासिकेंतून दीर्घ निश्वास चालू झाले व प्रत्येक श्वास क्रमाक्रमानें दीर्घ काळांत बाहेर पडूं लागला. प्रभाकरानें तिचा देहावसानसमय जाणला व तिच्या करुणमूर्तीकडे पहात तो स्तब्ध बसला. थोड्या वेळानें आनंदीनें मिटलेले डोळे उघडले. फारच दीन होऊन तिनें आत्मस्वीकाराची नम्र सूचना प्रभाकराला केली व मोठ्या प्रयत्नानें साश्रु नेत्रांनीं त्याकडे पहात असतां आपल्या अधरावर अंगुली ठेविली. प्रभाकराला आनंदीच्या भाषणानें फार वाईट वाटलें. परंतु आनंदीनें माधवावरील प्रेमान्तर करून त्याचे वांटेकरी आपणास व्हावयास सुचविलें तें मात्र करण्यास त्याचें मन घेईना. तो ह्मणाला–

" आनंदीबाई ! प्रेमान्तर करण्यानें तुह्मी आपल्या प्रियकराच्या विश्वासघाताच्या दोषी होत नाहीं का ? ज्याच्यावर तुह्मीं आजन्म प्रेम केलें, ज्याच्या प्रणययाचनेकरितां आपला वेष पालटून त्याच्याच घरीं मोठ्या खुबीनें राहिलांत, निरनिराळ्या प्रसंगीं आपल्या प्रेमाचें दर्शन त्यास दिलेंत व शेवटीं त्यानें दुसऱ्या स्त्रीच्या मोहांत पडून तुमचा स्वीकार केला नाहीं ह्मणून या प्रणयापराधाचें त्यास घोर असें देहान्त शासन केलेंत; त्याच्यावरचें प्रेम मरणकाळीं ढळून एखाद्या नगरभवानीप्रमाणें मन मानेल त्याशीं प्रेमाचा रोजगार करूं लागलांत तर तुमची हकीकत ऐकणाऱ्या एखाद्या स्त्रीला त्यापासून काय वाटेल ? प्रेम–प्रेम ह्मणून ज्या बाण्यानें तुह्मी

आजपर्यंत झटलांत तें साध्य न होतांच एकदम बदफैली स्त्रीप्रमाणें दुसऱ्याच्या गळ्यांत मिठी मारायला तयार होणारी स्त्री उद्यां मी तिच्या मनाप्रमाणें वागलों नाहीं ह्मणून तिसऱ्याच्या गळीं पडेल. एका फुलांतला रस संपतांच दुसऱ्याभोंवतीं फेऱ्या घालणाऱ्या भुंग्याप्रमाणें एक नाहीं दुसरा, तो आंवडत नाहीं तिसरा, असेंच पुरुषान्तर का करीत बसणार? स्त्रीपुरुषांना विवाहाच्या मिषानें एकत्र सांधण्यांत ईश्वराचा हेतु तो वारंवार स्वेच्छेप्रमाणें सांधला जावा व जन्मभर खिळखिळा रहावा असा नाहीं. स्त्रीपुरुष हीं दोन अंगें एकत्र करून त्यापासून ईश्वराचा हेतु साध्य करण्याची जबाबदारी सुखदुःखाच्या भट्टींतून तावून सुलाखून निघालेल्या मातापितरांवर आहे. मातापितरांनीं हीं दोन अर्धांगें एकवट केलीं तरी तीं कायमचीं एकमेकांत जखडण्याचें काम फक्त त्या दोघांच्या अंतःप्रीतीवर अवलंबून आहे व ती आपोआप उत्पन्न होण्याचें साधन ईश्वरानें तयार करून ठेविलेलें आहे. माझें कमलिनीशीं लग्न होणार ह्मणून जेव्हां मला समजलें तेव्हां इंग्रजी शिक्षणानें मी तसल्याच प्रेमानें तिच्याकडे पाहूं लागलों. पण कमलिनीच्या गुप्त भेटीनें तिनें माझ्या सर्व भ्रमाचा निरास करून आर्य स्त्रीच्या उच्च मनोवृत्तीचा मासला मला दाखविला. आनंदीबाई, तुमचे प्राण व्याकुळ झालेले मला पहावत नाहींत, तुमच्यासंबंधानें मला फार कींव वाटत आहे; पण माझा इलाज नाहीं. मी तुमचा स्वीकार करूं शकत नाहीं. फार तर तुमच्या पापाबद्दल ईश्वराची करुणा भाकण्याचें काम मी करतों."

प्रभाकर गप्प बसल्यावर आनंदीनें डोळे उघडले. स्वस्थता त्यांत वसत नव्हती. ती मरणोन्मुख झाली होती. तरी तिनें बोलण्याची खटपट केली.

"प्रभाकरपंत मला माझ्या पापविचारांत तळमळत पडूं देणें जसें

तुह्माला इष्ट वाटतें तसेंच आतां मला पण वाटूं लागलें. खरें प्रेम कांहीं निराळेंच असून मी आजवर निवळ प्रेमाभासानें फसलें अशी आतां मला खात्री वाटत आहे. मी घेतें आतां जगाचा निरोप. आर्य पुरुषांनो व स्त्रियांनो, आपल्या मुलामुलींना या आभासामध्यें कधीं गुरफटूं दे-ऊं-न-का-"

आनंदीचें प्राणोत्क्रमण झालें.

प्रभाकरानें एक दुःखाचा सुस्कारा टाकून आसपास पाहिलें तों आसपास मंडळी गोळा होत असल्याचें त्याला दिसलें.

---

## प्रकरण एकतिसावें.

## इकडे काय झालें ?

आपला पति उन्मादस्थितींत बाहेर पडल्याचें पाहून कमलिनीचे काय विचार चालले होते हें आह्मीं मागें एका प्रकरणांत सांगितलेंच आहे.

त्या स्थितींत तिचा बराच काळ लोटला. तासामागून तास गेले. पतीचा पत्ता नाहीं. यामुळें तिचा जीव काकुळतीस आला. तिचा धीर सुटूं लागला.

मनाच्या धांवेपुढें वायूचीहि गति लुली पडते असें एक वचन आहे. त्याची यथार्थता दाखविणारा प्रसंग बिचाऱ्या कमलिनीवर आला. एखादे वेळीं भावी अनिष्ट गोष्टींच्या भावना माणसाला आपल्या विचारलहरींत होत असतात; त्याचाहि प्रत्यय कमलिनीला येऊं लागला. जों जों घटका जाऊं लागल्या तों तों पतीवर कांहीं तरी अनर्थ ओढवला असा तिच्या मनानें ग्रह घेतला व त्याला अनुकूल असेच विचार मनांत येऊं लागल्यानें त्याची दृढ-

ताहि होण्यास अवकाश लागला नाहीं.

पतिविषयक विचाराबरोबर तिच्या मनांत प्रभाकराबद्दलहि विचार आल्यावांचून राहिले नाहींत. प्रभाकराला त्या पत्राच्या खरेखोटेपणाविषयीं विचारण्यास माधवराव गेला असेल, त्यामुळें त्या दोघांच्यांत चार दोन शब्द कमी जास्त बोलले जाऊन दोघेहि हातघाईवर आले असतील, आणि मग--त्यांपैकीं कोणाचा तरी घात होऊन त्याचें प्रायश्चित्त दुसऱ्यावर ओढवलें असेल. पतीचा मृत्यु अथवा प्रभाकराचा मृत्यु दोन्ही गोष्टी तिला असह्यच होत्या. पण त्यांतल्या त्यांत प्रभाकराच्या मरणाच्या असह्यतेचें प्रमाण माधवरावाच्यापेक्षां कमीच होतें व असा पक्षपात करण्याला तिचें पतिनिष्ठ मन मुळींच कचरलें नाहीं. आतां तिच्या मनांत एक नवीनच विचार बळावला. यदाकदाचित् माधवरावाच्या हातून प्रभाकराचें बरें वाईट झालें अन् त्याला पोलिसानें धरलें--आरोपाची शाबिती झाली--

हाय! हाय! पतीच्या मानेला सरकारच्या न्यायाची तात बसणार अन् मग--असह्य-असह्य--अगदींच असह्य--त्या अभागिनीकडे पाहून मनुष्यघातकी माधवरावाला सरकार जगण्याची सवलत देईल काय? नाहीं, खास नाहीं; वैधव्य-कोण भयंकर विचार हा!!!

ही सगळी कमलिनीची मानसिक विचारसृष्टिच! पण तें सगळें तिला खरें भासलें. तिनें ही दुःखकारक वार्ता ऐकण्यापूर्वींच आपल्या जीवाचा घात करण्याचें योजलें व हा विचार लागलाच अमलांतहि आणला.

एका कपाटांतून कसलीशी काळी वस्तु काढून तिनें तिचें ग्रहण केलें. अजून विषाचा पुरा अंमल शरीरांत भिनला नव्हता तोंच एक माणूस जोरानें "वहिनीबाई कुठें आहेत, कमलिनीबाई कुठें आहेत?" असा प्रश्न करीत धांवत आला. कमलिनीला पहातांच त्याच्या

नेत्रांतून अश्रुपूर लोटला. त्याला शब्दोच्चार करण्याची शक्ति राहिली नाहीं. त्याच्या एकंदर अंगविकारावरूनच कमलिनीच्या मनावर श्राव्य गोष्टींचें भेसूर चित्र उमटलें. तिनें धीर धरून त्याला वारंवार प्रश्न केले, तेव्हां " माधवरावाचा एका बाईनें खून केला, वहिनीबाई--" ह्मणून शब्दरूपानें आकाशाची कुऱ्हाड कमलिनीच्या मेंदूवर आदळली. वार्ता ऐकतांच तिचे डोळे गरगर फिरूं लागले व सडकून घेरी येऊन ती जमिनीवर पडली. वार्ता सांगणारा एखाद्या पोराप्रमाणें मोठ्यानें आक्रंदत तेथेंच बसला.

माधवरावाच्या घरांत कांहीं तरी विशेष गडबड चालली आहे असें समजतांच अंगणांत लोक गोळा झाले. या गडबडीनें हा वेळपर्यंत स्वस्थ निजलेला बाळ मकरंद जागा झाला व " आई आई " ह्मणून हांका मारूं लागला. आपल्या हांकेला न जुमानण्याइतकी निष्ठुरता आपल्या मातेच्या अंगीं कशामुळें आली व आली असल्यास तिच्या हृदयास पाझर फुटावा ह्मणूनच कीं काय त्यानें टाहो फोडिला. पण बाळा मकरंदा,—ज्या देहामध्यें वसत असलेल्या वात्सल्य-निर्झरीच्या दिव्य प्रेमरसावर तुझें पोषण झालें ती आतां शुष्क झाली आहे. त्या देहांत हृदयच असेल तर त्याला बालक्रंदनामुळें ओलावा यायचा ना ? मकरंदा, तुझ्या मातेचें आयुष्य सरलें, तुझ्या पित्याची प्राणज्योत विझली. आतां तुला एका नव्या पण तुझ्या मातेला बंधुवत् असलेल्या व्यक्तीच्या ताब्यांत जावें लागणार.

पतिमरणाच्या वार्तेनें विद्युत्पात होऊन मूर्छित झालेली कमलिनी मधुपुराला कायमची हरपली. या दुःखजनक प्रकाराचा प्रेक्षकजनांच्या हृदयावर द्रावक परिणाम होऊन त्यांचीं इंद्रियें किंचित् काळपर्यंत शिथिल झालीं. शेवटीं एकानें मोठ्या कष्टानें बाळमकरंदास घरांतून बाहेर आणिलें. आपल्या मृत मातेच्या

वास्तविक स्थितीचें ज्ञान नसलेल्या त्या अर्भकाचे आपल्या कालाच्या उदरांत नाहींशा झालेल्या मातेकडे त्याला जाऊं न दिल्यामुळें किती हाल झाले ! आपणास धरून ठेवणाऱ्या लोकांना धांवून, ओरबाडून, गालगुच्चे घेऊन, त्यानें शक्य त्या बालप्रयत्नांची शिकस्त आईकडे जाण्याकरितां केली. कदाचित् आपणाला बलात्कारानें धरून ठेवणाऱ्या या लोकापासून आपली माता आपणास सोडवील या कल्पनेनें त्यानें आईच्या नांवानें सारख्या हांका मारिल्या तरीहि व्यर्थ ! अखेरीस रडून रडून मकरंद दमला.

या अनिष्ट वार्तेनें सगळ्या गांवांत एकच कोलाहल झाला. स्त्रीपुरुषांची गर्दी जमली. स्त्रियांच्या कोमल मनावर त्याचा जास्त खोल परिणाम झाला. मातृहीन बाळमकरंदाला कडेवर घेऊन शोकाश्रुमिश्रित नेत्रांनीं त्यास त्यांनीं कितीदां तरी पाहिलें, त्याचें चुंबन घेतलें. जिकडे तिकडे त्या बाळाविषयीं सहानुभूति वाटत होती.

माधवरावाच्या घराजवळ जमलेल्या मंडळींपैकीं पुष्कळजण माधवराव व आनंदी यांचे देह पडलेल्या बाजूला गेले. तेथें त्यांना प्रभाकर दिसला.

* * *

प्रभाकराला कमलिनीची हकीकत कळतांच आनंदी–माधवाच्या मृत देहांना तेथेंच सोडून तो विद्युद्गतीनें गांवांत येण्यास निघाला. त्याच्या अंतःकरणावर इतका जबरदस्त आघात झाला कीं, मनाची सारासार–विचार–शक्ति नष्ट होण्याला वेळ लागला नाहीं. तो यापुढें जें जें कांहीं करी तें आपण करीत नसून आपोआपच घडत आहे असा त्यास भास होत होता. आपण आहोंत, आपलें वास्तव्य इहलोकावर आहे, याची जाणीव तो विसरला. त्याच्या हातून जीं जीं कृत्यें झालीं तीं कोणा तरी अदृश्य शक्तीनें घडवून आणलीं असेंच त्यास वाटूं लागलें.

* * * *

मंडळीची दारासमोर असलेली गर्दी हटवीत झपाट्यानें एक व्यक्ति घरांत शिरली. ही व्यक्ति कोण होती हें गांवकऱ्यांस ठाऊक होतेंच. त्या व्यक्तीचा वेग अद्भुत होता. घरांत शिरतांच त्याला कमलिनीचा मनोहर देह भूमीवर अचेतन होऊन पडलेला दिसला. 'कमलिनी' इतकीं अक्षरेंसुद्धां त्याच्या तोंडून बरोबर निघालीं नाहींत. त्याचा देह मागल्या भिंतीवर टेंकला व दृष्टि बंद होऊन एखाद्या निर्जीव प्रस्तरमय पुतळ्याप्रमाणें त्याची क्रियाशक्ति बंद पडून देह स्थिरावला. लोक तिच्याकडे पहात होते. परंतु त्या दुःखदायी देखाव्यामध्यें अगदीं गुंग होऊन गेल्यानें कर्तव्य गोष्टीचा पूर्ण विसर पडलेली मंडळी दुसरें काय करणार? प्रत्येकाच्या अंतर्वृत्तीचा प्रवाह एकाच दिशेनें वहात होता. या जगांत असे कित्येक प्रसंग असतात कीं, त्यांच्या योगानें प्रत्येकाचें रुचिवैचित्र्य लयाला जाऊन त्यांचीं अंतःकरणें एकरूप बनतात. त्यांतलीच आतांची वेळ होती. गांवांतल्या लोकप्रिय व कर्त्या व्यक्तीचा नाश एकदम एकाच वेळीं झाल्यानें लोकांच्या मनांत सर्वत्र उदासीन विचार येऊं लागले. बाळमकरंदावर सर्व आशा ठेवून त्यांनीं आपल्या कल्पनासृष्टींत त्यास आपल्या मातापितरांचें उदार चरित्र अक्षरशः गिरवून लोकांत मानमरातब मिळविणारी एक लोकनायक अशी व्यक्ति बनविली. प्रभाकर आपल्या मूर्छेतून जागा झाला. कमलिनीवर त्याची दृष्टि लागली. मनोमय विचारांत तो गर्क झाला.

माधवरावाच्या शोककारक मृत्यूनंतर कमलिनीला जीवित असह्य होईल हें तो जाणून होता. तथापि एकमेकांच्या सहवासांत त्या अंतर्वेदना सह्य झाल्या असत्या अशी त्याची कल्पना कमलिनीच्या आकस्मिक मरणानें निष्फळ झाली. जिच्यावर आपण आपल्या आयुष्यांत निर्हेतुक निष्कपट प्रेम केलें ती आपली कमलिनी आज आपल्याला व अखिल जगाला पारखी झाली.

हा आपला ठेवा मृत्यूनें निष्ठुरपणें हिरावून नेला, याहून बलवत्तर दुःख या जगांत दुसरें काय बरें असणार? ईश्वरानें आपणावर आजपर्यंत जे प्रसंग आणले, ज्यांतून आजपर्यंत वांचविलें, त्या सर्वांचा शेवट अशा भयंकर प्रसंगांत व्हावा यापेक्षां अधिक असें एखादें दुःख अजून जगांत उरलें आहे का? आपण आपल्या मित्राला पोंचविण्याकरितां कोंकणांत गेल्यावर तेथून परत येईपर्यंत आपणावर कोणते प्रसंग ओढवले, जगांतला अनुभव घेत घेत आपण कित्येक वर्षांनीं घरीं परत आलों असतां मुकुंदरावांची तीर्थयात्रा व त्यांचा अज्ञातवास इत्यादि गोष्टी आपणास कशा कळल्या, आपण गुप्त रीतीनें जगांत वावरून कमलिनीच्या घरीं गेलों, तेथून रानांत आयुर्घाताकरितां गेलों, तेव्हां चोरांनीं पकडलें, नारायणाच्या हातून त्याहि प्रसंगीं झालेली सोवडणूक, दरवडेखोरांचा बेत कसा फसला, त्या वावटळींत मुकुंदरावांचा कसा घात झाला, सरस्वतीशीं पडलेली आकस्मिक गांठ, तिला आपण कां ओळखलें नाहीं? नारायण तिचा मुलगा असें आपल्याला कळलें नाहीं, कमलिनीच्या भेटी आपण चोरून घेतल्या त्याचा परिणाम कसा विपरीत झाला, आपल्या सहीचें फाजिल पत्र—आनंदीची गांठ—हाय हाय प्रेमविवाहाच्या नादानें ती किती बेफामपणें अघोर वर्तन करीत होती, माधवरावावर सूड घेण्याकरितां तिनें योजलेल्या धाडशी युक्त्या, त्यांचें निष्फलत्व, माधवरावाचें घरसोडी वर्तन, कमलिनीची उदात्त वृत्ति, तिच्या हालांची परंपरा, पत्राला खरें मानून चिडलेला माधवराव, त्याची क्रूर मुद्रा, पिस्तुल हातांतून गळलें, सरस्वतीचा घात, नारायणाची जन्मकथा, माधवराव—आनंदीचा सामना, दोघांचा नाश, आनंदीबाईची कहाणी, शेवटची याचना व तिला आपण दिलेलें उत्तर, शिव! शिव!— एकाच दिवशीं घडून आलेले चार मृत्यु, केवढा अनर्थ गुदरला!

इत्यादि सर्व गोष्टींच्या स्मरणानें प्रभाकर वेडावला. त्याची चर्या विलक्षण बनली. त्याला प्रस्तुत प्रसंगीं एकूनएक गोष्टी आठवल्या. त्याला आजचा प्रसंग व तीव्रपणें घडलेले मृत्यु आठवतांच त्याच्या सर्व शरीराला कंप सुटे व भावी काळांतहि त्या दिवशींची आठवण त्याच्या मनस्तापाला कित्येकदां कारण होत असे.

* * * *

झाल्या गोष्टींचा शांतपणें निकाल लावून आपल्या शिरावरचें काम निष्कामकर्मबुद्धीनें पार पाडल्यावर तिशी बत्तिशीच्या ऐन उमेदींत प्रभाकरानें परमार्थचिंतनार्थ या जगाला रामराम ठोकला. जगांत घडणाऱ्या दुःखपरिणामी गोष्टींचें चांगलें झणझणित अंजन त्याच्या डोळ्यांत पडल्यामुळें प्रेमाचें अंधत्व अंतश्चक्षूंवरून साफ नाहींसें झालेल्या त्याच्या मनाला आतां ऐहिक सुखाविषयीं पूर्ण तिरस्कार उत्पन्न झाल्यामुळें या जगांत रहाण्यांत किती लाभ आहे हें त्यास पूर्णपणें कळलें. विनाशी वस्तूंच्या प्रेमपाशांत जखडून भगवंताची विस्मृति होऊं देणें त्यास मुळींच इष्ट वाटलें नाहीं.

कमलिनीच्या घराची पहाणी करतांना त्याला कमलिनीच्या खास पेटींत एक स्वतःच्या नांवचें मुकुंदरावांनीं लिहिलेलें मोहोरबंद पाकीट सांपडलें. मुकुंदरावांच्या स्वतःच्या अक्षरांत पूर्णत्व पावलेलें आपलें नांव पहातांच त्याला गहिंवर आला. त्याच्या हृदयाचा उत्कटपणा इतका विलक्षण झाला होता कीं, त्या अक्षरांचें प्रतिरूप हृदयावर कोरून ठेवणें जर मानवी शक्तीला शक्य असतें तर त्यानें त्या नश्वर कागदावरचीं लवकरच विनाश पावणारीं अक्षरें जशींच्या तशींच काढून आपल्या हृदयावर आमरण कोरून ठेविलीं असतीं. कालाच्या गतींत ज्याप्रमाणें त्या कागदावरचीं अक्षरें पुसटून जावयाचीं होतीं त्याप्रमाणें थोड्याबहुत

फरकानें विश्वग्रंथांतल्या जीवनपत्रावरील मानवादि प्राण्यांचीं अक्षरेंहि साफ पुसुटून जायचीं आहेत हें तो विसरला नाहीं. विरागमय मनःस्थितींतहि मुकुंदरावांच्या अक्षरानें बद्ध असलेलें आपलें नांव त्या उपकारी महात्म्याच्या आमरण स्मरणार्थ आपल्या हृदयावर असावें असें त्याला वाटलें.

कष्टानें त्यानें तें पत्र फोडलें. त्यांतून निघालेल्या कागदावर प्रभाकराला उद्देशून कांहीं मजकूर लिहिला होता. प्रभाकराचा शोध पुष्कळ केल्यानंतर त्याचा जेव्हां पत्ता लागेना तेव्हां त्याच्याविषयीं मुकुंदरावांची पूर्ण निराशा झाली. यदाकदाचित् तो जिवंत असलाच तर कमलिनी दुसऱ्याची झाल्यावर त्याला अन्नवस्त्राची टंचाई पडूं नये ह्मणून पांच हजारांच्या रोख नोटा त्यांत प्रभाकराचे नांवानें पितृतुल्य 'बाबांनीं' ठेवल्याचें पाहून प्रभाकराचें हृदय भडभडून आलें. घडलेल्या सगळ्या गोष्टी मूर्तिमंत त्याच्या दृष्टीसमोर उभ्या राहिल्या.

सरस्वतीच्या मुलावर त्याचें सख्ख्या बंधूप्रमाणें प्रेम होतें. त्यानें आपल्या नांवचें सर्व द्रव्य त्याला देऊन टाकलें व मरणापर्यंत अविच्छिन्न व्याजाचें उत्पन्न करून दिलें.

शिक्षण व वर्धन या दोन गोष्टींची जबाबदारी त्यावर होती. ती पूर्णपणें पार पाडल्यानंतर त्यानें नारायण व मकरंदाची रजा मागितली. त्यांना ती कशी देववेल ? मातृपितृवियोगाच्या दिवसापासून अत्यंत आस्थेनें संगोपन करणाऱ्या पुरुषाला जाऊं देणें मकरंदाच्या मनाला इष्ट वाटेना ! चोरांच्या कचाट्यासारख्या विलक्षण प्रसंगीं ओळख पडलेली व्यक्ति आपली भावी काळांत हितकर्ती व्हावी आणि एकमेकांतील सहवासजन्य प्रेमाचे दुवे घट्ट बसल्यावर त्यांचा वियोग व्हावा ही गोष्ट नारायणाच्या मनाला पटेना.

ईशचिंतनाकरितां एकान्तच हवा असेल तर येथेंच तुह्माला आह्मी वेगळी जागा देतों ह्मणून त्या दोघांनीं विनवण्या केल्या. त्यानें काम भागत नाहींसें पाहून त्यांनीं त्यास नाशिक, वांई अगर यांसारख्या महाराष्ट्रांतील इतर क्षेत्रीं रहा अशी प्रार्थना केली. उत्तर हिंदुस्थानासारख्या दूर प्रान्तांत आपल्या हितकर्त्यास जाऊं देण्यास त्यांचीं प्रेमळ मनें तयार नव्हतीं यांत आश्चर्य काय?

नारायण वयानें प्रभाकरापेक्षां थोडा लहान होता. पण तो आतां पूर्ण वयांत आला असल्यानें त्याची काळजी वाहणाऱ्या प्रभाकराला त्याच्या विवाहाची चिंता उत्पन्न झाली. घरगुती शिक्षण मिळालेली सुस्वरूप, गुणवती, गरीब पण कुलीन घराण्यांतली एक मुलगी त्यानें नारायणास मोठ्या थाटानें करून दिली. सुशील शारदाबाईच्या प्रेमबंधनांत अडकलेल्या नारायणरावाचें मन फारच सात्विक बनलें. त्याला विद्येचा व्यासंग जबर लागल्यामुळें व भार्या अनुरूप मिळाल्यानें त्याचा काळ अधिक आनंदांत जाऊं लागला. मकरंदाची विशी उलटली. त्याचेंहि शिक्षण बी. ए. पर्यंत करून दिलें. नंतर त्यास मथुराबाईच्या सहवासाची शास्त्रसिद्ध जोड प्रभाकरानें लावून दिली. नारायणराव व मकरंदाचे संसार पाहून प्रभाकराच्या विरक्त मनाला क्षणभर आनंद झाल्यावांचून रहात नसे. प्रभाकराच्या जन्मकालापासून जवळ जवळ बेचाळीस संवत्सरें लोटलीं होतीं. वयाच्या वाढत्या प्रमाणाबरोबर त्याच्या अंतरंगांतहि फरक पडत होताच.

नारायणरावाच्या व मकरंदाच्या लहान बाळांनाहि प्रभाकरपंतांच्या नेत्रांतून एकान्तांत येणारे अश्रु पाहून आश्चर्य वाटे व ते आपल्या बोबड्या शब्दांनीं प्रभाकरपंताच्या डोळ्यांतल्या पाण्याबद्दल प्रश्न करीत असत. तेव्हां त्यांच्या जिज्ञासा तृप्त करण्या-

करितां त्यांच्या आजाआजीची शोककहाणी सांगणाऱ्या प्रभाकराचा कंठ दाटून त्या कथेंत भंग होत असे. मकरंद–मथुरेचें प्रेमस्थल असलेला मधुकर वाढूं लागला. नारायण शारदेचें बाळ कमलाकर पांच वर्षांचें झालें.

प्रभाकराच्या वयाला पन्नाशी उलटली.

* * * *

शारदाबाई व मथुराबाई यांचें परस्पर प्रेम व नारायण मकरंदाचा अन्योन्य अनुराग फारच प्रेक्षणीय होता. त्या दोघांचा संबंध आजन्म तसाच कायम होता. त्यांच्या संसारांतील सुखसमाधान पाहून मनाची तळमळ किंचित् शांत झालेले प्रभाकरपंत त्यांस सोडून मोठ्या निग्रहानें तीर्थयात्रेकरितां निघाले. सर्व तीर्थक्षेत्रांचें दर्शन होऊन मन शांत झाल्यावर आपण परत महाराष्ट्रांत येऊं असें त्यांनीं आपल्या मधुपुरस्थ मित्रमंडळीला सांगितलें होतें. पण त्यांच्या मनास चैन कधींच न पडल्यामुळें हरिद्वारास मठ बांधून त्यांनीं तेथें ईशाराधन चालविलें.

* * * *

आज प्रभाकर कृष्णाजिनावर तळमळत पडला आहे. त्याच्या भोंवतीं विरागी व्यवसायबंधु जमले असून त्याला अन्तिम निरोप ते बाष्पगद्गद कंठानें देत आहेत. प्रभाकराची विद्वत्ता—त्याचा विरक्तिसिद्ध सहवास आपणांस अंतरणार या कल्पनेनें त्यांस वाईट वाटत होतें. परमार्थाकरितां संसाराला अगदीं कंटाळलेली ही मंडळी सहवासानें मोहांत पडून मृत्युशय्येवर पडलेल्या प्रभाकराबद्दल मनांतल्या मनांत शोक करीत आहेत. प्रभाकराचे नेत्र निष्प्रभ होऊं लागले व मरणाची भेसुर छाया त्याच्या निर्विकृत चर्येवर पडतांच त्यानें जवळ असलेल्या एका जीवश्च कंठश्च मित्राला कांहीं तरी अगदीं मंद स्वरांत सांगून त्याजवळ

कांहीं तरी दिलें. सगळ्यांच्या डोळ्यांसमोर, पहातां पहातां, प्रभाकराची जीवनपत्रिका कालाच्या प्रचंड व अज्ञेय दप्तरांत कायमची सांठविली गेली. सर्वांना फारच शोक झाला.

*　　*　　*　　*

आज मधुपुरास मकरंद नारायण शोकाकुल होऊन हातांतलें पत्र वाचीत आहेत. ज्यांच्या सहवासांत मथुराबाई व शारदाबाई यांना आनंद वाटत असे, लहानपणीं पतिगृहीं आल्यानंतर ज्यांनीं त्यांना आपल्या प्रिय मातापितरांची जाणीव भासूं दिली नाहीं त्या प्रभाकर मामंजींचें मरणवृत्त त्या पत्रांत होतें. मधुकर व कमलाकर या बालकांनाहि आपल्या मानलेल्या आजोबांची वार्ता ऐकून फार वाईट वाटलें. लहानपणीं मकरंदाच्या गळ्यांत असलेला व कमलिनीनें आपण हरवण्यापूर्वीं प्रेमचिन्ह ह्मणून दिलेला स्फटिकमणी प्रभाकरानें पत्राबरोबर पाठवून दिला होता. त्या स्फाटिक मण्याची रोज भाविकतेनें ते पूजा करीत असतात व त्या स्फटिक मण्यामुळें अद्भुत कथेची स्मृति राखली गेली आहे. पत्रांतला मजकूर येणेंप्रमाणें--

" अनेक आशीर्वाद विशेष--

आज बरेच दिवस माझ्या प्रकृतीला बरें नाहीं. माझ्या आयुष्याचा शेवटचा पडदा पडून जगद्रंगभूमीवरची आमची भूमिका संपण्याचें चिन्ह दिसत आहे. जगण्याच्या सीमेची अंतिम रेषा दाखविण्याकरितांच अस्वास्थ्य उत्पन्न झालें आहे.

" माझ्याबरोबरच्या अनेक भूमिकांनीं आपलीं बरीं वाईट कामें माझ्यापूर्वींच आटपून सूत्रधारी प्रभूकडे आपआपला रोजमुरा घेण्याकरितां त्या निघून गेल्या आहेत. त्यामध्यें मला जीं पत्रें विशेष नजरेस येतात तीं हीं--एक कमलिनी व दुसरें आनंदी. पहिलीनें आपल्या पित्याच्या आज्ञेनुरूप शास्त्रसिद्ध संबंध माधवरावाशीं घडून आल्यावर एकनिष्ठपणें पतिसेवा केली. लहानपणीं दोघें

एकमेकांच्या प्रेमपूर्ण सहवासांत वाढलों असतां तिला कधीं कधीं माझ्याशीं विवाह झाल्यानंतर होणाऱ्या काल्पनिक सुखाची असलेल्या वर्तमान सुखाशीं तुलना करावीशी वाटली असल्यास तिच्या चरित्राचा विचार करणारांनीं तीस दोष देणें रास्त होणार नाहीं. मनाच्या निरंकुश प्रवर्तनाला बळी न पडतां आपल्या जुन्या चालीरीतींस अनुसरून पतीच्या आराधनांत ती सदैव निमग्न होती. मी तिच्याशीं प्रेमानें वागत होतों, पण माझ्या मनांतली स्वार्थ-परायणता तिनें स्वतःच्या पवित्र वर्तनानें पार घालविली. खरें प्रेम काय असतें याचा धडा तिनें मला व माझ्याप्रमाणें सगळ्या जगाला दाखविला असें मी समजतों. शिक्षणानें आपल्या वृत्ति उच्छृंखळ न होऊं देतां आपल्या स्वधर्मातच रत रहाणारी ती साध्वी ईश्व-राच्या दरबारीं खास पूज्य मानली जाईल. तिच्या पतीचें वर्तन दुसऱ्या पात्राच्या संबंधामुळें जरी पुष्कळ धरसोडीचें झालें असलें तथापि विवाहानंतर तरी तें आनंदीला पूर्ण वश असें कधींच झालें नाहीं. निष्ठुर काळानें जर त्यावर इतक्या लवकर झडप घातली नसती तर मानवी चरित्रांत कमलिनीचें जीवन फारच दिव्य असें दृष्टीस पडलें असतें. या ठळक पात्राची मीमांसा झाल्यावर मी दुसरीचा विचार करतों.

" आनंदीनें मला अंतकाळीं जी हकीकत सांगितली तीवरून ती ब्राह्मण घराण्यांतील असून बरीच शिकलेली होती. इंग्रजी शिक्षणानें हुरळलेल्या कित्येक तरुणींपैकीं ती एक असून त्या शिक्षणानें तिच्या मनांत भरलेल्या कित्येक भ्रामक तत्त्वांपैकीं 'प्रेमविवाह' हें एक तत्त्व होतें. याच्या पायीं तिनें आपल्या अल्पायुष्यांत अनेक मायावी रूपें धारण केलीं. 'प्रेमविवाहा' चें वचन देणाऱ्या माधवरावाचे घरीं सूड उगविण्याकरितां मूल संभा-ळणाऱ्या दाईचें काम पत्करलें. प्रसंग साधून त्यास आपल्या मूळ

स्वरूपाची ओळख दिली. तथापि कमलिनीच्या निर्व्याज प्रेमाला भुललेला माधवराव तिच्या ह्मणण्याला कधींच कबूल झाला नाहीं. माझ्या व कमलिनीच्या गुप्त भेटीचा विपर्यास करून तिच्या संसारसुखाचा विलक्षण शेवट घडवून आणण्याला तीच कारण झाली.

"तिनें मरतांना स्वतःचीं सगळीं कृत्यें अगदीं निष्कपटपणें सांगितलीं, त्यांवरून तिच्यांत एक गुण मला दिसला व तो ह्मणजे निर्विकार प्रेम. पण त्या प्रेमाचा पाया शुद्ध नसल्यामुळें माझ्या मतें त्याचा असा घोर शेवट झाला.

"तुह्मांला भावी काळांत मुली होतील, तेव्हां त्यांस शिक्षण देतांना या दोन स्त्रियांचें उदाहरण तुमच्यासमोर असूं द्या. शाळांतून दिलें जाणारें शिक्षण पुष्कळ दोषयुक्त आहे. प्राचीन काळीं आर्यस्त्रिया विद्यासंपन्न असत त्यांनीं आपल्या समर्थ पतींसही कुंठित केल्याचें आपण पुराणांतरीं वाचतों तथापि त्या स्त्रियांचीं उदाहरणें शिक्षणापुरतींच डोळ्यांपुढें ठेवून इतर चरित्राचे बाबतींत त्यांच्या पवित्रतम गुणांना फारकत देण्याची आमची सध्यांची प्रवृत्ति घातक आहे. स्त्रियांवर निसर्गानें नेमून दिलेलें काम जेणेंकरून उत्तम रीतीनें पार पाडणें सुलभ जाईल अशा तऱ्हेचें शिक्षण त्यांस दिलें पाहिजे.

पौरुषरसः स्त्रीणां कुतः सिध्यति ।

असें एक प्रसिद्ध कविवचन आहे. आमच्या स्त्रीशिक्षणाची दिशा चुकत आहे व मूळांतच चूक असलेलें शिक्षण परिणामीं घातक झाल्यास त्यांत नवल नाहीं. अशा रीतीनें जर हा क्रम राहिला तर पांच पन्नास वर्षांच्या अवधींत हिंदु स्त्रीपुरुषांच्या संसारांत भयंकर क्रांति घडून सर्वत्र भांडण, कज्जे, असंतोष, पावित्र्यनाश इत्यादि विपरीत गोष्टी दृष्टीस पडतील. आमच्या आर्यसंस्कृतीचा

नायनाट न व्हावा अशी जर इच्छा असेल तर आर्यधर्माचीं बंधनें आमच्या भावी प्रजेच्या मनावर कायम रहातील असें त्यांस शिक्षण द्या. माझ्यासमोर दिसणाऱ्या आनंदी–कमलिनीच्या अन्योन्य विरोधी व्यक्तींच्या जीवनचरित्रापासून हा बोध तुह्मीं घ्यावा अशी माझी इच्छा आहे.

" प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें मला अधिक लिहवत नाहीं. माझ्या मरणाबद्दल वाईट वाटूं देऊं नका. कारण निसर्गाचा हा नियम सर्वांस लागू असल्याचें कोणासहि निराळें समजावून द्यायला नको. ईश्वर तुह्मां सर्वांचें कल्याण करो. संसार विचित्र आहे. जपून असा. अधिक काय लिहावें ? "

" तुमचा सर्वांचा आमरणान्त हितेच्छु —प्रभाकर. "

ता. क. हें पत्र प्रभाकरस्वामींनीं लिहून ठेवल्यानंतर दुसऱ्या दिवशींच त्यांचें देहावसान झालें, त्यामुळें या पत्राची तुमच्या हातीं पडेल अशी व्यवस्था करण्याचें दुःखकारक काम माझ्यावर आल्यामुळें तें करतांना मला फार वाईट वाटत आहे. प्रभाकरस्वामींचा तुमच्यावर आमरण लोभ होता. त्यामुळें त्यांचें मरणवृत्त ऐकून तुह्मांस वाईट वाटेल, पण नाइलाज आहे. " जातस्य हि ध्रुवो मृत्युः " अथवा ' मरणं प्रकृतिः शरीरिणाम् ' इत्यादि वचनें तुह्मांस ठाऊक नाहींत ह्मणून मी तीं देतों असें नाहीं. फक्त प्रसंग ओढवल्यावर मोहभरांत मनुष्याला तीं आठवेनाशीं होतात ह्मणून मी तीं येथें लिहीत आहें. मायेनें हें सगळें जग व्याप्त आहे. करितां तिचा निरास करण्याचा तुह्मी प्रयत्न करा. ईश्वर तुह्मां सर्वांचें कल्याण करो ! !

प्रभाकर स्वामींप्रमाणेंच तुमच्या
सर्वांचें हित इच्छिणारा
हरिद्वारस्थ ' कोणीतरी '

पत्र वाचून झाल्याला वर्ष सहा महिने गेले. त्यानंतर आह्मी एकदां आमचे मित्र ह्मणून उन्हाळ्याचे सुट्टींत मकरंदपंतांचे घरीं मधुपुरास गेलों होतों. तेथें सहज बोलण्याच्या ओघांत त्यांनीं प्रभाकरपंतांचे तोंडून वारंवार ऐकिलेली आपल्या मातापितरांची हृदयंगम व अद्भुत गोष्ट आह्मांस ऐकविली. ती ऐकत असतां आमचें मन अगदीं तन्मय झालें होतें व आह्मांस त्या गोष्टीचें राहून राहून आश्चर्य वाटत होतें. नंतर ही हकीकत पुस्तकरूपानें लिहून प्रसिद्ध करावी ह्मणजे लोकांना उपयोग होईल असें जाणून आह्मीं आपली इच्छा प्रदर्शित केल्यावर मकरंदपंतांनीं तसें करण्यास परवानगी दिली. त्या काळच्या हृदयस्थ इच्छेस आमची लेखणी आज शब्दरूपानें मूर्त स्थितींत प्रसवली आहे. रसिक वाचकवृंदाला ती रुचेल किंवा नाहीं हें निश्चित सांगणें फार साहसाचें होईल. तरी हा आमचा नूतन प्रयत्न आहे, इकडे लक्ष देऊन ते हिचा सर्वस्वीं अनादर करतील असें वाटत नाहीं. शेवटीं

मधुलिह इव मधुबिंदून् विरलानपि भजत गुणलेशान् ।

या कव्युक्तीनें त्यांची प्रार्थना करून लेखणी खालीं ठेवतों.

---

ॐ तत्सत्.

समाप्त.

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १५ | २२ | हृद्रत | हृद्गत |
| ३३ | २० | बाबतींमध्यें गुलाम-गिरीपासून | बाबतींमध्यें सामाजिक गुलामगिरीपासून |
| ३३ | २१ | स्वतंत्र | स्व-तंत्र |
| ३३ | २६ | ज्या शृंखलांनीं | ज्या सामाजिक शृंखलांनीं |
| ३७ | ६ | स्वतंत्र | स्व-तंत्र |
| ९५ | २४ | त्यांच्या | त्याच्या |
| ११५ | १ | मंदत्त्व | मंदत्व |
| १३३ | १३ | साहाजिकच | साहजिकच |

# प्रेमपरीक्षा.

( बोधप्रद आणि मनोरंजक सामाजिक कादंबरी )

संक्रमणावस्थेमध्यें असलेल्या आपल्या समाजाला जर योग्य दिशा लागेल तर समाजाचें हित होईल. अयोग्य दिशा लागेल तर समाजाची हानि होईल. भलत्याच प्रकारच्या शिक्षणानें आमच्यांतील कांहीं तरुणांच्या डोक्यांत वेडेचार कसे शिरतात आणि त्यांच्या योगानें संसाराचें कसें मातेरें होतें हें या पुस्तकावरून कळून येईल. किंमत बारा आणे.

**अष्टेकर आणि मंडळी.**

सदाशिव पेठ पुणें.



## मनोरंजक पुस्तकमाला.

छापत आहे. ] [ छापत आहे.

पुस्तक तिसरें.

# वत्सला आणि अभिमन्यु.

'वत्सलास्वयंवर' हें पौराणिक कथानक पुष्कळांना ठाऊक असेल. या अद्भुत कथेला नवीन वळण देऊन त्या[illegible] जास्त माधुरी आणली आहे. अभिमन्यूला वत्सला [illegible]ण्याची नाहीं, कशा [illegible] [illegible] त्कची माय! [illegible] पासून एकमेकांच्या [illegible] वाढलेल्या या जोडप्याचा प्रेमसंयोग कसा घडवून आणला याचें चटकदार व [illegible]संपूर्ण नवीन या कादंबरींत मार्मिक व रसिक वाचकांस पहावयास सांपडेल.

अष्टेकर आणि मंडळी
सदाशिव पेठ पुणें श[illegible]